# विठ्ठल गावस यांच्या कथासंग्रहांचा अभ्यास

## (Vitthal Gawas Yanchya Kathasangrahancha Abhyas)

**एम.ए. (मराठी) पदवीसाठी सादर केलेली संशोधन प्रबंधिका**

**MAR-651 DISCIPLINE SPECIFIC DISSERTATION**


**मराठी अध्ययनशाखा**

शणै गोंयबाब भाषा आणि साहित्य महाशाळा

**गोवा विद्यापीठ**

अभ्यासक

**उर्मिला बेतू गावस**

हजेरी क्र.: 22P0190029

ABC ID: 295694288427

पी. आर: 201809209

मार्गदर्शक

**विनायक ल. बापट**

(सहायक प्राध्यापक)

शणै गोंयबाब भाषा आणि साहित्य महाशाळा

मराठी अध्ययनशाखा



गोवा विद्यापीठ

**शैक्षणिक वर्ष २०२३ – २०२४**

# VITTHAL GAWAS YANCHYA KATHASANGRAHANCHA ABHYAS

**Submitted in partial fulfilment of Masters Degree**
**MA in Marathi**

**MAR-651 DISCIPLINE SPECIFIC DISSERTATION**

**Marathi Discipline**
Shenoi Goembab School of Language & Literature
**Goa University**

by


**Urmila Betu Gawas**

Seat No: 22P0190029
ABC ID: 295694288427
PR No.: 201809209


Under the supervision of


**Vinayak L. Bapat**
(Assistant Professor)
**Marathi Discipline**
Shenoi Goembab School of Language & Literature


**Goa University**
**2023 – 2024**

## DECLARATION BY STUDENT

I hereby declare that the data presented in this Dissertation report titled, "विठ्ठल गावस यांच्या कथासंग्रहांचा अभ्यास" is based on the results of investigations carried out by me in the Marathi Descipline at the Shenoi Goembab School of Language and Literature, Goa University under the Supervision of Vinayak Laxman Bapat and the same has not been submitted elsewhere for the award of a degree or diploma by me. Further, I understand that Goa University or its authorities / College will be not be responsible for the correctness of observations/ experimental or other findings given the dissertation.

I hereby authorize the University/college authorities to upload this dissertation on the dissertation repository or anywhere else as the UGC regulations demand and make it available to any one as needed.

UGawas.

Urmila B. Gawas

Seat no: 22P0190029

Date: 16/04/2024

Place: Goa University

## COMPLETION CERTIFICATE

This is to certify that the dissertation report " **विठ्ठल गावस यांच्या कथासंग्रहांचा अभ्यास** " is a bonafide work carried out by Ms. Urmila Betu Gawas under my supervision in partial fulfilment of the requirements for the award of the degree of **Masters of Arts** in the Discipline Marathi Descipline at the Shenoi Goembab School of Language and Literature, Goa University.

18/4/2024

**Vinayak Laxman Bapat**

Date: 18/4/2024

Signature of Dean of the School

Date: 25/04/2024

Place: Goa University

School Stamp

# मनोगत

नवीन अभ्यासक्रमाचा भाग म्हणून पदव्युत्तर पदवीच्या द्वितीय वर्षासाठी प्रबंधिका लेखन करावे लागते. या प्रबंधिका लेखनासाठी ‘विठ्ठल गावस यांच्या कथासंग्रहांचा अभ्यास’ हा मी विषय निवडला. विठ्ठल गावस यांच्या कथासंग्रहांचा वाङ्मयीन अभ्यास व्हावा हा उद्धेश या लेखनामागे आहे. या अभ्यासाला प्रारंभ करण्यापूर्वीपासून आजपर्यंत अनेक सहृदयांचे सहकार्य आणि मार्गदर्शन मला लाभले आहे. या सर्वांविषयी कृतज्ञता व्यक्त करणे हे माझे प्रथम कर्तव्य आहे.

एम. ए प्रथम वर्षाच्या अभ्यासक्रमा अंतर्गत गोमंतकीय साहित्याचा अभ्यास या विषया अंतर्गत विठ्ठल गावस यांच्या फिंगर बाऊल या कथासंग्रहाचा अभ्यास करण्यात आला होता. त्यावेळी प्रा. जयेश गावकर सरांच्या मार्गदर्शनामुळे लेखक विठ्ठल गावस आणि त्यांचे साहित्य वाचण्या विषयीचे कुतूहल मनात निर्माण झाले. प्रा. पूर्वा वास्त मॅडम यांनी मला विठ्ठल गावस यांच्या लेखनाचा अभ्यास करण्याची प्रेरणा दिली.

प्रा. विनायक लक्ष्मण बापट, गोवा विद्यापीठ हे माझ्या या संशोधन प्रबंधिकेसाठी मार्गदर्शक म्हणून मला लाभले. त्यांनी निवडलेल्या विषयाला योग्य मार्गदर्शन केले व माझ्या विचारांना योग्य दिशा दिली. सरांच्या प्रेरक मार्गदर्शनामुळे या संशोधनाबाबत आत्मविश्वास निर्माण झाला. सरांमुळे अनेक गोष्टी स्पष्ट झाल्या तसेच साहित्याकडे पाहण्याचा दृष्टिकोण अधिक व्यापक झाला. सरांचे अनमोल मार्गदर्शन, आणि निरपेक्ष सहकार्य माझ्यासाठी एक अमूल्य ठेवा आहे. त्यामुळे सरांची मनःपुर्वक आभारी आहे.

या अभ्यासासाठी मला गोवा विद्यापीठाच्या ग्रंथालयांची मदत झाली. या ग्रंथालयाचे ग्रंथपाल आणि सर्व कर्मचारी वर्ग यांचेही आभार. त्यात विशेष आभार ग्रंथपाल डॉ. संदेश देसाई त्यांनी कर्तव्यापलिकडे जाऊन केलेली मदत माझ्या नित्य स्मरणात राहील. त्याच प्रमाणे हे कार्य पूर्णत्वास नेण्यास कळत नकळत अनेकांनी मदत केली आहे. त्या सर्वांची मी आभारी आहे.

# विठ्ठल गावस यांच्या कथासंग्रहांचा अभ्यास

## अनुक्रमणिका


| अ. क्र | विषय | पृ. क्र |
|---|---|---|
| Declaration | | |
| Completion certificate | | |
| मनोगत | | |
| प्रस्तावना | | १-४ |
| १. | कथा: स्वरूप व संकल्पना | ४-२० |
| २. | गोमंतकीय मराठी कथा आणि विठ्ठल गावस यांचे वाड्मयीन योगदान | २१-४६ |
| ३. | विठ्ठल गावस यांच्या कथेतील जीवन चित्रण | ४७-७४ |
| ४. | विठ्ठल गावसांच्या कथांतील व्यक्तीचित्रणांचा अभ्यास | ७५-९३ |
| ५. | विठ्ठल गावास यांच्या कथांचे वाड्मयीन मूल्यमापन | ९४-१११ |
| ६. | सामारोप आणि निष्कर्ष | ११२-११५ |
| परिशिष्टे | | ११६-१२३ |

# प्रास्ताविक

मराठी साहीत्याच्या क्षेत्रात गोमंतकीय लेखकांनी महत्वाचे योगदान दिले आहे. १९०५ साली प्रादेशिक साहीत्य ही संकल्पना उदयास आली. गोमंतकीय लेखकांनी मराठी साहीत्य समृद्ध करण्यासाठी बरेच योगदान दिले आहे. गोव्यातील कृष्णदास सामा किंवा शामा यांचा 'श्रीकृष्णचरित्रकथा' हा गोमंतकाचा आद्य मराठी ग्रंथ मानला जातो. गोमंतकीय मराठी कथेची लिखित परंपरा याच ग्रंथा पासून सांगता येते. १९२६ च्या कालखंडात वि. स. सुखटणकर यांनी मराठी कथाविश्वात क्रांती घडवून आणली.

१९२६ ते स्थूलमानाने १९४५ पर्यंचा नवकथेचा उदय होईपर्यतचा काळ मराठी लघुकथेच्या विकासाचा तिसरा टप्पा मानला जातो. १९६१ साली गोवा पोर्तुगीज राजवतीतून मुक्त झाला. गोवामुक्ती नंतर गोमंतकीय कथेने नवे रूप धारण केले आणि त्यासाठी नवकथा ही संज्ञा वापरली जाऊ लागली. प्रल्हाद वडेर, नरेश कवडे, मूरलीधर कुलकर्णी, यशवंत कर्णिक यांनी ही नवकथा अधिक समृद्ध केली.

नव्वोदोत्तर कालखंडात नव्याने मराठी शिक्षण घेतलेल्या तरुण वर्गातून, वैशिष्ट्यपूर्ण कथालेखन होऊ लागले. नव्या दमाचे लेखक म्हणून विठ्ठल गावस, अशोक घाडी, चंद्रकांत गावस, डॉ. विठ्ठल ठाकूर, नारायण महाले, मोरेश्वर मराठे, दासू शिरोडकर, अवधूत कुडतरकर, डॉ. सु. म. तडकोड, जयराम कामत, ज्ञानेश्वर कोलवेकर, मिलिंद म्हामल, गजानन देसाई, उदय नाईक यांचा उल्लेख केला जातो.

विठ्ठल गावस हे याच कथाकारांपैकी एक प्रसिद्ध गोमंतकीय कथाकार आहेत. त्यांचे चार कथासंग्रह व एक कादंबरी प्रकाशित झाली आहे. या प्रबंधिका लेखनाचा विषय 'विठ्ठल गावस यांच्या कथासंग्रहांचा अभ्यास' असा असून विठ्ठल गावस यांच्या एकूण चार कथासंग्रहांचा अभ्यास होणार आहे. ‘कॅथरीन’, ‘ओझें’, ‘लवण’, ‘फिंगरबाऊल’ या कथासंग्रहांचा अभ्यास येथे करण्यात येणार आहे. त्यांच्या लेखनातुन ग्राम संस्कृतीच दर्शन घडतं त्याचा आढावा घेतला जाणार आहे. श्रद्धा- अंधश्रद्धा, जात-पात, ग्रामीण- शहरी, दोन पिढी मधला अंतर असे अनेक विषय त्यांच्या लेखनात आले आहे. त्यांच्या लेखनातून सांस्कृतिक, भौगोलिक, सामाजिक दृष्ट्या गोमंतक बदलत असलेले संदर्भ आढळतात याचा अभ्यास या प्रबंधिकाद्वारे केले जाणार आहे. हा विठ्ठल गावस यांच्या कथा लेखनाचे वाङ्मयीन मूल्यमापन करण्याचा प्रयत्न आहे.

**संशोधन विषयक समस्या**

- विठ्ठल गावस हे नव्वोदोत्तरी काळातील कथाकार असल्याने त्यांच्या कथांवर अजूनपर्यंत अभ्यास झाल्याचे आढळून अलेले नाही.
- गोमंतकीय प्रादेशिक कथेचा संशोधनात्मक अभ्यास कमी प्रमाणात झालेला आहे.

**संशोधनाची उपयुक्तता**

- काळानुसार कथेत बरेचसे बदल घडून आले आहेत. कथेची पारंपारिक चौकट सांभाळून कथाकारांनी नवे प्रयोग स्वीकारले आहेत. या नाविन्याचा शोध घेणे आवश्यक ठरते.
- प्रादेशिक लेखनातील वैशिष्ठे जाणून घेण्यास उपयुक्त ठरेल.
- गोमंतकीय साहित्याच्या पारंपारिक ठेव्यात नवीन भर पडेल.
- गोमंतकीय संस्कृतीचा, समाजाचा, नितीमूल्यांचा, बदलत्या जनजीवनाचा अभ्यासाचा उपयोग प्रादेशिकता जाणून घेण्यास उपयुक्त ठरेल.

**संशोधन कार्यामागची उद्धिष्ट्यें**

- विठ्ठल गावस यांच्या कथांतील आशयामध्ये दिसून येणाऱ्या बदलत्या समाज जीवनाचे संदर्भ तपासणे.
- विठ्ठल गावस यांच्या  लेखनातुन ग्रामीण पार्श्वभूमीचा वेध घेणे.
- विठ्ठल गावस यांच्या लेखनातून गोमंतकीय संस्कृती, रूढी, परंपरा, जीवन शैली, यांचा आढावा घेणे.
- विठ्ठल गावस यांच्या कथेतील पात्रांचा अभ्यास करणे.
- विठ्ठल गावस यांच्या कथांचे वाङ्ग्यीन मूल्यमापन करणे.

**गृहितकांची मांडणी**

- विठ्ठल गावसांच्या कथामधून बदलत्या गोमंतकीय जीवन शैलीच चित्रण घडते.
- विठ्ठल गावस यांच्या कथांतून गोमंतकीय ग्रामीण जीवनाचे दर्शन घडते.

- विठ्ठल गावस यांच्या साहित्यकृतीतून पारंपारिक गोमंतकीय जीवन जाणीवा दिसून येतात.
- विठ्ठल गावस यांच्या कथांतील पात्रे शोषक आणि शोषित वर्गाचं प्रतीनिधीत्व करतात.
- विठ्ठल गावस यांच्या मराठी कथा पुढच्या वळणावर घेऊन जाणाऱ्या आहेत.

**संशोधन पद्धती**

- ऐतिहासिक संशोधनपद्धत
- वर्णनात्मक संशोधनपद्धत
- सर्वेक्षण संशोधनपद्धत

**संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा**

विठ्ठल गावस यांच्या चार कथासंग्रहांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

दिवाळी अंक, वृत्त पात्रांतुन प्रकाशित झालेल्या लेखांचा किंवा कथांचा विचार या प्रबंधात केला जाणार नाही.

**संशोधन आराखडा**

| |
|---|
| प्रकरण१ : कथा: संकल्पना व स्वरूप |
| प्रकरण२ : गोमंतकीय मराठी कथा |
| प्रकरण३ : विठ्ठल गावस यांच्या कथेतील जीवन चित्रण |
| प्रकरण४ : विठ्ठल गावस यांच्या कथांतील व्यक्तिरेखांचा अभ्यास |
| प्रकरण५ : विठ्ठल गावस यांच्या कथेंचे वाङ्मयीन मूल्यमापन |
| प्रकरण ६ : समारोप आणि निष्कर्ष |

# प्रकरण १

# मराठी कथा: स्वरूप व संकल्पना

# मराठी कथा: स्वरूप व संकल्पना

## प्रस्तावना

कथा हा मानवाच्या जन्मा पासूनच अस्तित्वात आलेला एक प्रकार आहे. भाषेचा शोध लागण्यापूर्वी मानवाने ज्या ठिकाणी आश्रय घेतला तेथे रंग रंगोटीच्या साहाय्याने स्वतः व्यक्त होण्याचा प्रयत्न केला. मानवाला ज्यावेळी भाषेचा शोध लागला तेथून मानवाच्या व्यक्त होण्याच्या पद्धतीत बदल झाला. मानव आपले विचार, भावभावना शब्दांच्या व ध्वनींच्या माध्यमातून व्यक्त करू लागला आणि तेथूनच कहाण्या, गोष्टी निर्माण होऊ लागल्या. तेव्हापासून कहाणी सांगणे, गोष्टी सांगणे ही मानवाची एक अभिव्यक्ती ठरली. तेव्हापासून कथेच्या मौखिक परंपरेला सुरुवात झाली.

माणसांवर संस्कार करणारा एक प्रकार म्हणून कथेकडे पहिले जाते. आजी आजोबांनी सांगितलेल्या देवादिकांच्या, राजाराणीच्या, पऱ्या, राक्षसभुतांच्या कथांतून मुलांचे कल्पनाविश्व संपन्न होतं गेले. वाढत्या वयाबरोबर पऱ्या, राक्षसभुतांच्या गोष्टीकडून शूरवीरांच्या साहसकथा, रहस्यमय कथा, गूढरम्य, ऐतिहासिक कथा यांच्याकडे वळू लागते. स्वभाविकतः तारुण्य अवस्थेत मानवी मनात भावनीक बदल होत असतात. प्रौढ वयात प्रेम कथांचे आकर्षण तरुण मंडळीमध्ये असते. प्रेम, भोवतालचे जीवन, माणसांची सुखदुःखे या सारख्या गोष्टी ऐकण्याची इच्छा मानवी मनात निर्माण होत असते. 'कथा' ही मानवाला जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर पोषक बनवत असते. कथेकडे गंभीर विषय साध्या सोप्या पद्धतीने प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहोचविण्याचा कल असतो.

काळ जसा बदलला तसे माणसाने जीवनात आलेले छोटेमोठे प्रसंग व अनुभव दुसऱ्याला सांगण्यासाठी लवचिक, सुटसुटीत अशी रचना करण्यास सुरुवात केली. आदिमकाळात भूतेखेते, जादू-टोणे, दैवीकथा या सांगितल्या जायच्या, धर्म ग्रंथातून व संतचरित्रातून नितीकथा सांगितल्या गेल्या, पंचतंत्र व इसापनीतीतून प्राणिकथा सांगितल्या जाऊ लागल्या. प्राचीन काळात अशा प्रकारे सांगितलेल्या गोष्टी मध्ययुगीन काळात पोवाडा, बखर यातून सांगितल्या जाऊ लागल्या. त्यांचे विषय मात्र राजा, राजवाडे, शूरवीरांच्या शौर्यकथा असे होते. पुढे बालमनाला रिझवण्यासाठी अद्भुतरम्य कथा लिहिल्या जाऊ लागल्या त्यात चातुर्य कथा, अरेबियन नाईट्स सारख्या कथा सांगितल्या जाऊ लागल्या. आधुनिक काळात कथेला

विकसित असे स्वरूप प्राप्त झाले. इंग्रजीतील शॉर्ट स्टोरी या साहित्य प्रकारापासून मराठीत लघुकथा हा प्रकार रूढ झाला.

मराठी लघुकथा ‘करमणूक’ पासून १८९० पासून सुरु झाली. लघुकथा हा सगळयात लोकप्रिय वाङ्मयप्रकार ठरला. या वाङ्मयप्रकाराचा जागतिक इतिहास मानवाच्या जन्मापासून असलेला जाणवतो. लघुकथा हा वाङ्मयप्रकार बऱ्याच लेखकांनी हाताळला आहे. लोकप्रिय प्रसिद्ध असलेल्या लेखकांबरोबरच गंभीरवृत्तीने लेखन करणाऱ्या साहित्यिकांनी लघुकथा हा साहित्यप्रकार आपल्या लेखनासाठी निवडला. काळानुसार साहित्यनिर्मिती करणाऱ्यांनी लघुकथा हा वाङ्मयप्रकार रंजक बनवण्याचा प्रयत्न केला. १९व्या शतकात मासिके सुरु झाली आणि त्यामुळे लघुकथेची मागणी वाढली. त्यानुसार कथालेखकांच्या पिढ्या निर्माण झाल्या.

## १.१ मराठी कथा स्वरूप

कथा हा मराठी साहित्यातील एक लोकप्रिय साहित्यप्रकार आहे. कथेचे मुख्य प्रयोजन कथन करणे हे असते. मानवी जीवनात भाषेचा वापर होऊ लागला तेव्हा पासून गोष्टी, कहाण्या या मौखिक रूपाने सांगितल्या जाऊ लागल्या. परंपरागत कथा सांगण्याची व ऐकण्याची एक पद्धत मानवी जीवनात रूढ झाली. कथा सांगण्याच्या प्रक्रियेत निवेदक व ऐकणारा असे दोन घटक जन्मास आले. निवेदक हा काळानुसार कथालेखक या रुपात साहित्यात व समाजात वावरू लागला. त्याचप्रमाणे ऐकणारा, श्रवण करणारा हा कथेचा वाचकवर्ग बनला. भाषेच्या जन्मापासून मानवी जीवनात कथा सांगण्याच्या प्रवृत्तीतून काहाण्यांची रचना होऊ लागली. या काहाण्यांमध्ये पुढे परिवर्तन घडून आले व कथेने वेगवेगळी रूपे धारण केली. कथेचा हा प्रवास काहाण्यांपासून लघुकथेपर्यंत प्रकट झाला आहे. काळानुसार कथाकथन करण्याच्या पद्धतीत त्यातील विषयात बदल घडु लागले. मध्ययुगीनकाळात जाणीवपूर्वक कथा निर्मिती केली जात नव्हती. मात्र मराठीतील कथेची अनेक रूपे मध्ययुगीन काळापासून सांगता येतात. 'परमहंसकथा', लीळाचरित्र, संतसत्पुरुषांच्या 'चमत्कार' कथा, 'दृष्टान्तपाठ', 'स्वयंवरकथा' अशी काही कथेची पूर्वरूपे सांगता येतात. या कथांरूपात रंजन आणि नितीशिक्षण याचा अंतकार्य होता. काही भागात लोककथा गाण्याच्या माध्यमाने सादर केल्या जात होत्या. त्या लोककथा परंपरागत एका पिढीकडून दुसऱ्या पिढीपर्यंत मौखिक पद्धतीने संक्रमित होत गेल्या. त्या लोककथांचे कथा सांगणे किंवा कथन करणे हाच मुख्य हेतू होता. या पूर्वापार आलेल्या परंपरेत कथा या प्रकारचे प्रयोजन हे

केवळ कथन करण्यापूर्तीच मर्यादित होते. जाणीवपूर्वक कथा निर्मिती ही या काळाची गरज तसेच प्रयोजनही नव्हते. त्यासाठी तत्कालीन काळातील कथा सांगण्याला 'कथालेखन' असे संबोधणे अयोग्य ठरेल.

१९व्या शतकापासून कथा हा साहित्यप्रकार रूढार्थाने साहित्यात अवतरला. कथेची वाटचाल ही मौखिक परंपरे पासून लिखित परंपरे पर्यंत झाली. कथा या लवचिक व स्फूट स्वरूपाच्या असतात. कथेचा स्फूटगोष्टी म्हणूनच उल्लेख केला जातो. भाषांतरयुगात इंग्रजी व संस्कृत अशा दोन्ही भाषेतील कथा भाषांतरित रुपात असलेल्या आढळतात. सुरुवातीच्या काळात अनेक मासिकांसाठी कथा लिहिल्या जात होत्या. ती कथा वाङ्मयीन दृष्ट्या दुबळी होती, तरीही कथा विकासाची सुवर्ण पावले म्हणून त्याकडे बघता येते. इंग्रजीतील 'शॉर्टस्टोरी' पासून मराठी कथेने स्वतःचे रूप शोधले. कळत नकळत मराठी कथेचे मूळ रूप परंपरेपासून तुटले गेले. कथेच्या या विकसनशील प्रवासात कथेने निरनिराळे रुपविशेष स्वीकारलेली दिसतात. पूर्वी कथेचा विचार केवळ कथन करण्याच्या घटकार्यंतच केला जायचा. कालांतराने व्यक्तिचित्रण, घटनाप्रसंग, संघर्ष, अनुभव, संवाद, भाषाशैली, निवेदन असे अनेक घटक कथेत आढळू लागले.

प्राचीन काळात कथेचे रूपे लोककथा, परीकथा, दैवतकथा, गोष्टी असे होते. आधुनिक काळात मात्र कथेच्या स्वरूपात बदल घडून आले. आधुनिक काळात कथेची प्रयोजने बदलली. कथेची सादरीकरणाची पद्धतीत किंवा कथा लेखनात परिवर्तन झाले. आधुनिक काळातील कथेचे प्रयोजन हे रंजन करणे किंवा प्रबोधन करणे इथपर्यंतच मर्यादित न राहता त्यापेक्षा वेगळे ठरले. "कथा या साहित्यप्रकाराचा इतिहास केवळ शंभर दीडशे वर्षाचाच असला तरीही जगात सर्वात अधिक लोकप्रिय साहित्यप्रकार कथा हाच आहे." [१] असे मत प्रा. म. द. हातकणंगलेकर यांनी मांडले आहे. १९०१ साली ब्रॅडर मॅथ्यूज यांनी 'द फिलॉसॉफी ऑफ द शॉर्टस्टोरी' हा निबंध लिहिला. अमेरिकन लेखक एडगर एलेन पो. याने १८४२ साली कथेच्या स्वरूपाची चर्चा केली. पो. यांनी कथेला 'गद्य गोष्ट' असे संबोधले. "मोजकी पात्रे, प्रसंग, वातावरण इ. घटकांच्या अचूक जुळणीने कथा आकाराला येते व वाचकांच्या मनावर एकच एक संस्कार करते." [२] असे मत पो. यांनी म्हटले आहे.

कथा या साहित्यप्रकारांचे संकल्पना वा स्वरूप जाणून घेण्यासाठी कथेच्या घटकांचा विचार करावा लागतो. कथेत अनुभव, कथानक, व्यक्तिरेखा, वातावरण, भाषा, हे महत्वाचे घटक आहेत. अनुभव म्हणत असताना मानवी जीवनात वेगवेगळे अनुभव मानवाला येत असतात. ते अनुभव काव्यात्म, गंभीर, नाट्यत्म,

विनोदगर्भ उपरोधिक स्वरूपाचा, चिंतनशील असे असतात. कथाकार या मानवी अनुभवांवर एक कल्पित कथाविश्व आपल्या कथालेखनासाठी उभे करत असतो. त्यातून एकंदरीत कथाकार मानवी जीवनाचा आशयच प्रामुख्याने चित्रित करत असतो. कथा प्रकार म्हणत असताना भयकथा, रहस्यकथा, विज्ञानकथा, अद्भुतकथा, ग्रामीण कथा असे सांगता येतात. कालांतराने या कथा प्रकारात प्रयोग केले जाऊ लागले व त्यातूनच कथेचा 'लघुत्तम प्रकार' पुढे आला. कथेत जसजसे परिवर्तन होत गेले त्याचप्रमाणे कथेची संकल्पना टप्याटप्यावर बदलत गेलेली दिसते. मौखिक परंपरेत केवळ रंजकतेच्या हेतू पासून स्वतःच्या वेगळेपणाने स्वतःचे अस्तित्व साकारणारा हा प्रकार १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात वाचकप्रिय व विशिष्ठ प्रयोजनाच्या हेतूने विकसित झाला. त्याचप्रमाणे १९ व्या शतकातील मुद्रणकलेशी निघडित राहून नियतकालिकांच्या साहाय्याने लोकप्रिय ठरला. करमणूक, मनोरंजन, यशवंत, रत्नाकर, सत्यकथा या नियतकालिके व मासिकांनी कथेच्या विकासाला हातभार लावलेला दिसतो.

काव्-चिऊच्या कथा, परीकथा, प्राणीकथा या प्रारंभीच्या काळातील कथा ज्या मौखिक स्वरूपाने सांगितल्या जायच्या. ती कथा तपशील मांडणारी, पाल्हाळीक निवेदन करणारी व बोध करणारी होती. तिला एक विशिष्ट स्वरूप नव्हते. साहित्याच्या तंत्रापासून अलिप्त असलेली ती कथा होती. ना. सी. फडके, वि. स. खांडेकर यांच्या कालखंडापासून कथेच्या तंत्राचा विचार केला गेला. त्यामुळे कथेत बदल झाला पण तो वरवरचा ठरला. कथेची गुणवत्ताही वाढली नाही. कथेचे ते तंत्र नाकारणाऱ्या कथाही निर्माण झाल्या. विभावरी शिरुरकार, वामन चोरघडे सारख्या लेखकांनी कथेला कथानाकापासून मुक्त करण्याचा प्रयत्न केला. शेवटी १९४५ नंतर लघुकथेचे स्वरूप बदलले. लघुकथेचे 'नवकथेत' रुपांतर झाले. या नवकथेने विषयांची बंधने नाकारली. कथेत अनेक प्रयोग घडू लागले. नवकथा अधिक प्रगल्भ व गंभीर बनली. नवकथेत मानवी मनाचे गूढ व्यापार चित्रित झालेले दिसतात.

१९६० नंतर कथा या साहित्यप्रकारावर अनेकांगांनी चर्चा होऊ लागली तरीही कथेला ओहोटी लागली. काही कथाकारांनी कथा या साहित्यप्रकारावर टीका ही केली होती. कथा हा हिणकस आणि क्षुद्र प्रकार असल्याची टीका भालचंद्र नेमाडे यांनी केली होती. त्यांच्या मते, ‘‘लघुकथा हा कमी लांबीचा, चिंचोळा भाषिक अवकाश पुरवणारा, एक सूत्री आशयसूत्रातून स्थलकालाचे संकुचित, म्हणून तीव्र, संवेदन देणारा प्रकार आहे.’’[३] तरीही याच काळात गौरी देशपांडे, कमल देसाई, विलास सारंग, श्याम मनोहर, दिलीप चित्रे

यांनी कथाक्षेत्र स्वतःची लक्षणीय कामगिरी निभावली. कथेचे तंत्र आणि आशय यादृष्टीने या कथाकारांचा प्रयोग महत्वाचा ठरतो. नवकथेने वास्तव जीवनदर्शन, मनोविश्लेषण, अस्तित्वाचा शोध गंभीरपणे विचारात घेतला. १९६०-८० या काळात साहित्यात वेगवेगळे वाङ्मयीन प्रवाह अस्तित्वात आले. वाङ्मयीन प्रवाहामधील कथांमधून कथेने मानवी जीवनाचा शोध घेतला. नवकथाकारांनी कथेला अनुभववर्ग बनविले होते. नवकथेत संज्ञाप्रवाहाचा वापर, फ्लॅश बॅक पद्धत, प्रतीकांचा वापर केला जात होता. कथेने मध्यमवर्गीय जीवनातील काही विषयांवर प्रहार केला जसे की संकुचितपणा आणि अनैतिक धारणा. मानवी मनाचे अंतरंग उलघडून दाखविण्याचे कार्य नवकथेने केले. ग्रामीण व दलित प्रवाहामुळे कथेचे रूप बदलल्याचे आढळते. ग्रामीण कथेने ग्राम जीवन, ग्राम संस्कृती, ग्राम समाज वाचकांसमोर आणला. तर दलित कथाकारांनी माणसांच्या कल्याणाचा विचार, शोषण व शोषित वर्गाचे चित्र, काळजातून बाहेर पडणारा विद्रोह यांचे प्रभावी दर्शन कथेतून घडविले. ग्रामीण आणि दलित कथेमुळे मराठी कथा मध्यमवर्गीय जाणिवांचा पलीकडे पोहोचली. एकंदरीत स्वातंत्रोत्तर काळातील मराठी कथा वेगवेगळे पदर उलगडणारी ठरते. आधुनिकतेचे पदर, जगण्यातले ताणेंबाणे, स्त्री पुरुष संघर्ष, नात्यातील गुंतागुंत या सगळ्या विषयांचा सखोल वेध घेणारी कथा या काळात आढळते. नवीन विषया बरोबर कथेचे आशय व अभिव्यक्तीची विविध रूपे प्रकट झाली. कथेच्या रुपात काळानुसार बरेच बदल घडून आले. समाज बदलला त्याच प्रमाणे कथेतील विषयात वेगळेपणा आला. त्याचप्रमाणे वाङ्मयीन स्तित्यंतरामुळे हि कथेत बदल घडून आले.

कथेची संकल्पना समजून घेताना असं म्हणता येतं की मानवी जीवनाचा आशय सांगण्यासाठी कथेचे कल्पित कथाविश्व कथाकार निर्माण करतो. कथा हा सांगण्याचा, कथनकरण्याचा प्रकार आहे. कथेत निवेदक असतो. कथेचे निवेदन हे काही वेळा पात्रांच्या माध्यमातून केले जाते तर काही वेळा कथाकार स्वतः निवेदकाची भूमिका साकारत असतो. निवेदनाच्या माध्यमातून कथाकार कथानकाची निर्मिती करत असतो. घटनाप्रसंग वा पात्रांच्या कृतीतून कथेच्या कथानकाचे निवेदन केले जाते. मानवी मनातील कुतूहल, उत्कंठा वाढत राहील अशी कथानके कथाकार निवडत असतात. कथेत निवेदन करणारी पात्रे हि भौगोलिक व सामाजिक परिसरातच असतात. कथेतील वातावरण हे पात्रांच्या वा निवेदकाच्या माध्यमातून निर्माण केले जाते. प्रत्येक पात्राचे व्यक्तिमत्व, ओळख, वैशिष्ट्य त्यातूनच उभे राहते. कथेची भाषा ही प्रसंगानुरूप वापरली जात असते. विसाव्या शतकात साहित्यात वेगवेगळे प्रवाह आले. त्यातूनच बोलीभाषेचे उपयोजन कथालेखानात होऊ लागले. कथेला संवादांची जोड दिली जाऊ लागली. संवाद हा कथेचा गौण भाग असला

तरीही कथानक उभारणीत तो महत्वाचा घटक बनला. सामान्यतः कथा हि आरंभ, मध्य व शेवट अशा स्वरूपानेही साकारते.

कालांतराने स्त्रिया लिहू लागल्या. स्त्री आपल्या मनातील भावना शब्दरूपाने व्यक्त करू लागल्या. १९८० हा काळ स्त्रीवादी दृष्टिकोन प्रबळ होत जाण्याचा कालखंड आहे. स्त्रीवादी लेखन या काळात प्रामुख्याने आढळते. या काळात कथेला स्त्रीवादी, स्त्रीकेंद्री अशी रूपही लाभली. लेखनातून स्वतःचे अस्तित्व सिद्ध करण्याचा हा चांगला प्रयत्न होता. या काळातील कथेने आधुनिकतेचे भयावह चित्र व मानवी जीवन अधिक विस्तृत केलेले दिसते. श्याम मनोहर, रंगनाथ पठारे, जी.के.ऐनापुरे, जयंत पवार, राजन गवस, विलास सारंग, भारत सासणे  इ. काही प्रातिनिधिक कथाकारांनी नावे घेता येतात. या कथाकारांचा लेखनातून बदलत्या काळाचे चित्र आणि जगण्यातले भिन्न भिन्न प्रश्न त्यांच्या कथेतून आढळतात. बदलत्या काळानुसार कथेत झालेले हे बदल कथेची संकल्पना निश्चित होते, पण ही संकल्पना स्थिर असलेली दिसून येत नाही.

## १.३ कथेच्या व्याख्या

कथेचे स्वरूप हे व्यामिश्र आहे तरीही काही अभ्यासकांनी केलेल्या व्याख्या येथे जाणून घेणे आवश्यक आहे. पाश्च्यात्य त्याच प्रमाणे काही भारतीय लेखकांनी कथेच्या व्याख्या मांडल्या आहेत.

'एनसायक्लोपिडीया ब्रिटानिकात' 'Short Story' या शब्दाविषयी पुढीलप्रमाणे माहिती दिली आहे,

“The short story is a kind of prose fiction, usually more compact and intense than the novel and the short novel (novelette).” [४] (The New Encyclopaedia Britannica, volume 16, Helen Hemingway, Benton, Page 117)

वरील व्याख्या पाहता ती कादंबरी पेक्षा कथेचे वेगळेपण स्पष्टपणे नोंदविणारी व्याख्या ठरते. पाश्चात्य अभ्यासकांनी कथेचे तंत्र सांगताना तिचे लघुत्व, तिचे एकाकेंद्रीत्व, तिची संरचना, तिची महत्वपूर्ण परिणाम साधण्याची क्षमता इत्यादी गोष्टीना महत्व दिले आहे.

आधुनिक लघुकथेचा जनक एडगर एलन पो याने सर्वप्रथम १८४२ मध्ये लघुकथेची व्याख्या केली. 'A skillful artist has constructed a tale. If wise, he has not fashioned his thoughts to

accommodate his incidents, but having conceived with deliberate care, a certain unique or single effect to be brought out, he then invents such incidents, he then contrives such effects, as may best aid him in establishing this preconceived effect. If his very initial sentence tends not to the outbringing of this effect, then he has failed in his first step. In the whole composition there. should be no word written, of which the tendency direct or indirect, is not to the pre-established design.' [५]

पो ने कथेच्या पूर्वनियोजित परिणामांना महत्व दिले आहे. एखाद्या कथेतून एकच एक परिणाम साधण्यासाठी अनावश्यक असलेल्या गोष्टी कथेने टाळल्या पाहिजे. असे सांगून पो ने लघु कथेच्या तंत्राला महत्व दिले आहे.

Albright- "The short story is not a cut down novel." [६]

Albright यांच्या मते कथा हा एक स्वतंत्र साहित्यप्रकार आहे. त्यांनी कथेला कादंबरी पासून वेगळे स्थान देण्यावर भर दिला आहे. असाच आशय व्यक्त करणारी आणखीन एक व्याख्या Barry Pain यांनीही केली आहे.

"The idea that a story can be or should be a novel in a nutshell is absurd." [७]

Barry Pain यांच्या मते एखाद्या कादंबरीचा आशय संक्षिप्त स्वरुपात सांगण्यात काही अर्थ नाही. कथा हा पूर्णपणे एक वेगळा साहित्यप्रकार आहे त्याचे तंत्र कादंबरीपेक्षा वेगळे आहे यावरच भर देणाऱ्या व्याख्या पाश्चात्य अभ्यासकांनी प्रामुख्याने केल्या आहेत.

तंत्र आणि मंत्र या दोहोंचा संबंध साधणारी व्याख्या भारतीय लेखक ना. सी. फडके यांनी केली आहे.

"कमीत कमी पात्र व कमीत कमी प्रसंग वापरून थोड्या वेळात परिणामकारक रीतीने सांगितलेली व ऐकणाऱ्याच्या मनावर एकच एक ठसा उमटविणारी हकीगत म्हणजे लघुकथा होय." [८]

ना. सी. फडके यांच्या मते कथेत कमीत कमी पात्र असतात, प्रसंग मोजकेच असतात. कथेत कमीत कमी वेळात वाचकांच्या व ऐकणाऱ्याच्या मनावर परिणाम करण्याचे सामर्थ्य असल्यास तिला लघुकथा म्हणावी. ना. सी. फडके यांनी मांडलेल्या व्याख्येत पो ने सांगितलेल्या लघुकथेच्या लक्षणांचा उल्लेख झाला आहे.

कथा हा इतर वाङ्मय प्रकाराच्या तुलनेत नवा आहे या संदर्भात इंदुमती शेवडे यांनी व्याख्या मांडली आहे.

"आदिकाळापासून कथा कुठल्या ना कुठल्या स्वरूपात अस्तित्वात असल्याचे आढळते. जगातील विभिन्न भाषीय वाङ्मय तपासले तर त्यांचा पाया कथनात्मक असल्याचे दिसून येईल. याचा अर्थ असा की, कथा हा एखादा कृत्रिम वाङ्मयप्रकार नसून तो मूलतः काही उपजत मानवी प्रवृत्तींशी निगडित असा एक जिवंत व मूलभूत वाङ्मयप्रकार आहे. वाङ्मयप्रकारात लघुकथेचा जन्मक्रम शेवटचा लागतो, या दुसऱ्या घटनेचे महत्त्व असे की, मानवास साहित्याच्या कलात्मकतेची जाणीव झाल्यानंतर निर्माण झालेल्या साहित्यप्रकारात कथा ही शेवटची झाली. म्हणजे स्वतंत्र वाङ्मयप्रकार म्हणून स्वतःचे वेगळे अस्तित्व व आकार प्राप्त होण्यासाठी कथेला एकोणिसाव्या शतकापावेतो म्हणजे पो, हॉथार्न, स्टीव्हन्सन, मोपांसा, चेकॉव्ह इत्यादी लेखकांचा जन्म होईतो वाट पहावी लागली. याचा अर्थ असा की आधुनिक काळात एक वाङ्मयप्रकार म्हणून कथेला प्राप्त झालेले स्वरूप अत्यंत विकसित आणि अवघड अशा कलाप्रकाराचे आहे. " [९]

इंदुमती शेवडे यांनी कथा हा वाङ्मयप्रकार पूर्णपणे नवीन नसून मूलतः काही उपजत मानवी प्रवृत्तींशी निगडित असा वाङ्मयप्रकार असल्याचे सांगितले आहे. आधुनिक काळात अत्यंत विकसित स्वरूप प्राप्त झाले अशी भूमिका त्यांनी मांडलेली आहे.

कथा कथन करण्याच्या पद्धतीवर वा. ल. कुलकर्णी यांनी लघुकाथेची एक व्याख्या मांडली आहे.

"कथात्म साहित्याला अत्यावश्यक ठरणाऱ्या सर्व महत्त्वपूर्ण घटकांची अल्पावकाशात साधलेली अर्थपूर्ण संघटना म्हणजे लघुकथा. " [१०]

वा. ल . कुलकर्णी यांनी कथेच्या पूर्वनियोगीत परिणामांना महत्व दिले आहे. अल्पावकाशात साधलेल्या अर्थपूर्ण व महत्वपूर्ण घटकांच्या संघटनेला लघुकथा म्हणावी अशी भूमिका वा. ल. कुलकर्णी यांनी घेतली आहे. यांची व्याख्या पो ने सांगितलेल्या व्याख्येशी एकात्म साधणारी आहे.

कथेतून घडणाऱ्या व्यापक जीवनदर्शना संदर्भात सुधा जोशी यांनी आपले मत मांडले आहे.

"कथेचे हे 'स्व'त्व, विशेषतः कादंबरीहून प्रकारदृष्ट्या असलेले तिचे स्वतंत्र अस्तित्व ध्यानात घेतले की कादंबरीचे लघुरूप म्हणून कथेचा विचार करणे जसे गैर, तसेच तुलनेने कथेला गौण, दुय्यम साहित्यप्रकार

मानणे हेहि अप्रस्तुत हे स्पष्ट होते. स्फुट असला तरी त्यामुळे कथा हा साहित्यप्रकार फुटकळ स्वरूपाचा ठरत नाही. संपन्न कलानुभव देण्याची क्षमता कथेत आहे, याची प्रचिती देणारे साहित्य अनेक भाषांत आढळते.” [११]

वरील सर्व व्याख्या अभ्यासल्यावर स्वतःची कथा विषयी एक व्याख्या मांडली आहे.

"मानवी जीवनातील अनुभवांचे अल्पावकाशात अभिव्यक्त करण्याची पद्धत म्हणजे लघुकथा."

## १.४ कथेचे प्रकार

भाषा हि एक ध्वनी संकेत प्रणाली आहे. तिचा ज्यावेळी मानवाला शोध लागला तेव्हापासून मानवी जीवनाची एक मौखिक परंपरा निर्माण झाली. ह्या परंपरेतूनच कथा अस्तित्वात आल्या. कथेची परंपरा हि मौखिक कथा, लोककथा, लिखित कथा अशी आहे. तिचा थोडक्यात आढावा इथे घेण्यात येत आहे.

### १.४.१ मौखिक कथा

मानवाला ज्या वेळी भाषा अवगत झाली त्याने आपले विचार, आपल्या भावभावना, आपल्या जीवनातील घटना, प्रसंग एकमेकांना सांगण्यास सुरुवात केली. तेथून मौखिक कथा निर्माण झाल्या. मानावाद्वारे प्रस्तुत झालेल्या ह्या कथा पुढे मौखिक स्वरूपातच एका मानवा कडून दुसऱ्या पर्यंत संक्रमित होत गेल्या. आजपर्यंत अनेक मौखिक कथा ज्याचा करता अज्ञात असलेल्या कथा समाजात प्रचलित आहेत. मानवाची आद्य कथा निर्मिती हि मौखिक कथा असे म्हटले जाते. या मौखिक परंपरेतूनच अनेक लोककथा अस्तित्वात आल्या.

### १.४.२ लिखित कथा

मानवाला ज्यावेळी भाषेची लिपी अवगत झाली तेव्हापासून कथा लिहिल्या जावू लागल्या. गद्य कथा वाड्मयात सर्वात पुरातन कथा ही पपैरस कागदावर लिहिलेली लोककथा असे मानले जाते. इंग्रजी संशोधकांनी त्याला ‘टेल्स ऑफ मॅजिशिअन्स’ असे नाव दिले. त्या नंतर इजिप्तच्या राजाच्या मुलाची कथा, बायबल मधील कथा, महाकथा इ. वाड्मय हे प्राचीन लिखित कथा आहेत.

मौखिक कथेचे काही प्रकार दैवत कथा, परीकथा, प्राणीकथा, बोधकथा इ अनेक कथांचा समावेश लोककथेत केला जातो.

दैवत कथा

या कथांतून देव देवतांचे श्रेष्ठत्व, भक्ती भाव जपून ठेवण्याच्या हेतूने या कथांची निर्मिती झालेली दिसून येते. या कथेंचे मुख्य विषय हे देव दैवतांकडून राक्षसांचा नाश, चमत्कार, दैवतांची शक्ती हे असलेले जाणवतात. या कथा सर्व मानव समूहात असलेल्या दिसून येतात.

परीकथा

या कथा नायक व नायिका यांच्या अवतीभवती फिरणाऱ्या असतात. या कथांतून त्या दोघांचा संघर्ष, त्या दोघांचे अद्भुतरम्य जीवन चित्रित केलेले असते. या कथातून चमत्कार घडलेले दिसून येतात. या कथांचा शेवट हा नेहमी सुखात्मक असतो.

प्राणीकथा

या कथातून नीती उपदेश केलेला असतो. ही कथा पृथ्वीच्या कोणत्याही एका ठिकाणी निर्माण होते व पुढे जाऊन त्या कथेंचे संस्करणे अनेक देशात केले जाते. स्थळकाळानुसार या कथांतील प्राण्यांची नावे बदलतात.

बोधकथा

बोधकथा या शब्दावरूनच आपणास लक्षात येते कि बोध देण्याच्या हेतूने ह्या कथा निर्माण झाल्या आहेत. कोणतेही मूल्य समाजात रूजविण्यासाठी या कथा निर्माण झाल्या आहेत. या कथातून वाईट कृत्यांवर चांगल्या मुल्यांचा झालेला विजय झाल्याचे दाखविले जाते.

लोकसाहित्याची दखल ही सर्वात प्रथम पाश्चात्य अभ्यासकांनी घेतली होती. पाश्चात्य अभ्यासकांच्या प्रेरणेतू भारतीय अभ्यासकांनी लोकसाहित्याचे संकलन केले व ते उजेडास आणले. भारतीय लोकासाहीत्याकडे अभ्यासकांनी १९ व्या शतकात लक्ष केंद्रित केले. त्यात महाराष्ट्रातील वि. का. राजवाडे, शं. घो. दाते, दुर्गा भागवत, वि. वा. जोशी इ. अभ्यासकांचा उल्लेख करावा लागतो. या लोककथांचे विषय हे निसर्ग सौरक्षण संबंधित कथा, सण संबंधित कथा, यांचा सामावेश होतो. त्याच प्रमाणे या लोककथांमध्ये

अलिखित कथांचाही समावेश होतो. त्यात कथा पुराणे, कीर्तनातून सांगितल्या जाणाऱ्या आख्यान गोष्टी, धार्मिक कथा इ. कथा संत मंडळी आपल्या कीर्तनातून सादर करत असत.

### १.४.३ लिखित मराठी कथा

महानुभाव साहित्यापासून लिखित कथा वाङ्मयाची सुरुवात झाली. 'लिळाचरित्र' याचे संकलन महानुभाव पंथातील म्हाइंभट यांनी केले आहे. त्यांनी त्यातील प्रसंग हे कथा रूपाने सांगितले आहे. त्याच प्रमाणे 'दृष्टांतपाठ' हे हि कथा रूपातच मांडल्या आहेत. या मराठीतील पहिल्या कथा समजल्या जातात. मराठी कथेची सुरुवात तंजावर येथील सरफोजी राजे यांनी लिहून घेतलेल्या 'बालबोध' आणि 'इसापनीती' या ग्रंथापासून खऱ्या अर्थाने झाली. हे दोन्ही मराठीतील पहिले छापील कथासाहित्य होय.

## १.५ कथेचे घटक

### १.५.१ कथानक

कथानक हे साहित्यकृतींचे मूलसूत्र आहे. कथानकामुळे एखादा वाङ्मयप्रकार यशस्वी होत असतो. विविध घटनांच्या संघटनेतून कथानक आकारास येत असते. ई. एम. फॉस्टरने कथानकाचे 'गोष्ट' व 'कथानक' अशी दोन स्वरूपभेदांची मांडणी केली आहे. त्याच्या मते घटनांच्या संघटनेत कालानुक्रमाच्या तत्वा नुसार घटनांची मांडणी केली असेल तर अशा रचनेला 'गोष्ट' म्हणावे. घटनांच्या मालिकेत कालानुक्रमाच्या जोडीने कार्यकारणभावाचे सूत्र क्रियाशील असेल तर त्याला 'कथानक' म्हणता येते. कथात्म साहित्यात दोन कालात्म क्रिया अंतर्भूत असतात. एक म्हणजे घटनांचे नैसर्गिक कालक्रमानुसार घडणे आणि दुसरी म्हणजे घडलेल्या घटनेचे निवेदकाने कथन करणे या दोन भिन्न क्रिया यान अंतर्भूत असतात. काही वेळा कथात्म लेखनात या कालक्रमव्यवस्थेत बदल घडवून आणले जातात व त्यांनी अभिनव क्रमव्यवस्था घडविली जाते. साहित्यकृतीच्या कालात्म गरजेनुसार आणि स्वतःच्या सौंदर्यदृष्टीनुसार कथाकार घटनांची सौंदर्यनिष्ठ क्रमव्यवस्था निर्माण करत असतो. घटनांची कालक्रमव्यवस्था म्हणजे गोष्ट आणि त्या गोष्टीच्या सर्जनशील लेखनाने कथानक निर्माण होते. कथानक हे व्यक्तीतील संघर्षामुळे बहरते. कथेतील घटना संघर्षमय व नाट्यमय असणे आवश्यक असते. अन्य वाङ्मयप्रकारा पेक्षा कथेचे कथानक लवचिक असते. कथा यशस्वी करण्यासाठी

कथेचे कथानक गतीमान असणे गरजेचे ठरते. कथानक आकर्षक बनविण्यासाठी लेखक पात्रांचा, घटना प्रसंगांचा अधूनमधून वापर करत असतो. कथानक हे पूर्ण कथेला गुंफून ठेवत असते.

**१.५.२ व्यक्तिचित्रण**

कथात्म साहित्यात कथानक हे मुलसूत्र असले तरीहि कथेतील व्यक्ती किंवा पात्रे त्या कथानकाला घडवत असतात. कथात्म साहित्य घटनांच्या जोरावर उभे राहते. या घटना नैसर्गिक, भौतिक, असतात. या घटना कथेतील पात्रांवर संस्कार करत असतात. कथानक आणि पात्र हे घटक परस्परसंलग्न असतात. एकाबाजूने कथानक पात्रांना घडवत असतं तर दुसऱ्याबाजूने पात्रेही घटना घडवून कथानक गतिमान करत असतात. अशा प्रकारे कथानक कथात्म साहित्याचा गतिशील घटक ठरतो. कथात्म साहित्यातील पात्र हे शब्दांच्या साहाय्याने लेखक उभारत असतो. कथाकार त्या पात्रांचे अंतरंग व बहिरंग स्पष्ट करण्यासाठी विविध मानवी गुणवैशिष्ट्यांचा वापर करत असतो. त्याचे बोलणेवागणे, स्वभाव, वृत्तीप्रवृत्ती, भावविश्व, भाषा, जीवनदृष्टी इत्यादींच्या चित्रणातून कथाकार पात्र साकारत असतो.

पात्र या घटकाची प्रामुख्याने दोन अंगे सांगितली जातात. पात्रचित्रण आणि पात्रस्वरूप अशी दोन अंगे कल्पिली जातात. कथाकाराच्या कलादृष्टीतुन तो पात्र घडवीत असतो आणि अशा पत्रचित्रणाला कथासंहितेचे अंग असते म्हटले जाते. कथाकाराच्या पात्रचित्रणा नुसार वाचक स्वतः त्या पात्रांची एक काल्पनिक प्रतिमा स्वतःच्या मनात निर्माण करत असतो. ती प्रतिमा निर्माण करण्यासाठी वाचकाकडे साहित्यिक ज्ञानक्षमता व कल्पकता असणे आवश्यक ठरते. कथात्म साहित्यात मूर्त असणारे पात्र हे स्वतंत्र नसते. कथेच्या परिपूर्णतेच्या दृष्टीने पात्र व कथानक हे परस्परांशी बांधले गेलेले असते. पात्र हे कथेच्या अर्थसमष्टीचा महत्वाचा घटक असतो. साहित्यकृतीतील पात्रे ही पूर्णपणे काल्पनिक असतात. त्या पात्रांना संहितेपलीकडे अस्तित्व नसते. साहित्यकृतीत पात्रांचे स्थान व कार्यानुसार त्यांचे प्रमुख पात्र व दुय्यम पात्र असे वर्गीकरण केले जाते. नाट्यत्म साहित्याप्रमाणेच कथात्म साहित्यातही नायक, खलनायक, प्रतिनायक इ पात्रांची रूपे आढळतात. पूर्ण कथानकात ज्याला प्राधान्य दिले जाते ते प्रमुख पात्र त्यासाठी 'नायक' हि संकल्पना उल्लेखली जाते. पात्रांच्या स्वरूपानुसार द्विमिती व त्रिमिती असे पात्रांचे दोन प्रकार ई. एम. फॉर्स्टरने मांडले आहे. याला स्थिर पात्र व परिवर्तनशील पात्र असे म्हणतात. द्विमिती स्वरूपाची पात्रे सामान्यतः परिवर्तनशील नसतात. कथानकात घडणाऱ्या कुठल्याच प्रसंगातून त्यांच्या स्वभावात, गुणधर्मात बदल घडवून येत नाही. मोजक्याच

व्यक्तिविशेषांमुळे किंवा स्तिथीशिलतेमुळे ती व्यक्तिरेखा साहित्यकृतीत वावरताना दिसतात. त्रिमिती स्वरूपाची पात्रे साहित्यकृतीत अधिक वावरणारी दिसून येतात. ती व्यामिश्र, अनेक गुणवैशिष्ट्यपूर्ण परिवर्तनशील असतात. सर्वच साहित्यकृतीत द्विमिती आणि त्रिमिती स्वरूपाची पात्रे अशाच पद्धतीने वावरत असतात असे नाही. त्यात काही बदलही घडू शकतो अशी मते देखील मांडण्यात आली आहे.

### १.५.३ वातावरण

कथात्म साहित्यातील घटक हे काल्पनिक असतात. कथाकाराच्या कलादृष्टीतून ते शब्दरूपाने संहितेत उतरत असतात. पात्र, घटना, कथानक हे कथाविश्वाचे महत्वाचे घटक असतात. या बरोबरच स्थलकालबद्ध वातावरणही या कल्पित विश्वाचा मूल घटक मानला जातो. या कल्पित पात्रांच्या कृतिउकृतीतून, कालाच्या अवकाशातून कथाकार एकसूत्री असे वास्तव घडवीत असतो. साहित्य हा समाजाचा आरसा असतो. म्हणून प्रत्यक्ष वास्तव आणि कल्पित वास्तव या दोघांमध्ये परस्परसंबंध असतो. लेखक ज्या समाजात वावरतो, तो जे काही अनुभवतो त्याची अनुकृती तो कल्पित स्वरूपाने आपल्या लेखनात मांडत असतो. जेव्हा लेखक एका स्थळाचा, एखाद्या प्रदेशाचा व अवकाशाचा नावासह उल्लेख आपल्या लेखनात करतो तेव्हा ते सुद्धा त्याच्या कल्पकतेने निर्माण केलेले वास्तव असते. त्याचे अस्तित्व त्या साहित्यकृतीपुरतेच असते. कधी कधी वातावरण निर्मिती करत असताना कथाकार ते पूर्णतः आभासीक स्वरूपाचे करत असतो. त्यात कथाकार कधी एक नवा प्रदेश, संस्कृती इत्यादी चे चित्रण करतो तर काही वेळा अद्भुत, काल्पनिक, विश्व निर्माण करतो. कथाकाराने निर्माण केलेल्या या कल्पित वास्तवाचे वाचक आपल्या क्षमते नुसार एक मानसिक वास्तवाची प्रतिमा स्वतःच्या मनात निर्माण करत असतो.

### १.५.४ निवेदक

कथात्म साहित्यात निवेदक हे एक कल्पित पात्र कथाकार घडवीत असतो. निवेदक हे दोन प्रकारचे असतात. काही वेळा निवेदक हा प्रत्यक्ष साहित्यकृतीत पात्र म्हणून वावरत असतो किंवा तो त्रयस्थ, म्हणजे कथाविश्वात अदृश्य स्तिथीत असतो. जेव्हा निवेदक एक पात्र म्हणून साहित्यकृतीत असतो त्यावेळी त्याचे निवेदन हे 'प्रथमपुरुषी निवेदन' ठरते. त्रयस्थ प्रकारचे निवेदन हे सतत 'तृतीयपुरुषी' असते. निवेदकांचे उपप्रकारही असतात. प्रथम पुरुषी निवेदन हे मुख्य किंवा दुय्यम पात्राच्या स्वरूपाने केले जाते. त्रयस्थ निवेदनाचे देखील दोन मुख्य प्रकार असतात. निवेदक हा साहित्यकृतीत सर्वसाक्ष म्हणून वावरत असतो तर

काहीवेळा सर्वसामान्य माणूस म्हणून एक निरीक्षकाची भूमिका साकारत असतो. निवेदक हा कथेतील घटनांचे एका विशिष्ठ दृष्टिकोनातून कथन करीत असतो. निवेदन हे सर्वसाक्षी त्याचप्रमाणे स्थळ, कालबिंदूशीही निवडीत असते. निवेदकाचे साहित्यकृतीतील पात्रांशी भावसंबंध भिन्न प्रकारचे असू शकतात. निवेदकाची काही वेळा त्या भावनिक बंधनात अडकण्याची शक्यता असते, त्याचप्रमाणे त्याने या सर्वाकडे तटस्थ वृत्तीने पाहण्याची संभवता असते. कोणत्याही साहित्यकृतीत निवेदन हे एकाच प्रकारे केलेले आढळत नाही. लेखकाच्या गरजेनुसार कथाविश्वातील निवेदन पद्धत बदलत असते. निवेदकाचा आवाज हा त्याने केलेल्या विशिष्ट दृष्टिकोनातून एखाद्या प्रसंगांचे विशिष्ट शैलीत, भाषेत केलेले निवेदन असते. निवेदक हा लेखक स्वतःच्या काळाहेतूने कथाविश्वात निर्माण करत असतो. त्या निवेदकाचा साहाय्याने लेखक साहित्यकृतीतील पात्र, घटनाप्रसंगाची संघटना करत असतो. निवेदकाचे निवेदन हे सविस्तर, तपशीलवार तर कधी संक्षिप्त, ढोबळ स्वरूपाचेही असते.

संवाद हा निवेदनाचाच एक प्रकार आहे. साहित्यकृतीतील संवाद हे पात्रांच्या तोंडी निघणारे असले तरीही निवेदकाचे अस्तित्व त्यात असते. पत्रांच्याद्वारे निवेदक दोन प्रकारे निवेदन करत असतो. एकतर निवेदक आपल्या दृष्टिकोनातून पात्रांचे बोलणे संक्षिप्त स्वरूपात सादर करत असतो तर दुसऱ्याबाजूने पात्राच्या माध्यमातून पत्रामुखाने वदवत असतो. या दुसऱ्याप्रकारात संवाद, स्वगत भाषण, संभाषण यांचा समावेश होतो. पात्रचित्रणासाठी कथाविश्वात संवाद महत्वाचे ठरतात. पात्रांचे गुणधर्म, स्वभाव वैशिष्ट्ये, वृत्तीप्रवृत्ती, विचारप्रणाली, संस्कृती इत्यादी गोष्टी संवादामुळे प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे साहित्यकृतीत स्पष्ट होत असते. संवादामुळे कथाविश्वात नाट्यत्मकता काहीप्रमाणात निर्माण होत असते. पात्रांच्या बोलण्याच्या शैलीवरून पात्रांचे व्यक्तिमत्व मूर्त होत असते. पात्रांचे एकमेकांशी संवाद साधण्याच्या कृतीतून कथानक गतिमान होत असते. प्रसंगनिर्मितीत संवादाचा सहभाग असतो. त्याचप्रमाणे वातावरण, स्थलकालनिर्मिती हि संवादातून साधली जाते. कथा अर्थपूर्ण व मूलयुक्त ठरविण्यासाठी कथेच्या अन्य घटका बरोबरच संवादांचेही मुलभूत प्रयोजन असते.

### १.५.५ भाषाशैली

भाषा हे मानवाला मिळालेले वरदान आहे. भाषेमुळे मानव प्रगतशील बनला. भाषेमुळे मानव स्वतःचे आचार विचार, भावभावना व्यक्त करू शकला. भाषेला मानवी जीवनात अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले

आहे. मानवाने या भाषेला शब्दरूपही दिले. शब्द हे भाषेचे शरीर असे म्हटले जाते. लेखकाच्या मनात असलेले विचार साहित्यरूपाने रसिकासमोर साकारले जातात. म्हणून लेखक व वाचक यांमध्ये संदेशवहनाचे कार्य या भाषाशैलीमुळे घडते. भाषेबाबत लिहिताना डॉ. भालचंद्र नेमाडे असे म्हणतात की, "खास मानवी अशी संदेशवहनाची व्यवस्था म्हणजे भाषा होय."[१२] म्हणून खरोखरच भाषा ही व्यक्तीव्यक्तीत विचारांची देवाणघेवाण करणारी एक महत्त्वाची संस्था आहे, असे दिसून येते.

जेव्हा ही भाषा साहित्यरूपाने प्रगट होते तेव्हा जीवनातील वास्तवाचे प्रकटन होत असते. दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, आदिवासी साहित्य इ. प्रकारचे साहित्य आपण जेव्हा वाचतो तेव्हा त्या साहित्यातील भाषाशैलीमुळे तेथील घटनाप्रसंग व समाजजीवन आपल्या डोळयांसमोर जिवंतपणे उभे राहते. विशिष्ट पात्राच्या तोंडून येणारे शब्द त्या त्या प्रादेशिक जाणिवा, बोलीतील आशय, परंपरा, श्रद्धा, संस्कृती चित्रित करत असते. म्हणून भाषा म्हणजे कलाकृतीतील आशयाचा एक अपरिहार्य असा आविष्कार असतो.

सामाजिक स्तरानुसार सुशिक्षित-अशिक्षित माणसांच्या बोलण्यातून व्यक्त होणारा आशय भाषेत बांधला जातो. ग्रामीण बोलीभाषा व प्रमाणभाषा या प्रकारांनुसार त्या त्या वेळी साजेशी भाषा साहित्यात मांडली जाते. काळानुसार भाषेत सतत परिवर्तन घडत असते. भाषा ही व्यक्तीनुरूप, प्रदेशानुरूप, समाजनुरूप, भौतिक पर्यावरणानुरूप बदलत असते. शैली म्हणत असताना ती एक पद्धत असते. ती पद्धत व्यक्तीनुसार वेगवेगळी असते. कथा हा ललित वाङ्मयप्रकार आहे. या ललित वाङ्मयाचे लालित्य टिकून ठेवण्यासाठी कथाकाराला साहित्यकृतींची भाषा ही सरळ, सोपी, साधी ठेवावी लागते. साहित्यकृतीत वापरलेली भाषा ही वाचकांच्या परिचयाची असल्याने वाचक तिच्याशी एकरूप होऊ पाहतो. भाषेत कथाविश्वातील अनेक घटक उभारण्याची क्षमता असते. कथेतील पात्र, घटना, प्रसंग, वातावरण हे भाषेमुळेच वाचकांसमोर स्पष्ट होत असते. कथाविश्वातील भाषा ही वास्तवदर्शी असते आणि म्हणून काळानुसार ती बदलत असते. कथाविश्वात भाषाशैली हा एक महत्वाचा घटक ठरतो.

### १.५.६ घटना प्रसंग

एखाद्या स्तिथीत होणाऱ्या बदलांतून प्रस्थापित होणारी परिस्तिथी म्हणजे 'घटना' असे म्हणता येते. कथा हि घटनांच्या साखळीतून पूर्णत्वास येत असते. घटना हा कथात्म साहित्यकृतीत एक लघुत्तम घटक मानला जातो. घटना हि एक क्रिया असते. या घटनांचे कथात्म साहित्यात एखाद्या क्रियापदाद्वारे किंवा

कृतिदर्शक शब्दाद्वारे निवेदन केले जाते. कथात्म साहित्यातील घटना या काल्पनिक असतात. त्या घटनांना कल्पित स्थळकाळपरिस्तिथीचा संदर्भ असतो. या कल्पित परिस्तिथीत वावरणाऱ्या व्यक्तींच्या जीवनात अनेक घटना घडत असतात. या घटना व्यक्तींचा इतर व्यक्तींशी, समाजाशी, निसर्गाशी, संस्कृती संस्थांशी तसेच व्यवस्थांशी, तत्वांशी व स्वतःशी जो परस्परसंबंध असतो त्यातूनच घटना घडत असतात. सत्य स्तिथीत ज्याप्रमाणे माणसांच्या जीवनात अनेक घटना क्षणोक्षणी घडत असतात त्याच प्रमाणे या कल्पित वास्तवात वावरणाऱ्या व्यक्तींच्या जीवनात अनेकविध घटना घडत असतात. या घटना नैसर्गिक तशाच मानवनिर्मितही असतात. प्रत्यक्ष जीवनातील घटनांचे संस्कार कथाकारावर होत असतात त्याचप्रमाणे त्याच्या व्यक्तिगत कृतीमुळेही काही घटना त्याच्या आयुष्यात घडत असतात त्याच्या परिणामातून तो कथेतील घटनांची निर्मिती करत असतो. या घटनांचे एक वैशिष्ट्य म्हणजे या घटना भूतकाळातील असतात. घडून गेलेल्या घटनांचे कथन कथात्म साहित्यात केले जाते म्हणून अशा या कल्पित घटनामालिकेचे कथन वा निवेदन कथात्म साहित्यकृतीत केले जाते. म्हणून कथात्म साहित्याचा काळ हा भूतकाळ असतो. घटनांच्या मालिकेतून विशिष्ट कालानुक्रम क्रमव्यवस्थेचा निदर्शक म्हणून येणार कथनातील भूतकाळ हे कथात्म साहित्याचे वैशिष्ट्य आहे.

## समारोप

कथा हा एक स्वतंत्र साहित्यप्रकार आहे. भाषेच्या जन्म पासूनच कथा अस्तित्वात आल्या. कथा हा एक लोकप्रिय साहित्याप्रकर आहे. कथात्मकता हे तिचे ठळक वैशिष्ट्य आहे. कथेचे तंत्र इंग्रजी शोर्ट स्टोरी पासून निर्माण झाले. कथेचे तंत्र त्याच प्रमाणे लेखन हे कादंबरीपेक्षा वेगळे आहे. कथा ही स्फुट असली तरीही मानवी जीवनाचे अनेक पैलू गांभीर्याने व्यक्त करणारा साहित्यप्रकार आहे. अनुभवांची कलात्मक अभिव्यक्ती करणे हे कथेचे बलस्थान आहे. कथेचे स्वरूप मौखिक ते लिखित असे बदलत गेले आहे. कथेच्या पाश्चात्य व भारतीय अभ्यासकांनी व्याख्या मांडल्या आहेत. कथेचे वेगवेगळे घटक कथेला पूर्णत्वास आणत असते.

## निष्कर्ष

१. कथा हि आदिम काळापासून अस्तित्वात आहे.
२. कथा हा इंग्रजीतील 'शोर्ट स्टोरी' या पासून अस्तित्वात आलेला साहित्यप्रकार आहे.
३. कथा हा मानवी जीवन दर्शन घडवणारा एक साहित्यप्रकार आहे.

४. कथा हा कमी वेळात महत्वपूर्ण अर्थ मांडणारा एक साहित्यप्रकार आहे.

५. कथेतून एकच एक संस्कार केला जातो.

६. कथा हा साहित्यप्रकार स्फुट असला तरीही गहन विषय मांडणारा साहित्यप्रकार आहे.

७. २० व्या शतकात कथेने नवकथेचे स्वरूप स्वीकारले.

## संदर्भ सूची


१. बडवे, सतीश. "मराठी कथा स्वरूप व संकल्पना." गंधारे द. के.(संपा), 'मराठी वाङ्मय प्रकार : स्वरूप, संकल्पना व वाटचाल', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, २०१७, पृ. ९.

२. जोशी, सुधा. "कथा : संकल्पना आणि समीक्षा." मौज प्रकाशन मुंबई, २०१२, पृ. १६.

३. The New Encyclopaedia Britannica, volume 16, Helen Hemingway, Benton, Page 117.

४. शेवडे, इंदुमती. "मराठी कथा : उगम आणि विकास." सोमय्या पुब्लीशिंग हाउस मुंबई, पृ. ४९, ५०.

५. हातकणंगलेकर, म. द. "मराठी कथा : रूप आणि परिसर." सुपर्ण प्रकाशन पुणे, १९८६, पृ.२, ४.

६. फडके, ना. सी. "लघुकथा लेखन मंत्र आणि तंत्र." व्हीनस प्रकाशन पुणे, १९५२, पृ. २७.

७. शेवडे, इंदुमती. "मराठी कथा : उगम आणि विकास." सोमय्या पुब्लीशिंग हाउस मुंबई, पृ. ६, ७.

८. कुलकर्णी, वा. ल. "मराठी विश्वकोश." खंड ३, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ मुंबई, १९७६, पृ. २५५.

९. जोशी, सुधा. "कथा : संकल्पना आणि समीक्षा." मौज प्रकाशन गृह मुंबई, २०१२, पृ. १४.

१०. पावडे, व्यंकटी. "रा. र. बोराडे यांची कथा शोध आणि समीक्षा." इसाप प्रकाशन नांदेड, २०१३, पृ. १९२.

# प्रकरण २

# गोमंतकीय मराठी कथा आणि विठ्ठल गावस यांचे वाङ्मयीन योगदान

# गोमंतकीय मराठी कथा आणि विठ्ठल गावस यांचे वाड्मयीन योगदान

## प्रस्तावना

कथा हा प्राचीन काळापासून अस्तित्वात असलेल्या एक वाङ्मयप्रकार आहे. मानवी समूहाला भाषेचा शोध लागल्या नंतर गोष्टी कथन करणे व श्रवण करणे यातून हा वाङ्मयप्रकार विकसित झाला आहे. एकूणच मराठी साहित्यात कथा हा लोकप्रिय असा वाङ्मयप्रकार ठरला आहे. कथेच्या उगमाचा विचार करता पूर्वी लोककथा या मौखिक परंपरेतून मानवी समूहात प्रचलित होत्या. कथेच्या लिखित स्वरूपाचा विचार करता लिळाचरित्रपर्यंत आपणास मागे जावे लागते.

मराठी कथावाङ्मयाच्या क्षेत्रात गोमंतकीय मराठी कथेने मोलाची भर घातली आहे. गोमंतक हे विद्येचे माहेरघर म्हणून ओळखले जाते. या प्रदेशात कविता, कथा, कादंबरी, चरित्र आत्मचरित्र या सारखे अनेक वाङ्मयप्रकारांचे लेखन केले आहे. कथा या वाङ्मयप्रकाराच्या संदर्भात गोमंतकीय लेखकांनी 'प्रादेशिक साहित्य' हि संकल्पना मराठी वाङ्मयात आणली. गोमंतकीय कथेने काऊ चिऊच्या गोष्टी पासून पुढे बरीच प्रगती केली आहे. गोमंतकीय कथेला मोठ्या उंचीवर नेण्याचे कार्य हे मुक्तीपूर्व तसेच मुक्तीनंतरच्या लेखकांनी मोठ्या आत्मीयतेने केले आहे. नवोदोत्तरी गोमंतकीय कथाकारांपैकी विठ्ठल गावस हे एक महत्वाचे लेखक आहेत. त्यांनी गोमंतकीय कथेत मोलाची भर घातली आहे.

प्रस्तुत प्रकरणात गोमंतकीय कथेची वाटचाल, गोमंतकीय कथेतील प्रादेशिकता, गोमंतकीय मराठी कथेचे वेगळेपण त्याचप्रमाणे विठ्ठल गावस यांच्या वाङ्मयीन कर्तृत्व या गोष्टींची चर्चा केली आली आहे.

## २.१ गोमंतकीय मराठी कथेची वाटचाल

मध्ययुगीन काळापासून मौखिक परंपरेतून कथा ही गोमंतकात होती. ज्यावेळी मानवाने अभिव्यक्त होण्यास सुरुवात केली तेव्हा त्याच्याकडून काही कथांची निर्मिती झाली. त्या कथा पुढे लोककथा म्हणून मानव समूहात रूढ झाल्या.

गोमंतकीय मराठी कथेची वाटचाल सांगत असताना तिचे काळानुसार टप्पे पाडले जातात. गोमंतकीय मराठी कथेची वाटचाल हि मौखिक ते लिखित अशी झाली आहे. छापखान्याबरोबर कथेने लिखित स्वरूप

स्वीकारले. प्रारंभीची कथा प्रामुख्याने पाद्यात्मक स्वरूपाची होती. याचा प्रत्यय आपणाला गोमंतकाच्या आद्य मराठी ग्रंथ 'श्रीकृष्णचरित्रकथा' या आख्यानकाव्या पासून येतो. या ग्रंथात भगवान श्रीकृष्णचरित्राच्या अनेक कथा या ग्रंथात ओवीस्वरुपात कथन केल्या आहेत. म्हणून या ग्रंथाचा कथाग्रंथ म्हणून उल्लेख आपण करू शकतो. या ग्रंथाची रचना इ. स. १५२६ मध्ये झाली आहे. गोमंतकीय मराठी कथेची लिखित परंपरा म्हणून या ग्रंथाचा उल्लेख केला जातो. या लिखित परंपरेत 'प्रल्हादचरित्र', 'हरिश्चंद्र पुराण कथा', 'सुखदेव चरित्रकथा' या कथा ग्रंथांचीही नोंद केली जाते. या कथावाङ्मया बरोबरच 'रामायण' व 'महाभारत' या महाकाव्यांचाही उल्लेख गोमंतकीय लोककथांमधून केला जातो. या ग्रंथातील साहित्य हे गद्यात्मक स्वरूपाचे आहे. या कथांचा काळ लक्षात घेता एक गोष्ट निश्चित सांगता येते कि गोमंतकीय मराठी कथेचा प्रारंभ हा कृष्णदास शामाच्या पूर्व कालीन झालेला आहे. एकूण या कथा व्रतकथा, पुराण कथा अश्या स्वरूपाच्या होत्या. या कथांना आधुनिक कथातंत्रात बसवता येत नाही. तिची स्वतंत्र अशी शैली रूढ झाली आहे.

१८३२ मध्ये महाराष्ट्रात अनेक नियतकालिके प्रसिद्ध केली जाऊ लागली. महाराष्ट्रातिल अनेक नियतकालिकांतून निघणाऱ्या कथा गोमंतकीय कथाकार घडण्याचे कारण बनले. याच काळात गोमंतकीय कथालेखक तसेच कथालेखिका उजेडास आले. त्यात आत्माराम वामन भांडारी यांना प्रथम गोमंतकीय कथाकाराचा त्याच प्रमाणे पहिल्या कथासंग्रहाचा मान दिला जातो. १८८९ मध्ये भास्कर गोविंद रामाणी यांचेही दीर्घकथेचे पुस्तक याच काळात प्रसिद्ध झाले. १९११ मध्ये शंकर बळवंत आरस यांचाही दीर्घकथेचा संग्रह 'बा प्रणय' नावाचा प्रसिद्ध झाला. तत्कालीन कथा या करमणूक व मनोरंजन अश्या दोन प्रवृत्तीच्या असायच्या. गाद्यविलासिनी हा ग. कृ. शिरसाट यांचा कथासंग्रह १९१२ साली प्रकाशित झाला. कथा लेखकानं बरोबर कथालेखिकांनीही याच काळात लेखन सुरु केले. त्यात हिराबाई पेडणेकर, मनूबाई बोरकर, भद्राबाई मडगावकर, शांताबाई कामत, लक्ष्मीबाई कामत इत्यादी होत्या. या प्रत्येक लेखिकेच्या नावावर किमान एक कथा किंवा कथासंग्रह प्रसिद्ध झालेले दिसून येते. १९१२ साली शांताबाई कामत यांची 'ओठाबाहेर तेच कोटाबाहेर', यमुनाबाई बोरकर यांची 'भाऊबीजेच्या ओवाळणी' या कथा गोमंतकीय नियतकालिकांतून प्रसिद्ध झाल्या होत्या.भद्राबाई मडगावकर यांची 'अभागी यमू', त्याच बरोबर लक्ष्मीबाई कामत यांची 'मोहिनी दर्शन' व 'अप्सरा कि असीधारा?' यांच्या कथा अनेक नियतकालिके जसेकी 'प्रभात', 'उद्यान' यातुन प्रसिद्ध झाल्या. या काळातील कथां बोधकथा, पुराणकथा या सारख्या वळणाच्या आहेत.

हिराबाई पेडणेकर यांचे चार कथासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. त्यांना एक आद्य नाट्यकीर्ती म्हणूनही ओळखली जाते. त्यांची 'माझे आत्मचरित्र' या कथेचा उल्लेख आधुनिक काळातील पहिली गोमंतकीय मराठी कथा असा केला जातो. त्याच बरोबर 'शेवटी प्रयत्न निष्फळ झाले', 'जुने पत्र', 'कमल कुमारी' या सारख्या कथा त्यांच्या प्रसिद्ध झाल्या.

एकूणच या काळातील कथांचा विचार करता डॉ. बाळकृष्णजी कानोळकर असे नमूद करतात की या काळच्या कथांवर आपटे, गुर्जर या सारख्या कथाकारांचा रचनापद्धतीचा ठसा तत्कालीन कथांवर असलेला जाणवतो. त्या कथा या समाजाला चार चांगल्या गोष्टी शिकवण्याच्या हेतूने लिहिल्या जायच्या, त्यातील पात्रे ही वाचकांशी संवाद साधणारी होती. परंतु या कथा लघुकथेच्या तंत्रात बसण्या योग्य नव्हत्या. तत्कालीन कथा या मुख्यतः दीर्घ स्वरूपाच्या होत्या. त्यात घटनांची बेसुमार गर्दी, विपुल निसर्गवर्णने, पावलोपावली केलेला उपदेश  यातूनच तिचा जन्म झाला.

सुमारे १९१८ ते १९२६ या काळात सावळाराम घनश्याम कंटक हे २० व्या शतकातील एक लक्षणीय कथाकार ठरले. त्यांनी तत्कालीन काळात अनेक वाङ्मय प्रकार हाताळले परंतु १९३० ते १९४५ या पंधरा वर्षाच्या काळात त्यांनी लघुकथा बऱ्याच जोमाने लिहिल्या. त्यांचा सुमनगुच्छ हा पहिला कथासंग्रह १९२९ साली प्रसिद्ध झाला. त्यानंतर 'कणसाचे दाणे', 'शहाळी', 'जाईची फुले' हे तीन कथासंग्रह १९४१ पर्यंत प्रसिद्ध झाले. सा. घ. कंटक यांच्या कथाविश्वाच्या पार्श्वभूमीवर पुढेजावून मराठी कथाविश्वात क्रांती घडुन आली.

१९२६ साली आपली स्वतंत्र अशी कथा घेऊन गोमंतकीय साहित्यात अवतरतात ते म्हणजे कथाकार वि. स. सुखटणकर. १९२६ मध्ये त्यांची 'कटू कर्तव्य' नावाची कथा प्रसिद्ध झाली. १९३० पर्यंत त्यांनी अनेक कथा लिहिल्या. त्या कथांचा समावेश त्यांनी 'सह्याद्रीच्या पायथ्याशी' या त्यांच्या पहिल्यावहिल्या कथासंग्रहात केला. हा कथासंग्रह १९३१ साली प्रकाशित करण्यात आला होता. त्यांनी स्वतः आपल्या कथासंग्रहाला तीन उपाशीर्षके 'आक्रमण १ले', 'आजचे व कालचे गोमंतक', 'आठ स्वतंत्र प्रादेशिक कथा' दिली आहेत. त्यातील 'आठ स्वतंत्र प्रादेशिक कथा' या शिर्षकावरून 'प्रादेशिक' या संज्ञे बरोबर 'प्रादेशिक साहित्य' हे मराठीत अवतरले. मराठी कथासाहित्यात परिवर्तन घडवून आणण्याचे श्रेय हे या संग्रहाला दिले जाते. त्यांच्या कथा या भूमीप्रेम दर्शविणाऱ्या आहेत. इंदुमती शेवडे यांच्या मते वि. स. सुखटणकर, " गोमंतकीय सामाजिक जीवनामागे असलेल्या काही घटकांचे व प्रवृत्तींचे दर्शन ते कथेच्या माध्यमातून

प्रत्ययपूर्णतेने घडवतात व ते करताना प्रादेशिक वातावरणाची जोड त्याला देतात."१ त्यांनी गोमंतकीय वास्तवचित्रण केले आहे, त्यांच्या कथा या जुन्या वळणाच्या असल्या तरीही अनेक गोमंतकीय वैशिष्ट्यांनी परिपूर्ण असलेल्या त्यांच्या कथा आहेत. सुखटणकरांचा १९७५ साली सुवर्णपदक देऊन त्यांच्या साहित्यसेवेचा गौरव करण्यात आला होता.

१९३० च्या उत्तरार्धात प्रा. लक्ष्मणराव सरदेसाई व जयवंतराव सरदेसाई या सारखे कथालेखक उजेडास आले. १९३० ते १९४५ या काळात मराठी कथेला विशेष बहर आली. याच काळात का. दा. घोडे, प्र. शा. मांजरेकर, व्यंकटेश अनंत पै रायकर, ना. के. शिरोडकर, ह. वि. देसाई दत्तात्रय विष्णू कीर्तने, वि. द. साळगावकर इत्यादी लेखक कथा लेखक म्हणून पुढे आले. त्यातच एकमेव स्त्री कथाकार म्हणून स्नेहलता वैद्य यांचा उल्लेख केला जातो. याच कालखंडात प्रा. लक्ष्मणराव सरदेसाई यांनी गुणवत्तेच्या आणि संख्येच्या दृष्टीने विपुल लेखन केले. त्यांच्या प्रेरणेतूनच अनेक कथालेखक निर्माण झाले. प्रा. लक्ष्मणराव सरदेसाई हे तत्कालीन लेखकांचे गुरुस्थानी होते. सरदेसाईंचा कालखंड हा गोमंतकीय मराठी कथेचा सुवर्णकाळ मानला जातो. प्रा. लक्ष्मणराव सरदेसाई यांनी आयुष्याच्या अंतापर्यंत म्हणजेच १९८६ पर्यंत सातत्याने लेखन केलेले होते. त्यांचे एकूण १४ कथासंग्रह प्रसिद्ध झाले. फडके- खांडेकर यांच्या बरोबरीने त्यांनी सातत्याने कथालेखन केले. आणि आपली कथा वाचकांच्या आणि समीक्षकांच्या पुढ्यात आणली. प्रा. लक्ष्मणराव सरदेसाई यांच्या कथालेखनावर प्रादेशिक साहित्याचा शिक्का मारण्यात आला होता. त्यांचे लेखन हे प्रामुख्याने गोमंतकाच्या पार्श्वभूमीवर असल्याने त्यांचे लेखन हे प्रदेशिकतेच्या अंगानेच जाणारे होते. प्रा. लक्ष्मणराव सरदेसाई यांचे 'कल्पवृक्षाच्या छायेत', 'सागराच्या लाटा', 'वादळातील नौका', 'ढासळलेले बुरुज', 'अनीतेचे दिव्य' असे पाच कथासंग्रह १९४५ पर्यंत प्रसिद्ध झाले. लक्ष्मणरावां बरोबरच जयवंतराव सरदेसाई यांनीही बरेचसे कथालेखन केले आहे. त्यांचे तीन कथा संग्रह प्रसिद्ध झाले आहे. 'सुखाचे क्षण', 'अवशेष' व 'गुलाबगेंद' त्यानंतर मात्र त्यांचं कथालेखन बंदच झालं. त्याच कारण म्हणजे तत्कालीन गोमंतकीय राजकीय परिस्तिथी होती.

व्यंकटेश अनंत पै रायकर हे याच कालखंडातील आणखी एक गोमंतकीय कथालेखक आहे. १९४० पर्यंत त्यांनी अनेक लघुकथा लिहिल्या. प्रा. अनंत काणेकर यांनी त्यांच्या विषयी एक उदगार काढले होते की, 'मराठी लघुकथावाङ्मयात एक नवा तारा उदयाला आला'.२ त्यांच्या पहिला कथासंग्रह 'कारंजाचे तुषार' १९३९

साली प्रसिद्ध झाला. त्यांच्या कथा या शृंगारकथा व परंपरेने चालत आलेल्या कथा अश्या दोन प्रकारात असलेल्या जाणवतात. लक्ष्मणराव सारदेसाईंच्या प्रेरणेतून रायकरांनी लेखन केले होते.

काशिनाथ पुंडलिक घोडे हे बाल- किशोरकथांची निर्मिती करणारे लेखक होते. त्यांनी त्या बरोबरच लघुकथाही लिहिल्या होत्या. त्यांच्या नावावर दोन कथासंग्रह प्रसिद्ध झालेले आहेत. त्यांचा पहिला कथासंग्रह 'सुख संवाद' १९३६ साली प्रसिद्ध झाला होता. दुसरा 'वन्ही तो चेतवा' हा १९८० मध्ये प्रसिद्ध झाला. त्यांच्या कथा या आघाडीच्या मासिकांतून प्रसिद्ध झाल्या. त्यांच्या लेखनात गोमंतकीय वातावरण होते पण ते प्रादेशिक म्हटले गेले नाही. त्यांनी कंटकांच्या वळणाचे कथालेखन केले पण त्यांना कथालेखनातले सातत्य राखता आले नाही. घोडे यांच्या कथा या कथेच्या रुळलेल्या वाटेनेच जाणाऱ्या स्वरूपाच्या होत्या. त्यातील आशय, विषय, कथनपद्धती, भाषा ही रुळलेल्या वाटेने जाणारीच होती. त्यांच्या कथांमध्ये निवेदक हा नव्हताच. काही कथा जशा कि 'दूधसागर', 'अंजनी', 'सोनार बाग', 'लौकिक' व 'अंधार' या काही विशेष लक्षणीय कथा ठरतात. या कथांतिल विषयात तोचतोचपणा असला तरी त्याची वैचारिक बैठक वेगळया स्वरूपाची आहे. आशय आणि विषयाच्या द्वंदातून कथा शेवटी स्फोटक बनते व वाचकाला अंतर्मुख करणारी ठरते.

१९४५ नंतर गोमंतकीय मराठी कथेला सर्वांगाने बहर आलेली दिसून येते. या कालखंडात अनेक साहित्य सांस्कृतिक चळवळी निर्माण झाल्या. त्यानंतर १९१० मध्ये रिपुब्लिक सरकार सत्तेवर आल्यानंतर नवजागरणाची चळवळ निर्माण झाली आणि त्याचाच भाग म्हणून नियतकालिकांची चळवळ सुरू झाली. याच नियतकालिकांतून वाचन त्याचप्रमाणे आपल्या लेखनाचे पहिले धडे गिरवले जाऊ लागले आणि त्यातूनच लेखकांची जडणघडण झाली. 'प्राचीप्रभा', 'प्रभात', 'सत्यंग', 'भारत', 'भारत मित्र', 'प्रगती', 'सुबोध' व 'कला' या नियतकालिकांनी लेखकांची जडणघडण केली. १९३० मध्ये महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे अधिवेशन प्रो. वा. म. जोशींच्या अध्यक्षतेखाली मडगावात संपन्न झाले ते ही गोमंतकीय साहित्यिक चळवळीला पोषक ठरले. त्याच बरोबर १९३४ साली सारस्वत ब्राह्मण समाजाचे अधिवेशन मडगाव येथे झाले. त्यासाठी मामा वरेरकर, न. ची. केळकर, डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर इत्यादी लेखकांचे गोमंतकात येणे जाणे होत होते. त्यांचा फायदा गोमंतकीत कथालेखकांवर होत होता. या चळवळीतुन अनेकजण लिहु लागले व त्यातूनच गोमंतकीय मराठी कथा विस्तारू लागली. बा. द. सतोस्कर यांनी १९३५ च्या मडगावच्या साहित्य

संमेलनात एक स्वतंत्र प्रकाशनसंस्था काढण्याचा प्रस्थाव मांडला आणि पुढे जाऊन तो स्वीकारही झाला. त्यातूनच 'सागर साहित्य प्रकाशन' जन्मास आले. त्या द्वारे अनेक कथासंग्रह प्रकाशित होऊ लागले.

याच काळात अनेकानी कथालेखन सुरु केले. त्यात शंकर निळकंठ वागळे, स्नेहलता वैद्य, दत्तात्रय विष्णू कीर्तने, विनायक दत्ताराम साळगावकर इत्यादी लेखकांचा समावेश होतो. या पैकी काही लेखकांचे काही कथासंग्रह निघाले. या शिवाय काही लेखकांनी कथा लेखन केले मात्र त्यांचे संग्रह निघाले नाही. त्यानंतर काही फ्रेंच, पोर्तुगीज वा इंग्रजी या कथांचे अनुवाद ही काही वरील लेखकांनी केले आहे. आणि ते अनुवादित संग्रह प्रसिद्ध करण्याचे श्रेय बा. द. सतोस्कर व जनार्दन जगन्नाथ शिर्के याना दिले जाते. नारायण केशव उर्फ ना. के. शिरोडकर हे गोमंतकीय कथा लेखक. त्यांचा पहिला कथा संग्रह 'नवे जहाज' हा १९३९ साली प्रसिद्ध झाला. त्यानंतर 'किमया', व 'दीपगृह' असे दोन कथासंग्रह त्यांचे प्रदीद्ध झाले. त्यांच्या काही कथा हिंदीतही अनुवादित झाल्या. त्यांच्या कथा या गोमंतकीय वास्तव चित्रण करणाऱ्या होत्या पण त्या प्रादेशिक स्वरूपाच्या नव्हत्या ते त्यांनी स्वतः मान्य केलेले आहे. त्यांच्या कथा लेखनात विविधता आहे. एक शैलीदार लेखक म्हणून त्यांच्याकडे पाहता येते. परंतु मराठी समीक्षकांनी त्यांच्या साहित्याची फारशी दखल घेतलेली दिसत नाही.

त्यानंतर ह. वि देसाई या गोमंतकीय कथाकाराचा केवळ एक कथासंग्रह १९४० साली प्रसिद्ध झाला. त्यांनी आपल्या कथांमधून तरुण तरूणींच्या भावभावनांचे चित्रण, मातृप्रेमाच्या उदत्ततेचे चित्रण करणाऱ्या कथा लिहिल्या. 'दगडाचा देव' ही त्यांची उत्कृष्ट अशी कथा असलेली सांगता येते. ते कलेकडे एक जीवनवादी दृष्टिकोनातून पाहत होते.

प्र. शां. मांजरेकर हे १९४० साली उजेडास आलेले कथाकार आहेत. त्यांचा 'उष: प्रभा' हा कथासंग्रह प्रसिद्ध झाला आहे. एक लक्षणीय कथाकार म्हणून त्यांच्याकडे पहिले जाते. त्यांच्या कथा या दिवाकर कृष्णाच्या परंपरेतील आहे. त्यांनी कथेच्या परंपरेला विकासाच्या पुढच्या टप्यापर्यंत नेण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी कथेच्या चाकोरीत राहून चाकोरी मोडण्याचे कठीण कार्य केले आहे. त्यांच्या लेखानाबधलं इंदुमती शेवडे यांनी असे म्हटले आहे की, ' मांजरेकरांच्या कथेत कल्पनारम्य वातावरण असले तरी त्यांची कथा रेखीव व भावोत्कट आहे व दिवाकर कृष्णाची कथा तिने अधिक विकसित केली.'३ नवकथेच्या उदयाच्या कालखंडात मांजरेकरांना प्रथम स्थान दिले आहे. वि. द. साळगावकर आणि द. वि. कीर्तने यांचे

प्रत्येकी दोन कथासंग्रह याच काळात प्रसिद्ध झाले होते. त्याचबरोबर स्नेहलता वैद्य आणि शंकर निळकंठ वागळे यांचे कथासंग्रह देखील याच काळात प्रसिद्ध झाले.

१९४५ ते १९६१ या कालखंडात गोमंतकीय कथालेखन बऱ्याच प्रमाणात कमी झाले. पोर्तुगीज राजवट गोव्यात होती. पोर्तुगीज्यांच्या दडपशाहीमुळे गोमंतकीय लेखकांना गोव्याबाहेर जावे लागले. त्यात लक्ष्मणराव सरदेसाई, बा. भ. बोरकर यांचा समावेश होतो. काही लेखक गोव्यातच वास्तव करत होते परंतु त्यांचे लेखन थांबले होते. याच कारणामुळे गोमंतकीय कथालेखन या काळात पूर्वीच्या मानाने खूपच कमी झाल्या. तरीही प्रा. लक्ष्मणराव सरदेसाई यांनी हार मानली नाही. त्यांनी गोव्याबाहेर राहूनही कथालेखन चालूच ठेवले. विद्यार्थी दशेत काही कथालेखक उजेडास आले. वामन राधाकृष्ण, भालचंद्र मडकईकर, गं. का गावकार, बा. द. सतोस्कर, जनार्दन शिंक्रे या सारखे अनेक नवीन लेखक या काळात लिहू लागले. त्यांचे प्रत्येकी एक दोन कथासंग्रह प्रसिद्ध झाले होते. या काळात लक्ष्मणराव सरदेसाई यांचे पाच कथासंग्रह प्रसिद्ध झाले होते. 'संसारातील अमृत', 'मोहोर', 'मधुचंद्र', 'सुरेख संगम' आणि निवडक कथांचा एक संग्रह 'लक्ष्मणरेषा'. याच कालखंडात लक्ष्मणरावांनी जीवनविषयक तत्वज्ञान मांडणाऱ्या कथा, देशीवादी जाणिवांशी नाते सांगणाऱ्या कथा, स्त्रीवादी जाणिवांशी नाते सांगणाऱ्या कथा लिहिल्या. लक्ष्मणराव सरदेसाई यांच्या कथालेखनाचा गौरव हा महाराष्ट्रात त्याचप्रमाणे अमेरिकेतही करण्यात आला आहे. लक्ष्मणराव सरदेसाई नंतर पंडित महादेव शास्त्री जोशी हे एक महत्वाचे कथाकार म्हणून त्या काळात प्रसिद्धीस आले. त्यांचे एकूण ११ कथासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. त्यांच्या कथेचे भारतीय भाषांमध्ये अनुवाद झाले आहे त्याच प्रमाणे काही कथांवर चित्रपटही निघाले आहे. लक्ष्मणराव सरदेसाई सारखाच त्यांचाही बहुमान गोमंतक मराठी साहित्य संमेलनाच्या सुवर्णपदक देऊन झाला आहे. त्याचप्रमाणे प्रस्तुत संमेलनाच्या १६ व्या अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून त्यांची निवड झाली होती. पुढे कवी बा. भ. बोरकर यांनी कविते बरोबरच कथालेखनही केले. 'सुताराची सून' ही त्यांची पहिली कथा. १९६० पर्यंत त्यांनी अनेक कथा लिहिल्या. पुढे त्या कथांचा एक संग्रही निघाला. त्यांचे कथा लेखन हे स्वतंत्र होते. त्यांच्या कथा प्रादेशिक वळणाच्या असल्या तरीही त्यावर लक्ष्मणराव सरदेसाई किंवा सुखटणकरांचे पडसाद त्यात उमटलेले जाणवत नाही. तरीही त्यांच्या कथा या सुखटणकरांच्या कथेशी जुळणाऱ्या आहेत. त्यानंतर बाळकृष्ण दत्ताराम सतोस्कर हे एक गोमंतकीय साहित्यिक आहेत. त्यांनी साहित्यिक त्याचबरोबर संशोधक म्हणूनही कार्य केले आहे. त्यांनी काही फ्रेंच व पोर्तुगीज कथा अनुवादित केल्या आहेत. त्यांचे संग्रहही प्रसिद्ध झाले आहे. १९४९ पासून त्यांनी त्यांचे स्वतंत्र कथालेखनाला प्रारंभ

केला. 'प्रीतीची रीत व इतर कथा' हा त्यांच्या पहिला कथा संग्रह १९६१ साली प्रसिद्ध झाला होता. त्यांनी गोव्या बाहेर राहून गोमंतकीय कथा लिहिल्या. त्यांच्या कथांतील पात्रे ही गोमंतकीय आहेत पण त्यातील घटना मात्र मुंबईत घडताना दिसतात. त्यांच्या काथांवर कुठल्याही समकालीन कथाकारांचा प्रभाव पडलेला जाणवत नाही.

गोमंतकीय कथेचा पुढचा टप्पा हा गोवामुक्ती नंतरचा मानला जातो. १९६१ साली गोवा मुक्त झाला. गोमंतकीय राजकीय, सामाजिक, शैक्षणिक पद्धतीत बदल घडून आला. शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार याच काळात होत होता. गोवामुक्ती नंतर शिक्षण क्षेत्रांत अधिकाधिक शिक्षकवर्गाची गरज भासू लागली. त्या करीता प्रार्थमीक ते महाविद्यालयीन स्थरापर्यंत अध्यापनासाठी मोठ्याप्रमाणात महाराष्ट्रातून, बेळगाव, कारवार या सारख्या मराठी भाषिक प्रदेशातून शिक्षक नेमले गेले. मुक्तीपूर्व काळात कथाकार हे प्रामुख्याने उच्चवर्णीय व शिक्षित होते. गोवा मुक्तीनंतर मात्र हे चित्र बदलले. पुढेजाऊन या शिक्षकवर्गानेच गोमंतकीय मराठी साहित्य निर्मितीची कास हाती घेतली. याच कालखंडात नवकथेला प्रारंभ झाला. याच काळात गोव्यातुन पारंगत झालेले लेखक गोमंतकात परतले व त्यांनी आपल्या लेखनाला पुनः सुरुवात केली. गोवामुक्ती नंतरच्या कथाकारांमध्ये गोमंतकीय व नवगोमंतकीय असे लेखक आहे. हे लेखक मध्यमवर्ग तसेच बहुजन समाजातून आलेले होते. त्यांच्या कथा या विविध नियतकालिकांतून व अनियतकालिकांतून प्रसिद्ध झाल्या होत्या. तर काहींच्या कथा या प्रसिद्धीस पावल्या नाहीत. काही मुक्तीपूर्व काळातील कथाकारांचे कथासंग्रह या काळात प्रकाशित झाले. मुक्ती नंतर अनेक नवे उपक्रम व चळवळी गोमंतकात घडल्या. त्यातून नवी नियतकालिके व अनियतकालिके निघाली. नवी व्यासपीठे निर्माण झाली, प्रकाशन संस्था ही निघाल्या. गोवामुक्ती नंतरची कथा विकसित करण्यास व तीला नाविन्यपूर्ण बनविण्यास या सगळयांचा हातभार लागला.

वि. स. सुखटणकर, प्रा. लक्ष्मणराव सरदेसाई, पं. महादेवशास्त्री जोशी हे बा. भ. बोरकर यांनी मुक्तीपूर्व तसेच गोवामुक्ती नंतरही कथा लेखन केले आहे. प्रो. लक्ष्मणराव सरदेसाई मुक्तीपूर्व तसेच मुक्ती नंतरही कथालेखन केले आहे. त्यांनी सुमारे सातशे कथा लिहिल्या. गोवा मुक्तीनंतर 'सोनेरी ऊन', 'पडसाद', 'बिजेची कोर' या सारखे कथासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. लक्ष्मणरावांच्या गोमंतकीय कथा या लघुकथाच आहेत. पं. महादेवशास्त्री जोशी यांचे गोवा मुक्ती नंतर नवीन कथासंग्रह प्रसिद्ध झाले नाहीत परंतु त्यांचा 'कांचनाची निरांजने' हा निवडक कथांचा संग्रह १९९६ साली प्रसिद्ध झाला. पं. महादेवशास्त्री जोशी यांच्या लेखनाचे

वैशिष्ट्य म्हणजे त्यातील प्रभावी व्यक्तीचित्रण, साधी सोपी भाषा, प्रदेशिकता ही आहे. त्यानंतर ब. भ. बोरकर यांचा 'समुद्रकाठची रात्र' हा कथासंग्रह १९८१ साली प्रकाशित झाला. त्यांच्या प्रादेशिक स्वरूपाच्या कथा आहेत. या कथाकारां बरोबरच व्यंकटेश अनंत पै रायकरांचे 'सप्तस्वर', 'सोन्याचा कळस', 'भावना आणि वासना' असे तीन कथासंग्रह मुक्तीनंतर प्रसिद्ध झाले. त्यांच्या कथालेखनाला गोमंतकीय पार्श्वभूमी लाभली आहे. त्याच बरोबर त्यांच्या लेखनाची भाषाशैली ही ओघवती राहिली आहे.

र. उ. राव हे एक गोमंतकीय लेखक. ज्यांच्या लेखनातून गोमंतकीय समाज जीवनातील स्तीत्यतराचे चित्रण झाले आहे. त्यांचा 'निराळे लोक' हा कथासंग्रह १९६५ साली प्रकाशित झाला. ॲड. जयवंतराव सरदेसाई यांचा मुक्तीनंतरच्या कालखंडात 'अवशेष' हा कथासंग्रह प्रसिद्ध झाला. रंजनवाद व घटनाप्रधानता हे त्यांच्या कथांचे वैशिष्ट्य असलेले दिसून येते. १९६१ साली सां. घ. कंटक यांचा 'जाईची फुले' हा संग्रह प्रसिद्ध झाला. बा. द. सतोस्कर यांच्या कथालेखनाचे विषय हे बदलत्या गोमंतकीय जीवनाचे वेध घेणारे होते. त्यांचे 'अभूकता', 'मिलींद', 'दर्याचा पुत्र', 'फिलूची मुदी', 'मोल' या सारखे संग्रह गोवामुक्तीनंतरच्या दशकात प्रसिद्ध झाले. एड. गणाधीश खांडेपारकर यांनी १९४६ ते १९५८ या काळात कथालेखन केले. स्वातंत्रोत्तर काळात त्यांचे 'गाठोडे', ' रिकामे 'मधूघट', 'कायदा गाढव आहे' या सारखे कथासंग्रह प्रसिद्ध झाले.

प्रा. मनोहर हिरबा सरदेसाई यांनी १९४५ ते १९९४ पर्यंत कथालेखन केले आहे. त्यांचे गोवा मुक्तीपूर्व तसेच मुक्तीनंतर अनेक कथासंग्रह प्रसिद्ध झाले आहे. 'सप्तर्षी', 'रक्तचंदनी वाट', 'पनिहारी' इ कथासंग्रह त्यांचे प्रसिद्ध झाले. त्यांच्या कथासंग्रहांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी कल्पनेच्या आधारावर चित्रित केलेली कथेतील पात्रे आहेत. डॉ. प्रल्हाद वडेर यांचे लेखन नवकथाकारांच्या समांतर जाणारे आहे. त्यांचे तीन कथासंग्रह 'चढण', 'वीज', 'रक्तखुणा' हे प्रसिद्ध झाले आहेत. मानवी मनातील भाव भावनांना त्यांनी आपल्या लेखनात महत्व दिले आहे. नवकथेच्या कालखंडात लेखन करणारे प्रा. मुरलीधर कुलकर्णी यांचे 'थोरला', 'पेमेंट', 'टाळीत कावळा', 'थैमान' असे कथासंग्रह प्रसिद्ध झाले आहे. त्यांच्या कथेने नवकथेचे संस्कार आत्मसात केले. प्रा. रवींद्र घवी यांनी त्यांच्या कथे बद्धल असे विधान केले आहे कि, "आशय, अविष्काराचा एक अनोखा संगम त्यांच्या कथेत दिसतो". त्यानंतर नरेश नामक कथाकार यांचे 'बिअरची सहा कॅन्स' व 'चुळचुळ मुंगी पळी पळी कंटाळा' हे कथासंग्रह प्रसिद्ध झाले आहे. त्यांच्या कथा लेखनाचे विषय हे कौटुंबिक जीवनातील आहे. या कथाकाराने रचनातंत्राचा प्रयोग केला आहे. त्याचप्रमाणे फॅन्टसी तंत्राचाही वापर केला

आहे. आणि त्या कारणाने त्यांच्या कथा वाचनीय ठरल्या आहे. यशवंत कर्णिक यांच्या कथा हि नवकथेच्या जवळ जाणाऱ्या आहेत. त्यांनी कथेतून स्त्री पुरुष संबंध, नात्यातील दुरावा, मानवी वासना, भावनिक गुंतागुंत या सारखे नवीन विषय त्यांनी हाताळले आहे. त्यांचा 'उरूस व इतर कथा' हा कथासंग्रह १९७२ साली प्रसिद्ध झाला. त्यांच्या कथांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यातील नेमकेपणा व सुचकता आहे. डॉ. अरुण हेबळेकर हे याच काळातील कथाकार आहेत. त्यांचे 'रिंग ऑफ सॅटर्न' व 'पाय नसलेली माणसे' हे कथासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. त्यांच्या कथांतून आधुनिकीकरणाच्या प्रभावाने बदलणारे मानवी नाते संबंध यांचे चित्रण झाले आहे. त्याच प्रमाणे नैराश्यपूर्ण जीवन जगणारी माणसे त्यांच्या कथांमध्ये चित्रित होतात. या नवकथेच्या काळात लेखन करणारे पु. शि. नार्वेकर हे आहेत. त्यांचे कथा लेखन हे रंजनप्रधान व घटनाप्रधान स्वरूपाचे आहे. त्यांच्या कथा या नवकथेच्या वाटेने जाणाऱ्या नव्हत्या. 'विघ्नहर्ता', 'मृगजळ' व 'कलंदर' हे त्यांचे कथासंग्रह प्रसिद्ध झाले. त्यांच्या कथांतून पोर्तुगीज कालीन गोमंतकीय समाज जीवनाचे तपशील आलेले आहेत. त्यांनी त्यांच्या कथांतून पोर्तुगीज अधिकारांच्या मनोवृत्तीचे जीवन चित्रण करण्याचा प्रयत्न केला आहे. मुक्तीनंतरच्या बदलत्या समाज जीवनाचे चित्रण तन्मयतेने करणारे कथाकार म्हणजे ज्ञानेश्वर कोलवेकर. त्यांनी आपल्या कथालेखनात बदलत्या समाज जीवनात उपस्तिथ होणाऱ्या समस्यांचे चित्रण करण्यात आले आहे. तरुण पिढी मध्ये होणारी मानसिक ओढाताणीचे चित्रण त्यांच्या कथांतून होते.

जयराम पा. कामत यांचे 'अंधारयात्री' व 'क्रांतिदूत' हे संग्रह प्रसिद्ध झाले आहेत. नेमकेपणा व नाट्यमयता हे त्यांच्या कथेचे वैशिष्ट्य आहे. स्त्रियांच्या मनोस्तिथीचे चित्रण त्यांच्या कथांमध्ये आलेले आहे.त्याच प्रमाणे आधुनिक समाजजीवनातील क्रूरता व्यक्त करणाऱ्या कथा हि त्यांनी लिहिल्या. डॉ. विठ्ठल ठाकूर या कथाकाराचे 'भार' व 'आवर्त' हे कथासंग्रह प्रसिद्ध झाले आहे. नवीन विषय त्यांच्या कथांतून आलेले आहे. त्यांच्या कथा या आशयकेंद्री आहेत. त्यानंतर वासंती नाडकर्णी या कथालेखिकेनी गोमंतकीय कथालेखनात मोलाची भर घातली आहे. 'कौमुदी', 'प्यादी', असंही', 'अपत्य' व 'आकाशफुल' या सारखे कथासंग्रह त्यांचे प्रसिद्ध झाले आहे. या नवकथाकारांच्या काळातच आणखीन काही कथा लेखक व लेखिका या काळात उदयास आले. प्रा. सुरेश वाळिंबे यांचा 'जाई जुई' हा कथासंग्रह २००१ साली प्रसिद्ध झाला. त्यांच्या कथा या रंजनप्रधान आहेत. प्रखर वास्तवापासून अलिप्त राहणाऱ्या त्यांच्या कथा आहेत. म्हणूनच त्यांच्या कथा या नवकथे पासून वेगळी असल्याचे दिसून येत. भालचंद्र मडकईकर यांचे 'सुकेरिया', 'गौडबंगाल', 'चंद्र चांदणे शिंपीत होता' असे तीन कथासंग्रह प्रसिद्ध झाले आहे. त्यांच्या कथा या मानवी

मनाचा खोलवर शोध घेताना दिसतात. डॉ. श्री. शं. फडके 'पाडुवा' हा कथासंग्रह १९९२ साली प्रसिद्ध झाला. त्यांचे लेखन हे वास्तववदर्शी आहे. त्यांची कथा ही ग्रामीण जीवन चित्रण करणारी आहे. समाजविघातक प्रवृत्तीचे चित्रण करणाऱ्या कथा चंद्रकांत नारायण माशेलकर यांनी लिहिल्या. त्यांचे 'असा एक अभिमन्यू', 'सार्थक', 'असूया' या सारखे कथासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. ना. बा. राणसिंग यांचा 'भेंगळ भिंत' हा कथासंग्रह प्रसिद्ध झाला आहे. महादेव कंग्राळकर यांचा 'स्वाहा' हा संग्रह प्रसिद्ध झाला. लक्ष्मणराव पाटील यांचे 'नवी पहाट' व 'वटवृक्षाच्या छायेत' या सारखे कथासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. त्यांच्या कथांना गोवा, कर्नाटक, महाराष्ट्र या सारख्या भूप्रदेशांची पार्श्वभूमी लाभली आहे. त्यानंतर विठ्ठल गावस यांचे 'कँथरीन', 'लवणं', 'ओझे' आणि 'फिंगर बाऊल' असे चार कथासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. या कथासंग्रहातून गोमंतकीय लोक जीवनाचे, बदलत्या गोमंतकीय समाजाचे, गोमंतकीय संस्कृतीचे चित्रण घडते. नारायण महाले यांच्याकडे नव्या पिढीचे गोमंतकीय कथाकार व कादंबरीकार म्हणून पाहिले जाते. त्यांचे 'अस्तित्व', 'होमकुंड' हे कथासंग्रह प्रसिद्ध झाले आहे. त्यांच्या कथा कृषी जीवन, शेता भाटांत कष्ट करून आयुष्य जगणारी माणसे यांचे सकस चित्रण करणाऱ्या आहे. मिलिंद म्हामल यांचे 'चतुर्थी', 'अल्काण्याचो डोंगर', 'मांड' असे तीन कथासंग्रह प्रसिद्ध झाले आहे. त्यांच्या या कथा गोव्यातील सर्वसाधारण माणसांचे जीवन, नातेसंबंध, त्यातील संघर्ष, ग्रामीण जनजीवन अश्या विषयांना कवेत घेणाऱ्या आहेत. भाऊ नाईक, सुरेश नाईक, दासू शिरोडकर, मोहनदास सुर्लकर, गजानन रायकर इत्यादी अनेक गोमंतकीय लेखकांनी कथा हा वाङ्मयप्रकार मोठ्या ताकदीने हाताळला आहे. आणि आजतागायत त्यांचे हे कार्य चालू आहे.

## २.२ गोमंतकीय मराठी कथेतील प्रदेशिकता

१९२० साली लो. टिळकांचे निधन झाले. भारतीय राजकारणात महात्मा गांधींच्या नेतृत्वाचा उदय झाला, त्यांनी भारतीय राजकारणाला आणि पर्यायाने स्वातंत्र्याच्या लढ्याला एक नवी दिशा दिली, गती दिली. त्यांनी ही चळवळ देशाच्या खेड्यापाड्यापर्यंत पोहोचवली. त्यानंतर ग्रामीण, दलित, प्रादेशिक ह्या पार्श्वभूमीवर मराठी साहित्य लेखन होऊ लागले.

प्रदेश या शब्दाचा अर्थ प्रांत, भूभाग असा आहे. एका प्रदेशाचे किंवा प्रांताचे जीवन म्हणजे प्रादेशिकता. एखाद्या प्रदेशाच्या भौगोलिक, सांस्कृतिक, सामाजिक, इतिहासिक जडण घडणीतून प्रादेशिकता निर्माण होत असते. आणि अशा या जीवनाचे चित्रण ज्या साहित्यात होते ते प्रादेशिक साहित्य. प्रादेशिकता ही

मानवी जीवन जगण्याची प्रवृत्ती आहे. निसर्ग आणि संस्कृती ह्या दोन बाबी प्रादेशिकतेच्या दृष्टीने महत्वाच्या असतात. त्यामुळे प्रादेशिकतेचा ग्रामीण परिसराशी जवळचा संबंध असतो. ग्रामीण परिसर म्हणत असताना हा परिसर आधुनिकता, नगर, महानगर यांच्या पासून अलिप्त असलेला परिसर असतो. अशा वैशिष्टयानी उभ्या राहिलेल्या परिसराला प्रादेशिक असे संबोधले जाते. ज्या साहित्यातून विशिष्ट भूभागातिल सामाजिक व सांस्कृतिक जीवन चित्रण केले जाते, त्याला प्रादेशिक साहित्य म्हटले जाते.

ग्रामीण साहित्यिक आनंद यादव यांनी प्रादेशिक साहित्याची एक व्याख्या केली आहे जी इथे लक्षात घेण्यासारखी आहे. ते म्हणतात, "एखाद्या विशिष्ट प्रदेशातील लोक जीवन, संस्कृती, परंपरा, जीवनसंकेत, रीती, समूह जीवनातील भावभावना आणि या सर्वातून निर्माण झालेल्या समस्या आणि जीवननाट्य यांचे दर्शन घडविण्याच्या उद्देशाने जे साहित्य लिहिले जाते ते प्रादेशिक साहित्य होय." ४

प्रादेशिक साहित्याबद्धल असे म्हटले जाते की, 'भौगोलिकदृष्ट्या अस्तित्वात असलेला एक वैशिष्ट्यपूर्ण भूप्रदेश, तेथील मानवसमूह, त्याची वैशिष्ट्यपूर्ण बोली, निसर्ग, संस्कृती यांचे समुचित व संघटित असे भावमय चित्रण जे साहित्य करते ते प्रादेशिक होय.' या मतांचा विचार करता प्रादेशिक साहित्य हे विशिष्ट भूप्रदेशाचे हुबेहूब सांस्कृतिक व सामाजिक जिवन चित्रण असते हे दिसून येते. डॉ. मदन कुलकर्णी यांनी आपल्या ‘मराठी प्रादेशिक कादंबरी : तंत्र आणि स्वरूप’ या ग्रंथात प्रदेशिकतेची काही तत्वे सांगितली आहे. ती म्हणजे भौगोलीकता, मागासलेपणा आणि समस्या, निसर्ग, लोकसंस्कृती, सामुहिकता, भाषा अशी आहे.

गोमंतकीय मराठी कथेने मराठी साहित्याशी संलग्न राहून आपले अस्तित्व शोधले आहे. गोमंतक हा महाराष्ट्र व कर्नाटक या प्रदेशांशी आपली सीमा समीकरण करतो. त्यामुळे गोमंतकावर थोड्या फार प्रमाणात या दोन्ही प्रदेशांचा प्रभाव पडला आहे. गोमंतक हा एक वैशिष्ट्यपूर्ण असा प्रदेश आहे. ज्यावेळी एखादा लेखक एका प्रदेशात वास्तव्य करतो आणि त्या प्रदेशातील अनेक गोष्टी अनुभवतो त्यावेळी त्याच्या लेखनातून त्या विशिष्ट प्रदेशाचे प्रतिबिंब उमटत असते. गोमंतकीय साहित्याच्या बाबतीत हेच घडलेलं आहे.

गोमंतकीय साहित्यात 'प्रादेशिक' ही संज्ञा १९३१ साली अवतरली आहे. गोमंतकीय लेखक वि. स. सुखटणकरांनी प्रादेशिक कथेची मुहूर्तमेढ रोवली. त्यांच्या 'सह्याद्रीच्या पायथ्याशी' या कथासंग्रहाला त्यांनी 'आठ स्वतंत्र प्रादेशिक कथा' असे शीर्षक दिले. आणि तेथूनच प्रादेशिक साहित्य मराठीत अवतरले. वि. स. सुखटणकरांच्या 'सह्याद्रीच्या पायथ्याशी' या कथासंग्रहाने मराठी कथासाहित्यात परिवर्तन घडवून आणले.

सुखटणकरांनी आपल्या कथालेखनात गोमंतकीय निसर्ग, समाज जीवन, तेथील धार्मिक सांस्कृतिक जीवन, रूढी परंपरा, श्रद्धा इ गोष्टींकडे डोळसपणे लक्ष केंद्रित करून ते आपल्या लेखनात उतरवले आहे. गोमंतकीय निसर्गाची समृद्धी व संपन्नता त्यांच्या कथांना अधिक वजनदार बनवतात. आंब्या-फणसांच्या व नारळी पोफळींच्या झाडांनी व्यापलेली खेडी, खेड्यांच्या मध्यभागी असलेले तलाव, त्याच्या सभोवती भाटांनी व कुळागारांनी वेढलेली लहान-लहान घरे, प्रचंड खळखळाट करीत वाहणाऱ्या नद्या, अबोली, शब्दुली, पारिजातक, चाफा अशी चोहीबाजूनी सुगंधीत करणारी फुलझाडे सुखटणकरांच्या कथेतील प्रादेशिकतेला समृद्धी आणि वैभव प्राप्त करून देणाऱ्या कथा त्यांनी लिहिल्या. गोमंतकीय प्रादेशिक कथा केवळ सृष्टीसौंदर्य वा व्यक्तिचित्रणच करते असे नाही. तर गोमंतकीय जीवनातील दुःख दारिद्र्य आणि व्यथा-वेदना यांचाही समर्थपणे शोध घेताना दिसते.

सुखटणकरांच्या कथांतून तत्कालीन गोमंतकीय जीवन चित्रित झाले आहे. त्यात केवळ हिंदू धर्मातील लोकसमूहाचे चित्रण नसून ख्रिस्तीधर्मियांना तेवढेच महत्व दिले आहे. त्याच प्रमाणे गोव्यातील , भाटकार, मुंडकर ह्या संस्कृतीचे दर्शन ही त्यांच्या कथेत होते. देवदेवतांचे सण, जत्रा, श्रद्धा, अंधश्रद्धा, दंतकथा, इतिहास या सारखे अनेक महत्वपूर्ण विषय सुखटणकरांनी आपल्या लेखनात हाताळले आहेत. तत्कालीन समाजातील अनेक लोकगीते, कवने, म्हणी, शब्दप्रयोग, वाक्प्रचार, प्रतीके, प्रतिमा इ. गोष्टीमुळे भाषाविशेषांचा गोडवा प्रादेशिक कथेला प्राप्त होतो. सुखटणकरांनी वाचकवर्गाचा विचार करून वाचकांना अडचणीचे वाटतील अशा प्रादेशिक शब्दांचे अर्थ व स्पष्टीकरणात्मक टीपा कथासंग्रहाच्या अखेरीस दिलेल्या आहेत. आपल्या प्रादेशिक कथा वाचकांना पुरेपूर समजाव्यात व आनंद देणाऱ्या ठरण्याच्या हेतूने त्यांनी हा पुढाकार घेतला होता.

सुखटणकरांसोबत प्रादेशिक साहित्याच्या पंगतीत बसणारे अनेक कथाकार प्रा. लक्ष्मणराव सरदेसाई, व्यंकटेश पै रायकर, पंडित महादेव शास्त्री जोशी, बा. भ. बोरकर, बा. द सतोस्कर इ. असे आहेत. त्यांनी गोमंतकीय प्रादेशिक कथेला एक उंचीवर नेऊन पोहोचविली. गोमंतकीय मराठी कथेची ओळखं म्हणून संबोधल्या जाणाऱ्या स्थरांच्या कथांची निमिर्ती प्रा. लक्ष्मणराव सरदेसाई यांच्याकडून झाली. त्यांची कथालेखानाची संख्या ही खूपच जास्त आहे. त्यांचे १५ कथासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. त्यांच्या गोमंतकीय कथेत प्रदेशिकतेचे ठसे उमटत असलेले दिसून येते. ते आपल्या कथांतून गोमंतकीय लोकजीवनाचे व लोकसंस्कृतीचे यथार्थ दर्शन घडवितात. लक्ष्मणरावांनी आपल्या लेखनात गोमंतकीय संस्कृती, नागरी

जीवनाचा परिणाम म्हणून गोमंतकीय ग्रामीण जीवनातील ढासळणाऱ्या परंपरांचे चित्रण, नाते संबंध असे विषय हाताळले आहेत.

लक्ष्मणरावांनी 'बिजेची कोर' या कथासंग्रहात स्त्रियांच्या मनोव्यथाचे चित्रण करण्याचा प्रयत्न केला आहे. पुरुष स्त्रीसुखासाठी आसुसलेले असतात त्याच प्रमाणे स्त्रियांच्या ही काही सुप्त भावना असतात. यातून एकंदरीत काळानुसार बदलत्या विचारसरणीचे, स्व चा शोध घेणाऱ्या स्त्रीचे चित्रण लेखकांनी केले आहे. या बरोबरच काही जुन्या गोमंतकीय वैभवाचे पडसाद ही त्यांच्या कथांतून झालेले दिसून येतात. ख्रिस्ती लोकजीवनाचे चित्रण करणाऱ्याची त्यांच्या कथा आहेत. त्यातून धर्मांतर या सारख्या विषय ही आला आहे. एकंदरीत प्रादेशीकता म्हणत असताना लक्ष्मणरावांनी गोमंतकीय समाज वास्तताव, निसर्ग वर्णन, गोमंतकीय संस्कृतीत घडणारे बदल, गोमंतकीय बोली हे त्यांच्या कथांतून दिसून येते.

गोमंतकीय कुटुंब व्यवस्थेवर भाष्य करणाऱ्या कथा या पंडित महादेवशास्त्री जोशी यांनी लिहिल्या. गोव्यातील मध्यमवर्ग व ब्राह्मणवर्गाचे कौटुंबिक जीवन चित्रण त्यांच्या कथांतून दिसून येते. गोमंतकीय कौटुंबिक जीवनाचं चित्रण करत असताना शास्त्रीबुवांनी स्त्री मनातील करूण भावना, संसारचित्रे, जीवनातील सुख-समृद्धी जोपासणाऱ्या कथा त्यांनी लिहिल्या. 'वृंदा', 'झाडपणी' सारख्या कथांतून समाजाकडून मिळालेल्या हिंसक वागणुकीतून एका विधवा स्त्रीचे दुःख चित्रित केले आहे. 'मोरभटजी', 'कन्यादान', 'सत्कार' इ. कथांतून सेवाभावी व कर्मयोगी व्यक्तींची चित्रणे महादेवशास्त्रीनी केली आहेत. गोमंतकीय माणसांमधील असलेली दुसऱ्याविषयीची आपुलकी, गावाच्या प्रति असलेल्या प्रेमापोटी स्वतःचे बलिदान देणे, गावातील माणसांमध्ये एकी निर्माण करण्यासाठी धडपडणारी प्रभावी व्यक्ती चित्रणे त्यांनी आपल्या कथांतून रेखाटली आहेत.

बा. भ. बोरकर हे लक्ष्मणराव सरदेसाई, पंडित महादेवशास्त्री जोशी यांच्या समकालीन लिहिणारे गोमंतकीय प्रादेशिक कथाकारांपैकी एक आहेत. गोमंतकीय लोकजीवन हे बोरकरांच्या लेखनाचा केंद्रबिंदू आहे. घराण्याची प्रतिष्ठा, गोमंतकीय भूमीप्रेम या सारख्या प्रादेशिक कंगोरे त्यांच्या 'समुद्रकाठची रात्र' या कथासंग्रहातून व्यक्त होताना दिसतात. त्याच बरोबर श्रद्धा, अंधश्रद्धा, गोमंतकीय दंतकथा, आख्यायिका यांचा ही वापर त्यांनी आपल्या प्रादेशिक कथांतून केला आहे. अद्भुतरम्यता, रंजकता, वास्तवता हे त्यांच्या कथांचे गुणविशेष आहे. 'सोनकेळ', 'देवीचे दान', 'समुद्रकाठाची रात्र', 'सुताराची सून' या सारख्या कथा प्रादेशिकतेच्या

दृष्टीने महत्वाच्या ठरतात. कारण त्यातून गोमंतकीय देव देवस्की विषयी असलेली मान्यता त्यात अवसर येणे, शाप, प्रसाद लावणे, नवस करणे या सारख्या गोष्टींचा उल्लेख झाला आहे. व्यंकटेश अनंत पै रायकर यांनी 'तिमीरातून तेजाकडे', 'भावना आणि वासना', 'साक्षात्कार कि वरदान' 'पस्तिशी' 'वासनाकांड' या सारख्या अनेक कथा लिहिल्या आहेत. त्यांच्या या कथांना गोमंतकीय पार्श्वभूमी लाभली आहे. त्यांच्या कथांतून मानवी मनातील भावना आणि वासना, मानवी मनातील अहंकार आणि घमंडेखोरी, देवावरील श्रद्धा या सारखे विषय आले आहेत. अँड. जयवंतराव सरदेसाई यांनी प्रादेशिक कथा लिहीत असताना समाजातील निम्नस्थरिय व्यक्तिचित्रण, प्रसंग यावर त्यांच्या कथा आधारलेल्या आहेत. त्यांनी आपल्या कथांतून अगदी घरगुती प्रसंग सुरेख व प्रभावीपणे व्यक्त केले आहे. त्यांनी कथालेखानाचा सहजसुंदर, सोपी, मधुर, क्वचित अलंकारिक भाषा वापरली आहे. त्यामुळे त्यांची कथा रचना, विषय आशय प्रभावी व प्रवाही बनतात. त्यांच्या प्रादेशिक कथा विषयी मामा वरेरकर यांनी असे म्हटले आहे की, "गोमंतकाच्या काव्यभूमितील जिवात्म्याचे अंतरंग प्रस्तुत लघुकथा लेखकाइतक्या सहृदयतेने आणि वास्तवतेने इतर कोणत्याही लेखकाने यापूर्वी चित्रित केले नाही असे म्हणण्यास मला यत्किंचितही संकोच वाटत नाही." सारदेसाईंच्या प्रादेशिक कथा या सुंदर व वाचनीय आहेत. 'गुलाब गेंद' या कथासंग्रहातील आठवणींचे अवशेष ही त्यांची गोमंतकीय समाजातील देवदासी प्रथेवर भाष्यकरणारी कथा आहे. 'पाप आणि पुण्य', 'पहिले पाप', 'सोलदाद' या सारख्या कथांना केवळ प्रादेशिक पार्श्वभूमी लाभली आहे. त्यानंतर त्यांच्या तिसऱ्या कथासंग्रहातील 'आल्बर्ट आता इथेच राहील' आणि 'धाकटो देव' या दोनच कथा प्रादेशिक कथा आहेत. सां. घ. कंटक यांनी देखील गोमंतकीय कुटुंब व्यवस्थेवर भाष्य करणाऱ्या कथा लिहिल्या आहेत. काशिनाथ पुंडलिक घोडे यांच्या कथालेखानातून ख्रिस्ती जीवनाचे चित्रण झाले आहे. त्याच प्रमाणे पोर्तुगीज व फ्रेंच जीवनशैलीचे चित्रण झाले आहे. यातूनही प्रादेशिकता त्यांच्या कथांतून झळकत असलेली दिसून येते. बा. द. सतोस्कर अभूकता या संग्रहातील 'मिलिंद', 'दर्याचा पुत्र', 'फिलुची मुदी', 'मोल', 'जग बदलते आहे' या कथांतून गोमंतकीय बदलत्या समाज जीवनाचे चित्रण लेखकांनी केले आहे. त्यांनी आपल्या कथांमध्ये संवेदनशील अशी व्यक्तिचित्रणे केली आहे. त्याचे चित्रण अभूकता या कथेतून झाले आहे. जिथे एक ख्रिस्ती तरुणी मेलिंद एका हिंदू तरुणाशी लग्न करू पाहते पण तिच्या घरच्यांचा त्याला नकार असतो पण ती आपल्या घरच्यांना ठणकावून सांगते की लग्न केल्यावर ती ख्रिस्ती तसेच हिंदू धर्माचेहि पालन करणार. र. उ. राव यांच्या 'तुळशी' सारख्या कथेतून गोमंतकीय समाज जीवनातील स्थित्यंतराचा विषय येतो. अँड. गणाधीश खांडेपारकर यांनी गोमंतकीय ख्रिस्ती जीवनावर

आधारित कथा लिहिल्या आहेत. प्रा. मनोहर हिरबा देसाई यांनी गोमंतकीय कथालेखानात गोमंतकीय समाज, त्यातील स्तीत्यंतरे, परिवर्तने, संघर्ष, समाजाची जडणघडण या सारखे विषय मांडले आहेत. नाग, पौर्णिमेच्या रात्री, राधिका, वटवृक्ष, बाबुश, फुलावंती इत्यादी कथा महत्वाच्या आहेत. पौर्णिमेच्या रात्री या कथेला त्यांनी गोव्यातील मांडावी नदीच्या काठाची पार्श्वभूमी दिली आहे. फुलावंती या कथेतून एका देवदासीची कथा व्यक्त केली आहे. वटवृक्ष या कथेतून सत्तरीतील ग्रामीण जीवन जगणारा जानू गावडा व पणजी सारख्या शहरात राहणाऱ्या भाऊसाहेब यांच्यामधला ऋणानुबंध चित्रित करण्यात आला आहे. अशा काही कथांतून गोमंतकीय प्रादेशिक जीवन सारदेसाईंच्या कथांतून दिसून येते.

गोवामुक्ती नंतर गोमंतकीय लघुकथेने नवेरूप धारण केले. गोमंतकीय कथेत नवीन विषय येऊ लागले. या कालखंडात गोमंतकीय कथेने नवकथेचे रूप घेतले आणि ते पुढे नेण्यास कथाकार प्रल्हाद वडेर, नरेश, मुरलीधर कुलकर्णी, यशवंत कर्णिक या सारख्या कथाकारांचा उल्लेख करावा लागतो. डॉ. प्रल्हाद वडेर यांनी 'न्यूड' या कथेत गोमंतकीय समुद्रकिनाऱ्यावरील रोमँटिक वातावरण, हिप्पीची मुक्त जीवन पद्धती याचे चित्रण केले आहे. मुरलीधर कुलकर्णी यांचे चार कथासंग्रह प्रसिद्ध झाले आहे. त्यांनी कारकून, शिक्षक, इंजिनियर, नातेवाईक, शेजारीपाजारी यांच्या जीवनातील विविधरूपे त्यांच्या कथेत दिसून येतात. आधुनिक जीवनाला भेडसावणाऱ्या समस्या त्यांच्या कथेत दिसून येतात. नरेश कवडी यांचे दोन कथासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. त्यांच्या कथांतून कौटुंबिक जीवन जीवनातील भावबंध, भावनिक संघर्ष यांचा प्रत्यय येतो. वास्तव चित्रण करणाऱ्या त्यांच्या कथा आहेत. अरुण हेबळेकर यांचे दोन कथासंग्रह प्रसिद्ध झाले आहे. त्यांच्या कथा या मानवाच्या अंतर्मनातील वासना, विकार आणि विकृती यांचा वेध घेणाऱ्या आहेत. पती पत्नी नात्यातील मानसिक दुरावलेपणा, त्यांच्या कथेतून प्रत्ययाला येते. माणसांची दुःखद स्तिथी त्यांनी आपल्या कथांतून चित्रित केली आहे. गोमंतकीय कथेत विज्ञान कथा आणण्याचे श्रेय हेबळेकरांना जाते. पु. शि. नार्वेकरांचे तीन कथासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. यांच्या विघ्नहर्ता या कथेत गोव्यातील पोर्तुगीज राजवटीच्या दरम्यान घडलेल्या चळवळीत संशयित दृष्टीने अटक करण्यात आलेल्या विसुभटाला त्यांचा मुलगा आजेंत मोंन्तेरोच्या तावडीतून सही सलामत सोडवून आणतो. या सारख्या गोमंतकीय इतिहासिक घटनांचे चित्रण त्यांच्या कथांतून झाले आहे. अंधश्रद्धाळू समाजव्यवस्थेचे चित्रण हि त्यांनी आपल्या कथालेखानात केले आहे. नार्वेकरांच्या कथालेखानात गोव्याच्या समाजजीवनात घडणाऱ्या घटनांचे तपशील दिसून येतात. ज्ञानेश्वर कोलवेकर यांनी मुक्तीनंतरच्या कालखंडात बदलत्या जनजीवनाचे चित्रण करण्यात आले आहे. त्यांच्या कथांना प्रादेशिकतेची

पार्श्वभूमी लाभली आहे. समाज जीवनातील वास्तवता त्यांच्या कथेतून प्रभावीपणे दिसून येते. बदलत्या गोमंतकीय सामाजिक व आर्थिक परिस्तिथीचे चित्रण त्यांच्या 'वाटचाल' या कथेतून घडताना दिसते. पर्यटनाचे गोव्यातिल जीवनावर होणारे दुष्परिणामाचे चित्रण 'सायबिणी पाव' या कथेतून झालेले दिसते. समुद्री वातावरणाचे चित्रण ही या कथासंग्रहात कोलवेकरांनी केले आहे. त्यानंतर जयराम पां. कामत यांनी गोमंतकीय कथालेखनात वैशिष्ट्यपूर्ण असे स्थान निर्माण केले आहे. त्यांचे दोन कथासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. त्यांची कथा ही आधुनिक समाज व्यवस्थेचे चित्रण करण्यात आले आहे. त्यांच्या कथेत मानसिक गुंतागुंत असलेल्या व्यक्तिरेखा आढळतात. भाटकर व मुंडकार या सामाजिक व्यवस्थेचे चित्रण हि त्यांच्या कथांतून घडते. 'वारसा', 'खेळ नियतीचा', 'दुर्दैवी शामाय' या सारख्या कथांतून गोव्यातील ख्रिस्ती कुटुंबे त्यातील व्यतिरेखा त्यांच्या कथांतून दिसून येतात. 'तिखळी' या कथेतून गोमंतकीय समाजातील अंधविश्वासावर त्यांनी प्रकाश टाकला आहे. डॉ. विठ्ठल ठाकूर यांचे दोन कथासंग्रह प्रसिद्ध झाले आहे. त्यांची कथा मानवी मनातील गुढतेचा शोध घेताना दिसते. 'आघात' या कथेतून प्रादेशिकतेचे रंग दिसतात. गोवामुक्ती नंतरच्या काळात बदलत्या सामाजिक व आर्थिक परिस्तिथीपुढे हतबल झालेल्या स्वतंत्र सैनिकांच्या मानसिक उलघालीचे चित्रण ही त्यांच्या कथांतून होते. वासंती नाडकर्णी यांनी गोमंतकीय कथेत मोलाची भर घातली आहे. त्यांचे चार कथासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. भारतीय परंपरेतील स्त्री, तिचं कुटुंबातील स्थान, नातेसंबंध त्यातील ताणतणाव या सगळयाचा विचार करत असताना लेखिका निखळ वास्तवतेचे चित्रण आपल्या कथांतून करतात. गोव्याचा निसर्ग, जन जीवन, चित्रण करणारा आणखीन एक लेखक म्हणजे गजानन रायकर. त्यांच्या कथासंग्रहातून गोमंतकीय मातीतील व्यक्तिचित्रणे आलेली आहेत. पोर्तुगीज कालखंडात स्त्रियांवर झालेल्या अत्याचाराचे वर्णन 'नातालीन' सारख्या कथेतून झाले आहे.

१९८० साली गोमंतकीय कथावाङ्मयात संख्यात्मक व गुणात्मक भर पडली. कथाकार म्हणून प्रसिद्धी मिळवणारे सुभाष भेंडे, वैज्ञानिक विषय गोमंतकीय कथेत आणणारे डॉ. अरुण हेबळेकर, गोमंतकीय मराठी कथेला नवकथेचे अंग देणारे नरेश कवडी इत्यादी लेखकांचा इथे उल्लेख करावा लागतो. त्यानंतर याच कालखंडात कथा लेखनाकडे वळणारे, नव्या दमाचे लेखक म्हणून विठ्ठल गावस, अशोक घाडी, चंद्रकांत गावस, डॉ. विठ्ठल ठाकूर, नारायण महाले, मोरेश्वर मराठे, दासू शिरोडकर, अवधूत कुडतरकर, डॉ. सु. म तडकोड, जयराम कामत, ज्ञानेश्वर कोलवेकर, मिलिंद म्हामल, गजानन देसाई, उदय नाईक यांचा उल्लेख केला जातो.

कथाकारांबरोबरच काही कथा लेखिका या काळात लिहित्या झाल्या. त्यात श्रीमती माधवी देसाई, वासंती नाडकर्णी, अंजली आमोणकर, मीनल तळावलीकर, रेखा मिरजकर, रेखा पौडवाल, सुजाता सिरंगबाळ, गिरीजा मोरगोडी, लीना पेडणेकर, मंगला साने, मीना समुद्र, डॉ. किशोर पै, ज्योती कुकळकर या सारख्या लेखीकांनी गोमंतकीय कथावाङ्ग्यात मोलाची भर घातली.

१९८० नंतरच्या कालखंडाचा नवोदत्तरी कालखंडात असा उल्लेख केला जातो. तर या काळातील प्रादेशिक कथेत गोव्याचा भौगोलिक परिसर, निसर्गवर्णने, गोमंतकीय बोली अशा प्रादेशिक खुणा चित्रित झालेल्या दिसून येतात. डॉ. विठ्ठल ठाकूर यांच्या 'भार', 'आवर्त' या कथांतून गोव्यातील ग्रामीण समाजातील श्रद्धा अंधश्रद्धा, देवाचा अवसर येणे, समाजातील शोषित व शोषक वर्गाचे चित्र, गोमंतकीय बोलीचा वापर झालेला आहे. डॉ. विठ्ठल ठाकूर यांचे दोन कथासंग्रह प्रसिद्ध झाले आहे. त्यांची कथा मानवी मनातील गुढतेचा शोध घेताना दिसते. 'आघात' या कथेतून प्रदेशिकतेचे रंग दिसतात. गोवामुक्ती नंतरच्या काळात बदलत्या सामाजिक व आर्थिक परिस्तिथीपुढे हतबल झालेल्या स्वतंत्र सैनिकांच्या मानसिक उलाघालीचे चित्रण त्यांच्या कथांतून होते. नरेश कवडी यांचे दोन कथासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. त्यांच्या कथांतून कौटुंबिक जीवन जीवनातील भावबंध, भावनिक संघर्ष यांचा प्रत्यय येतो. वास्तव चित्रण करणाऱ्या त्यांच्या कथा आहेत. अरुण हेबळेकर यांचे दोन कथासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. त्यांच्या कथा या मानवाच्या अंतर्मनातील वासना, विकार आणि विकृती यांचा वेध घेणाऱ्या आहेत. पती पत्नी नात्यातील मानसिक दुरावलेपणा, त्यांच्या कथेतून प्रत्ययाला येते. माणसांची दुःखद स्तिथी त्यांनी आपल्या कथांतून चित्रित केली आहे. गोमंतकीय कथेत विज्ञान कथा आणण्याचे श्रेय हेबळेकरांना जाते. पु. शि. नार्वेकरांचे तीन कथासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. यांच्या विघ्नहर्ता या कथेत गोव्यातील पोर्तुगीज राजवटीच्या दरम्यान घडलेल्या चळवळीत संशयित दृष्टीने अटक करण्यात आलेल्या विसुभटाला त्यांचा मुलगा आजेंत मोंन्तेरोच्या तावडीतून सही सलामत सोडवून आणतो. या सारख्या गोमंतकीय इतिहासिक घटनांचे चित्रण त्यांच्या कथांतून झाले आहे.

नव्वोदत्तरी गोमंतकीय कथेचे स्वरूप हे काही प्रमाणात प्रादेशिकते पासून ग्रामीण स्वरूपात बदलत असलेले दिसून येते. नारायण महाले, विठ्ठल गावस, मिलिंद म्हामल या सारख्या पुढच्या गोमंतकीय कथाकाराच्या पिढीने ग्राम जीवनाकडे लक्ष अधीक केंद्रित केले. त्यांनी आपल्या लेखनात ग्राम जीवनातील समाज जीवन, कृषी व्यवसाय, ग्रामीण समस्या, ग्रामीण रूढ परंपरा याचे चित्रण प्रामुख्याने केले. अशा प्रकारे

प्रादेशिक कथेचा काळ नवोदत्तरी कालखंडात खालावला. पण तिचे छोटेमोठे पडसाद हे आजही गोमंतकीय कथा वाड्मयात जिवंत असलेले जाणवतात.

## २.३ गोमंतकीय मराठी कथेचे वेगळेपण

गोमंतक हा निसर्गाने नटलेली असा भूप्रदेश आहे. अरबी समुद्र व डोंगराळ भागाच्या सानिध्यात हा भूप्रदेश वसलेला आहे. गोमंतक हा एक छोटासा प्रदेश असून विविधांगी वैशिष्टयानी नटलेल्या असा हा प्रदेश आहे. गोवा हा सामाजिक, सांस्कृतिक, नैसर्गिक दृष्ट्या अन्य प्रदेशाहून वेगळा ठरतो. अश्या या भूमीत वेगवेगळे साहित्यिक जन्माला आले. त्यांना गोमंतकीय साहित्यिक म्हणून एक ओळख लाभली आहे.

गोमंतकीय कथा या साहित्यप्रकाराचा विचार करता त्याचे प्रामुख्याने दोन भाग पाडले जातात. एक गोवामुक्तीपूर्व गोमंतकीय कथा व गोवामुक्तीनंतरची गोमंतकीय मराठी कथा. गोमंतकीय लेखकांनी कथा हाच साहित्यप्रकार प्रामुख्याने हाताळलेला दिसून येतो. लेखक, समाज आणि साहित्य यांच्यात प्रत्यक्ष अप्रत्यक्ष संबंध असतो. लेखक ज्या समाजात वावरतो, तो जे अनुभवतो त्याच्या लेखनातून ते व्यक्त होत असते. या पार्श्वभूमीवर गोमंतकीय मराठी कथा उदयास आली.

गोवा हा बराच काळ भौगोलिक दृष्ट्या महाराष्ट्र राज्याशी सलग्न होता. त्यामुळे त्या महाराष्ट्रात घडणाऱ्या काहीएक घडामोडींचा परिणाम गोमंतकीय साहित्यावर हि झालेला दिसून येतो. मध्ययुगीन कालखंडात गोमंतकीय कथालेखनास प्रारंभ झाला. 'श्रीकृष्णचरित्र' या आख्यान काव्यापासून गोमंतकीय लिखित कथेची परंपरेला सुरुवात झाली. तत्कालीन कालखंडातील कथा लेखन हे भक्तीभाव, पुराणकाव्य, नामसंकीर्तन, आख्यायिका अधूनमधून शृंगाररीक अश्या प्रकारचे होते. त्यातून केवळ देव देवता, राजे राजवाडे, भक्तिभगवंतांचे चित्रण येत असे. आधुनिक कथा रचना तंत्राच्या दृष्टीने ही कथा वेगळी होती. त्याचप्रमाणे या कथांतील भाषा ही व्याकरणीक दृष्ट्या शुद्ध नव्हती. तत्कालीन कालखंडातील गोमंतकीय कथा ही श्रवणीय अधिक होती.

काळानुसार गोमंतकीय कथेत अनेक बदल घडत गेले. या बदलत्या गोमंतकीय कथेच्या स्वरूपात नियतकालिकांचा मोठा वाटा होता. 'लोकमित्र' या नियतकालिकाची विक्री गोमंतकात मोठ्याप्रमाणात होत होती. त्यातून अनेक गोमंतकीय कथा प्रकाशित होत होती. नियतकालिकांचे युग याच काळात गोमंतकात सुरु

झाले होते. त्यानंतर अनेक नियतकालिके जसे की 'प्रभात', 'भारत', 'भारतमित्र' इत्यादी. या नियतकालिकांतून प्रकाशित होणाऱ्या कथांनी गोमंतकीय कथाकारांची खऱ्या अर्थाने जडण घडण केली. या कालखंडातील अनेक कथाकारांनी लेखन केले. त्यांच्या लेखना मागचा हेतू हा समाज व्यवस्थेवर संस्कार करणे हा होता. या कथा समाजव्यवस्थेत घडणाऱ्या दोष दाखवणे इथपर्यंत मर्यादित असायच्या. या कथा वाचकांना उपदेश देणाऱ्या स्वरात लिहिल्या जायच्या म्हणून काही अंशी या कथेची भाषा कृत्रिम स्वरूपाची होती. कथेत नाटकाचे ही प्रयोग मिसळले जायचे. तत्कालीन कथेची रचना ही पक्की नव्हती तिच्यात खूप त्रुटी असलेल्या दिसून येतात.

मुक्तीपूर्व गोमंतकीय मराठी कथा ही कौटुंबिक विषय जास्त प्रमाणात हाताळणाऱ्या होत्या. नैसर्गिक चित्रण या कथांतून होत होते. १९३० मध्ये गोमंतकीय मराठी कथेत क्रांती घडवून आली. वि. स. सुखटणकरांनी गोमंतकीय मराठी कथेत सर्वांगाने बदल घडवून आणले. रंजक्ता, मनोरंजन, केवळ निसर्ग वर्णन या पासून अनेकविध वेगळी ओळख गोमंतकीय कथेला प्राप्त झाली. वि. स. सुखटणरांनी गोमंतकीय कथेला प्रादेशिकतेचे स्वरूप प्राप्त करून दिले. त्यांनी कथेच्या अंतरंगात तसेच बाह्यांगात बदल घडून आणले. या क्रांतीची सुरुवात त्यांनी कथासंग्रहांचा मुखपृष्ठापासून सुरुवात केली. मुखपृष्ठाच्या रंगीत सजवटीमुळे या कथासंग्रहाला रसिक वळण प्राप्त झाले. प्रादेशिकता हि केवळ वाचनातून नव्हे तर चित्रकृतीद्वारे वाचकांच्या डोळ्यासमोर उभी राहावी म्हणून त्यांनी कथासंग्रहात सूचक चित्रे छापविण्याचा निर्णय त्यांनी घेतला. त्यामुळे गोमंतकीय कथासंग्रह हे आगळेवेगळे ठरले. सुखटणकरांच्या नंतर लक्ष्मणराव सरदेसाई, जयवंतराव सरदेसाई, व्यंकटेश अनंत पै. रायकर, काशिनाथ पुंडलिक घोडे इत्यादी अनेक लेखकानी या कथेच्या विकासात हातभार लावला. गोमंतकीय कथेत गोमंतकीय मराठी अस्मिता जागवण्याचे श्रेय वि. स. सुखाटणकरांना जाते. या कथासंग्रहातून त्यांनी प्राचीन इतिहासाचा मागोवा घेणाऱ्या कथा, राजकीय गुलामगिरीमुळे धासळणाऱ्या सामाजिक नितीमुल्यानचे, तत्कालीन लोकांच्या आर्थिक परिस्थितीचे, आत्मभान गमावून बसलेल्या समाजाचे चित्रण त्यांनी केले. गोमंतकीय स्वातंत्र्यासाठी झुंज देणाऱ्या स्वातंत्र्यवीरांच्या विफल प्रयत्नांचे चित्रण ही त्यांच्या कथेने घडविले. मानवी स्वभाव, सांस्कृतिक जीवन यांचे सूक्ष्म निरीक्षण त्याचबरोबर योग्य वाक्प्रचार, म्हणी, लोकसमजूती त्यांनी कथेतून मांडल्या आहेत. या सर्व गोष्टी टिपणे याचाच अर्थ एकप्रकारची गोमंतकीय अस्मिता त्यांनी आपल्या कथांतून जोपासली आहे.

पं. महादेवशास्त्री जोशी यांनी आपल्या कथेतून गोव्याची पार्श्वभूमी, गोव्यातले लोकजीवन, त्यांची सुखदुःखे आपल्या कथेतून मांडली आहे. गोव्याच्या सत्तरी भागातील ब्राह्मण समाजाचे पारंपारिक जीवन, त्यांच्या चालीरीती त्यांनी साध्या सरळ भाषेतून मांडल्या. स्त्रीयांच्या व्यथा प्राधान्याने त्यांच्या कथांतून व्यक्त होताना दिसून येतात. त्याचबरोबर कौटुंबिक कथेचा प्रवाह त्यांनी समृद्ध केला. अश्यातून गोमंतकीय कथेला त्यांनी अधिक संपन्न केली.

प्रा. लक्ष्मणराव सरदेसाई यांनी आपल्या कथालेखनात गोव्यातील सारस्वत घराणी, त्यांच्या चालीरीती, भोगावीलास, भाविणी, धर्मांतरित ख्रिस्ति समाज अशी वास्तववादी व्यक्तिचित्रणे त्यांनी आपल्या कथांतून रंगविली आहे. गोमंतकाच्या गतवैभवाची क्षणचित्रे देखील त्यांच्या काही कथांतून दिसून येतात. त्यांनी ग्रामीण भागातील झोपडपट्टीचे चित्रण हि आपल्या कथांतून केले आहे. गोव्यातील माणसांचा दैनंदिन जीवनाचा योग्य वापर त्यांनी आपल्या कथांतुन चित्रित केले आहे. त्यांच्या आशय संपन्न कथांनी मराठी कथासृष्टीत लक्षणीय भर घातली आहे. विस्तृत असे गोमंतकीय चित्रण त्यांनी आपल्या कथातुन केले आहे.

१९४७ ते ६१ या काळात काही गोमंतकीय कथाकारांनी गोव्याबाहेर राहून गोमंतकीय कथेला एक अभिजात वळण देण्याचा प्रयत्न केला आणि त्यातून गोमंतकीय प्रादेशिक कथा अधिक समृद्ध केली. १९६१ साली गोवा पोर्तुगीज राजवटीतून मुक्त झाला. पोतुगीजां बरोबर पोतुगीज भाषा नाहीशी झाली, कदंब बरोबर कानडी भाषा देखील नाहीशी झाली. पण मराठी भाषा हि गोव्यात प्राचीन काळापासून नांदत होती. मराठी राज्य महाराष्ट्रात स्थापित होण्यापूर्वी पासून मराठी भाषा ही गोव्यात होती आणि म्हणून गोव्याची कोकणी हि मातृभाषा असली तरीही गोमंतकीय साहित्य हे मराठी भाषेतूनच लिहिले गेले. नंतरच्या काळात त्यात कोंकणी भाषेचा वापर लेखकांनी करण्यास सुरुवात केली.

गोवामुक्ती पूर्वकाळात व्यंकटेश पै. रायकर, जयवंतराव सरदेसाई, बा. द. सतोस्कर, का. पु. घोडे या सारख्या अनेक कथाकारांनी मराठीतून कथा लिहिल्या आहेत. मुक्तीनंतर सां. घ. कंटक, भालचंद्र मडकईकर, मनोहर हिरबा सरदेसाई, सौ. वासंती नाडकर्णी, जयराम कामत, पु. शि नार्वेकर, गणाधीश खांडेपारकर इत्यादी अनेक गोमंतकीय कथाकारांनी गोमंतकीय कथा लेखनाला सुरुवात केली. अश्या प्रकारे गोमंतकीय कथाकारांची पिढी घडली आहे. आणि त्यातुनच गोमंतकीय मराठी कथेला नवे वळण मिळाले.

याच काळात काही कथाकारांनी कथा अनुवादीत केल्या. डॉ. नरेश कवडेकर यांनी उपहास, उपरोध, विनोद, तिरकस यांच्या योग्य वापर आपल्या कथालेखनात केला आहे. डॉ. अरुण हेबळेकर यांच्या विज्ञान कथांतून भेदकता आणि सखोलता जाणवते. जीवनातील अटळ दुःखाचा आश्वस्त प्रत्यय ते आपल्या लेखनातून देतात. त्यानंतर डॉ. प्रल्हाद वडेर, डॉ. सुभाष भेंडे, विजय कापडी, पु. शि नार्वेकर, मेघना कुरुंदवाडकार, वर्षा वाडेकर इत्यादी अनेक कथाकारांनी वेगवेगळे विषय हाताळून गोमंतकीय मराठी कथेत मोलाची भर टाकली. गोमंतकीय अस्मिता जपण्याचा प्रयत्न या कथाकारांनी केलेला दिसून येतो.

सौ. वासंती नाडकर्णी यांनी स्त्री जीवनातील अनेक समस्याचे चित्रण कलात्मक पद्धतीने आपल्या कथांतून केले आहे. डॉ. विठ्ठल ठाकूर यांनी आपल्या कथेतून जी. ए. कुलकर्णी यांचे अनुकरण करण्याचा प्रयत्न करतात. आणि तेथूनच रूपक कथेचा प्रवाह त्यांनी मराठी कथा लेखनात आणला. ज्ञानेश्वर कोलवेकर यांनी गोमंतकाच्या प्रादेशिक जीवनातील ताणतणाव आपल्या कथांतून चित्रित केले आहे. श्री. श. फडके यांनी गोव्याचा भूप्रदेश, बदलत्या सभोवतालच्या जनजीवनाचे चित्रण, या विषयाचे चिंतन आपल्या कथांतून मांडतात. त्यात माणसा माणसातील नातेसंबंध, श्रमिक लोकांच्या वाट्याला येणाऱ्या यातना अश्या वास्तवाचे चित्रण त्यांनी केले आहे. विठ्ठल गावस यांच्या कथांतून गोमंतकीय ग्रामीण भागातील जीवन चित्रण येते.

गोमंतकीय कथाकारांचे एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी कथालेखनासाठी व्यक्तिचित्रणे ही वाचकांच्या अवतीभवती वावरणाऱ्या समाजातील रेखाटली आहे. साधी सरळ अगदी आपल्या अवतीभवती माणसे आहे तशीच माणसे कथेत वावरल्या सारखी कथांतून चित्रित होतात. माणसातील भेदभाव, त्यांचे परस्पर संबंध, कुटुंबातील ताणतणाव, हेवेदावे, सुखदुःखे यांचे प्रत्ययकारी जिवंत चित्रण करणाऱ्या कथा त्यांनी लिहिल्या आहेत. काही स्त्री लेखिकांनी स्त्रीची होणारी कुचंबणा कथेतून चित्रित केली आहे. अंजली आमोणकर यांच्या कथांमधून दैव, योगायोग, संघर्ष यांचे दर्शन घडते.

माधवी देसाई यांच्या कथा या पुरुष प्रधान संस्कृतीत भरडल्या जाणाऱ्या स्त्रीचे चित्रण करणारी आहे. स्त्रीच्या अंतर्मनाचा शोध घेणे हा त्यांच्या कथालेखानाचा स्थायीभाव असलेला दिसून येतो. गोमंतकीय जीवन पद्धती, तिची वैशिष्ट्ये सांभाळत गोमंतकीय कथेने आकार साकारला आहे. गोमंतकीय कथा ही गोमंतकाची पार्श्वभूमी, गोमंतकाचे अंतरंग, कथेतील अशयातून दिसून येणारी अभिव्यक्ती, विनोदी कथा, अनुवादित कथा यातुन आपले स्वतंत्र अस्तित्व टिकवून ठेवते. १९३० नंतर गोमंतकीय कथा ही बोधकरणे, मनोरंजन करणे,

भक्तिभाव, जीवनातील अनुभवांची गुंफण करणे या सगळ्यातून बाहेर पडून गोमंतकीय प्रादेशिकतेचे अंतरंग मांडणारी ठरली. गोव्यातील सण समारंभ, ग्रामीण संस्कृती, गोव्यातील खाद्य पद्धती, विशिष्ट राहणीमान यांचे चित्रण कथातून होवू लागले. गोमंतकीयत्व या कथांतून व्यक्त होऊ लागले. गोमंतकीय बोली कथा लेखनासाठी वापरली जाऊ लागली त्यातून गोमंतकीय समाज जीवन चित्रणाला जिवंतपणा लाभला आहे. या सर्व गोष्टींतून गोमंतकीय कथेचे वेगळेपण आपणाला नमूद करता येते.

## २.४ विठ्ठल गावस यांचे  वाङ्मयीन योगदान

गोमंतकीय कथाकार विठ्ठल गावस हे डिचोली तालुक्यातील न्हावेली या गावचे रहिवासी आहेत. त्यांचा जन्म २८ एप्रिल १९५६ रोजी झाला. त्यांचे पूर्ण बालपण न्हावेली या खेड्यातच गेले. विठ्ठल गावस हे मध्यमवर्गीय शेतकऱ्याच्या घरी जन्माला आलेले लेखक आहेत. त्यांचे प्रार्थमिक शिक्षण न्हावेली साखळी येथे पूर्ण झाले. त्यानंतर साखळीतील आमोणे गावातून त्यांनी हायस्कूल (अकरावी एस. एस. सी) पर्यंतचे शिक्षक पूर्ण केले. पुढील महाविद्यालयीन शिक्षणासाठी त्यांनी म्हापसा येथील ज्ञानप्रसारक कॉलेज ऑफ कॉमर्स येथे प्रवेश घेतला. प्रथम वर्ष वाणिज्य शाखे पर्यंतचे त्यांचे शिक्षण पूर्ण झाले. त्यांनी मुरगाव पोर्ट ट्रस्ट येथे ३८ वर्षे नोकरी करून निवृत्त झाले.

विठ्ठल गावस यांनी नव्वोदोत्तर काळात गोमंतकीय कथाकार म्हणून नामलौकिक कमाविले. विठ्ठल गावसांना लेखन परंपरेचा वारसा आपल्या वडिलांकडून लाभलेला होता. नोकरीतून निवृत्त झाल्या नंतर त्यांनी आपले लक्ष वाचन व लेखनाकडे वळविले आणि सातत्याने कथा लेखन करण्यास सुरुवात केली. 'कॅथरीन' हा त्यांचा पहिलाच कथासंग्रह १९९४ साली प्रकाशित झाला होता. 'लवण' हा त्यांचा दुसरा कथासंग्रह २००३ साली प्रकाशित झाला होता. 'ओझे' हा २०१० सही प्रकाशित झालेला त्यांचा कथासंग्रह आहे. 'फिंगर बाऊल' हा त्यांचा चौथा कथासंग्रह २०१९ साली प्रकाशीत झाला आहे. २०२२ साली 'खाणमाती' ही एकच एक कादंबरी त्यांची प्रकाशित झाली आहे. विठ्ठल गावस यांना त्यांच्या संपूर्ण साहीत्यीक योगदानासाठी धी गोवा हिन्दू असोसिएशन, मुंबई यांचा बा. भ. बोरकर साहित्य पुरस्कार.

## प्रकाशित पुस्तके

'कॅथरिन' कथासंग्रह - गमभन प्रकाशन, पुणे

'लवण' कथासंग्रह - गोमंतक मराठी अकादमी, पर्वरी

'ओझे' कथासंग्रह - गोमंतक मराठी अकादमी, पर्वरी 'फिंगर बाऊल' कथासंग्रह कैलास प्रकाशन, औरंगाबाद

'खाणमाती' कादंबरी अक्षरवाङमय प्रकाशन, पुणे

'क्षितिजरंग' कथासंग्रह - प्रतिनिधीक कथासंग्रहाचे संपादन, गोमंतक साहित्य सेवक मंडळ, पणजी

## पुरस्कार

१. 'कॅथरिन' कथासंग्रहाला गोमंत विद्यानिकेतन, मडगाव यांचा साहित्य पुरस्कार.

२. 'लवण' कथासंग्रहाला गोमंतक मराठी अकादमी, पर्वरी यांचा साहित्य पुरस्कार.

३. 'लवण' कथासंग्रहाला गोवा कला अकादमी, पणजीचा पुरस्कार.

४. 'लवण' कथासंग्रहाला लोकमान्य टिळक ट्रस्ट, चिपळूणचा साहित्य पुरस्कार,

५. 'ओझे' कथासंग्रहाला गोवा कला अकादमी, पणजी यांचा साहित्य पुरस्कार.

६. 'ओझे' कथासंग्रहाला गोमंतक मराठी अकादमीचा साहित्य पुरस्कार.

७. 'ओझे' कथासंग्रहाला गोमंतक मराठी साहित्य परिषद्, वाळपई यांचा साहित्य पुरस्कार

८. 'कहत कबिरा' कथेला फुदासांव ओरियेंते या पोर्तुगीज सांस्कृतिक संस्थेचा आल्बानो कुतो कथा पुरस्कार.

९. 'फिंगर बाऊल' कथासंग्रहाला सेतूबंध प्रतिष्ठान, पुळूज-पंढरपूर यांचा पुरस्कार.

१०. 'फिंगर बाऊल' कथासंग्रहाला कुंभार प्रतिष्ठान, कोवाडचा पुरस्कार.

११. 'फिंगर बाऊल' कथासंग्रहाला शिवचरण उज्जैनकर फाऊंडेशनचा साहित्य पुरस्कार.

१२. गोवा आणि महाराष्ट्र पातळीवर विविध साहित्यिक संस्थांच्या कथास्पर्धांमधून बक्षिसे.

१३. 'खाणमाती' कादंबरीला गोवा मराठी अकादमीचा पणजीचा साहित्य पुरस्कार.

१४. गोवा सरकारचा साहित्यिक पुरस्कार २०२२-२३

१५. महाराष्ट्र सरकारचा सयाजीराव गायकवाड पुरस्कार २०२२-२३

## इतर

१. 'लवण' व 'ओझे' कथासंग्रहाचा गोवा विद्यापिठाच्या पदव्यूत्तर अभ्यासक्रमात समावेश.

२. 'फिंगर बाऊल' कथासंग्रह्मचा सप्रे-आठले महाविद्यालय, देवरुख, रत्नागीरी यांच्या तृतीय वर्ष कला शाखेच्या अभ्यासक्रमात समावेश.

३. काही कथांचा इंग्रजी अनुवाद 'ब्रॉडवे' व 'गोवा १५६६' या प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या कथासंग्रहात समावेश.

४. Sao Paulo विद्यापिठ ब्राझीलच्या Thinking Goa Project अंतर्गत 'कहत कबिरा' व 'सांजाव' या कथांचा इंग्रजी अनुवाद Under The Peepal Tree या कथासंग्रहात समाविष्ट.

५. गोमंतक मराठी अकादमी आयोजित ११व्या युवा साहित्य संमेलनाचे अध्यक्ष.

६. गोमंतक मराठी अकादमीचे माजी उपाध्यक्ष. गोमंतक साहित्य सेवक मंडळ पणजी या संस्थेचे उपाध्यक्ष.

८. प्रागतिक विचारमंच आयोजित १६व्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष.

## सामारोप

गोमंतकीय मराठी कथेने मराठी साहित्यात मोलाची भर घातलेली दिसून येते. गोमंतकीय कथेने मराठी साहित्याशी राहून आपले अस्तित्व शोधले आहे. गोमंतकीय कथेला परिपूर्ण असे स्वरूप देण्यात अनेक कथाकारांनी या क्षेत्रात भर घातली आहे. गोमंतकीय लेखक तसेच लेखिकांनीही यासाठी हातभार लावलेला आहे. गोमंतकाचा एतिहासिक घटनांचा विचार करता अनेक उतार चढाव या साहित्यिक क्षेत्रात आले तरीही गोवा मुक्तीपूर्व व गोवा मुक्तीनंतर ही कथेचा प्रवाह अधिकाधिक वृन्धिगत होत गेला आहे.

## निष्कर्ष

- गोमंतकीय कथा हि प्राचीन काळापासून लोकसाहित्याच्या स्वरुपात गोव्यात होती.

- गोमंतकीय कथेत गोव्यातील प्रत्येक समाज जीवनाचे चित्रण कथाकारांनी प्रभावी पणे मांडले आहे.
- गोमंतकीय कथेचा प्रवाह हा प्रादेशिक कथेपासून नवकथा, ऐतिहासिक कथा, विनोदी कथा असा झाला आहे.
- मुक्तीपूर्वीची कथा ही रंजनप्रधान होती पण मुक्तीनंतरची कथा ही अस्सल वास्तवाचे चित्रण करणारी ठरली.
- मुक्तीपुर्वीच्या कथेच्या तुलनेत मुक्तनंतरच्या कथेत अनेक नवीन विषय हाताळले आहे.
- नव्वदोत्तर काळात प्रादेशिक कथेत ग्रामीण जीवन चित्रण जास्त प्रमाणात झालेले आहे.

**संदर्भ**


१. कानोळकर, बाळकृष्णजी. 'कथा', प्रभुदेसाई, वि. बा., घवी, रवीन्द्र, (संपा.), "गोमंतकीय मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड १." गोमंतक मराठी अकादमी प्रकाशन, २००३, पृ. क्र ३६५.

२. कानोळकर, बाळकृष्णजी. 'कथा', प्रभुदेसाई, वि. बा., घवी, रवीन्द्र, (संपा.), "गोमंतकीय मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड १." गोमंतक मराठी अकादमी प्रकाशन, २००३, पृ. ३७८, ३८७.

३. महाले,नारायण. 'कथा', नाडकर्णी , एस. एस., कोमरपंत, सोमनाथ (संपा.), "गोमंतकीय मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड २." गोमंतक मराठी अकादमी प्रकाशन, २००३, पृ. क्र ५६.

४. पंडित, अर्चना. "पं. महादेवशास्त्री जोशी यांचे कथाविश्व." कॉन्टीनेंटल प्रकाशन, १९९९, पृ. ६८.

५. कानोळकर, बाळकृष्णजी. "गोमंतकीय साहित्यातील शोध्स्थळे." गोमंतक मराठी अकादमी प्रकाशन बार्देस, २००८.

६. कुरुंदवाडर, मेघना. "गोमंतकीय कथेतून प्रकट होणारी मराठी अस्मिता", गोमंतकाची मराठी अस्मिता, पृ.११७.

७. बापट, विनय. "नव्वदोत्तर गोमंतकीय मराठी कथा." हेरोळे गजानन (संपा.), 'नव्वदोत्तर मराठी कथा, गोदा प्रकाशन औरंगाबाद, २०१८, पृ. ९८.

# प्रकरण ३

# विठ्ठल गावस यांच्या कथेतील जीवन चित्रण

# विठ्ठल गावस यांच्या कथेतील जीवन चित्रण

## प्रस्तावना

विठ्ठल गावस यांच्या कथाना गोमंतकीय पार्श्वभूमी लाभलेली आहे. त्यांच्या कथातून ग्रामजीवनातील अनेक विषय वेगवेगळ्या अंगाने हाताळण्यात आले आहे. विठ्ठल गावस यांचे जीवन पाहिले, तर ते एका खेड्यातील शेतकऱ्याच्या पोटी जन्माला आलेले असे जीवन आहे. त्यामुळे त्यांचे बालपण खेड्यात गेलेले आहे. खेड्यातील लोकांचे राहणीमान, तेथील माणसे, त्यांच्या जीवन जगण्याच्या पद्धती, तेथील दारिद्र्य, शेतीवर असलेला उदरनिर्वाह, त्यातून आलेली संकटे, नैसर्गिक आपत्ती, अवर्षण, ग्रामीण भागातील स्त्रीचे जीवन या सर्व गोष्टी त्यांनी अगदी जवळून स्वतःच्या डोळयांनी पाहिल्या आहेत.

लेखकाच्या जीवनजाणिवा सांगताना सुधा जोशी असे लिहितात की,

"कथात्म साहित्यात शब्दार्थाच्याद्वारे कल्पित वास्तवाची निर्मिती होत असते. घटना, पात्रे आणि स्थलकालबद्धता, वातावरण हे या कल्पित विश्वाचे म्हणजे कथाविश्वाचे मूलघटक असतात. असे कल्पित घटनाप्रसंग, पात्रे, त्यांच्या कृतिउक्ती, ही पात्रे जिथे जगतात व वावरतात आणि हे घटनाप्रसंग जिथे घडतात असा प्रदेश अशी स्थळे तसेच कालाचा अवकाश या सर्वांच्या निर्मितीतून एक सलग, एकसंघ असे वास्तव लेखक घडवीत असतो. कथात्म साहित्यकृतीत अशा कल्पित वास्तवाची आंतरिक संगती असलेली स्वयंपूर्ण अशी रचना आहे. लेखकाच्या जीवनजाणिवा, कलाजाणिवा त्याची मूल्यदृष्टी, त्याचे कलाहेतू ही रचना किवा संघटना नियंत्रित करीत असतात. "[१]

म्हणून लेखकाच्या मनावर तो जगत असणाऱ्या संस्कृतीचा व समाजरचनेचा फार मोठा परिणाम होत असतो. त्यातूनच लेखक कथानिर्मिती करत असतो. त्याचप्रमाणे या प्रकरणा अंतर्गत विठ्ठल गावस यांच्या कथासंग्रहातून चित्रित होणारे ग्रामीण जीवन चित्रण व परिसर, गोमंतकीय लोकसंस्कृती, समस्यारूपी अशायसूत्रे, गोमंतकीय बदलत्या जीवनाचे पैलू या विषयांना केंद्रस्थानी ठेवून अभ्यास करण्यात येणार आहे.

## ३.१.१ ग्रामीण जीवन व परिसर

नवोदोत्तर गोमंतकीय मराठी कथाकारांपैकी विठ्ठल गावस हे एक नावाजलेले असे लेखक आहे. त्यांचे कॅथरीन, लावण, ओझे आणि फिंगर बाऊल हे प्रकाशित झालेले कथासंग्रह आहेत. 'ग्रामीण' हा शब्द

उच्चारताच आपल्या डोळ्या समोर कृषिसंस्कृतीशी निगडित चित्र उभे राहते. गावसांच्या कथांचा ग्रामीण जीवन चित्रणा संदर्भात विचार करता त्यात शेती, निसर्ग, हिरवी पिके, माळरानं, शेतकरी, गुरंढोरं, शेताशी निघडीत कालचक्र, सण-उत्सव या सर्व बाबीचा समावेश होतो. गोमंतकीय भाटकार मुंडकार संस्कृतीचे दर्शन होते.

## ३.१.१.१ कथांमधून चित्रित झालेले कृषिजीवन

लेखकाने 'नांगरणी' या कथेत शेती व्यवसायात नवनवीन यंत्रणांची भर पडल्या कारणाने पारंपरिक पद्धतीने नांगरणी करून चार पैसे कमावणाऱ्या शेतकऱ्यांच्या आयुष्यात कशाप्रकारे प्रभाव होतो याचे चित्रण केले आहे. 'जोत' पद्धतीला आलेले कमीपणा आणि त्यामुळे एका गरीब शेतकऱ्याची होणारी शोकांतिक अवस्था लेखकाने या कथेत मांडली आहे. ग्रामीण जीवन चित्रण करताना गावस यांनी गोमंतकीय गावातील माळरानं, गुरं बांधणारा गोठा, चवढीवरील संध्याकाळी विडी ओढत बसणारा वायस्करांचा घोळका यांची जोड त्याला दिली आहे. अंतू शेतकरी हा दर वर्षी एका भाटकारणीचे शेत नांगरून चार पैसे कमावित असतो. एका वर्षी त्या भाटकारणीने ट्रॅक्टरच्या साहाय्याने आपले शेत नांगरून घेते. तिच्या मते ट्रॅक्टरमुळे नांगरणी लवकर होते व त्या मुळे ते काम कमी पैशांनी पूर्ण होते. तिच्या त्या निर्णयामुळे अंतू शेतकऱ्यासमोर एका मोठा प्रश्न उपस्तिथ होतो. अंतू शेतकऱ्या समोर उत्पादन स्रोताचा प्रश्न निर्माण होतो. तरीही भाटकारीण अंतुला मदत म्हणून आंतोन भटकाराचे नांगरणीचे काम मिळवून देते. ठरल्याप्रमाणे अंतू नांगरणीला सुरुवात करतो पण ऐन वेळी कधी न बसणारा त्याचा बैल त्यादिवशी बैठक मारतो. कुटुंबाच्या सुखसोयीसाठी त्याला भाटकाराचे काम पूर्ण करून देणे महत्वाचे असते. तो बैलाला शेतात चालविण्याचा खूप प्रयत्न करतो. काठीने तो आपल्या बैलाला मारहाण करतो पण बैल त्याला साथ देत नाही. त्याचा बैल आजारी असल्याचे अंतोला समजते त्या दिवशी नांगरणीचे काम होत नाही. ते पाहून आंतोन भाटकराला राग येतो व तो त्याला कामावरून काढून टाकतो. अंतूला बैलावर उमटलेल्या काठ्यांचे वळ दिसताच त्याच्या मनात पाश्चातापाची भावना निर्माण होते. एकंदरीत ग्रामीण माणसाचा प्राण्यांशी असलेला अतुट संबंध लेखकाने या कथेत चित्रित केला आहे.

'बांध' ही कथा गोमंतकीय परिसराचे सूक्ष्म चित्रण करणारी कथा ठरते. गोमंतकाचे सौंदर्य हे इथल्या हिरव्यागार निसर्गामुळे टिकून राहिले आहे. शेती बरोबरच भाट, कुळागर हे या प्रदेशातील ग्रामीण जीवनाचे अविभाज्य घटक आहेत. गोव्यातील बहुतांश लोकांचे जीवन हे या कुळागारांवर अवलंबून असते.

कुळागरांतील शांत शीतल वातावरण हे कुणाच्याही मनाला भुरळ घालणारे असते. "त्यांचं ते ऐसपैस पसरलेलं हिरवंकंच... कुळागार... आकाशाला गवसणी घालणारी नारळी-पोफळीची झाडं... त्याच्या खाली असलेलं केळीचं बन... त्याच्या वरच्या बाजूला असलेली आंब्या फणसाची झाडं पाटात वाहणारं खळखळतं नितळ पाणी... नानांनी हे सगळं प्रयत्नपूर्वक जोपासलं होतं... वाढवलं होतं..."

"शेता-भाटात कुळे राबत होती. सकाळ- संध्याकाळ कितीतरी माणसं त्यांच्या घरी जेवत होती. खात-पीत होती. भाटकाराच्या शेतात नुसतं उभं राहिलं की त्या दिवसाची पोटभर जेवणाची चिंता नाही असं प्रत्येकाला वाटत होतं. घर धन-धान्यानं भरलेलं असायचं. हंगामाच्या दिवसात आंब्या-फणसांचा वास सगळीकडे पसरलेला असायचा." (बांध, ५४)

अशा प्रकारचे एकंदरीत मन प्रसन्न करणारा गोमंतकीय निसर्ग गावसांनी या कथेत उभा केला आहे.

'गोल चेहऱ्याचा मुलगा' या कथेत वस्तीचे चित्रण झाले आहे. ती वस्ती साधी सुधी नसून जिथे वेश्या व्यवसाय उघडपणे सुरु असतो. रंगनाथ कुलकर्णी हा तरुण या वस्तीत आपल्या रिसर्चच्या कामासाठी आलेला असतो. या कथेत चित्रित झालेले वातावरण हे पूर्णपणे वेश्यावस्तीतले आहे. संध्याकाळच्या वेळेच्या वस्तीतील चित्र या कथेतून चित्रित झाले आहे. एक पान विकणारा गाडेवाला आहे. जिथे मधमाश्यांसारखे लोक घोळका करून आहेत. वस्तीतील म्हातारी माणसे शेकोटी पेटवून बसली आहे. प्रत्येक माणूस विडी शिलगावत आहे. संध्याकाळच्या वेळी लहान मुलं घोळक्या घोळक्यानी दंगा मस्ती करत आहेत. त्या मुलांच्या अंगावर पुरेसे कपडे नाहीत. तिथे पोलीस आहेत पण ते फक्त उभे राहण्यासाठीच. अश्या या वस्तीत रात्र होताच गर्दी वाढू लागते. कारण हा वेळ वस्तीतील बायकांचा धंद्याचा वेळ असतो.

रंगनाथ कुलकर्णीला या वेश्याव्यवसाया निघडीत अनेक प्रश्न असतात आणि त्याची उत्तरे शोधण्यासाठी तो त्या वस्तीत गेलेला असतो. त्यावेळी त्याला अनेक गोष्टींचा उलगडा होतो. देवदासी ही वेश्या पेक्षा काही वेगळी नसते याची जाणीव त्याला तेथे होते. एकंदरीत ग्राम संस्कृतीतील देवदासी प्रथेच्या नावावर चालणाऱ्या वेश्यांचे भीषण असे जीवन चित्रण या कथेत स्पष्ट झाले आहे.

गोमंतकीय कॅथलिक समाजाचे चित्रण करणाऱ्या काही कथा लेखकाने मांडल्या आहेत. त्यात त्यांनी गोमंतकीय कॅथलिक लोकांचा पेहराव, त्यांचे राहणीमान, व्यवसाय, भाषा यांचे सूक्ष्म चित्रण केले आहे.

"केश्रू आमका एक डुकरं जावो असलो"

"कित्याक रे"

"आयज आयतार न्हु... मास आणि रसांव." (कॅथरीन, २)

गोमंतकीय कॅथलिक लोकांच्या दैनंदिन खाद्यसंस्कृतीचे प्रत्यय वरील संवादावरून लक्षात येतात. गोमंतकीयांमध्ये व पर्यटकांमध्ये गोव्यातील काजू फेणी किंवा हुर्राक याचे विशेष आकर्षण असलेले दिसून येते. काजूची फेणी ही गोव्याच्या संस्कृतीचाच एका भाग बनली आहे. कॅथरीन ही 'ताव्हेर्नात' त्याचीच विक्रीकरून स्वतःचा संसाराचा गाडा ढकलत असते.

## ३.१.१.२ कथांमधून दिसून येणारा गोमंतकीय ग्रामीण व्यवसाय

'लवण' या कथेत बाजारपेठात फॅक्टरीतून तयार करण्यात येणाऱ्या मिठाच्या विक्रीमुळे पारंपरिक मिठागरांतून मिळणाऱ्या मीठावर सरकारतर्फे बंदी आणल्याने दादू सारख्या मीठ तयार करणाऱ्याला झालेल्या यातना लेखकाने यात मांडल्या आहेत. सरकारी नोकरी म्हणजे सर्वस्वी मानून पिढीजात चालत येणाऱ्या व्यवसायाला दादुचा मुलगा विरोध करतो व चोरून आपली जमीन सरकारला विकण्याचा निर्णय घेतो. स्वतःच्या शेतात मिठ पिकवण्याच्या दादुच्या निर्णयाचा व नैसर्गिक पद्धतीने निर्माण केल्या जाणाऱ्या मिठाचा दादुचा मुलगा तिरस्कार करतो पण बाजारातल्या महागड्या मिठाचे समर्थन करतो. याच दरम्यान दादुची भेट अजय नावाच्या मुलाशी होते आणि तो दादुच्या बाजूने उभा राहतो. एकाबाजूने स्वतःच्या मुलगा व दुसऱ्याबाजूने अजय सारख्या परकी व्यक्ती असूनही आपल्या भावभावना समजून घेतो हे पाहून दादू द्वंद्वात पडतो. शेवटी दादुला त्याचा मुलगाच धोका देतो व यातून दादू सारख्या शेतकऱ्याची झालेली दुःखद अवस्था लेखक वाचकांसमोर मांडतात. काहीवेळा तर दुःखात जगणाऱ्या ग्रामीण माणसाची शोषिक वृत्ती लेखक वाचकांसमोर मांडतात. त्यात आपल्या कुटुंबासाठी, मुला-बाळासाठी, संसारासाठी, नात्यागोत्यासाठी 'त्यागी' होऊन कष्ट करणाऱ्या ग्रामीण व्यक्तिरेखांची चित्रण लेखकाने आपल्या कथातुन केले आहे.

'दर्याचा पूत' या कथेत बदल्या काळानुसार दोन वेगवेगळ्या विचारसरणी मुळे जुन्या व नव्या पिढीमधला संघर्ष चित्रित झाला आहे. बदलत्या काळानुसार व्यवसाय क्षेत्रे बदलली, लोक गावाकडून शहरांकडे वळले. नानू हा मत्स्य व्यवसाय करणारा असतो. तो पारंपरिक नैसर्गिक जीवन जगू पाहणारा असतो.

नानू हा आपला वडिलोपार्जित मत्स्य व्यवसाय करणारा असतो. त्याचा मुलगा प्युनची नोकरी करणारा असतो. त्याच्या मुलाला त्याने पारंपरिक जीवन जगणे लाजिरवाणे वाटत असते. त्यांचे कौलारू घर त्याला गावठी वाटत असते म्हणून तो त्याला घर विकून टाकण्याचा उपाय सुचवितो. मुलाच्या सांगण्यावरून तो आपले घर विकून टाकतो. त्याचा मुलगा त्या पैश्यातून शहरात एक फ्लॅट विकत घेतो. त्यानंतर ते फ्लॅटमध्ये राहू लागतात. पण नानू आपला व्यवसाय सोडू पाहत नाही. कारण त्यांच्या अनेक पिढ्यांनी ह्याच व्यवसायाद्वारे आपले संसार चालवलेले असतात. ज्या दर्याने आपल्या इतक्या पिढ्या जगवल्या त्या दर्याला त्याला पाठ करायची नव्हती. त्यांची ती परंपरा त्याला सोडायची नसते. लग्न झाल्यावर त्याचा मुलगा त्याला हा व्यवसाय सोडण्यासाठी सांगतो. त्याला मत्स्य व्यवसाय हा किळसवाणा वाटत असे. मत्स्य व्यवसाय हा नारळी पौर्णिमेशी संबंधित असतो. नारळी पौर्णिमेचा सण साजरा करण्यासाठी नानू आपल्या मुलाकडे पैसे मागतो त्यावेळी त्याचा मुलगा त्याला नकार देतो. त्याचा मुलगा त्याला होडी विकून टाक म्हणून सांगतो. नानू मात्र त्याचे ऐकत नाही कारण होड्यामुळेच त्याला चार पैसे कमवता येत असतात. शेवटी आपल्या मित्रांच्या मदतीने नानू आपल्या होडीला पौर्णिमेच्या पूजेसाठी तयार करतो. पौर्णिमेच्या दिवशी नानू दऱ्याची पूजा करण्यासाठी दऱ्यांवर जातो. त्याचा मुलगा त्यावेळी त्याला अडवतो. नानूच्या हातातील सामान तो हिसकावून घेतो. तरीही नानू रीकाम्या हातानेच दऱ्यावर जातो. तेथे दऱ्याची पूजा करून संध्याकाळी मासे मारण्यासाठी सर्वजण थांबलेले असतात. पण अचानक दऱ्यात झालेल्या वादळामुळे नानूचे मित्र दऱ्यात जाणे टाळतात. नानू मात्र एकटाच होडी घेवून दऱ्यात उतरतो. तोच त्याचा शेवटचा दिवस ठरतो. नानू आपला वडिलोपार्जित व्यवसाय, रीतिरिवाज पाळण्यासाठी धडपडतो तर दुसऱ्या बाजूने त्याचा मुलगा या परंपरा पासून पळ काढू पाहतो. बदलत्या जीवनामुळे त्रस्त होवून स्वतःचाच अंत करून घेणाऱ्या नानू सारख्या ग्रामीण व्यक्तीचे दुखद वर्णन लेखकाने या कथेत केले आहे.

### ३.१.१.३ कथांमधून दिसून येणारे गावगाड्याचे चित्रण

सोयरिक जुळवताना देवाचा प्रसाद घेण्याची प्रथा गोमंतकात प्रचलित आहे. 'कॅथरीन' या कथेत ज्यावेळी कॅथरीनची सोयरिक जॉकीशी जुळते त्यावेळी कॅथरीनचे वडील श्री शांतादुर्गा देवीच्या देवळात प्रसाद घेतात. देवीचा प्रसाद मिळाल्या करणारे आपल्या मुलीचे लग्न सुरळीत पार पडणार या विश्वासाने तो तीच लग्न

करून देतो. कॅथरीन चे लग्न झाल्यावर तिचा नवरा दारुडा असल्याचे उघडकीस येते व त्याने कॅथरीनचे जगणे मुश्कील करून ठेवलेले असते. ज्यावेळी ही गोष्ट कॅथरीनच्या वडिलांना समजते त्या वेळी,

"देवी शांतादुर्गेचा प्रसाद असा नासका कसा ठरला...?" (कॅथरीन, ४)

असा प्रश्न उपस्थित करतो. एकंदरीत गोव्यातील गावगाड्याचे संदर्भ या कथेत आले आहे.

'मद' या कथेतून भाटकार मुंडकार व्यवस्था अंबलात आल्या नंतर गोव्यातील ग्रामीण जीवनात रूढ झालेल्या या पद्धतीचे संदर्भ या कथेतून आले आहेत. मुंडकार हा भाटकाराच्या भाटात राबत असतो. त्याच प्रमाणे धाकू हा या कथेत आलेला मुंडकार आहे. कायद्यानुसार भाटातील उत्पन्नाचे दोन भाग केले जातात. एक भाटकाराला व दुसरा मुंडकाराला, त्याच प्रमाणे या कथेतील भाटकार भाट पाडून घेण्यासाठी गावात येणार असतो. तर भाट पाडण्याची सर्व व्यवस्था मुंडकाराला करावी लागते. त्यानुसार धाकू भाटकाराचा संदेश मिळताच पाडेल्याची शोधाशोध करतो. मुंडकाराला भाटकार हा देवा समान असतो कारण त्याच्या भाटावर त्याचा संसार अवलंबून असतो. मुंडकार हा भाटकारासमोर गड्याच्या समान असतो. गावात भाटकाराला मान असतो त्याचे पालन करणे हे मुंडकारांचे कर्तव्य असते. भाटकार मुंडकाराशी किंवा त्याच्या कुटुंबियांशी कसाही वागला तरीही लाचार, गरीब मुंडकालारा ते सहन करावे लागते. वडिलोपार्जित चालत आलेल्या प्रथा परंपरेचे पालन करणे हे गावगाड्याचे वैशिष्ट्य आहे. ते लेखकाने चांगल्या पद्धतीने चित्रित केले आहे.

गावगाड्यातील जातीव्यवस्थेवर भाष्य करणाऱ्या लेखकाच्या 'तुटलेल्या साखळया', 'बांध', 'वहिवाट' या कथा सांगता येतात. गावात जातीयता मोठ्याप्रमाणात मानली जात असते. एखाद्या उच्चवर्णीय समाजातील मुलगी एका बहुजन समाजाच्या मुलाशी लग्न करू शकत नाही. अथवा असे होणे समाजाला मान्य नसते. बांध या कथेत भाटकाराच्या मुलीचे एका गावड्या जातीतील मुलाशी प्रेमप्रकरण चालू असते आणि त्याच्यापासून तिला दिवस गेलेले असतात. ज्यावेळी ही गोष्ट भाटकाराला समजते त्यावेळी ते लग्नाला पूर्ण विरोध करतात. कारण तो मुलगा बहुजन समाजातला असतो. गावातील जातीव्यवस्थेवर प्रकाश टाकणारी ही कथा आहे.

### ३.१.१.४ कथांमधून दिसून येणारे ग्रामीण जीवनातील राजकारण

'वादळ' या कथेच्या माध्यमातून ग्रामीण राजकारण व ग्रामीण भागातील शोषिक वर्गाचे चित्रण झाले आहे. सरपंच हा गावाचा प्रमुख असतो. गावात घडणाऱ्या घडामोडींकडे लक्ष घालणे व आपल्या गावातील

लोकांच्या समस्यांवर उपाय शोधणे हे त्याचे काम असते. प्रस्तुत कथेत मात्र वेगळेच चित्र आपल्याला पाहायला मिळते.

पावसाळ्यात झालेल्या वादळात गावातील लोकांना मोठे नुकसान झालेले असते. त्यातील एका शेतकऱ्याच्या घराचे छप्पर उडून गेलेले असते. त्यांची नुकसान भरपाई म्हणून सरकारकडून त्यांना पैसे देण्यात आलेले असतात पण गावातील सरपंचांनी केलेल्या गफलतीमुळे त्या गावातील लोकांची घरं; वादळ होऊन पंधरा दिवस झाले तरीही त्याच परिस्थिती उभी असतात. मंत्रीसाहेब ज्यावेळी गावात गावकऱ्यांची विचारपूस करण्यासाठी येतात त्यावेळी गावातील सरपंच गावकऱ्यांना नुसती नंदीबैलासारखी मान हलवण्यासाठी सांगण्यात येते. गावातील अशिक्षित भोळ्या भाबड्या गावकऱ्यांना या संदर्भात काहीच माहिती नसते. त्यात सरपंच्याला जाब विचारणे हे ही त्यांना जमत नसते. ज्यावेळी मंत्रीसाहेब गावात येतात त्यावेळी ते रवळूकडे चौकशी करू लागतात. ज्या वेळी ते वादळात झालेल्या नुकसानाची भरपाई म्हणून पैसे तुमच्यापर्यंत पोहोचले का? असा प्रश्न विचारतात त्यावेळी रवळू गोंधळतो. त्याच्याकडे त्या प्रश्नाचे उत्तर नसते. या वरून आपणाला कळून येते की सरपंचाकडून त्यांना पैसे पोहोचलेले नसतात. ग्रामीण जीवनात सत्ताधाऱ्यांकडून होणाऱ्या शेतकऱ्यांचे शोषण, ग्रामीण जीवनातील भ्रष्टाचार, फसवणूक याचे चित्रण या कथेतून घडते.

सरकारी शिक्षण संस्थेत चालू असणाऱ्या राजकारणाचे चित्रण येथे आहे. शहरातील शिक्षकाकडून एखाद्या गावातील शिक्षकाची होणाऱ्या कुचंबणेचे चित्रण नाडकर्णी व सावंत मास्तर यांच्याद्वारे लेखकाने 'हार' या कथेत चित्रित केले आहे. सावंत सर हे साधे भोळे गावातील शिक्षक असतात. ते जबाबदारीने व शिस्तीने वागणारे असतात. मुलांनी शिक्षण घेऊन मोठे व्हावे हीच त्यांची इच्छा असते. मुलांना वठणीवर आणण्यास शिक्षासुद्धा गरजेची असते याची त्यांना जाणिव असते. याचे प्रत्यय पुढील वाक्यातून लक्षात येते,

"आता आलं लक्षात. फार उनाड आहे मुलगा तुमचा. शिक्षणाकडे अजिबात लक्ष नाही त्याचं. मागच्या बाकावर बसून मुलांच्या खोड्या काढीत असतो. म्हणून दोन मारल्या काठ्या." (हार, १३२)

मुलांनी चांगल्या वळणावर जावे हाच त्यांचा प्रांजळ हेतू असतो. शिक्षण क्षेत्रात त्यांना पंचवीस तीस वर्षाचा अनुभव असतो. त्यांनी अनेक वर्षे सत्तरीतील अनेक शाळांमध्ये काम करून आपले अस्तित्व निर्माण केलेले असते. एक दिवशी अचानक त्यांची बदली शहरातील एका शाळेत केली जाते. त्यांची बदली वास्कोला केली जाते. कारण सरकारतल्या एका व्यक्तीच्या नातेवाईकाला वाळपईला बदली हवी होती.

स्वतःच्या माणसाची चांगली सोय व्हावी म्हणून रचलेले हे कारस्थान असते. या कारस्थानात सापडणारे हे सावंत सर असतात. त्यांची बदली शहरात झाल्या नंतर त्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. त्यांना तिथल्या मुलांशी, शिक्षण व्यवस्थेशी, मुलांच्या पालकांशी संघर्ष करावा लागतो. स्वार्थी राजकारणामुळे रिटायरमेंटच्या वयात सावंत सिरांना भोगाव्या लागणाऱ्या असंख्य यातना या कथेत मांडण्यात आल्या आहेत.

'निकाला नंतरची गोष्ट' या कथेत मतदानाच्या वेळी घडणाऱ्या भ्रष्टाचाराचे चित्रण झाले आहे. निवडणुकीच्या वेळी निवडणुका लढवल्या जातात. त्या जिंकण्यासाठी अनेक कटकारस्थाने रचली जातात. त्याचा एक भाग म्हणजे अशिक्षित माणसांना पैशांचे आमिष दाखवून मत गोळा करणे. या कथेत प्लास्टिक गोळा करून मिळालेल्या चार पैशावर जीवन जगणाऱ्या माणसांचे जीवन चित्रित झाले आहे. त्यांचा मतदान, निवडणुकी, राजकारण या गोष्टींशी काहीएक संबंध नसतो. कारण त्यांच्याकडे राज्याचे नागरिक म्हणून कोणतेच ओळखपत्र किंवा त्यांचा समावेश मतदानाच्या यादीत केलेला नसतो. त्यांच्या तोंडून खोटं बोलून घेतलं जातं. त्यांना आपल्या खऱ्या नावाच्या बदल्यात मतदान यादीत असलेले नाव सांगण्यास प्रवृत्त केले जाते. ज्यावेळी एखाद्या पक्षाला निवडणूक जिंकायची असते त्यावेळी ते लोक या अशिक्षित वर्गाकडे वळतात. त्यांना मत मारण्यासाठी पैसे दिले जातात. त्या हातावर पोट असणाऱ्या माणसांचा एक शिक्का मारून चार पैसे जास्त मिळावण्याशी मतलब असतो तर, नेत्यांना निवडणुकीच्या वेळी जास्त मतांनी निवडून येण्याशी. शेवटी मतदान झाल्यावर ते त्या अशिक्षित वर्गाकडे, फुटपाथवर जगणाऱ्या माणसांकडे ढुंकूनही पाहत नाही. वेळ आल्यास त्यांना फुटपाथ वरून हाकलण्यास ही मागेपुढे पाहत नाहीत. अशा प्रकारे राजकारणात चाललेल्या भ्रष्टाचार, कारस्थानी राजकारणाचे चित्रण लेखकाने या कथेतून केले आहे.

विठ्ठल गावास यांच्या कथा या गोव्यातील ग्रामीण जीवनाचे चित्रण करणाऱ्या आहेत. चारही कथासंग्रहातील निवडक कथांच्या अनुषंगाने त्यांच्या कथेतून चित्रित झालेले कृषिजीवन, गावगाडा, गोमंतकीय लोकजीवन, पारंपरिक ग्रामीण व्यवसाय इ. चा अभ्यास करण्यात आला आहे.

## ३.१.२ विठ्ठल गावसांच्या कथांतून चित्रित झालेली गोमंतकीय संस्कृती

गोमंतकीय ग्रामीण जीवनातील संस्कृतीचा विचार करता समाजातील रूढ चालीरीती, परंपरा, धर्मविषयक, देवविषयक श्रद्धा, लोकसमजुती या प्रदेशात प्रकर्षाने जाणवतात. या सगळयांमध्ये माणसांना

मिळूनमिसळून राहावे लागते. त्यातून त्यांचे भावजीवन तयार होते. संस्कृतीशी निगडित सर्व बंध त्याला पाळावे लागते.

गोवा राज्याला एक अलौकिक असा सांस्कृतिक वारसा लाभलेला आहे. गोव्यात ख्रिश्चन तसेच हिंदू परंपरांची सरमिसळ विशेष प्रमाणात जाणवते. सांस्कृतिक एकात्मता आणि सामाजिक एकी या मूल्यांची सांगड घालणारे भारताचे गोवा हे राज्य आहे. गोमंतकीय माणूस हा नवस बोलणे, अंगात देव येणे, देवतेला कौल लावणे, लग्नविषयक, मृत्यूविषयक परंपरेने चालत आलेल्या समजूतीनी भारावून घेलेला आहे. त्याचा सविस्तर अभ्यास करणे आवश्यक आहे.

संध्याकाळी देवासमोर दिवा लावणे, देवाचे स्मरण करण्याची गोमंतकीय लोकांची संस्कृती ही आजही अस्तित्वात आहे. संध्याकाळी लक्ष्मी घरात प्रवेश करते म्हणून संध्याकाळच्यावेळी घरात शांत वातावरण असले पाहिजे. असे दैनंदिन गोमंतकीय जीवनातील संस्कृतीचे संदर्भ गावसांच्या अनेक कथांतून पाहावयास मिळतात.

शेतीनंतर मत्स्य व्यवसाय हा गोमंतकीयांचा मूलभूत व्यवसाय बनला आहे. गोव्यात नारळी पौर्णिमा साजरी करण्याची रीत आहे. मत्स्य व्यवसाय हा गोमंतकीयांच्या संस्कृतीचाच एक भाग बनला आहे. गावसांच्या 'दर्याचा  पूत' या कथेत एकंदरीत दोन पिढीमधल्या संघर्षाचे हेवेदावे दर्शविले आहे. या कथेतील वडीलधारी व्यक्ती परंपरेने चालत आलेल्या संस्कृतीचे जतन करू पाहत असलेले दिसून येते,

"बाबू, उद्या पुनव!" त्यानं मुलाला म्हटलं.

"माहीत आसा माका"

"थोडे पैसे हवे होते."

"कशाक ते?"

"हे आणि कितें विचारता रे....? पुनव म्हणजे आम्हा खारव्याचो मोठो सण!"

"खबर आसा माका."

"मागीर?"

"पैसे कशाक हवे तर...?"

"फाल्या दर्याची पूजा करूक व्हयी. होडयेची पूजा करूक व्हयी..."

"कर मरे." मुलाचं बेपर्वाईचे उत्तर.

"वर्सासारखे होड्येक थोडो काळो डींक काढूक व्हयो. पाणयान इबाडची ना आणि बरी दिसतली ती." (दर्याचा पूत, ४)

एकंदरीत वर्षानुवर्षे वर्षातून एके दिवशी दर्याची पूजा करण्याची संस्कृती  या मत्स्य व्यवसाय करणाऱ्या गोमंतकीय समाजात असलेली या कथेतून स्पष्ट झाली आहे. आपल्या धर्मानुसार नवीन कार्य करण्या अगोदर औक्षण करणे, देवाचे स्मरण करण्याची प्रथा आहे तशीच व्यवसायाला सुरुवात करण्या अगोदर दर्याचा पूजा करणे ही या कोळी समाजाची संस्कृती आहे.

चतुर्थी, दिवाळी, दसरा या सणा बरोबरच सांजाव हा गोमंतकीय कॅथलिक धर्मात साजरा केला जाणारा सण आहे. पावसाळ्यात हा सण सर्व कॅथलिक बांधव मिळून साजरा करतात. तर प्रस्तुत कथेत शेरोन ही नावविवाहीत तरुणी सांजावच्या निमित्ताने आपल्या नवऱ्यासोबत माहेरी आलेली असते. गावसांनी आपल्या या कथेत सांजावच्या वेळेचे सूक्ष्म चित्रण या कथेत केले आहे. सांजावाला म्हटल्या जाणाऱ्या गाणी, त्या वेळेचे थंडगार वातावरण, लोकांचा उत्साह हा "व्हिवा सांजाव" म्हणून वाड्यावर फिरून जल्लोष करून वाढविला जातो. सांजाव हा पावसाळ्यात साजरा केला जातो, त्यात रंगीबेरंगी फुलांचा मुकुट डोक्याला घालून, घुमटाच्या तालावर गाणी म्हटली जातात. 'घुमट' हे गोमंतकीय वाद्यांपैकी एक आहे. गोव्यात अनेक सणांना घुमट वाजविले जाते. घुमट हे वाद्य गोमंतकीय संस्कृतीची ओळख आहे. अश्या या गोमंतकीय संस्कृतीचे संदर्भ गावसांनी आपल्या कथेला जोडले आहेत.

'दृष्ट' या कथेत गोमंतकीय महार समाजावर लेखक भाष्य करताना दिसून येतो. या कथेत मोरतू नावाचा नायक आहे जो आपल्या आई सोबत एका झोपडपट्टीत राहत असतो. टोपल्या विकण्याचा धंदा करून तो आपलं घर चालवत असतो. परंतु हल्लीच्या दिवसात त्याला एकही गिऱ्हाईक न मिळाल्या कारणाने त्याची व त्याच्या आईची एका वेळचे जेवण मिळणे ही कठीण होऊन बसते. त्याची झालेली ही दुःखद अवस्था लेखकांनी या कथेत चित्रित केली आहे. मोरतुचे वडील पूर्वी टोपल्या, सुपं विकण्याच्या धंद्या बरोबरच

म्हारपणाचे म्हणजेच दृष्ट काढण्याचे काम करत होते. मोरतु जसजसा मोठा होऊ लागला त्याला आपल्या वडिलांच्या दृष्ट काढण्याच्या धंद्यांची लाज वाटू लागली. म्हणून तो आपण हे काम करणार नाही असे ठरवतो. शेवटी पोटाची खळगी भागविण्यासाठी मोरतुला हे काम हाती घ्यावच लागतं. अप्पा राण्यांच्या घराकडून त्याला जेव्हा दृष्ट काढण्याच्या कामासाठी बोलावण्यात येतं त्यावेळी तो आईला न जाण्याचं कळवतो. कारण त्याला दृष्ट काढण्याचे मंत्र किंवा त्याच्या विधी माहित नसतात. शेवटी पोट भरण्यासाठी तो हे काम करण्यासाठी तयार होतो. तो अप्पा राण्यांच्या घरी जाऊन त्यांच्या सुनेची दृष्ट काढतो. दृष्ट काढण्याच्या नावावर काहीही बरळतो आणि तेथून पळ काढतो. गोमंतकीय समाजात पसरलेल्या लोकसमजुतीवर लेखकाने बोट ठेवले आहे.

'फिंगर बाऊल', 'कॅथरीन', या सारख्या कथांतून गोमंतकीय कॅथलिक धर्मातील बांधवांचे दर रविवारी चर्चमध्ये मास ला जाण्याच्या प्रथेचे चित्रण गावस आपल्या कथांतून करतात. दर रविवारी चर्चमध्ये मास असते त्यावेळी चर्चच्या आजूबाजूचा वातावरण एखाद्या सणासारखे असते त्याचे चित्रण गावस आपल्या कथेत करतात.

"रंगीबेरंगी कपडे केलेले स्त्री-पुरूष घोळक्या घोळक्यानं एकत्र होऊन एकमेकांशी बोलत असतात. थट्टा-मस्करी करीत असतात. त्यानी लावलेल्या परफ्युमनं तिथलं सारं वातावरण सुगंधित झालेलं असतं, तर तरूण मुलं-मुली आपल्या वेगळयाच जगात वावरत असतात. लहान मुल जवळपासच्या दुकानात खाऊसाठी किंवा एखाद्या खेळण्यासाठी आपल्या आई-वडिलांकडे हट्ट करताना दिसत असतात, तर बऱ्याचजणांनी आजूबाजूच्या दुकानात खरेदीसाठी एकच गर्दी केलेली असते... रविवार म्हटला की बहुतेकांचा सुटीचा दिवस... दुपारचा मेनू ठरलेला... जेवणापूर्वी थोडीशी दारू प्यायची... मटण-बीफचं रूचकर जेवण करायचं आणि तिन्हिसांजा होईपर्यंत झोपून द्यायचं, हे त्याचं ठरलेलं असतं." (फिंगर बाऊल, ६३)

गोव्यात कॅथलिक बांधव तियात्र हा लोककलाप्रकार मोठ्या उमेदीने रंगमंचावर सादर करतात. गोव्यात तियात्राला गोमंतकीय लोकसंस्कृतीचा दर्जा दिला आहे. कॅथरीन या कथेतील विजय या व्यक्तीच्या तोंडून निघणाऱ्या उद्गारांतून ते लक्षात येते.

"गोयचे तियात्र हावेन पळेले ना. जे एक गोयचे संस्कृतायेचे आंग आसा. आयज व्हडले इंगर्जेकडे तियात्र आसा. आयज मझो गोयातलो निमाणो दिस..." (कॅथरीन, ६)

अशा प्रकारे गोमंतकीय संस्कृती ही बहू धर्मांनी नटलेली आहे. याचे उत्तम दर्शन या कथेतून घडते.एकंदरीत गोमंतकात हिंदू धर्मातील त्याच प्रमाणे कॅथलिक धर्मातील सण साजरा करण्याचा संस्कृतीचे दर्शन या कथेतून घडते.

'वहिवाट' ही अप्रतिम अशी गोमंतकीय संस्कृतीचे दर्शन घडविणारी कथा आहे. "कानात घुमट समेळचा आवाज घुमू लागायचा... 'सर पुढे', 'सर पुढे' हे शब्द कानावर आदळू लागायचे. अंग थोडंसं थरथरल्यासारखे वाटायचं. देहात कोणतीतरी एखादी अदृश्य शक्ती संचारत असल्याचा भास व्हायचा. आणि त्याच क्षणी त्याचं थरथरणं थांबायचं. अंगाला घाम आल्यासारखा वाटायचा." (वहिवाट,९३)

अवसर काढणे ही गोमंतकात प्रचलित असलेली प्रथा आहे. अवसर येणे म्हणजे गावातील एका व्यक्तच्या अंगात एखाद्या देवाचा संचार होणे. एकंदरीत साक्षात देव सर्वांसमोर त्या माणसाद्वारे प्रकट होणे. गावातील काही मोजकीच घराणी असतात ज्यांच्या घरातील माणसांवर देवाचा अवसर येतो. अवसर काढण्या मागचे कारण म्हणजे गावातील भुरगी बाळं, गोरवा वासरं, पिकपाण्याकडे लक्ष ठेवून गावकऱ्यांना अन्न, वस्त्र, आरोग्य देऊन सगळयांना सुखरूप ठेवणे हे असते. देवाचा अवसर हा पाडवा, शिमगा या सणांच्या दिवसात काढला जातो. ज्या वेळी अवसर येतो त्यावेळी लोक आपल्या इच्छा देवापुढे व्यक्त करतात आणि त्याला अवसर आलेल्या माणसाद्वारे देवाचा प्रतिसाद मिळतो व लोक समाधानी होऊन त्यातून परततात. गोमंतकीय माणसांची देवावरील असलेली श्रद्धा लेखकाने येथे टिपली आहे.

'फोण' या कथेत लेखकाने गोव्यातील गडे उत्सवाचा विषय मांडला आहे. हा लोकउत्सव होळीच्या दिवशी रात्री होळीच्या मांडावर खेळवला जातो. या उत्सवात गावातील काही गावकऱ्यांवर देवाचा अवसर आणला जातो व ते होळीभोवती ढोलाच्या तालावर नाचत असतात. काही वेळा नंतर ते होळीच्या मांडावरून बाहेर पडतात व गावातील जंगलात जाऊन पुरलेल्या माणसांची हाडे (मसणा) घेऊन होळीभोवती नाचू लागतात. या दरम्यान गडयांना केवळ आपल्या गावातील खड्डे खणायची मर्यादा असते. दुसऱ्या गावात जाण्यास त्यांना परवानगी नसते. दुसऱ्या गावच्या सीमेवरील देवचार त्यांना गावात घेत नाही असा लोकांचा समज असतो. पण ज्यावेळी गड्यानी दुसऱ्या गावातील फोण ते पण म्हारिणीचा इसकल्याची बातमी गावात आगी सारखी पसरते त्यावेळी गावकाऱ्यांमध्ये हळहळ उठते. गडे स्वतः फोण इसकतात अशी समजुती लोकांमध्ये पसरलेली असते. ज्यावेळी गावकऱ्यांना समजते कि गावातील एखादा माणूस दुसऱ्या गावातील

लोकांना फितूर झालेला असतो त्यावेळी गावकरी त्या अपराध्याला त्यांनी केलेल्या कारस्थानाची शिक्षा त्याला देवच देणार असे जाहीर करतात त्या वेळी त्या अपराध्याचे मानसिक संतुलन बिघडते. एकंदर देवाची भीती मनात बाळगणाऱ्या गोमंतकीय लोकांची मनोवृत्ती लेखकाने मांडली आहे. या कथेतून गोमंतकीय सणाचे त्याचप्रमाणे लोकसंस्कृतीचे दर्शन घडते. गोमंतकीय लोकांची देव-देवस्कीवरील श्रद्धा या कथेतून निदर्शनास येते.

गावगाड्याचे काही नियम असतात. ते परंपरेने पाळण्याची प्रथा. त्यात काही लोकाचारही असतात या लोकाचारामध्ये काही घराण्यांना मान दिलेला असतो. गावातील ग्रामदेवाचे कार्य करण्याची प्रथा काही घराण्यांनाच दिली जाते. 'वहिवाट' या कथेत विठू नावाचा एक तरुण आहे. त्यांच्या घराण्यावर देवाचा अवसर काढण्याची प्रथा होती. त्याच्या वडिलांच्या निधना नंतर ती प्रथा पुढे नेण्याची जबाबदारी विठूवर होती. पण काहिकेल्या विठूवर अवसर येत नसे. देवाचा अवसर येण्यासाठी एखाद्याचे चरित्र शुद्ध असणे आवश्यक असते. त्याची परस्त्रीकडे पाहण्याची दृष्टी सुद्धा शुद्ध असली पाहिजे. विठुचे मात्र वाड्यावरील एका जातीबाहेरच्या मुलीवर प्रेम होते. आणि अवसर येण्याच्या वेळी तिचा चेहरा त्याला आठवायचा आणि त्याच्यावर येणार अवसर निघून जायचा. वाजवणारे वाजवून थकायचे, 'सर पुढे' म्हणून लावणाऱ्यांचा गळा दुखू लागायचा पण गावकऱ्यांना देवाचा कौल मिळत नसे. गावाच्या सुख समाधनासाठी वर्षातून एकदा देवाचा अवसर काढण्याची संस्कृती गोमंतकात रूढ झाली आहे. याचे दर्शन या कथेतून घडते.

'ओझे' ही कथा गोमंतकीय रितिभाती दर्शविणारी कथा आहे. नवीन लग्न झालेल्या मुलीसाठी ओझे पाठवणे ही गोव्यातील बामण जातीतील लोकांची एक पद्धत होती. पण काळानुसार ती पद्धत समाजातील अन्य जमातीने आत्मसात केली. ओझे म्हणजे त्यात अनेक वस्तू द्याव्या लागतात. प्रत्येक सणा नुसार, कार्यानुसार लागणारे सामान त्यात कपड्या पासून चप्पल देण्याची व्यवस्था मुलीच्या वडीलाला करावी लागते. ओझे पाठवण्यामागील हेतू हा एकंदरीत मुलीच्या सासरी तिला सुखाने नांदू द्यावे व जावयाचा तो मान आहे या कारणाने हे ओझे पाठविले जाते.

"आपलो जावई सरकारी नोकर आसा म्हणान मिरयला म्हणून जायना, तशो रीतीभाती करूक व्हयो मानपानकरून व्हया. चवथीच्या ओझ्याची आजून कायच तयारी करूक ना... ओझा ना धाडला तर ती लोकां पोरांक सुखात नांदूक दिवची ना... ओझ्यान काय काय धाडूचा त्येची भलीमोठी यादीच धाडून दिल्या त्या

लोकांनी. पाचशे नेवऱ्या, हाताच्या वेताच्या लांबीच्यो... त्याशिवाय माटोळीची फळां-फुलां... चवथीच्या जेवणाक लागतली कडधान्या, नवऱ्याखातीर सोवळा, छत्री, चप्पल...." (ओझे, ९)

सुरुवातीला बामण समाजापूर्ती मर्यादित असलेली ही रीत काळानुसार अन्य निम्नस्तरीय जातीतील लोकांमध्ये रूढ होऊन ती गोव्याची एक संस्कृतीचा भाग बनली आहे. जानू पाडेली हा भाटकाराच्या भाटात कष्ट करून आपले पोट भरत असतो. मुलीच्या लग्नाच्या वेळी बऱ्याच गावकऱ्यांकडून त्याने कर्ज घेतलेले असते. लग्न होऊन महिने उलटले पण त्याला ती रक्कम फेडता आली नाही. लग्ना नंतर सणांच्या वेळी मुलीच्या सासरकडून ओझ्याची मागणी केली जाऊ लागली. ते पाठवता पाठवता त्याचे कर्जाचे हप्त्यांचे ढीग होऊ लागले. अशा अवस्थेत ज्यावेळी जानू त्याच्याच जातीतील रामगोदादा या व्यक्तीकडे मदतीसाठी जातो त्यावेळी त्याने काढलेले उद्गार महत्वाचे ठरतात.

"पोराक ओझे धाडून व्हया."

"काय?"

"चावथीचा ओझा."

"तू बामण केवापासून झालो रे?"

"सोरोप नाचत म्हणान गायनोळान नाचाक जायना." (ओझे, १२)

एकंदरीत उच्चभ्रू समाजातील प्रथा सर्वसामान्य माणसांवर लाधली जाते त्यावेळी त्या माणसाची होणारी दयनीय अवस्था लेखक येथे मांडतात.

गोमंतकीय लोक जीवनात घराण्याच्या प्रतिष्ठेला अधिक महत्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे काही प्रतित घराण्यांना गावात मान दिला जातो. तो मान वर्षानुवर्षे त्या एकाच घराण्यातील माणसांकडे असतो. अशाच जीवनाचे चित्रण करणारी 'पाऊस' ही कथा आहे. श्रावण महिन्यातील पहिला शनिवार हा भाटकार्णीच्या नवीन सुनेने करण्याची रीत गोमंतकात आहे. गोमंतकीय प्रतिष्ठित घराण्यातील रीतिरिवाजावर, त्यांच्या संस्कृतीवर भाष्य करणारी 'पाऊस' ही कथा आहे. गोमंतकातील भाटकारांच्या घराण्यातील सुनेने गावातील देवळात

जाण्यासाठी भरझरी शालू नेसणे, सर्व दागिने परिधान करून जाणे आवश्यक असते. त्यात नाकातील नथ हे प्रतिष्ठेचे आभूषण मानले जाते. त्याचबरोबर देवावरील विश्वासाचे चित्रण या कथेत झाले आहे.

"हे आपलं कुलदैवत... सातेरी देवी...! तिची आपल्यावर कृपा आहे. तिच्या आशीर्वाद सगळं सुरळीत चाललेलं आहे. अडीअडचणीला तिला हाक मारली तर पावते ती." (फिंगर बाऊल, १२)

गोमंतकीय लोकांची देव-देवस्कीवरील असलेली श्रद्धा व त्यातून निर्माण झालेली गोमंतकीयची संस्कृती याचे यथार्थ चित्रण या कथेत झाले आहे.

'सोयरिक' ही गोमंतकीय मध्यवर्ती लोकांमधली लग्नव्यवस्थेचे चित्रण करणारी कथा आहे. जिथे एक गरीब बाप आपल्या मुलीची सोयरिक एका चांगल्या मुलाशी जुळवून तिला चांगल्या घराण्यात लग्न करून देण्याची स्वप्न पाहतोय. मुलीचं लग्न करण्यासाठी एका चांगल्या मुलाची सोयरिक तिच्यासाठी शोधण्याचे मोठे आव्हान एका मुलीच्या वडिलासमोर असते. त्याचप्रमाणे गोपीच्या मनात आपल्या मुलीचे लग्न करायची इच्छा तरळत होती. त्याच्या बायकोचीही तशीच इच्छा होती. म्हणून तो मिळेल त्याला आपल्या मुलींसाठी सोयरिक पाठण्यास सांगत होता. गोमंतकात सोयरिक जुळवणे हे मोठ्या जबाबदारीचे काम असते. एके दिवशी त्याची भेट भिकुशी होते आणि तेथे भिकू त्याला एका मुलाची सोयरिक असल्याचे सांगतो. मुलगा दुबईला असतो चांगल्या घराण्यातील असतो. गोपी आपल्या मुलीच्या परवांगीनी एके दिवशी पाहण्याचा कार्यक्रम आयोजित करतो. गोपी व त्याची बायको आपल्या मुलीची सोयरिक जुळणार आहे या आशेने खूप खुश असतात. एकंदरीत गोमंतकीय सोयरिक जुळविण्याच्या प्रथेचे व त्याच्या निघाडीत अनेक महत्त्वाच्या गोष्टीचे चित्रण या कथेतून घडते.

गोपीची मुलगी कॅसिनो मध्ये कामाला असते. ज्या दिवशी तिची सोयरिक जुळवण्याचा कार्यक्रम असतो त्या दिवशी पोलिसांनी धाड घातलेल्या हॉटेलात ती सापडते. ही बातमी गोपिला कळताच त्याच्या पायाखालची जमीन सरकते. आपल्या मुलीची सोयरिक जुळवण्याचे गोपीचे स्वप्न तिथल्या तिथेच मातीत मिसळते. कारण सोयरिक जुळवण्यासाठी एखाद्या मुलीची स्वभावमूल्ये शुद्ध व ठाम असणे आवश्यक असतात. तरच तिची सोयरिक जुळते अन्यथा जुळत नाही. गोपीच्या माध्यमातून एका चिंताग्रस्थ वडिलाचे चित्रण या कथेतून झाले आहे.

मुलगी ही परक्याचे धन असते असे म्हटले जाते. लग्न झाल्यावर तिने माहेरपणासाठी आईकडे येणे स्वाभाविक असते. पण नवऱ्याला सोडून आपल्या बापाच्या घरी मुलीने परतणे हे समाजाला मान्य नसते. गावसांच्या 'चंवर' या कथेतून शेवंती ची लग्नाच्या वेळी फसवणूक झालेली असते. तीच लग्न एका वेंधळया मुलाशी लावून दिलेले असते. तिचा नवरा कसलेही काम करत नव्हता, स्वतःच्या अक्कलने दोन पैसे कमाविण्याची ऐपत त्याची नव्हती. ज्यावेळी शेवंतील ह्याची जाणीव होते त्यावेळी ती कावरी बावरी होते. तिला तिच्या नवऱ्याला सोडून कुठेतरी निघून जावेसे वाटते. त्यावेळी ती म्हणते,

"आई-वडिलांच्या घरी परतावं तर वडील दारावरसुद्धा उभं करून घेणार नाहीत..."(चंवर,२९)

या वरून एकंदरीत गोमंतकीय ग्रामीण जीवनातील रितिभातीचे चित्रण दिसून येते.

एका स्त्रीला समाजात वांझ म्हणून हिणवण्याचे हिणसक कृत्य 'डाग' या कथेतून चित्रित झाले आहे. या कथेत एक तरुणी आली आहे. जिला लग्न होऊन दोन वर्षे झाली आहे. तिच्या बरोबर लग्न झालेल्याना एखादं दुसरं मुलं झालेले होते. पण तीची कुस अजून उजवली नव्हती म्हणून तिच्या शेजारच्या पाजारच्या बाया, मैत्रिणी तिची चौकशी करत होते. तिने व तिच्या नवऱ्याने डॉक्टरांशी बोलून या संदर्भात चौकशी केली होती पण डॉक्टरांनी त्यांना कसलाही दोष असल्याचे सांगितले नव्हते. काही जोडप्यांना उशिरा होतात मुलं प्रयत्न चालू ठेवण्याचा सल्ला त्यांना दिला होता. पण आपला समाज या गोष्टींकडे लक्ष कोठे देतो. तिच्या शेजाऱ्या पाजाऱ्यांनी तिला वांज ठरवून तिला वाळीत टाकले होते. एखाद्या स्त्रीला वांझ ठरविल्या नंतर तिला मिळालेल्या वागणुकीचे चित्रण लेखक येथे करतात.

"आता नाही होणार मूल तुला. डॉक्टर काहीही सांगतात." काहींनी वांझ म्हणून तिची हेटाळणीही सुरू केली. देवाधर्माच्या कार्याला तिला बोलावणं टाळलं जाऊ लागलं. काहीजणी तर हळदीकुंकवालाही बोलवेनाशा झाल्या. तिच्याकडून कपाळाला कुंकू लावून घेईनाशा झाल्या. एखाद्या लहान बाळाला अपूर्वाईनं उचललं तर त्याची आई धावत येऊन मुलाला तिच्याकडून हिसकावून घेऊ लागली... एकदा तर ती अशीच शेजारी मुलाच्या बारशाला गेली होती. पाळण्यात घातलेल्या बाळाला सगळयाजणी कुंकू लावत होत्या. म्हणून ती ही कुंकवाचा करंडा घेऊन पाळण्याकडे गेली तर बाळाच्या आजीनं तिला अडवलं. 'वांझ बाईनं माझ्या नातवाला कुंकू लावायचं नाही. त्याचं भावी आयुष्य फुलायला हवं. फळायला हव," म्हणत तिनं तिच्या हातातला करंडा हिसकावून घेतला." (डाग, १००)

एकंदरीत कुस न उजवलेल्या स्त्रीला अपशकुनी मानण्याची लोकसमजुती गावस या कथेतून अत्यंत गांभीर्याने रेखाटतात. गोव्यात अजूनही काही लोकसमजुती मानल्या जातात. तीन मुलां नंतर जन्मलेल्या मुलीला तिखळी असे म्हटले जाते तर लग्न करून दुसऱ्याच्या घरी गेल्यावर तिला पांढऱ्या पायाची असे संबोधले जाते. अशा या लोकसमजुतीचे चित्रण गावस आपल्या कथांतून करतात.

'गाभ' या कथेत एक म्हैस गाभ धरते पण प्रत्येकवेळी ती दोन महिन्यांनी गाभ टाकते यावर गावात असलेल्या लोकसमजुतीचे चित्रण लेखकाने केले आहे. शेडूल्याची म्हैस दर दोर महिन्यांनी गाभ सांडते याचे नेमकं कारण काय असावे या बद्धल तो चौकशी करू लागतो त्यावेळी गावातील एक वयस्कर माणूस त्याला विचारतो, "तुझ्या गोठ्याचो पागो कसलो रे?" म्हणजे गाई बैलाचा पागा असलेल्या गोठ्यात म्हैस आणून पाळली तर ति यश आणत नाही. अशाप्रकारे छोट्या छोट्या गोष्टीवरून गावात लोकसमजुती रूढ झाल्या आहेत. या प्रकारचे संदर्भ गावसांच्या कथेतून दिसून येतात.

'अगतिक' ही गावगाड्यातील काही सामाजिक परंपरेचे चित्रण करणारी कथा आहे. सरकारी नोकरीच्या मोहापोटी वडिलोपार्जित व्यवसाय न करण्याकडे तरुण पिढीचा जो कल दिसून येतो त्यावर लेखकाने येथे प्रकाश टाकलेला आहे. देवस्थानाची पूजाअर्चा करणाऱ्या पुरोहिताचे आणि भिक्षुकी करणाऱ्या भटजीचे जीवनचित्र या कथेत रंगविले आहे. वडिलांचा व्यवसाय वडिलां नंतर त्याच्या मुलाने करावा अशी लोकांची इच्छा असते.

"आम्हाला दुसरा पुरोहित मिळत नाही असं नाही. पण गेल्या कित्येक पिढ्या तुमच्या घराण्यातील माणूस देवळातील पूजा करीत आहे. त्यात खंड पडू नये अशी आमची इच्छा आहे." (अगतिक, ४३)

नानांचीदेखील मुलाबद्दल हीच अपेक्षा असते म्हणून ते त्याला भिक्षुकीची दीक्षा देतात. पूजापाठ समजावून देतात. पण मुलाचे शालेय शिक्षण संपल्यावर त्याच्या जाणिवा विकसित होतात. शाळेत आलेल्या बुद्धिप्रामाण्यवादी विचारवंताच्या भाषणामुळे प्रभावित होऊन परमेश्वराच्या अस्तित्वासंबंधीची त्याची कल्पना बदलते. त्याच्या वडिलांना हे पटत नाही. त्या दोघांमध्ये मतभेदांची भिंत निर्माण होते. तो मुलगा तीन-चार वर्षे परागंदा होतो. नानांच्या मृत्यूप्रसंगी असहाय अवस्थेत ते मुलाला आपली आंतरिक इच्छा बोलून दाखवितात. "खुशीने नसली तरी माझ्यानंतर देवळातील पूजा तू करावीस" असे ते उद्गारतात. अगतिकपणे वडिलांची इच्छा प्रमाण मानून एका हातात पूजेचा पडगा आणि दुसऱ्या हातात पाण्याचा तांब्या घेऊन त्याची पावले

देवळाच्या दिशेने पडतात. गावगाड्यातील परंपरां या एकापिढीकडून दुसऱ्यापिढीकडे संक्रमित होणे व सातत्याने पाळणे याचे चित्रण या कथेतून घडते.

"पिडाला कावळा शिवला?" अप्पाचा जाणतेपणाचा प्रश्न.

"नाही." तो उत्तरला.

"कसला राग केला तर-"

"काही समजत नाही... सगळं सांगून पाहिलं. तास-दीड तास बसून राहिलो. पण कावळा पिडाकडे फिरकला नाही." (अगतिक, ४२)

असे घडल्यावर गावकरी आपल्या समजुतीनुसार त्याला सांगतात की कदाचित त्यांची इच्छा अपुरी राहिली असावी त्यामुळे पिंडाला कावळा शिवायला इतका वेळ लागला असावा. एकंदरीत पिंडाला कावळा शिवला नाही म्हणजे त्या स्वर्गीय माणसाची इच्छा अपुरी राहिली असावी असा लोकसमाज समाजात रूढ झालेला आहे. मुळात स्वर्गीय लोकांना पिंड देण्याची रीत सर्वत्र  रूढ झाली आहे.

अशा लोकसंकेतावर व श्रद्धेवर आधारित असणाऱ्या कथा गावसांनी साकार केलेल्या आहेत. ज्यातून जुन्या परंपरा, जागेकर असणे, दृष्ट काढणे, पिंड देणे या सारख्या लोकसमजूती, अवसर येणे या सारख्या लोकश्रद्धा, लोक उत्सव यांचा अंतर्भाव होताना दिसून येतो. ही ग्रामजीवनाची अविभाज्य अंगे आहेत. याचे चित्रण त्यांच्या कथासंग्रहातील काही कथांमधून दिसून येते.

## ३.१.३ विठ्ठल गावसांच्या कथांतून दिसून येणारी  समस्यारुपी आशयसूत्रे

लेखक ज्या समाजात वावरतो त्या समाजात अनेक बऱ्या वाईट गोष्टी घडत असतात. जगण्यातील कुठल्याही गोष्टीत समस्या ह्या असतात. गावस यांनी आपल्या कथांतून तत्कालीन समाजातील वेगवेगळ्या समस्यांचे चित्रण आपल्या कथांतून मांडले आहे. ग्रामीण जीवनातील समस्या, शहरी जीवन, राजकारण या सारख्या क्षेत्रातील समस्यांचे चित्रण त्यांच्या 'प्रोफेसर बारलिंगे', 'अपहृत', 'अगतिक', 'चंवर' इ. कथातून व्यक्त झाले आहे.

### ३.१.३.१ कथांतून चित्रित झालेल्या सामाजिक समस्या

'प्रोफेसर बारलिंगे' या कथेत गावसांनी देशाच्या दृष्टीने निर्माण झालेल्या मोठ्या समस्येचे चित्रण केले आहे. भारताच्या वाढत्या लोकसंख्येचा विषय या कथेत मांडला आहे. देशाच्या वाढत्या लोकसंख्येमुळे पुढे माणसाला अनेक वाईट परिस्तिथीना सामोरे जावे लागेल याचे भान असणारे प्रोफेसर बारलिंगे या कथेचे नायक आहेत. प्रोफेसर बारलिंगे सुप्रिया नावाच्या मुलीशी प्रेमविवाह करतात. विवाह करण्यापूर्वी ते सुप्रियला लग्नसंबंधी, संसारसंबंधी त्यांच्या असलेल्या काही अटी सांगतात. त्यांना लग्ना नंतर सुप्रियाने मुलाला जन्म देणे मान्य नसते. वाढत्या लोकसंखेत भर घालून एका जीवाला भोग भोगायला लावण्या ऐवजी त्याला जन्माला न घातलेले बरे असे त्यांचे वैयक्तिक मत होते. लोकसंख्यातज्ञांच्या मते पुढील वीस वर्षात आपल्या देशाची लोकसंख्या शंभर कोटी कडून दीडशे कोटी होईल. वाढत्या लोकसंख्येचा अंदाज घेत त्यांच्या मताशी प्रोफेसर बारलिंगे शंभर टक्के सहमत होते. म्हणून त्यांना सुप्रियाने गरोदर राहणे मान्य नव्हते. एकंदरीत वास्तवस्तीथी लक्षात घेऊन त्या विषयी चिंताग्रस्थ जीवन जगणाऱ्या प्रोफेसरचे चित्रण  या कथेतून झाले आहे.

वाढती लोकसंख्या म्हणजे शिक्षणक्षेत्रात, रोजगार, आरोग्य, जागा या सारख्या अनेक गोष्टींचा प्रश्न निर्माण होतो. प्रदूषण, अन्न भेसळ, प्रदूषित हवा-पाणी, सुपीक शेतजमिनीचा अभाव, नैसर्गिक संसाधनांचा अतिवापर व हास, वृक्षतोड, जंगलांचा नाश, वन्यजीव आणि मानव यांच्यातील वाढता संघर्ष, इंधनाचा वाढता वापर, कधी दुष्काळ, कधी पूर, स्वच्छ हवा आणि पाण्याचा अभाव, पर्यावरणाचा ऱ्हास, वाढती काँक्रीटची जंगले, बेरोजगारी, भूक, महागाई, जीवनसंघर्ष आणि वाढते गंभीर आजार या सर्व समस्यांचे कारण वाढती लोकसंख्या आहे. जास्त लोकसंख्या म्हणजे अधिक गरजा. आजही आपल्या समाजातील अनेक असहाय्य लोक, भिकारी, आजारी, हतबल लोक, असहाय मुले रस्त्यावरील कचरा, खराब झालेल्या अन्नाच्या ढिगाऱ्यातून अन्न निवडताना दिसतात अशा गंभीर समस्या लोकसंख्येतवाढ झाल्यामुळे निर्माण होत आहेत. या गंभीर समस्ये विषयीचे चिंतन उत्कृष्टपणे गावस आपल्या कथेत करतात.

बेकायदेशीर बांधकाम हे शहर आणि नियोजनाच्या बाबतीत मोठ्याप्रमाणात धोका निर्माण करत असते. 'देऊळ' या कथेत गावसांनी जागोजागी बेकायदेशीर देऊळांची उभारणीमुळे उपस्तिथ होणाऱ्या अनेक समस्यांची मांडणी केली आहे. देऊळ या कथेत एक वयस्कर नाना जोशी नावाचे व्यक्ती आहेत. उमेदीचे पूर्ण आयुष्य चाळीच्या दोन खोल्यात काढल्या नंतर रिटायरमेंटच्या काळात व्ही आर एस घेऊन रोजच्या दगदगीतून स्वेच्छानिवृत्ती घेतात. प्रॉव्हिडंट फंड मिळालेल्या पैश्यांचा शहरापासून दूर एक फ्लॅट विकत घेतात.

आयुष्यभराची सगळी कमाई शांत, आरामात, दगदगी शिवाय जगण्यासाठी खर्च करतात. नानांना मराठी साहित्याची, वाचनाची आवड होती आणि त्या दृष्टीने त्या दिशेने काम करण्याची इच्छा त्यांची होती. आणि त्यासाठी ते खूप उत्साहात होते. पण त्यांचा तो उत्साह काही जास्तवेळ टिकला नाही. त्यांनी घेतलेल्या फ्लॅटच्या सोसायटीलाच लागून एकेदिवशी देऊळ बांधण्याचे काम सुरु झाले.

देऊळ बांधणे या गोष्टीकडे लोक सतत श्रद्धेच्या, आस्तेच्या दृष्टीने विचार करत असतात. म्हणून सोसायटीचे बहुतेक रहिवासी त्यात नानांची बायकोसुद्धा त्या देऊळ बांधणीबद्धल सहमत होते. पण नाना मात्र या गोष्टी विरोधात होते. कारण ते देऊळ तिथे बांधणे बेकायदेशीर होते. अश्याच बेकायदेशीर बांधणी मूळे अनेक समस्या समाजात निर्माण होतात. त्याबद्धल नानांच्या माध्यमातून लेखकाने त्या या कथेत नमुद केल्या आहेत. ते म्हणतात, "का बांधतात हे लोक अशी देवळे जागोजागी ? घरातला देव नमस्कारासाठी पुजे-अर्चेसाठी पुरत नाही का त्यांना ? रस्त्यावरच्या वळणावर हे देवळे बांधतात, मग ते क्रॉस उभे करतात, दर्गे तयार करतात... स्पर्धा वाढतच जाते. वाहतुकीला अडथळा येतो... अपघात होतात... निरपराध लोकांचे जीव जातात... याचे कुणालाही काही वाटत नाही. माणसांच्या जिवापेक्षा दगडाचा देव मोठा वाटतो का त्यांना ? सर्वधर्मसमभाव राखणारे आपले निधर्मी लोकशाही सरकार कुणाच्याही वाटेला जात नाही... का ? तर म्हणे लोकांच्या धार्मिक भावना दुखावतील म्हणून... कायद्यापेक्षा लोकांच्या भावना महत्त्वाच्या वाटतात त्यांना आणि आपले संत-महंत, धर्मगुरू, पाद्री, मुल्ला... यांनी तरी आपल्या या अनुयायांना आवरायला नको का? उलट तेच लोक तर अशा प्रकारांना उत्तेजन देतात. कसं होणार आपल्या या देशाचं ? (देऊळ, १८०)

बेकायदेशीर बांधकाम हे कशाप्रकरे समाजासाठी धोकादायक असू शकते आणि त्यामुळे समाजात निर्माण होणाऱ्या अनेक समस्यांची मांडणी या कथेतून झाली आहे. नाना जोशी द्वारे समाजात सुरु असलेल्या या अनधिकृत बांधकामाकडे अनेक जबाबदार अधिकाऱ्यांचे लक्ष केंद्रित करतात . पण आजच्या भ्रष्ट अधिकाऱ्यांमुळे या बेकायदा सुरु असलेल्या कामाकडे दुर्लक्ष केले जाते. नाना सोसायटीच्या अध्यक्षाकडे, पोलिसांकडे, मामलेतदारकडे, मुंसिपालिटीकडे, मुख्यमंत्री न्यायालयाकडे जाऊन या सामाजिक समस्येची मांडणी करतात. मात्र प्रत्येक ठिकाणी त्यांच्या पदरी निराशाच पडते. कारण प्रत्येक जण स्वतःची जबाबदारी दुसऱ्यावर ढकलण्याचा प्रयत्न करतात हे या कथेतून दिसून येते. एकंदर सरकारी भ्रष्ट व्यवहाराचे उत्तम उदाहरण दर्शन गावसांची ही कथा करते.

'सवाई' ही कथा एक मुलगा वाईट मार्गावर गेल्यामुळे आईला होणाऱ्या संवेदनांचे चित्रण करणारी आहे. समाजात घटस्फोट घेणे हा खरंतर धर्माच्या विरुद्ध मनाली जाणारी गोष्ट आहे. लग्न हे दोन माणसांप्रमाणेच दोनकुटुंबाचे, दोन घराण्यांचे मिलन असते. आजच्या काळात लग्नसंस्कृतीचे पावित्र्य खालावत चाललेले दिसून येते. आधुनिक जगणे हे माणसाच्या आयुष्यात अनेक समस्या निर्माण करत असलेल्या दिसून येतात. आजच्या काळात प्रेमविवाह करणे शक्य झाले आहे. स्वतःचा जोडीदार स्वतः निवडण्याचा हक्क प्रत्येकाकडे आहे. पण एवढे असूनही नवरा बायकोमध्ये घटस्फोट होण्याचे प्रमाण वाढत असलेल्या दिसून येते. या कथेत आलेली नायिका ही घटस्फोट घेतलेली स्त्री आहे. आपल्या नवऱ्याच्या बाहेरख्याली स्वभावाला कंटाळून तीने मारियोन कडून घटस्फोट घेतला होता. त्यांचा असफल प्रेमविवाह ठरला. घटस्फोटाच्यावेळी तिने रोहन लहान आहे म्हणून त्याचा हक्क आपल्याला मिळायला हवा अशे मागणी केली. त्यानुसार कोर्टाने तिचे मागणे मान्य केले. घटस्फोटीत जोडप्यांच्या मुलांची झालेली वाईट दशा येथे निदर्शनास येते.

रोहन शाळेत जात होता पण त्याचे शिक्षणाकडे लक्ष नव्हते. तो मुलांच्या टवाळक्या करणे, मुलींची छेड काढणे या गोष्टी करू लागतो. घर सांभाळण्याच्या जबाबदाऱ्यांनी तिचेही रोहनकडे दुर्लक्ष झाले होते. जस जसा मोठा झाला तसा मुलीं सोबत नको नको ते प्रकार करू लागला. मुलींना प्रेमाच्या जाळयात फसवून आपली शारीरिक हौस भागवू लागतो. लग्नाची वचने देऊन मुलींचा गैरफायदा घेऊ लागतो. अँना नावाच्या मुलीला रोहनपासून दिवस गेलेले असतात. रोहनला हे समजतात तो तिला टाळू लागतो. एका असफल विवाहामुळे समाजात असंस्कृत, गुंड प्रवृत्तीची माणसे जन्माला येतात. दुर्लक्षिक पालकत्व समाजात अनेक समस्या निर्माण करतात. त्याचे प्रत्ययकारी चित्र गावसांनी या कथेत उभे केले आहे. निष्पाप, भोळया भाबड्या मुली असल्या माणसांच्या तावडीत सापडतात व आपले जीवन उध्वस्त करून टाकतात. रोहनवर नागरी संस्कृतीचा अधिक प्रमाणात झाला होता. हे त्याच्या बोलण्यावरून कळून येते,

"आज- काल हे सगळं असंच चाललं आहे. दारू पिणं, डान्स पार्टीत नाचणं, पोरीला घेऊन फिरणं हे प्रतिष्ठेचं मानलं जातं. तुम्ही हे सारं करीत नसाल तर मागासलेलं समजलं जातं. जंगली मानलं जातं. आपल्या अवतीभोवती सगळेजण हेच करत असतात. मी काही नवीन करत नाही. आणि मम्मी..."(सवाई, १४७)

हे इतक्या स्पष्टपणे आपल्या जन्मदात्या आईकडे बोलत असताना त्याला किंचितही लाज वाटत नाही. रोहन पुढे रिनाशी लग्न करतो. एक नवरा म्हणून एकही जबाबदारी आपल्या खांद्यावर घेत नाही. शिक्षण नसल्याने नोकरी मिळत नाही. तरीही रिनाचे वडील त्याला एक काम मिळवून देतात पण ते ही त्याला सांभाळता येत नाही. रिनाकडे पैशांची मागणी करू लागतो. तिच्या वडिलांकडे पैशांची मागणी करू लागतो. त्यांच्या घरी जाऊन त्यांना त्रास करू लागतो. रोहन ने रिनाशी प्रेमाचे नाटक केलेले असते. त्याचा खरा डोळा तर रिनाच्या वडिलांच्या संपत्तीवर असतो. रिनाच्या वडिलांनी आपल्या मुलीच्या सुखासाठी तिने रोहनकडून घटस्फोट घ्यावा असा निर्णय घेतात. पुढे रिनाच्या वडिलांचे अपहरण करून त्यांचा खून केला जातो. बदलत्या काळानुसार अनेक गोष्टी माणसांच्या मनासारख्या घडू लागल्या पण त्यातून समाजात बऱ्याच प्रमाणात समस्या निर्माण होऊ लागल्या. आईवडिलाच्या घटस्फोटाचा वाईट परिणाम एका मुलावर होत असतो. मुलांवर चांगले संस्कार केले नाही, त्यांच्यावर लक्ष ठेवले नाही तर असेच रोहन जन्म घेत राहतील. आधुनिक जीवनात शहरीकरणाच्या वाईट परिणामांचे चित्रण या कथेतून घडते.

समाजात लिंग भेद हे पूर्वीपासून चालत आलेले आहे. मुलगा हा घराचा कुलदीपक असतो तो घराण्याचा वंशज असतो. तर, मुलगी ही आईवडीलावर ओझे असते असे म्हटले जाते. प्रत्येक पुरुषाला आपल्या बायको कडून मुलगा जन्माला येण्याची अपेक्षा असते. मुलीचा गर्भ असला तर गर्भपात करणे आजकाल समाजात सुरु आहे. लिंग चाचणी करणे हा कायद्याने गुन्हा ठरतो पण एका डॉक्टर कडून घडणाऱ्या गुन्ह्याचे चित्रण गर्भजल सारख्या कथेतून झाले आहे. ज्वलंत समस्ये विषयी लेखक या कथेत लिहितात. 'गर्भजल' या कथेत झोपडपट्टीत राहणारी शांतव्वा नावाची एक बाई आहे. शांतव्वा व तिचा नवरा शहरात मिळालेले काम करून पोट भरणारी असतात. त्यांना पाच मुली असतात. शांतव्वाच्या नवऱ्याला तिच्याकडून मुलगा पाहिजे असतो. तिला दुसरी मुलगी झाल्यापासून तो तिच्याकडे मुलगा झालाच पाहिजे म्हणून आग्रह धरतो. मुलगा किंवा मुलगी होणे हे काय माणसांच्या हातात नसते. ती देवाची देणगी असते हे ती त्याला समजावण्याचा प्रयत्न करते पण तो काही तिचं ऐकून घेत नाही. म्हणून शांतव्वा शहरातल्या नावाजलेल्या रेडियॉलॉजिस्टला भेटून आपल्या गर्भात वाढणारे मुलाचे लिंग तपासण्याचा प्रयत्न करू लागते. तिची दयनीय अवस्था बघून डॉक्टरही तिला प्रतिसाद देतात. पाचव्या वेळी डॉक्टर तिला मुलगी असल्याचे सांगतात आता तिची सहावी वेळ असते. आता तिला मुलगा झाला नाही तर तिचा नवरा दुसरं लग्न करणार होता. म्हणून शांतव्वाला आपल्या पोटातील गर्भाची तपासणी करायची होती. पण यावेळी मात्र मुलाचा गर्भ तिच्या पोटात

वाढत होता. ते कळल्यावर शांतव्वा सुखावली. एकंदर मुलगा व मुलगी या केलेला फरक येथे दर्शविला आहे. स्वतःची आर्थिक अवस्था कितीही खालावलेली असली तरीही या सारख्या गोष्टींवर आजकाल जास्त प्रमाणात भर दिला जातो. लिंग भेद हे झोपडपट्टीत राहणाऱ्या माणसांमध्येसुद्धा किती प्रकर्षाने चालू असते याचे दर्शन या कथेतून घडते.

## ३.१.३.२ कथांतून चित्रित झालेल्या ग्रामीण जीवनातील समस्या

'नांगरणी' ही कथा शेती व्यवसायात येणाऱ्या आधुनिक तंत्रज्ञानामुळे उपस्तिथ होणाऱ्या समस्येचे चित्रण येते. गोमंतकीय शेतकऱ्यांची भाटकारांच्या शेतात नांगरणी करण्यासाठी जाण्याचे चित्रण या कथेत आले आहे. पूर्वी गावातील लोक बारदेशला भाटकारांचे शेत नांगरण्यासाठी जायचे त्याच प्रमाणे धोंडी त्या वर्षी बारदेशला आपले बैल घेऊन निघाला होता. त्याच्या मनोमन असे विचार चालू होते की,

"यावर्षी नांगरणीचं काम नक्कीच चांगलं मिळेल असं गेल्या काही वर्षांच्या अनुभवावरून त्याला वाटत होतं. चार पैसे जास्त मिळाले तर यंदाचा पाडवा धुमधडाक्यानं साजरा करायचा. बैलांना छान सजवायचं. गोडधोड करायचं... बायकोला नवीन लुगडं आणायचं... पोरांना नवीन कपडे शिवायचे. आपल्यालाही एखादी धोतराची जोडी घ्यायची... " (नांगरणी, ९६)

बारदेशला पोहोचताच त्याची ही सर्व स्वप्ने मातीत मिसळून जातात. कारण ज्या भाटकारणीचे काम आपल्याला मिळणार या आशेने तो गेला असतो ती आपले शेत ट्रॅक्टरने नांगरून घेते. कारण त्यामुळे वेळी वाचतो व पैसेही कमी लागतात. पण याचा परिणाम गरीब शेतकऱ्यांवर मोठ्या प्रमाणात होतो. ट्रॅक्टरमुळे नांगरणीतुन चार पैसे जास्त कमावण्याची संधी शेतकऱ्यांच्या हातातून निसटली जाते. आधुनिक तंत्रज्ञानामुळे शेतकऱ्या समोर निर्माण होणाऱ्या समस्याचे चित्रण गावसांनी या कथेतून साकारलेले आहे.

'गाभ' या कथेत गावात कारखाना आल्यामुळे गावकऱ्यां समोर निर्माण होणाऱ्या अनेक समस्यांचे चित्रण लेखकाने केले आहे. गावात कारखाना आल्या मुळे लोकांना आपल्या हक्काच्या जमिनी सरकारला विकाव्या लागल्या. कारखान्यासाठी गावातील बहुतेक जमीन वापरली गेली. म्हणून जनावरांना चरण्या इतपत जमीन गावात राहिली नाही म्हणून लोकांना जनावरंसुद्धा विकावी लागली. शेत करणारे, पारंपरिक व्यवसाय करणाऱ्या माणसांकडे कुठलेच काम राहिले नाही. गावात कारखाने आल्यामुळे त्यात काम करण्यासाठी

बाहेरून माणसांना गावात आणण्यात आले. त्यांच्या मुळे प्रत्येक ठिकाणी झोपडपट्या उभ्या राहिल्या. बाहेर गावातील माणसे आपली सगळी दिवसातील कामे उघड्यावर करू लागली म्हुणून गावातील अन्य लोकांना त्याचा त्रास होऊ लागला.

कारखान्याच्या चिमणीतून निघणाऱ्या धुळीमुळे व कारखान्याचे सांडपाणी न्हयच्या पाण्यात मिसळल्या मुळे गावातील वातावरण प्रदूषित होऊ लागले. एक दोन गुरं ढोरं होती ती त्यांची गाभ एक दोन महिन्यातच टाकू लागली. अश्याप्रकारे कारखाना गावात आल्यामुळे गावकऱ्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागले याचे चित्रण गावसांनी या कथेत मांडले आहे.

## ३.१.४ कथांमधून दिसून येणारे बदलते गोमंतकीय जीवन

१९९० नंतर गोमंतकात अनेक बदल घडले. १९९० नंतर जागतिकीकरण झाले. शिक्षणाचा प्रसार आणि प्रचार देशातील काना कोपऱ्यात होऊ लागला. व्यवसायाच्या दृष्टीने कारकुनी कामासाठी सरकारी नोकऱ्या लोकांसाठी उपलब्ध झाल्या, बाजारपेठ उपलब्ध झाला, मोठमोठे कारखाने अस्तित्वात आले. या सगळ्यातून गोमंतकीय जीवन हे अनेक अंगांनी बदलले. पारंपरिक व्यवसायाच्या जागा सरकारी नोकऱ्यांनी घेतल्या, निवारा घेणाऱ्या कौलारू घरांच्या जागा फ्लॅट, टेर्रसच्या घरांनी नी घेतल्या, शेतातील जोताची जागा ट्रॅक्टरने घेतली इ गोष्टीमुळे गोमंतकीय जीवन बदललेले गावसांच्या कथांतून दिसून येते.

गोमंतकीय पारंपरिक व्यवसायात घडणाऱ्या बदलांचे चित्रण करणारी 'लवण' हि कथा आहे. या कथेत दादू नावाचा मीठ पिकावणारा एक कामगार असतो. मिठ तयार करणे  हा त्यांचा वडिलोपार्जित व्यवसाय आहे. दादुचा मुलगा हा सरकारी शिपायाची नोकरी करणारा असतो. त्याला मिठागरात राबणे हे लाजिरवाणे वाटत असते. म्हणून मिठागराचा पूर्ण भर दादू एकटाच पेलत असायचा. एके काही दिवशी सरकारी माणसं त्यांच्या गावात येतात व मीठ पिकवण्यावर बंदी घालण्यात येते. मिठागरात पिकवण्यात येणाऱ्या मिठामुळे लोकांना त्रास होतात, गळा मोठा होतो. अशी कारणं सांगून गावातील सर्व मिठागर शेतकऱ्यांना मीठ पिकवण्यापासून वंचित ठेवले जाते. लोकांना फॅक्टरीत तयार झालेले महागडे मीठ खरेदी करण्यास भाग पाडले जाते. जमिनीच्या बदल्यात सरकार पैसे मिळण्याच्या आशेने त्याचा मुलगा ददुच्या नकळत त्यांची जमीन सरकारला विकतो. स्वतःच्या मुलांकडून झालेल्या फसवणुकीची जाणीव झाल्यावर बिचाऱ्या मीठ कामगाराला  झालेल्या मानसिक यातना लेखकांनी या कथेत मांडल्या आहेत. एकंदरीत गोमंतकात बाजारपेठ

वसल्या कारणाने कारखान्यातून तयार झालेल्या वस्तूंना महत्व आलेले आहे. तरुण पिढीत बदलत्या काळानुसार पैशाला आलेल्या महत्वामुळे पारंपरिक जीवन पद्धतीत बदल घडवू पाहतात याचे चित्रण या कथेतून दिसून येते.

'नांगरणी' या कथेत गोमंतकातील शेतीव्यवसायाच्या संबंधित लेखकाने विषय मांडला आहे. नांगरणीचे काम मिळाले तर आपले जीवन उजळून निघेल या इच्छेने अंतू शेतकरी बारदेशला जातो. पाडव्याच्या सणाला बैलांना सजविता येईल. कुटूंबीयासाठी कपडे घेता येईल. अशी मनोमन आशा त्याने केलेली असते. त्यानुसार तो बारदेशला भाटकारणीकडे  जातो. तेथे जाऊन त्याला समजते कि त्या वर्षी भटकारणीने ट्रॅक्टरने आपले शेत नांगरून घेतले होते. ते कळताच तो निराश होतो. एकंदरीत शेती व्यवसायात आधुनिक तंत्रज्ञानाचे आगमन झाल्यामुळे पारंपरिक शेत नांगरणीचे प्रथा बंद होण्याच्या मार्गावर चालत होती. या परिस्तिथीत चिंताग्रस्थ झालेल्या शेतकऱ्याचे चित्रण गावस या कथेतून करतात.

'लिब्रूची इच्छा' या कथेत बदलत्या काळानुसार रूढ झालेल्या टेरेसच्या बंगलो संस्कृतीचे चित्रण झाले आहे. लिब्रूचा मुलगा हा कुवेतला कामाला असतो. त्याची बायको मारियान सासू सोबत गोव्यात मातीच्या घरात राहत असतात. एके वर्षी डॉमनीक कुवेतहुन दोन महिन्याच्या रजेवर गोव्याला परततो. त्याच्या इच्छेनुसार त्यांचे मातीचे घर पाडण्यात येते व तेथे सिमेंट काँक्रीटचे छप्पर घालण्यात येते. थोड्याच दिवसात छोट्याश्या कौलारू घराच्या जागी डोळे भरून टाकणारा बंगला उभारण्यात येतो. गृहप्रवेशाच्या वेळी बंगल्याची सजावट,

"सारा बंगला रंग-बेरंगी विजेच्या दिव्यांनी चकाकत असतो. जागोजागी फॉरीन वस्तू व्यवस्थित लावून ठेवलेल्या असतात, बाजूच्या रूममध्ये व्हिडिओवर कुठला तरी भन्नाट मरामारीचा पिक्चर वाड्यावरील सारी पोरं बघत असतात. सिटिंगरूममध्ये कॅसेट प्लेअरवर वेस्टर्न म्युजीकची धुन वाजत असते." अशा प्रकारे केली जाते. पुढेजाऊन काही दिवसांनी लिब्रूची सून तिच्या डुकरांचा घुड मोडून टाकते कारण तिच्या बंगल्याची शोभा त्याच्यामुळे कमी होते शिवाय तिला डुकरांची घाण सहन होत नाही. डुकर पाळणे हा पारंपरिक कॅथलिक समाजाचा व्यवसाय आहे. मातीच्या घरात राहणे, डुकरं पाळणे हे जीवन पुढील काळात बदलले. बदलत्या काळानुसार तरुण पिढीच्या राहणीमानात बदल घडून आल्यामुळे एखाद्या लिब्रू सारख्या वयस्कर, पारंपरिक जीवन जगणाऱ्याचे मात्र हाल झाले. डुकरांचे मास विकून स्वतःचे पॉट भरणाऱ्या लिब्रूला तिच्या मॉडर्न

सुनेच्या वागणुकीमुळे एवढा मोठा भव्य बंगला सोडून फ्रायलान भाटकाराच्या लॉजमध्ये राहणे पसंत करते. लिब्रूला तिच्या मॉडर्न सुनेकडून मिळालेल्या वागणुकीमुळे तिची होणारी दुःखद दशा लेखकाने या कथेतून चित्रित केली आहे.

'दर्याचा पूत' या कथेत बदल्या काळानुसार दोन वेगवेगळ्या विचारसरणी मुळे जुन्या व नव्या पिढीमधला संघर्ष चित्रित झाला आहे. बदलत्या काळानुसार व्यवसाय क्षेत्रे बदलली, लोक गावाकडून शहरांकडे वळले. त्याचप्रमाणे नानू हा मत्स्य व्यवसाय करणारा असतो. तो पारंपरिक नैसर्गिक जीवन जगू पाहणारा असतो. ज्यावेळी त्याचा मुलगा लग्न करून आपल्या बायकोला घरी आणतो त्यावेळी ती घर विकून फ्लॅट घेण्याचा आग्रह धरते. नानूला मात्र बंद फ्लॅटमधले गच्च राहणीमान अजिबात आवडत नव्हते. त्याचप्रमाणे नानूला कास्टी बांधण्याची सवय होती पण त्याच्या सुनेला फ्लॅटमध्ये कास्टी बांधून राहणे लाजिरवाणे वाटत होते. म्हणून नानूचा मुलगा त्याला चड्ड्या आणून देतो व या पुढे त्याच घालून राहायचे असे बजावतो. बदलत्या काळानुसार निर्माण झालेल्या या परिस्तिथी नव्यापिढीकडून जुन्यापिढीला मिळालेली शिक्षाच असावी. एकाबाजूने वयस्कर नानू आपले रीती रिवाज पूर्ण करण्यास धडपडतो तर दुसऱ्या बाजूने त्याचा मुलगा या परंपरा पाळण्यास नकार देतो.

"माका ती परंपरा नाका आणि तुझो हो धंदोय नाका. आंगांक दिस- रात्र नुसत्याच्यो घाणी... मी भुरग्यापणान शाळा कशाक सोडली माहीत आसा मरे...? माझी आवय माथ्यार नुसत्याचो पाटलो घेवन 'बांगडे कोणाक जाये गे' म्हणत गावभर भोवताली. शाळेत सगळे माका चाळयताले, 'बांगडे कोणाक जाये गे...' म्हणून. माका लज दिसताली. त्याखातीर हावेन शाळा सोडली. आता ते होडे तू विकून टाक," म्हणत मुलगा बेडरूमध्ये शिरला आणि दरवाजा बंद केला." ( दर्याचा पूत, ३)

तरुण पिढीत पारंपरिक व्यवसाय हे काळानुसार किळसवाणे, लाजिरवाणे ठरू लागले. ऑफिसमध्ये दुसऱ्याच्या हाता खाली काम करणे मोठ्या प्रतिष्ठेचे होते. मात्र स्वतःच्या हक्काच्या जमिनीवर शेती करून किंवा घराण्याचा पारंपरिक व्यवसाय चालवण्यात लोकांना कमीपणा वाटू लागला.

'कॅथरीन' या कथेत कॅथरीन ही ताव्हेर्न चालवत असते. ताव्हेर्न म्हणजे पारंपरिक दारू विक्री करण्याचे दुकान. या ताव्हेर्नात कॅथरीन ही पारंपरिक गोव्याची प्रसिद्ध काजू फेणी विक्री करत असे. गोव्यात काजूशी निघडीत व्यवसाय मोठ्या प्रमाणात केला जात होता व अजूनही केला जातो. तर, काळानुसार त्यांच्या गावात

अनेक दारूची दुकाने उघडली गेली. त्या दुकानात बदलत्या काळानुसार वेगवेगळ्या विदेशी मद्यपानाची विक्री होऊ लागली. औद्योगिकीकरणामुळे गोव्यात बरेच बदल घडले त्यात मुक्त बाजारपेठ उपलब्ध झाल्या नंतर अनेक विदेशी वस्तू गोव्यातील गावात पोहोचल्या. म्हणून गावातील ताव्हेर्नातील काजू फेणीची जागा बियर, रम, जीन फॉरीन ड्रिंकने आणि खरातल्या तोरांची जागा तातया, मटण, चणे याने घेतली. कॅथरीन च्या ताव्हेर्नात मात्र पारंपरिक काजू फेणी व खायला खरातल्या तोरांची विक्री होत होती. अश्या प्रकारच्या गोमंतकीय जीवनातील स्तीत्यंतरांचे चित्रण गावसांच्या कथांतून आढळते.

'कहत कबीर' या कथेत बदलत्या काळानुसार हिंदू मुसलमान धर्मा मधील भेदभावामुळे भीतीदायक समाजव्यवस्थेचे चित्रण लेखकाने येथे उभे केले आहे. गोव्यात पूर्वी लोक एकजुटीने राहायचे. प्रत्येक धर्माचे लोक गोव्यात भावबंधीलकीची नात्याने राहायचे. वाड्यावरचे एखादं खातं पितं घर सोडलं तर सगळ्यांकडेच गरीबी. मिळेल ते काम करून माणसं पोट भरायची. कुणी एखादा बाजारात बांगड्या विकायचा, तर कुणाचं छोटसं सायकल दुरूस्त करायचं दुकान असायचं तर कुणी बीफ विकायचा. कोंबड्या-बकरे कापणारे तर सगळेच मुसलमान. गरीबी असली तरी माणसं सुखी होती. धर्माधर्मामध्ये कुठेही कटूता नव्हती. दिवाळी, चवथीच्या सणात मुसलमान सहभागी व्हायचे. मिठाई नेवऱ्या मुसलमानाच्या घरांमध्ये पोहचल्या जायच्या. तर हिंदू इदच्या शीरकुर्माची चव घ्यायचे. एखादी निःपुत्रिक बाई तिठ्यावरच्या पीराच्या दर्याला मूल होण्यासाठी नवस करायची. नवसाला पावणारा पीर म्हणून पंचक्रोशीत त्याची ख्याती होती. हिंदूच्या गाऱ्हाण्यातही पीराचे नाव घेतले जायचे. एखादा उत्सव यशस्वी होण्यासाठी त्याचे आशीर्वाद घेतले जायचे. पण बदलत्या काळानुसार हे वातावरण बदलू लागले होते. काही वर्षापूर्वी शाळा सोडून उनाडक्या करणारी मुले दुबईला गेला. हाडा-पेरानी भरलेला उंच, भरजरी कपडे, दोन्ही हाताच्या बोटात चार-चार अंगठ्या, गळयात भली मोठी चकाकणारी साखळी. त्यानंतर वाड्यावरचा एक एक तरूण दुबई, कुवेतसारख्या देशात जाऊ लागला. आता तर प्रत्येक घरातला एखादा दुसरा गल्फमध्ये आहे. पैसा कमावतो आहे. भरमसाठ मिळणाऱ्या पैशामुळे संपूर्ण वाड्याचे बदलणारे चित्रण लेखकाने येथे चित्रित केले आहे. या बदलत्या जीवनशैली मुळे समाजात सुधारणा होण्याऐवजी अनेक प्रकारचे प्रश्न निर्माण होऊ लागले. अनेक समस्या निर्माण होऊ लागल्या. बदलत्या काळानुसार प्रत्येक माणूस पुढच्या माणसाला कमी लेखू लागला. हिंदू मुसलमान जमातीत छोट्या छोट्या कारणावरून भांडणे होऊ लागली होती. मारामाऱ्या होऊ लागल्या होत्या. शकिलच्या वाड्यावर तर गोहत्या आणि बीफ खाण्यावरून वादावादी होऊ लागली होती. या बदलत्या काळानुसार दोन जमातीत घडणाऱ्या

ताणतणावाच्या प्रसंगी शकील सारख्या भोळ्या भाबड्या नैसर्गिक जीवन जगू पाहणाऱ्या व्यक्तींची वाताहत होऊ लागली. शकील हा मुसलमान असून पूर्वी मंदिरात अभंग गाण्यासाठी बसायचा पण कालौघात निर्माण झालेल्या या परिस्थितीचा परिणाम म्हणून शकीलला मौलनाकडून अभंग गाणे बंद करण्याचा आदेश दिला जातो तर दुसऱ्याबाजूने तो मुसलमान असल्याकारणाने हिंदू धर्मीय लोक त्याला मंदिरात प्रवेश करू देत नाही. या प्रसंगी देवळात मात्र "कहत कबीर सुनो भाई साधो, राम रहीम एक है दोनो." हा अभंग आळवला जात होता. देवाच्या अभंगात आपण राम आणि रहीम हे एकच असल्याचे मान्य करतो मात्र आज प्रत्यक्षात आपले वर्तन कसे झाले आहे या बद्धल कोणी विचार करत नाही.

## सामारोप

विठ्ठल गावस यांच्या कथासंग्रहातील काही कथांच्या माध्यमातून ग्रामीण जीवन चित्रण या विषया अंतर्गत कृषिजीवन, गोमंतकीय ग्रामीण व्यवसाय, ग्रामीण स्त्री जीवन चित्रण, ग्रामीण जीवनातील राजकारण या विषयांवर चर्चा केली आहे. त्याचप्रमाणे त्यांच्या कथातून दिसून येणाऱ्या लोकसंस्कृतीचा अभ्यास केला आहे. त्यांच्या समस्यारुपी आशसूत्रांवर देखील मांडणी केली आहे. बदलत्या गोमंतकीय जीवनशैलीचा ही येथे अभ्यास केला आहे.

## निष्कर्ष

१. गावासांच्या कथा ह्या गोमंतकीय ग्रामीण जीवनातील अनेक महत्वाचे विषय मांडणाऱ्या आहेत.
२. गावासांच्या कथा या गोमंतकीयांच्या लोकसमजुती, प्रथा परंपरांचे दर्शन घडविणाऱ्या ठरतात.
३. ग्रामीण स्त्री दुख हे त्यांच्या काही कथांचे मुख्यसुत्र आहे.
४. बदलत्या गोमंतकीय लोकजीवनाचे चित्रण करणाऱ्या गावासांच्या कथा लक्षवेधी आहेत.

## संदर्भ

१. जोशी, सुधा. "कथा : संकल्पना आणि समीक्षा." मौज प्रकाशन गृह मुंबई, २०१२, पृ. ७.
२. पावडे, व्यंकटी. "रा. र. बोराडे यांची कथा शोध आणि समीक्षा." इसाप प्रकाशन नांदेड, २०१३, पृ. १९२.

# प्रकरण ४

# विठ्ठल गावस यांच्या कथांतील व्यक्तिरेखांचा अभ्यास

# विठ्ठल गावस यांच्या कथांतील व्यक्तिरेखांचा अभ्यास

## प्रास्तावना

विठ्ठल गावस यांच्याकथेत गोमंतकीय परिपेक्षात वावरणाऱ्या व्यक्तींचे चित्रण झाले आहे. त्यांच्या कथा या ग्रामीण व शहरी पार्श्वभूमीवर घडणाऱ्या आहेत. त्यामुळे त्यांच्या कथांमधून अनेक स्वभावधर्म जोपासणाऱ्या व्यक्तींचे चित्रण झालेले आहे. त्यांच्या कथा निरक्षर असणाऱ्या त्याचप्रमाणे शिक्षित व्यक्तींचेही चित्रण करणाऱ्या आहेत. ग्रामीण स्त्री चित्रणे त्यांच्या कथांतून चित्रित झाली आहेत. समाजातील शोषक व शोषिकवृत्तीच्या माणसांचे चित्रण करणाऱ्या व्यक्तींचे चित्रणही त्यांच्या कथांमधून झालेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात विठ्ठल गावसांच्या कथेतून चित्रित झालेल्या पुरुष व्यक्तिरेखा व स्त्री व्यक्तिरेखांचा अभ्यास करण्यात येणार आहे. कथांमधून येणाऱ्या ग्रामीण पुरुष व्यक्तिरेखा, ग्रामीण स्त्री व्यक्तिरेखा यांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

## ४.१.१ कथांमधून चित्रित झालेल्या ग्रामीण पुरुष व्यक्तिरेखा

'ओझे' या कथेत जानू हा सर्वसामान्य जीवन जगणारा पाडेली चित्रित झाला आहे. भाटकाराच्या भाटात माड पाडून व लहानसहान कामं करून आपलं आयुष्य जगणारा आहे. जानू हा संस्कृती जपणारा माणूस आहे. त्याचप्रमाणे कष्ट करून पैसे कमावणारा आहे. त्याने आपल्या मुलीचे लग्न एका सरकारी नोकरी करणाऱ्या मुलाशी लावून दिलेले असते. सरकारी नोकरी म्हणजे प्रतिष्ठा, मोठेपणा हा त्या व्यक्तीला जडलेला असतो. त्याच प्रमाणे जानुचा जावई जानुशी वागत असतो. लग्नानंतर प्रत्येक सणाला त्याचा जावई त्याच्याकडून ओझ्याची मागणी करतो. लोकांकडून कर्ज काढून ओझे पाठविण्याशिवाय त्याच्याकडे अन्य कोणताही मार्ग मोकळा असत नाही. एकंदरीत एका गरीब बापाचे संवेदनशील व्यक्तिमत्वाचे चित्रण जानुच्या माध्यमातून लेखक करतात.

'पियानोचे स्वर' या कथेत बायको पासून दूर राहणाऱ्या कॅनथ या व्यक्तिरेखेचे चित्रण झाले आहे. गोवामुक्ती पूर्व गोमंतकातील वातावरणाचे चित्रण या कथेत आले आहे. ज्यावेळी पोर्तुगीज शासन गोव्यात होते. चळवळी, मोर्चा, दहशदवाद या सारख्या गोष्टी तत्कालीन कालखंडात घडत होत्या. कॅनथ हा बोटीवर कॅप्टन म्हणून काम करत असतो. एका पार्टीला गेलेल्या ठिकाणी त्याची भेट एका अँग्लो पोर्तुगीज तरुणीशी

होते. ती चांगला पियानो वाजवत असते. पुढे त्यांच्यात मैत्री होते व त्या मैत्रीचे रूपांतर प्रेमात घडते. ते दोघेही लग्न करतात. लग्नानंतर तिने त्याला पियानो वाजवायला शिकवलेला असतो. ते गोवा स्वातंत्र्याचे दिवस असतात. कॅनथ हा भारतीय असल्या कारणाने गोवा पोर्तुगीजांच्या सत्तेतून मुक्त व्हावा ही त्याची इच्छा असते. पण त्याच्या बायकोचे मत मात्र वेगळे असते. ती भारतीय लोकांचा तिरस्कार करायची. शेवटी गोवा स्वातंत्र झाला. "यापुढे गोव्यातील सगळ्या लोकांना भारतीय नागरिक समजण्यात येईल. तरीपण ज्याला कुणाला पोर्तुगालला जायचं असेल त्यांची भारत सरकार तर्फे सोय करण्यात येईल." अशी बातमी गोव्यात पसरू लागली त्यावेळी कॅथनची बायको आपल्या मातृभूमी पोर्तुगालला जाण्याचा निर्णय घेते. ती कॅथनला सोडून स्वतः पोर्तुगालला निघून जाते. कॅथन मात्र गोव्यात राहाणेच स्वीकारतो. सुरुवातीच्या काळात ती त्याला पत्र पाठवायची पण काळानुसार ते बंद झाले. कदाचित ती त्याला विसली असावी. पण कॅथन मात्र तिला कधीच विसरू शकला नाही. ज्यावेळी त्याला तिची आठवण स्मरायची त्यावेळी कॅथन पियानो वाजवायचा. त्या पियानोतून निघणाऱ्या स्वरांतून त्याच्या मनातील भावना उस्फुर्तपणे व्यक्त करायचा. त्याच्या पियानोतून निघणारे स्वर हे दुःखाचे, आर्ततेचे स्वर असायचे. कॅथनच्या माध्यमातून एका गोमंतकीय तरुणांच्या भावनिक मनोवृत्तीचे चित्रण लेखकाने केले आहे.

'त्याची म्हैस परत आली' या कथेत एका संवेदनशील पुरुषाचे चित्रण झालेले आहे. धोंडी हा या कथेचा नायक आहे. त्याच्या कुटुंबात त्याची म्हातारी आई व त्याची लहान मुलगी असते. धोंडीची बायको गोंदू ही अचानक घर सोडून गेलेली असते. धोंडी हा गरीब शेतकरी असतो. त्याचे लग्न गोंदूशी झालेले असते. गोंदू ही स्वभावाने कमी बोलायची. तीने कधीही धोंडु बरोबर भांडण केलेले नसते की कसला वाद केलेला असतो. पण काही दिवसांपासून ती वेगळीच वागत होती. दुपारच्या वेळी घरातून बाहेर पडत होती व धोंडी घरी परतण्यापूर्वी घरी परतत होती. एके दिवशी तिच्या सासूने तिच्या ह्या वागण्याबद्धल धोंडीला सांगितले व त्यावरून त्यांच्यात एक छोटंसे भांडण झाले. त्यात धोंडीने तिच्यावर हात उगारला. सर्वसामान्य पुरुषाच्या मनात आपल्या बायको विषयी निर्माण झालेल्या संशयात्मक भावनेचे चित्रण या ठिकाणी होते. ती घर सोडून गेल्या नंतर धोंडीला अनेक परिस्तिथीना सामोरे जावे लागते. गावातील माणसे बायको पळून गेली म्हणून त्याच्याबद्धल चेष्टा मस्करी करू लागले, त्याची म्हातारी आई तिला अपशब्द देऊन तिचा तिरस्कार करू लागते. धोंडीला मात्र हे सहन सर्व मुकाट्याने ऐकून घ्यावे लागते. बायको पळून गेल्यावर एका पुरुषाची झालेली अवस्था धोंडूच्या माध्यमातून लेखकाने चित्रित केली आहे. त्याला एक लहान मुलगी असते. आई

विना एका बाळाला सांभाळणे ही पुरुषावर एक मोठी जबाबदारी असते. खरंतर मुलीला सांभाळण्यासाठी त्याला दुसरं लग्न करता आले असते पण तो तसे करत नाही. त्याची गोठ्यातील म्हैस पळून गेलेली असते. चार-पाच दिवसांनी ती परत घरी परतते. तिला पाहून धोंडूच्या मनात एके दिवशी गोंदूपण अशीच घरी परत येईल अशी आशा मनात निर्माण होते. ग्राम जीवनातील आशावादी मनोवृत्तीचे चित्रण करणारी धोंडी हे व्यक्तिचित्रण लेखकाने या कथेत उभे केले आहे.

'माज' या कथेत धाकू या कुळवाड्याचे चित्रण झाले आहे. धाकू हा भटकाराच्या भाटात गड्यासारखा वावरत असतो. भाटकाराच्या भाटात काम करण्याची वडिलोपार्जित परंपरा त्यांच्या घराण्याला लाभलेली असते. भाटकाराच्या भाटाने त्यांच्या अनेक पिढ्या जागवलेल्या असतात. तीच परंपरा चालू ठेवण्यासाठी व आपला संसार चालवण्यासाठी धाकू हा भाटात राबत असतो. भाटकाराची धाकुच्या बायकोवर वाईट नजर असते. धाकुला या गोष्टीची जाणीव असते  पण तो या गोष्टीकडे दुर्लक्ष करतो. धाकुच्या माध्यमातून लेखकाने कष्टकरी समाज, तिथल्या माणसांची लाचारी या कथेतून चित्रित झाली आहे.

'दृष्ट' या कथेतील मोरतू हा ग्रामीण जीवनातील कष्टकरी व्यक्तीरेखा चित्रित झाली आहे. रोजच्या दोन वेळेचे जेवण मिळवणे त्याला व त्याच्या आईला कठीण झालेले असते. तो प्लास्टिकची भांडी विकून चार पैसे कमवायचा पण अनेकवेळा विक्री न झाल्याने त्याच्यासमोर पैशांचा मोठा प्रश्न उपस्थित होत असे. हातात पैसे नसल्याने आईने सांगितलेले सामान विकत आणणे त्याला शक्य होत नाही. तो तरुण असतो. त्याचे लग्नाचे वय असते. म्हणून त्याची आई त्याला लग्न करण्या विषयी विचारते त्यावेळी तो तिला साफ नकार देतो. कारण त्याला स्वतःच्या परिस्तिथीची जाणीव असते. आपल्या व आईच्या दोन वेळच्या जेवणासाठीची धडपड त्याला माहिती असते. त्यात दुसऱ्या व्यक्तीला घरात आणून तिचे हाल करणे त्याच्या मनाला पटणारे नसते. अशा या हालाकीच्या परिस्तिथीत जगणाऱ्या मोरतूचे चित्रण लेखकाने येथे केले आहे. ग्रामीण जीवनात संवेदनशीलपणे जगणाऱ्या मोरतूचे चित्रण प्रभावीपणे लेखकाने या कथेत केले आहे.

'पाऊस' या कथेत एका भाटकाराच्या समंजस स्वभावाचे चित्रिण लेखकाने केले आहे. त्याचा मुलगा शिकलेला असतो. शिकून त्याला शहरात नोकरी मिळालेली असते. त्याचे लग्न झालेले असते पण तो एकटाच शहरात राहत असे. पारंपरिक गावगाड्याच्या व्यवस्थेत विभक्त कुटुंब पद्धतीला वाव नसतो. त्यामुळे भाटकाराला आपल्या मुलाने शहरात बिऱ्हाड करून राहणे पसंत नसते. भाटकाराच्या मुलाला शहरात नोकरी

करणे व अधून मधून गावात परतणे सोयीस्कर नव्हते कारण पावसाच्या दिवसात नदीत पूर यायचा. अशा वेळी घरी पोहोचणे त्याला अशक्य होई. म्हणून तो भाटकाराकडे शहरात बिऱ्हाड करून राहण्याचा प्रस्थाव मांडतो पण भाटकार त्याला मान्यता देत नाही. एका भाटकाराच्या मुलाने बिऱ्हाड करून राहणे हे भाटकाराला कमीपणाचे वाटायचे. पण ज्यावेळी त्याला आपल्या मुलाची होणारी दगदग समजते; कि त्यादिवशी तो नदीतून पोहत घरी आलेला असतो. त्यावेळी एक बाप म्हणून भाटकाराच्या मनाची होणारी घालमेल या कथेत चित्रित झाली आहे. शेवटी आपल्या मुलाच्या काळजीपोटी तो त्याला शहरात बिऱ्हाड करून राहण्याला मान्यता देतो. स्वतःच्या समाधानामुळे आपल्याकडून आपल्या मुलाचे होणारे हाल त्याला कळून येतात व शेवटी भाटकार समंजसपणे या परिस्तिथीचा विचार करताना या कथेत दिसून येते.

तर, ग्रामीण जीवनातील अशा अनेक स्वभाव वैशिष्ट्यांचे चित्रण करणाऱ्या व्यक्तिरेखा लेखकाने पाऊस, दृष्ट, त्याची म्हैस परत आली इ. या कथांमधून  चित्रित केल्या आहेत.

‘हार’ या कथेत शहरातील शिक्षकाकडून एखाद्या गावातील शिक्षकाच्या होणाऱ्या कुचंबणेचे चित्रण नाडकर्णी व सावंत मास्तर यांच्याद्वारे लेखकाने 'हार' या कथेत चित्रित केले आहे. सावंत सर हे साधे भोळे गावातील शिक्षक असतात. ते जबाबदारीने व शिस्तीने वागणारे असतात. मुलांनी शिक्षण घेऊन मोठे व्हावे हीच त्यांची इच्छा असते. मुलांना वठणीवर आणण्यास शिक्षासुद्धा गरजेची असते हे त्यांना माहित असते. मुलांनी चांगल्या वाटेने जावे हाच त्यांचा प्रांजळ हेतू असतो. शिक्षण क्षेत्रात त्यांना पंचवीस तीस वर्षाचा अनुभव असतो. त्यांनी अनेक वर्षे सत्तरीतील अनेक शाळांमध्ये काम करून आपले अस्तित्व निर्माण केलेले असते. एक दिवशी अचानक त्यांची बदली शहरातील एका शाळेत केली जाते. त्यांची बदली वास्कोला केली जाते. कारण सरकारतल्या एका व्यक्तीच्या नातेवाईकाला वाळपईला बदली हवी होती. स्वतःच्या माणसाची चांगली सोय व्हावी म्हणून रचलेले हे कारस्थान असते. या कारस्थानात सापडणारे हे सावंत सर असतात. त्यांची बदली शहरात झाल्या नंतर त्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. त्यांना तिथल्या मुलांशी, शिक्षण व्यवस्थेशी, मुलांच्या पालकांशी संघर्ष करावा लागतो. स्वार्थी राजकारणामुळे रिटायरमेंटच्या वयात सावंत सिरांना भोगाव्या लागणाऱ्या असंख्य यातना या कथेत मांडण्यात आल्या आहेत.

ज्यावेळी त्यांची बदली वास्कोला केली जाते त्यावेळी त्यांना शहरातील शाळेतील अनेक गोष्टींचा उलघडा होतो. शहरातील शिक्षकांची सत्तरी सारख्या गावातील शिक्षका विषयी असलेले मत विठ्ठल गावस यांनी नाडकर्णी द्वारे पुढील उद्गारात स्पष्ट केले आहे,

"घाटी, आम्हाला शहाणपणा शिकवतो, म्हणे शिक्षकीपेशा ही नुसती नोकरी नसून एक व्रत आहे. बेशिस्त चालवून घेतली जाणार नाही. वाSSवाSS ही काय सत्तरीतील गांवढळ लोकांची शाळा आहे?"(हार, १३५)

तेथे ते आपल्यापरीने तिथल्या परिस्तिथीत सुधारणा करू पाहतात पण शेवटी त्यांच्या नशिबी निराशाच येते. नाडकर्णीने रचलेल्या अनेक कारस्थानांना ते बळी पडतात. गावातील मुलांच्या चांगल्यासाठी सावंत सरांनी मुलांना मोफत ट्यूशन देण्याचा निर्णय घेतलेला असतो. शिक्षकांनी ट्युशन क्लास चालवणे गुन्हा असतो. या गोष्टीचा नाडकर्णी फायदा घेतो व सावंत सरां विरुद्ध तक्रार नोंदवितो. शेवटी सावंत सरांनी सुरु केलेल्या मोफत ट्यूशन मुळे रिटायरमेंन्ट मिळण्याच्या वयात त्यांना शिक्षकी पेशातून सस्पेंड करण्यात येते.

'देऊळ' या कथेत न्यायप्रिय व कायद्याचा आदर करणाऱ्या नाना जोशींचे भ्रष्ट अधिकाऱ्यांकडून होणारे शोषण लक्षवेधी आहे. नाना जोशी ज्या सोसायटीत राहायचे त्याला लागूनच एकेदिवशी अचानक काही लोक येऊन देऊळ बांधणीचे काम सुरु करतात. त्या देऊळ बांधणीचा पुढे जाऊन सोसायटीत राहणाऱ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागणार होते. देऊळ बांधून पूर्ण झाल्यावर भजन-कीर्तनाच्या नावानं गोंधळ घातला जाणार... बरं देवदर्शनासाठी येणारे सगळेच काही देवभक्त असतात असं नाही. देवदर्शनाच्या निमित्ताने चोर, गुंड, लफंगे येणार... त्यामुळे आपल्या सोसायटीची सुरक्षा धोक्यात येऊ शकते अशी चिंता नाना जोशींना वाटत होती. समाजाच्या हितासाठी व सोसायटीतल्या लोकांच्या सुरक्षितेसाठी देऊळ बांधण्याचे काम बंद होणे नानांना आवश्यक वाटत होते म्हणून त्यादृष्टीने त्यांनी पुढाकार घेण्याचा निर्णय घेतला.

सुरुवातीला ते सोसायटीच्या अध्यक्षांकडे गेले तेथे देवाधर्माच्या कार्याला आपण उगाच विरोध का करूया असे म्हणून अध्यक्षांनी तो विषय टाळला. पुढे ते पोलीस स्टेशनवर तक्रार दाखल करण्यासाठी गेले. तेथे त्यांना एखादं बेकायदेशीर बांधकाम कायदेशीर आहे की बेकायदेशीर हे ठरवण्याचा अधिकार पोलिसांना नाही असे सांगण्यात आले व जागेच्या मालकीसंबंधी व्यवहार मामलेदाराकडे असता असे सांगण्यात आले. तेथून त्यांनी मामलेदारचे ऑफिस गाठले पण तेथे ते काम आपलं नाही म्युनसिपालिटीला या गोष्टीचा

शहानिशा करण्याचा अधिकार असल्याचे सांगण्यात येते. इतक्या ठिकाणी जाऊन सुद्धा निराशाच पदरी आल्यावर सुद्धा नाना हार मानत नाही. ते मुख्यमंत्र्यांना पत्र लिहितात. पुढे जाऊन म्युनसिपालिटीत जाऊन या समस्येचे निवारण होण्याची आशा मनात बाळगतात. म्युनसिपालिटीचे लोक त्यानुसार जागेचे इंस्पेक्शन करण्यासाठी तेथे जातात त्यावेळी देऊळ बांधणाऱ्या लोकांना नाना देऊळ पाडण्यासाठी सरकारी पातळीवर प्रयत्न करत असल्याचे समजते. त्यांना नानांचा राग येतो ते त्यांच्या फ्लॅटकडे जातात व तेथे जाऊन त्यांना शिव्याशाप देतात त्याचप्रमाणे त्यांच्या घराच्या खिडक्यावर दगड मारून तेथून निघून जातात. कायद्याला धरून चालणाऱ्या व्यक्तीला किती हालअपेष्टा सहन करावे लागतात याचे प्रत्यय या प्रसंगातून कळून येते. न्यायप्रिय व कायद्याचा आदर करणाऱ्या आदर्श व्यक्तीचे लेखकाने या कथेत चित्रण केले आहे.

‘फिंगर बाऊल’ या कथेत राजकरणाच्या चक्रव्हूव्हात फासणाऱ्या मार्कुसचे चित्रण झाले आहे. मार्कुस हा सर्व सामान्य जीवन जगणारा माणूस असतो. मांस, मटण विकण्याच्या धंद्यातून त्याने आपले अस्तित्व समाजात निर्माण केले होते. त्याच्या दुकानावर काम करणाऱ्या माणसांशी तो नेहमी आपुलकीने वागायचा. अडीअडचणीच्या वेळी तो त्यांना मदत करायचा. त्याचप्रमाणे च्याचा समाजकार्यातही सहभाग असायचा. लोकांना मदत करणे हा त्याचा स्वभावधर्म होता. चर्च संदर्भात काही कामे त्यांनी पूर्ण केली होती आणि म्हणून ख्रिश्चन माणसे त्याचा आदर करायची. तर, येत्या लोक सभा इलेक्शनच्या वेळी पार्टीची तिकीट देण्याचे आश्वासन उपमुख्यमंत्र्याकडून मार्कुसला मिळते. त्यानुसार मार्कुस निवडणुकीची तयारी करतो. सर्व ख्रिशचन बांधवांना आपल्या बाजूने मतदान करण्यासाठी अनेक समाज कार्ये करतो. स्वतःच्या पदरचे पैसे खर्च करतो. एम्. एल्. ए साहेबांनी त्याला दिलेल्या ऑफर ऐकून तो भांबावून जातो. आमदार होण्याची स्वप्नं पाहू लागतो. पण त्याचा हा उत्साह जास्त काळ टिकत नाही. उपमुख्यमंत्र्याने दिलेल्या शब्दानुसार मार्कुस आपल्याला तिकीट मिळेल याच आशेने होता पण शेवटी नॉमिनेशनच्या वेळी मार्कुसचे नाव बाहेर काढले जाते. त्याने केलेली धडपड फुकट जाते. दुसऱ्या पार्टीशी मिळून मार्कुस या चक्रव्हूव्हात उतरला असता तर अवश्य निवडून आला असता. स्वतःच्या फायद्यासाठी लक्ष विचलित करण्याच्या उद्देशाने एका सर्व सामान्य माणसाची होणारी वाताहत लेखक या कथेतून मार्कूसच्या माध्यमातून स्पष्ट करतात.

'कहत कबीरा' ही विठ्ठल गावसांची वैशिष्ट्यपूर्ण अशी कथा आहे. या कथेत हिंदू मुसलमाना मध्ये उडणाऱ्या खटल्यांचे चित्रण लेखकांनी केले आहे. शकील हा एक मुसलमान असतो. त्याला देवळात भजन

गाण्याची खूप आवड असते. लहानपणी देवळात वाटणाऱ्या गोड धोड प्रसादाच्या आशेने तो देवळात जाऊ लागला. तेथूनच त्याचा संपर्क भजनाकडे झाला. सुरवातीला भजनाला कोरसला तो बसायचा. भजन शिकून त्याने आपली ओळख समाजात निर्माण केलेली असते. भजन गाऊन मिळालेल्या चार पैशांवर तो आपला संसार चालवायचा. पण बदलत्या काळानुसार समाजात निर्माण होणाऱ्या धार्मिक भेदभावामुळे शकीलला अनेक वाईट प्रसंगांना सामोरे जावे लागले. शकीलला मुसलमान असल्या कारणाने मंदिरात जाण्यापासून वंचित ठेवले जाऊ लागले, दर्गातील मौलनाकडून त्याच्यावर नमाजला येण्याची सक्ती केली जाऊ लागली, भजन गाणे हे शरीअतला मंजूर नाही असे सांगून त्याला भजन गाण्यास मनाई केली जाऊ लागली. भजन गाणे हा शकिलचा आवडता छंद असतो. भजनाचे स्वर ऐकताच क्षणी त्याचे मन उचंबळीत होत असत. पण धार्मिक कलहामुळे त्याला या सर्वापासून जबरदस्तीने वेगळे ठेवण्यात येते. मुसलमान लोक गायीचे मांस खातात तर दुसऱ्या बाजूने हिंदू धर्मात गायीला देवतेचे स्थान दिले आहे. गायीची हत्याकरून मुसलमान लोक हिंदू धर्माचा अपमान करतात हेच कारण सांगून शकिलला मंदिरात प्रवेश करण्यावर बंदी घालण्यात येते. देवळात भजन सुरु असताना त्याला देवळात जात येत नाही व इतकी वर्षे ज्यांच्या सोबत भजनाचे कार्यक्रम केले त्यांनीही त्याच्याकडे पाठ फिरवली. या प्रसंगी सर्वसामान्य माणसाची होणारी मानसिक घालमेल लेखकाने शकिल या व्यक्तिचित्रणातून मांडली आहे.

'मद' या कथेतील 'भाटकार' ही पाशवी वृत्तीची व्यक्तिरेखा लेखकाने चित्रित केली आहे. लैंगिक वासनेने झपाटलेला. आपल्या भाटातील उत्पन्नाच्या बदल्यात 'धाकुच्या बायकोचे' जीवन उद्ध्वस्त करणारा आहे. धाकूच्या घराण्याला भाटकाराच्या भाटात राबण्याची वडिलोपार्जीत परंपरा लाभली होती. धाकू त्याच्या बायको व भाटकारापासून जन्मलेल्या एका मुलीबरोबर त्या भाटात राहत असे. दरवर्षी भाटकार भाट पाडण्याच्या वेळी गावात येत असे. भाटकार भाट पाडण्यासाठी येणार हे कळताच धाकुच्या बायकोला झोप लागत नव्हती. कारण भाटकार ज्यावेळी भाट पाडण्याची वेळ होण्यापूर्वीच भाट पाडण्यासाठी येण्याचा निरोप पाठवतो त्या वेळी त्याचा इरादा काही बरा नाही हे तिला समजायचे. भाटकार आला म्हणजे काही दिवस राहायचा आणि त्या वेळी रात्रीचा तो धाकुच्या बायकोच्या कुशीत झोपायचा तिचा शारीरिक उपभोग घ्यायचा. या वेळी तर पशुवत्वाची भाटकाराने सीमाच ओलांडली. या वेळीतर त्याने स्वतःच्या मुलीवरच हात घातला असा हा कामांध भाटकार भाटकारी रूपाने या कथेत लेखक व्यक्त करतात.

भाटकाराच्या निमित्ताने ग्रामजीवनातील अत्याचारी पैश्यांच्या मग्रुरीने मस्तवाल झालेल्या माणसांचे चित्रण भाटकाराच्या रूपाने केले आहे. या गर्विष्ठ माणसांमुळे सामान्य माणसांच्या जीवनाची कशी होळी होते याचे भयावह चित्रण ते करतात. भाटकार ही व्यक्तिरेखा ग्रामजीवनातील अत्याचाराचे प्रतीक आहे. तो कामांधतेने पेटलेला आहे. धाकुच्या गरीब परिस्तिथीचा फायदा घेणारा आहे. त्यामुळे धाकुचे जीवन कौटुंबिक ताणतणावाला आणि बायकोच्या मानसिक असंतुलनाला बळी पडलेला आहे. भाटकार हा ग्रामीण मग्रुरी करणारा ठरतो.

'सोबत' या कथेतील लक्ष्मी ही विधवा असते. स्वतःचा संसार चालविण्यासाठी ती घरातून बाहेर पडते व आपला छोटासा पान सुपारी विकण्याचा धंदा सुरु करते. नकुल हा गावातील गुंड प्रवृत्तीचा तरुण तिच्यावर वाईट दृष्टी धरून असतो. गावात त्याची ओळख ही बायका मुलींची छेद काढणार म्हणून असते. गुंडगिरी ही ग्रामीण समाजव्यवस्थेत पैशांचा माज असणाऱ्या माणसांची प्रवृत्ती आहे. दुकान बंद करून रात्री एकटी बाजारातून गावापर्यंतची वाट चालत होती. नकुल तिच्यासाठी रोज त्या वाटेवर तिची वाट पाहत राहायचा. ती आल्यावर तिला आपल्या सायकलवर बसवून गावापर्यंत सोडायचा. सायकल चालवताना नकुल तिच्या अव्यवांना स्पर्श करत होता. पण लक्ष्मी ही साधी भोळी चुकून लागला असेल हाथ म्हणून सोडून द्यायची. तिला वाटायचे की आपल्या काळजीपोटी नकुल आपल्याला मदत करतो. पण हे सर्व करण्यामागे त्याचा हेतू शुद्ध नसावा ही लक्ष्मीला शंका होती. म्हणून नाटकाला बोलावल्या वेळी लक्ष्मी त्याला त्याच्यासोबत जाण्यास नकार देते. तरीही तो तिला नाटकाला घेऊन जाण्याचा प्रयत्न करतो पण लक्ष्मी आपल्या मतावर ठाम राहते. नाटकाला गेलेल्या ठिकाणी नकुलने एका बाईवर बलात्कार करण्याची बातमी गावभर पसरते. अतृप्त कामवासनेने ग्रस्त झालेला माणूस हा शेवटी पशुत्वच पत्कारतो.

'सवाई' या कथेत शहरी संस्कृतीत वाढणाऱ्या रोहनची प्रत्येक स्त्रीकडे पाहण्याच्या दूषित दृष्टीचे चित्रण झाले आहे. अँन या तरुणीला लग्ना अगोदर रोहनपासून दिवस गेलेले असतात. रोहनने तिला तिच्याशी लग्न करण्याचे वचन देऊन तिची फसवणूक केलेली असते. शहरी संस्कृतीत पोरींना फिरवणे हे प्रतिष्ठेचे मानले जाते म्हणून हे करण्यास प्रवृत्त होणाऱ्या रोहनमुळे अँनची होणारे दुःखद स्तिथी येथे चित्रित झाली आहे. पोलिसात तक्रार केल्याने समाजात मुलींच्याच अब्रूचे धिंडवडे निघतात. म्हणून अँन त्याच्या विरुद्ध तक्रार नोंदवत नाही.

याचाच फायदा घेऊन रोहन पुढे रिनाला फसवतो. एकंदर स्त्रीकडे केवळ एक उपभोगाची गोष्ट म्हणून पाहणाऱ्या व मानवी अतृप्त वासनेने ग्रस्थ माणसाचे चित्रण रोहनच्या माध्यमातून येथे झाले आहे.

'माज' या कथेत ग्रामीण भागातील पाड्यांना चेचण्याच्या पद्धतीवर भाष्य करण्यात आलेले आहे. कुष्टा हा पाड्याना चेचण्याचे काम करायचा. द्रुपदी कुष्टाची बायको ही दिसायला सुंदर होती. तिच्यावर गावातील अनेक जणांची नजर होती. त्यात एक भाटकाराचा झीलही होता. पुरुषोत्तम हा भाटकाराचा मुलगा असतो. त्याच वर्तन चांगले नसते. भाटकाराचा मुलगा असण्याचा त्याला माज होता. गावात प्रत्येकाशी तुच्छतेने तो वागायचा, लोकांना सतावणे हा त्याचा दिनक्रम होता. पुरुषोत्तम हा गावातील गुंडप्रवृत्तीचा व्यक्ती होता. तर त्याची नजर ही कुष्टच्या बायकोवर होती. तो तिचा पाठलाग करायचा, तिची छेड काढायचा. तिच्यासमोर कुष्टाविषयी नकोनको ते बोलत होता  त्यामुळे द्रुपदीची मानसिक कोंडामारी होत असे. दिवसेन दिवस खचत चालली द्रुपदी एके दिवशी या सगळ्याची खबर कुष्टाला करून देते. ते सर्व ऐकणे कुष्टाला असहनिय होते. त्याचा रागाचा पारा वर चढतो. त्या दिवशी कुष्टा त्याचा माज जीरवण्याचा निर्णय घेतो. पुरुषोत्तमाचा माज जीरवण्यासाठी कुष्टा एक योजना आखतो. शेवटी त्या प्रसंगी पुरुषोत्तम त्याच्या जाळयात फसतो व त्याचा अंत होतो. पाड्यांना चेचण्याच्या हातांनी पुरुषोत्तमाला चेचण्यात येते. कुष्टाच्या माध्यमातून एका बंडखोर पुरुष व्यक्तिरेखेचे चित्रण या कथेतून घडते.

विठ्ठल गावस यांच्या कथांमधून चित्रित झालेल्या ग्रामीण पुरुष व्यक्तिरेखा या सर्वसामान्य जीवन जगणाऱ्या आहेत. त्यांचे जीवन हे त्याग, दारिद्र, गरिबी यापासून वंचित नाही आहे. कौटुंबिक जिव्हाळा, माणुसकी, एकमेकांप्रती आदर, प्रेम बाळगणाऱ्या या व्यक्तिरेखा आहेत. मानवी मनाचा वेध घेत असताना त्यांच्या अनेक वृत्तीप्रवृत्तींचे चित्रण कथातील व्याक्तीरेखांतून झाले आहे. त्यामुळे काही कथांमधून कामवासनेने पेटलेल्या काही व्यक्तिरेखा दिसून येतात. शारीरिक भूक भागवण्यासाठी कोणताही मार्ग पत्करताना दिसून येतात. त्याचप्रमाणे शोषक व शोषीक वृत्तीच्या माणसांच्या व्यक्तिरेखांचे चित्रण त्यांच्या कथांतून झाले आहे. तर, ग्रामीण जीवनात अन्याय सहन करणाऱ्यां बरोबरच बंडखोर मनोवृत्तीची व्यक्ती लेखकाने आपल्या कथातून उभी केली आहे.

## ४.२ कथांमधून चित्रित झालेल्या ग्रामीण स्त्री व्यक्तिरेखा

विठ्ठल गावस यांच्या कथेतून ग्रामीण जीवनातील स्त्रीचे दुःख मोठ्या प्रत्ययकारी रीतीने साकार झाले आहे. ग्रामीण समाजजीवन व तेथील विचारसरणी याचा अभ्यास केला तर, त्यांच्या कथेतील काही 'स्त्री व्यक्तिरेखा' ह्या पुरुषी वर्चस्वाला बळी पडलेल्या दिसून येतात. त्यांच्या कथेतील स्त्री व्यक्तिरेखा ह्या कुटुंबातील कुटुंबप्रमुखाच्या आदेशाच्या 'हुकमतीवर' आधारलेल्या दिसून येतात. 'पाऊस' या कथेतील 'ती' हे त्याचे जिवंत उदाहरण आहे. 'ती' भटकाराच्या घरातील मोठी सून होती म्हणून असंच वागायला पाहिजे तसंच वागायला पाहिजे हे तिला सांगण्यात येत असे. पण तिला तसे वागणे आवडत नसे. नथ घातल्याने तिला अवघडल्या सारखे वाटत होते पण सासूच्या आग्रहा पोटी तिला ती घालावी लागते. अशा विविध स्वरूपाच्या स्त्री व्यक्तिरेखा गावसांच्या कथेतून ग्रामजीवनातील अनेक स्त्री प्रश्न घेऊन प्रगट होणाऱ्या आहेत. तिचे जगणे उलगडून दाखवणाऱ्या आहेत. तिचे दुःख, वेदना, मानसिक द्वंद्व, अधिक 'सजीव' करणाऱ्या आहेत. त्यांच्या कथेतील स्त्री व्यक्तिरेखा ह्या विविध स्वरूपाच्या आहेत. त्या कधी दारिद्र्याच्या खाईत जगणाऱ्या आहेत, तर कधी ती वासनांध 'गावगुंडाच्या' तावडीत सापडलेल्या आहेत. अशा विविध स्वरूपाच्या व्यक्तिरेखा त्यांच्या कथेतून येताना दिसतात.

'गुंता' ही कामगार वस्तीत घडणारी कुटुंबकथा लेखकाने रेखाटली आहे. या कथेत बाप आणि मुलगा यांच्यात चाललेल्या संघर्षामुळे घरातील स्त्रीच्या होणाऱ्या घुसमटीचे चित्रण आले आहे. एक पत्नी आणि एक आई म्हणून जगत असतानाच्या तिच्या द्विधा मनस्तिथीचे चित्रण येथे केले आहे. एक आई म्हणून तिला आपल्या मुलाविषयी काळजी, प्रेम, जिव्हाळा आहे. तर, एक पत्नी म्हणून नवऱ्याशी जुळवून घेणे तिला भाग आहे. मुतव्वा आणि तिचा एकुलता एक मुलगा असतो. तो शिकलेला असतो पण कामधंदा करत नसतो. तिला त्याने कामगार वस्तीत घाणेरडी कामे करणे पटत नसते. मुलगा शिकलेला असल्याकारणाने त्याने बारीकसारीक कामे करणे योग्य नाही अशी मानसिकता बाळगणारी ही आई आहे. त्यांच्या खिशातले पैसे चोरीला गेलेला असतात. ते स्वतःच्या मुलाने चोरले असल्याची तिला जाणीव असते. पण ती एक आईच्याहृदयाने या गोष्टीकडे दुर्लक्ष करते व या गोष्टींवर पांघरून घालते. पण ज्यावेळी हे त्याच्या बापाला समजले त्यावेळी त्याच्या आकांततांडवामुळे त्यांचा मुलगा घर सोडून जातो. अशा वेळी एकाबाजूने नवऱ्याच्या बडबडणी मुळे व दुसऱ्या बाजूने मुलाच्या बेशिस्त वागणुकीमुळे तिची होणारी चिडचिड येथे चित्रित झाली आहे. एका प्रसंगी बाप व मुलामध्ये हातापायी होते. या क्षणी दोघांनाही थांबविण्याच्या प्रयत्नात तिच्याकडुन रागाने मुलांवर प्रहार केला जातो व तिचा मुलगा गतप्राण होतो. इथे खरंतर तिला आपल्या मुलाचा

अंत अपेक्षित नव्हता तर बापलेका मधल्या संघर्षाचा अंत करायचा होता. पत्नी आणि आईच्या दुहेरी नात्याला संभाळत असताना एका स्त्रीच्या मनाची झालेली घालमेल लेखकाने आपल्या कथांमधून चित्रित केले आहे.

'घुसमट' या कथेत ज्युलीच्या मानसिक कोंडमाऱ्याचे चित्रण लेखकाने केलेले आहे. तिचा नवरा जॉन पाच वर्षे अर्धांगवायूमुळे अंथरुणाला खिळून असतो. त्यामुळे ज्युलीला अत्यंत खडतर अनुभवांतून जावे लागते. अशा वेळी ॲन ही तिची बहीण तिला भरभक्कम आधार देते. मूलतः सेवावृत्तीची सवय असलेली ॲन जॉनची सर्वतोपरी काळजी घेते. पण तोच ज्युलीच्या काळजीचा विषय होतो. असहाय स्थितीतदेखील जॉन आणि ॲन यांच्यामध्ये नाजूक भावबंध निर्माण झाले आहेत, असा ज्युलीला दाट संशय येतो आणि तो खरा वाटावा असे त्या दोघांचे वर्तन असते. मानवी प्रमादशीलतेचे मनोविश्लेणात्मक चित्रण या कथेत परिणामकारकतेने केलेले आहे. ज्युली हा सगळा वृत्तान्त आपल्या जिवलग मैत्रिणीला सांगत असताना ॲन ते सारे ऐकते आणि मुकाट्याने बहिणीच्या घराचा निरोप घेते. या कथेत एका ग्रामीण स्त्रीच्या मानसिकतेचे चित्रण दिसून येते. ज्युलिच्या माध्यमातून स्त्री सुलभ भावना व्यक्त होताना दिसते. कितीही असले तरीही एका स्त्रीला आपल्या नवऱ्याच्या बाबतीत दुसऱ्या स्त्री विषयीची असुरक्षिततेची भावना तिच्या मनात तरळत असते. ती स्त्री स्वतःची बहीण जरी असली तरीही तिची मानसिकता तशीच असते. एका मध्यमवर्गीय स्त्रीची मानसिकता, तिचे जगणे या कथेतून व्यक्त झाले आहे.

'सोबत' या कथेत एक निराधार विधवा स्त्रीचे चित्रण झाले आहे. सर्व सामान्यपणे एका विधवा स्त्रीकडे बघण्याचा दृष्टिकोण आणि तारुण्यात एखाद्या स्त्रीला वैधव्य येते त्यावेळेला तिच्याकडे असणाऱ्या बुभुक्षित नजरांचे चित्रण लेखकाने येथे केले आहे. एका स्त्रीला आपला कोसळलेला संसार सावरीत असताना समाजातील दूषित नजरांना सामोरे जावे लागत असते. लक्ष्मीला आपल्या जाळयात पकडण्याचा प्रयत्न करत असताना नकुल नावाचा तरुण या कथेत आलेला आहे. रात्रीच्या वेळी घरी परतताना नकुल लक्ष्मीला सोबत करतो. तो तिला सायकलवर बसवून नेतो. सुरुवातीला असहाय स्थितीत तिला नकुलची सायकल आणि त्याची सोबत महत्वाची वाटते. कारण रात्रीच्यावेळी एका स्त्रीने पायवाटेने जाणे एका भीतीदायक वातावरणात म्हणून तिला त्याचा आधार वाटतो. पण नकुल हा खरंतर स्वार्थी भावनेने, वासनेमुळे तिच्याशी जवळीक साधत असतो. तीही थोडीफार त्याच्यात गुंतत जाते. या गोष्टीवरून हॉटेलमधील सदाभटापासून गावातील शेजारीपाजारी बायकामध्ये कुजबुज सुरु होते. तारुण्यात एका विधवा स्त्रीच्या वाट्याला येणाऱ्या जगण्याचे

चित्रण येथे येते. एक स्त्रीने एका पुरुषाकडे मैत्रीच्या नात्याने जरी बोललं तरी समाज तिच्याकडे वेगळ्याच नजरेने पाहत असतो. विधवा बाईच्या वाट्याला ज्या यातना येतात त्या लक्ष्मीलाही सोसाव्या लागतात. तिला करावा लागणार संघर्ष या कथेत व्यक्त झाला आहे. नकुल आपल्या अतृप्त वासनांची तृप्ती करून घेण्यासाठी तिला रात्रीच्या वेळी नाटकाला बोलावतो पण त्यावेळी ती त्याला नकार देते. दुसऱ्या दिवशी बातमी येते की नाटकाला गेलेल्या ठिकाणी नकुलने एका बाईवर बलात्कार केलेला असतो. आणि त्याला अटक करण्यात आलेली असते. ते ऐकून लक्ष्मी सुटकेचा निःश्वास टाकते पण सारे आठवून घामाने ओलाचिब झालेला तिचा देह थरथर कापू लागतो. एकूणच मोहाच्या क्षणाला आवरून तिने घेतलेल्या निर्णया मुळे ती या प्रसंगातून सुखरूप बाहेर पडते. ग्रामीण विधवा स्त्रीच्या जगण्यावर लेखकाने या कथेतून प्रकाश टाकला आहे.

'अपहृत' या कथेतील सुनिता तिन्हीसांजेच्या अंधूक प्रकाशात लायब्ररीमधून येताना चार-पाच काळा बुरखाधारी माणसे गाडीतून उतरतात आणि तिला पळवून नेतात. स्थानिक राजकारणाच्या गुंत्यामधून तिचे अपहरण केले जाते. ती नऊ दिवस अतिरेक्यां सोबत असते पण त्या अतिरेक्यांनी तिचा छळ केलेला नसतो. उलट त्यांनी तिची एका बहिणी सारखी काळजी घेतलेली असते. त्या अतिरेक्यांना केवळ आपला साथीदार परत मिळवण्याशी मतलब असतो. नऊ दिवसानंतर तिला तिच्या कुटुंबीयांकडे सुपूर्त केले जाते. नऊ दिवस अपहरणकर्त्यांच्या सहवासात असल्यामुळे तिचा नवरा समीर तिच्या चारित्र्याविषयी शंका घेतो. पौराणिक संदर्भ बघता असाच प्रश्न माता सीतेला ही विचारण्यात आला होता. त्याच प्रकारे आधुनिक स्त्रीवर देखील हा प्रश्न उपस्तिथ केला गेलेला आहे. अशा वेळी एका स्त्रीची झालेली भावनिक घालमेल या कथेतून व्यक्त झाली आहे. सुनीताने प्रेम विवाह केलेला असतो. तिच्या नवऱ्याकडे तिच्यावर उपस्तिथ झालेल्या शंकेमुळे तिचे डोळे उघडले जातात. इतकी वर्षी ती एका आभासिक वातावरणात जगत होती हे तिला कळून येते व सत्यतेची तिला जाणीव होते. पैसा, श्रीमंती, प्रतिष्ठा या पेक्षा माणुसकीचे महत्व जाणणारी सुनीता अशावेळी नवऱ्या पासून वेगळे होऊन घटस्फोट घेण्याच्या निर्णयावर पोहोचते. त्यानंतर तिचा मित्र किरण तिच्याकडे आपल्याशी लग्न करण्याची मागणी घालतो. त्यावेळी पुनः तिच्या मनात तोच विचार येऊन जातो की आपण ज्या व्यक्तीवर प्रेम केले तो आपल्याला समजू शकला नाही तिथे पुढे किरण ही तिला कसा समजू शकेल. शेवटी कोर्टा समोर थांबलेल्या अतिरेक्यांची गाडीकडे बघून ती विचार करते. अतिरेकी असले तरीही ते समाजासाठी जगत असतात त्याच प्रमाणे स्वतःला स्वतंत्र जगायचे असल्याचा निर्णय घेते.

'चंवर' या कथेतील शेवतू हे ग्रामीण जीवनातील स्त्रीचे दुःख मांडणारी कथा आहे. शेवतुचे लग्न एका भोळ्या भाबड्या तरुणाशी तिच्या घरच्यांनी लावून दिले होते. खरंतर शेवतुचे फसवणूक झालेली असते. तीच ज्या मुलाशी लग्न झालेले असते त्याच्या विषयी तिला काहीच माहिति नसते. दोन पैसे कमाविण्याची अक्कलही त्याला नसते. लग्न झाल्यावर तिला आपला नवरा वेंधळा असल्याचे कळते त्यावेळी ती कावरीबावरी होते. एका वेंधळया माणसाशी पूर्ण आयुष्य कसं काढायचं या चिंतेत ती पडते. अश्यावेळी मोठ्या मनाने ती त्याला स्वीकारते व त्याला सुधरविण्याच्या प्रयत्नात लागते. पुढेजावून आपला संसार चालविण्यासाठी ती स्वतः घराबाहेर पडते. भाटकारांच्या शेतात कष्टाचे काम करून घराची जबाबदारी पेलते. त्यात भर म्हणून पुढे काही महिन्यातच ती गरोदर राहते. पहिल्या मुलां नंतर एका वर्षांतच तिला परत दिवस जातात. घरच्या हालाकीच्या परिस्तिथीमुळे शेवतुला खरंतर आणखीन मुलांना जन्माला घालण्याची इच्छा नव्हती. पण दरवळी मोहाला क्षणाला बळी पडत होती. त्यांच्या अश्या या वागणुकीमुळे गावातील लोकांमध्ये चुळबुळ सुरु झाली होती. सुखाने दोन वेळचे जेवण मिळविणे कठीण असलेल्या शेवतूला दरवेळेची बाळंतपण कशी काय झेपतात. शेवतु खरंतर आपल्या मनाला आवर घालण्याचा प्रयत्न करत होती पण तिच्या नवऱ्यामुळे तिला शेजाऱ्या पाजाऱ्यांकडून ऐकून घ्यावं लागत होते. ज्यावेळी शेवतु लोकांचे ऐकून आपल्या नवऱ्याला जबरदस्तीने घरातून बाहेर काम करण्यासाठी पाठवण्याचा प्रयत्न करते त्यावेळी तिचा नवरा घर सोडून पळून जातो. त्यानंतर शेवतु एकटी पडते. पण ती हार मानत नाही आपल्या मुलांच्या भविष्यासाठी मिळेल तेथे काम करते व आपल्या संसाराचा गाडा चालवण्याचा प्रयत्न करते. शेवतु या व्यक्तिरेखेतून एकंदरीत एका संवेदनशील, कणखर, परिस्तिथीला झुंझ देणाऱ्या ग्रामीण स्त्रीचे चित्रण लेखक करतात.

'कॅथरीन' या कथेत एका ग्रामीण ख्रिस्ती स्त्रीचा संघर्षमय जीवन पट लेखकाने चित्रित केला आहे. कॅथरीनचं जॉकी नावाच्या व्यक्तीशी लग्न झालेलं असतं. जॉकी हा पूर्णपणे दारूच्या व्यसनात बुडालेला माणूस असतो. लग्न झाल्या नंतर जॉकी कॅथरीनला त्रास करू लागतो. तो तिचा शारीरिक तसाच मानसिक छळ करू लागतो. कॅथरीन आपल्या संसाराचा गाडा चालविण्यासाठी ताव्हेर्न चालवत असते. त्या ताव्हेर्नात तिला विजय या माणसाची भेट होते. त्या दोघांत मैत्री होते. काळानुसार कॅथरीनच्या मनात विजय विषयी मैत्री पलीकडील अव्यक्त अशी भावना निमार्ण होते. मात्र ती या प्रसंगी स्वतःला त्या परिस्तिथीत झोकून न देता स्वतःच्या भावनांना आवर घालते. विजयची गोव्यातून बदली गुंदुरला झालेली असते. हे ऐकताच ती गोंधळते, निराश होते कारण विजय तिला मनापासून आवडत असतो. विजयचा तिला आधार असतो. एके रात्री कॅथरीन

व जॉकी ह्या दोघात बरच मोठं भांडण होतं. जॉकी दारूच्या नशेत कॅथरीनला अपशब्द देतो, तिला मारहाण करतो. तोच प्रसंग कॅथरीनच्या सहनशीलतेचा अंत ठरतो व ती विजय सोबत गुंदूरला जायचे ठरविते. आपला संसार उध्वस्त होण्यापासून वाचविण्यासाठी एखादी स्त्री तंतोतंत प्रयत्न करत असते. कॅथरीनच्या माध्यमातून एखाद्या कष्टकरू स्त्रीचे चित्रण लेखकाने केले आहे. या कथेत चित्रित झालेली स्त्री ही परिस्तिथीना सामोरे जाणारी आहे. पण ज्यावेळी तिच्या सहनशीलतेचा अंत होतो त्यावेळी मात्र ती परिस्तिथीपासून पळ काढते.

'गोल चेहेऱ्याचा तरुण' या कथेत देवदासी समाजातील स्त्रियांचे खडतर जीवनाचे चित्रण लेखकाने केले आहे. या कथेत रघुनाथ कुलकर्णी हा एका वेश्यांच्या वस्थित आपल्या रिसर्रच संदर्भात काही प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी गेलेला असतो. तेथे त्याची भेट शारदा या स्त्रीशी होते. ज्यावेळी रघुनाथ तिच्या कडून माहिती गोळा करण्याचा प्रयत्न करू लागतो त्यावेळी त्याला अनेक गोष्टींचा उलगडा होतो. शारदा ही बेलूर गावाची राहणारी असते. तिची आई दिवसाची देवळात देवदासीच काम करायची व रात्री पोट भरण्यासाठी वेश्या व्यवसायाचा धंदा करायची. ज्यावेळी शारदा वयात आली त्यावेळी तिच्या आईच्या गिरहिकांची नजर शारदावर पडली आणि पुढे शारदानेही या धंद्यात बस्थान मांडले. देवदासी हि खरंतर देवाची सेवा करणारी स्त्री असते. पण स्वतःच घर चालविण्याकरिता त्यांना परपुरुषाशी शारीरिक संबंध ठेवावे लागतात. पांढरपेशा समाजाची दूषित दृष्टी या स्त्रियांवर टिकलेली असते. देवदासींना वेश्येच्या समांतर मानले जाते. त्याचप्रमाणे शारदा ही या परंपरेचा भाग बनलेली असते. शारदाला वास्तवाचे भान असते. शारदा ही देह विक्री करून स्वतःचे पोट भरत असते. ती जरी वेश्या व्यवसाय करत असली तरीही तिची वृत्ती ही कष्टाने पैसे कमाविण्याची असते. रघुनाथ ज्यावेळी तिला पैशांचे अमिश दाखवून आपल्या प्रश्नांची उत्तरे मिळविण्याचा प्रयत्न करतो त्यावेळी शारदा त्याला,

"नाय-नाय आमी फुकटचे पैसे घेत नाय..."(गोल चेहऱ्याचा तरुण, १७)

असं म्हणून नकार देते. या वरून तिच्या निर्मळ मनाचे प्रत्यय आपणास येतात. शारदावर  खरंतर अनेक वाईट प्रसंग या धंद्यामुळे ओढवले जात असतात पण त्यांना सामोरे जाण्या शिवाय तिच्याकडे मार्ग मोकळा नसतो. याची कबुली तिच्याच तोंडून निघणाऱ्या काही उद्गारांतून आपणाला समजते.

'घुसमट' या कथेत ज्युलीच्या मानसिक कोंडमाऱ्याचे चित्रण लेखकाने केलेले आहे. तिचा नवरा जॉन पाच वर्षे अर्धांगवायूमुळे अंथरुणाला खिळून असतो. त्यामुळे ज्युलीला अत्यंत खडतर अनुभवांतून जावे

लागते. अशा वेळी ॲन ही तिची बहीण तिला भरभक्कम आधार देते. मूलतः सेवावृत्तीची सवय असलेली ॲन जॉनची सर्वतोपरी काळजी घेते. पण तोच ज्युलीच्या काळजीचा विषय होतो. असहाय स्थितीतदेखील जॉन आणि ॲन यांच्यामध्ये नाजूक भावबंध निर्माण झाले आहेत, असा ज्युलीला दाट संशय येतो आणि तो खरा वाटावा असे त्या दोघांचे वर्तन असते. मानवी प्रमादशीलतेचे मनोविश्लेणात्मक चित्रण या कथेत परिणामकारकतेने केलेले आहे. ज्युली हा सगळा वृत्तान्त आपल्या जिवलग मैत्रिणीला सांगत असताना ॲन ते सारे ऐकते आणि मुकाट्याने बहिणीच्या घराचा निरोप घेते.

'सोबत' या कथेत नकुल या वाह्यात तरुणाच्या वर्तनाचे चित्रण केलेले आहे. एक निराधार विधवा बाई आपला कोसळलेला संसार सावरीत असताना बुभुक्षित नजरेने तिला हेरून आपल्या जाळ्यात पकडण्याचा तो प्रयत्न करतो तो लक्ष्मीला रात्रीच्या वेळी सायकलवर बसवून नेतो. पण त्याचा हेतू शुद्ध नसतो. सुरुवातीला असहाय स्थितीत तिलाही या बाबीचा आधार वाटतो. तीही थोडीफार त्याच्यात गुंतत जाते. या गोष्टीकडे हॉटेलमधील सदाभटापासून गावातील शेजारीपाजारी बायका कुत्सितपणे पाहतात. कर्त्यासवरत्या पुरुषाच्या जाण्यानंतर एखाद्या विधवा बाईच्या वाट्याला ज्या यातना येतात त्या लक्ष्मीलाही सोसाव्या लागतात. नकुल तिला रात्रीच्या वेळी नाटकाला बोलावतो तेव्हा ती सक्त विरोध करते. कथेच्या शेवटी नकुलला एका बाईवर बलात्कार केल्याच्या आरोपावरून पोलिसांनी अटक केलेली असते. ते ऐकून लक्ष्मी सुटकेचा निःश्वास टाकते खरी; पण सारे आठवून घामाने ओलाचिंब झालेला तिचा देह थरथर कापू लागतो.

'अपहृत' या कथेतील नायिका सुनिता तिन्हीसांजेच्या अंधूक प्रकाशात लायब्ररीमधून येताना चार-पाच काळा बुरखाधारी माणसे गाडीतून उतरतात आणि तिला पळवून नेतात. स्थानिक राजकारणाच्या गुंत्यामधून तिचे अपहरण केले जाते. पण तिचा छळवाद केलेला नसतो. पण नऊ दिवस अपहरणकर्त्यांच्या सहवासात असल्यामुळे तिचा नवरा समीर तिच्या चारित्र्याविषयी शंका घेतो. स्त्री चरित्रावर क्षणो क्षणी घेतलेल्या संशयामुळे तिची होणारी मानसिक कोंडीचे चित्रण या कथेतून घडते.

'गर्भजल' या कथेत शिक्षित व अशिक्षित अशा दोन स्थरांवरच्या स्त्रीमनाचा वेध घेण्यात आला आहे. एकाबाजूने शहरी जीवन जगणारी, सुशिक्षित घराण्यातील रेडियॉलॉजीस्ट डॉक्टर आहे. तर, दुसऱ्या बाजूने झोपडपट्टीत राहणारी शांतव्वा आहे. शांतव्वा ही दारिद्र्यात जगणारी स्त्री असते. तिला पाच मुली असतात. तिच्या नवऱ्याला वंशाचा दिवा पाहिजे असतो. म्हणून तो तिच्यावर बाळंतपणे लादत असतो. सहाव्या वेळी

मुलगी झाली तर दुसरे लग्न करण्याची धमकी तिचा नवरा तिला देतो. अशावेळी शांतव्वाची होणारी मानसिक कोंडी लेखक चित्रित करतो. एका वेळी तिने मुलगी आहे हे कळल्यास गर्भपातही केलेला असतो. ती आपल्या नवऱ्याची समजूत घालण्याचा प्रयत्न देखील करते पण पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रीची होणारी कुचंबणा शांतव्वाच्या माध्यमातून येथे चित्रित करतात.

या कथेतील रेडियॉलॉजीस्ट डॉक्टर ही आधुनिक जगातली स्त्री आहे. ती सुशिक्षित, शहरी जीवन जगणारी आहे. तिला एक पाच वर्षांची मुलगी असते. लग्नानंतर पहिल्या बाळंतपणा नंतर आणखीन मुल नको असा निर्णय तिने घेतलेला असतो. एक डॉक्टर असल्या कारणाने फॅमिली प्लॅनिंगचे महत्व तिला माहित असते.  पण तिचा नवरा पाच वर्षानंतर  तिच्याकडे दुसऱ्या मुलाचा हट्ट धरतो. नवऱ्याच्या मनाविद्ध जाणे एका स्त्रीला पूर्वीही कठीण होते आणि तसेच आताही आहे. तीची व तिच्या नवऱ्यांची शांतव्वा संदर्भात अधून मधून चर्चा होत असे. अशा वेळी त्याने शांतव्वाच्या नवऱ्याच्या मानसिकतेचे समर्थन करणे तिला पटत नव्हते. त्याने मुलीच्या द्वारे दुसरं होणारे बाळ हे मुलगा असण्याची अपेक्षा करणे. आणि शेवटी सोनोग्राफी करून घेण्याचा त्याने विचार प्रकट करणे. या सर्व गोष्टीतून एक स्त्री म्हणून तिच्या मनाची घालमेल येथे स्पष्ट होते. आपल्या सुशिक्षित नवाऱ्याकडूनही सोनोग्राफी करून लिंग चाचणी करण्याच्या गोष्टीने तिच्या मनात अनेक प्रश्न उपस्तीत होतात. शांतव्वा आणि आपल्यात फरक तरी काय राहिला याची जाणीव तिला होते. अशा प्रकारे स्त्रीमनाचा वेध घेणारी ही कथा ठरते.

'पेजेला देईल...' या कथेत एका देवदासी 'ति'चे चित्रण आले आहे. देवदासी ही देवाची सेवा करणारी, देवाच्या कामासाठी स्वतःला वाहून घेतलेल्या स्त्रीला देवदासी म्हटले जाते. पण काळानुसार त्यात अनेक अनैतिकतेचे घटक जुळत गेले व या प्रथेचा अनर्थ होऊ लागला. या देवदासींना स्वतःचा संसार चालवण्यासाठी प्रतिष्टीत लोकांशी लैंगिक संबंध ठेवावे लागले. गावातील प्रतिष्ठित लोकांची तिच्याकडे केवळ भोगावयाची गोष्ट म्हणून बघितले जाऊ लागले. या देवदासी प्रथेत देवदासीच्या मुलींकडे देवदासीच म्हणून बघितले जाते. आणि देवदासींचे जीवन हे पेजेला देईल त्याला शेजेला घेईन अशा प्रकारचे असते हेच या कथेतून व्यक्त झाले आहे.

अलका ही एका देवदासींणीची मुलगी असते. देवळातील पुरोहित हा अलकाच्या आईचा हितचिंतक होता. त्याने कधीही तिला एका देवदासीची वागणूक दिलेली नसते. उलट त्याने अनेक प्रसंगी तिला मदत

केलेली असते. त्यांची दोघांची मुले बरोबरच वाढलेली असतात. पुरोहिताचा मुलगा हा पुढे एक प्रसिद्ध कीर्तनकार म्हणून नावाला येतो. अलका व त्याच्या तारुण्यात प्रेमभावना निर्माण होतात. ती दोघेही लग्न करण्याची स्वप्ने पाहू लागली. पण गावाच्या व्यवस्थेनुसार एक देवदासी व ब्रह्मणांच्यात लग्न करणे अशक्य असते. ज्यावेळी पुरोहिताला या प्रकरणाची चाहूल लागली त्यावेळी त्याने आपल्या मुलाला तिच्यापासून वेगळे करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या विरोधात जाऊन पळून जाण्याचा निर्णय अलका व पुरोहोताच्या मुलाने घेतला पण ऐनवेळी पुरोहिताच्या मुलाने अल्काचा विश्वासघात केला. त्यानंतर पारंपरिक प्रथेनुसार तिच्या आईनंतर अलकाने देवदासीचे जीवन स्वीकारावे अशी पूर्ण गावाची इच्छा होती. पण तिने ती स्वीकारली नाही. त्या प्रसंगा गावातल्या सगळयांची ती चेष्टेचा विषय बनली, तिच्याकडे जो तो माणूस हिणकस नजरेने बघायचा, तिची मस्करी करायचा, तिचा उपभोग घेण्याचा प्रयत्नही झाला. तिच्या आईच्या निधनानंतर तिने तो गाव सोडण्याचा निर्णय घेतला व तीने दुसऱ्या गावात आपले बस्थान मांडले. आईच्या निधनानंतर आई सारखेच तिनेही लग्न केले नाही व ती देवदासीचे जीवन जगू लागली. ज्यावेळी ती पुन्हा आपल्या पूर्वीच्या प्रियकराला किर्तनकाराला भेटली त्यावेळी त्याने तिच्याशी लग्न करण्याची इच्छा व्यक्त केली पण आता अलकाने स्वतःला पुरुषांची शारीरिक भूक भागवणारी एक स्त्री म्हणून स्वीकारलेले असते. एका देवदासीचे खडतर जीवन व पारंपरिक प्रथा परंपरेकडे एका विशिष्ट पद्धतीने बघण्याच्या दृष्टीकोणामुळे एका स्त्रीवर होणाऱ्या मानसिक आघाताचे चित्रण लेखकाने येथे केले आहे.

'सौभाग्य' या कथेतही नितुच्या माध्यमातून एका देवदासीच्या आयुष्यात घडणाऱ्या अनेक कठीण परिस्तिथीचे चित्रण लेखकाने येथे केले आहे. माधव भाटकार व नितु यांचे एकमेकांवर खूप वर्षांपासून प्रेम असते. नितु ही देवदासी असते. पुढे माधव भटकारांचे लग्न ठरवण्यात येते. त्यावेळी नितु त्याला किंचितही विरोध न करता त्या परिस्तिथीचा स्वीकार करते व त्याच्या लग्नात वावरते. त्याच्या पत्नीशी देखील चांगले जुळवून घेते. लग्न होऊन पहिल्या मुलानंतर मात्र माधव आपले घर सोडून नितुकडे राहू लागतो. माधव नितुत इतका गुंतून जातो की नितुला त्याला त्याच्या पत्नीची, मुलांची आठवण करून द्यावी लागते. पुढे मधवच्या म्हातारपणी त्याचा मुलगा त्याला आपल्या घरी घेऊन जाण्याचा आग्रह करतो व त्याला घेऊन निघून जातो. त्यानंतर आपल्या सौभाग्याच्या आठवणींनी व्याकुळ झालेल्या एका देवदासीची मानसिक घालमेल या कथेत चित्रित झाली आहे. माधवचे व नितुचे लग्न झालेले नसते पण देवदासी असून माधवने नितुला सौभाग्य अनुभवण्याचे सुख दिलेले असते.

म्हातारपणात मात्र माधव आपल्या मुलाच्या खांद्याचा आसरा घेत नितुच्या घरातून बाहेर पडतो कारण एका पुरुषाला अंतिम क्षणांच्या वेळी आपले हक्काचे घर लागते, शेवटच्या क्षणी तोंडात पाणी घालायला पुत्र लागतो व काळजी घ्यायला स्वतःची धर्मपत्नी लागते. त्या व्यतिरिक्त इतर सर्व माणसे त्याला परकी वाटतात. अशा वेळी नितु देवदासीची झालेली भावनिक मानसिक घालमेल गावसांनी सूक्ष्मपणे या कथेतून चित्रित केली आहे.

'मद' या कथेत परंपरागत भाटकारांची भाटे सांभाळणारा कष्टकरी समाज या कथेत चित्रित झाला आहे. या कथेत आलेला धाकू हा भटकाराच्या सेवेस तत्पर असतो. भटकाराची वाईट नजर कुलवाड्याच्या बायकोवर असते. भाट पाडण्याच्या वेळी भाटकार त्याच्या घरात वास्तव करतो त्यावेळी तो तिच्या बायकोचा शारीरिक उपभोग घेतो. धाकू भाटकाराच्या भटाची काळजी घेत शेवटी स्वतःच्या बायकोला भाटकाराच्या स्वाधीन करतो. स्वतःच्या बायकोचा उपभोग घेणाऱ्या भाटकाराकडे तो दुर्लक्षित करतो. भाटकाराच्या शारीरिक संबंधांतून धाकुची बायको एका मुलीला जन्म देते. मुलगी सतरा वर्षांची झाल्यावर त्या कोवळया मुलीवर भाटकाराची नजर पडते व तिला तो आपल्या वासनेच्या पोटी बळी पडण्याचा प्रयत्न करतो. पण मुकाट्याने अत्याचार सहन करणारी धाकुची बायको भटकाराचा माज जीरवतो. इथे आलेली ग्रामीण स्त्री ही अत्याचार सहन करते त्याच प्रमाणे बंडखोर ही बनते याचे प्रत्ययकारी चित्रण लेखकाने या कथेत केले आहे.

'घुसमट', 'सोबत' आणि 'अपहृत' या वेगवेगळया स्तरांवरील स्त्रीच्या वाट्याला येणाऱ्या दुःख-व्यथांच्या कथा आहेत. सध्याच्या सामाजिक जीवनात संसाराचा भार सांभाळण्यासाठी, आपला आर्थिक स्तर सुधारण्यासाठी स्त्रीला नोकरी-व्यवसायासाठी बाहेर पडावे लागते. कार्यालयात, कारखान्यात व इतरत्रं तिला पुरुषांबरोबर काम करावे लागते. या स्त्री-पुरुष संपर्कामुळे समाजात नव्या समस्या निर्माण झालेल्या आहेत. पुरुषांच्या वासनायुक्त नजरा स्त्रियांकडे वळत असतात. विशिष्ट प्रकारचे कौटुंबिक वातावरयण, समाजव्यवस्था आणि परिस्थितीजन्य कारणे यांमुळे स्त्रीला अशा प्रकारच्या यातनाचक्रातून जावे लागते याचे चित्रण या कथांतून झाले आहे.

**समारोप**

विठ्ठल गावसांच्या कथा अभ्यासताना त्यांच्या कथेतील व्यक्तिरेखा ह्या विविध स्वरूपांच्या दिसून येतात. कधी त्या व्यक्तिरेखा जीवनाबद्दल विचार करणाऱ्या दिसतात तर केव्हा सांसारिक अडीअडचणीत

सापडल्यामुळे त्रस्त झालेल्या आढळतात. नात्यागोत्यांच्या बंधनात अडकल्यामुळे स्वतःचे आयुष्य वाहून घेऊन, भावना मारून, मन मारून जगताना दिसून येतात. आपले दुःख मनात ठेवून 'कुढत' जगताना दिसतात. आर्थिक शोषण आणि दारिद्र्यात असल्यामुळे मूलभूत गरजांच्या पूर्ततेसाठी वणवण रोजंदारीसाठी भटकताना आढळतात. एवढे अपरंपार दुःख सहन करूनदेखील कधीकधी पुरुषी वासनांध मनोवृत्ती त्यांचा गिधाडी हल्ला सहन करणाऱ्या स्त्री व्यक्तिरेखादेखील दिसून येतात. त्यामुळे त्यांच्या कथेतील काही व्यक्तिरेखा शारीरिक भूक भागवण्यासाठी वासनेने वखवखलेल्या दिसून येतात.

## निष्कर्ष

१. विठ्ठल गावसांच्या कथांमधून ग्रामीण स्त्री व ग्रामीण पुरुष व्यक्तिरेखांचे चित्रण प्रामुख्याने झाले आहे.
२. कथेतून चित्रित झालेल्या ग्रामीण पुरुष व्यक्तिरेखा या संवेदनशील, कष्टाळू, समंजसपणे जीवन जगणाऱ्या आहेत.
३. कथेत चित्रित झालेल्या ग्रामीण व्यक्तिरेखा पारंपारिक जीवन जगणाऱ्या आहेत.
४. काही व्यक्तिरेखा या स्वतःला आधुनिक जीवनाशी जुळवून घेवू पाहणाऱ्या आहेत.
५. कथेतून चित्रित झालेल्या स्त्रिया पुरुषांच्या अतृप्त वासनांना बळी पडलेल्या आहेत.
६. विठ्ठल गावसांच्या कथेतून ग्रामीण स्त्री संवेदनांचे चित्रण झाले आहे.
७. विठ्ठल गावसांच्या कथेतील स्त्री ही शोषिक त्याचप्रमाणे बंडखोरही आहे.
८. ग्रामीण स्त्री व्यक्तीरेखाटनातून स्त्री सुलभ मनाचा वेध घेण्यात आला आहे.

# प्रकरण ५

# विठ्ठल गावस यांच्या कथांचे वाड्मयीन मूल्यमापन

# कथासंग्रहांचे वाङ्मयीन मूल्यमापन

## प्रस्तावना

विठ्ठल गावस यांच्या कथा आशयाच्या अंगाने जशी वेगळी आहे तशी ती अभिव्यक्तीच्या अंगाने वेगळी आहे असे दिसून येते. त्यांच्या कथालेखनातील निवेदपद्धती, भाषाशैली, वातावरण निर्मिती, त्यांच्या कथांतून त्यांनी केलेले जीवन भाष्य या सर्व घटकांनी युक्त असणारे विविध पैलू लक्षात घेवून प्रस्तुत प्रकरणात त्यांचा अभ्यास करण्यात आला आहे.

## ५.१ निवेदन

निवेदन हा कथेतील महत्त्वाचा घटक असतो. कथा लेखक आपले अनुभव व्यक्त करण्यासाठी निवेदकाचे सहाय्य घेत असतो. कथन, वर्णन, भाषा, संवादरचना या महत्त्वाच्या घटकांद्वारे निवेदन आकारास येत असते. कथेतील पात्ररेखाटन, घटनाप्रसंग, वातावरण, प्रसंगचित्रण यांची निर्मिती निवेदनाद्वारेच होत असते. सुटे-सुटे असणारे प्रसंग निवेदनातून कथेत एकत्रित बांधले जातात. निवेदक हा घटनाप्रसंग, व्यक्तिवर्णन, वातावरण यांचे निवेदन करीत असतो. एकंदरीत निवेदन हा कथेतील घटकांचा दुवा ठरत असते. यातूनच निवेदनाला जिवंतपणा येतो. निवेदनाच्या प्रमुख दोन पद्धती आहेत. पहिली निवेदन पद्धती 'प्रथम पुरुषी निवेदन' व दुसरी 'तृतीय पुरुषी निवेदन' या नावाने ओळखली जाते. कथेमधील निवेदक हा कधी पात्र-प्रसंगांचे वर्णन कथन करतो, तर कधी प्रसंगांचे नाट्यात्म दर्शन घडवितो. कथेतील सर्व घटकांचा तपशील मांडण्यापासून कथेची विशिष्ट मांडणी करण्यापर्यंतचे कार्य निवेदन हा घटक करीत असतो.

विठ्ठल गावसांनी कथालेखनासाठी एखाददुसऱ्या कथेसाठी प्रथम पुरुषी तर प्रामुख्याने तृतीय पुरुषी निवेदन पद्धतीचा वापर केलेला आहे. या निवेदन पध्दतीमध्ये निवेदक हा पात्रांविषयी, घटनांविषयी सर्वज्ञ असतो तर काही वेळा तो सर्वसामान्याप्रमाणे निरिक्षक असतो. तटस्थपणे बाह्य आणि आंतरिक चित्रण करणारा निवेदक हा तृतीयपुरूषी निवेदक असतो.

### ५.१.१ प्रथम पुरुषी निवेदन

'अदेशी' या कथेतून प्रथम पुरूषी 'मी' चे निवेदन येते. या कथेमधील नायक 'मी' चा अनुभव कथन करतांना दिसतो. या कथेत दोन मित्रांचे चित्रण झालेले आहे. त्यातील एक मित्र हा 'स्व' चा उल्लेख करताना या कथेत येतो. तो स्वतः आपल्या मित्रा विषयीच्या प्रसंगांचे चित्रण या कथेत करतो.

उदा. "आंतोन आणि मी बालपाणाचे मित्र... वार्का आमचा जन्मगाव... बालपणापासून आम्ही एकत्र वाढलो, खेळलो, खूप मजा केली. माझे वडील मी लहान असतानाच वारले, त्यामुळे शिक्षणासाठी माझ्या मामाच्या गावी सावर्डेला जावे लागले. माझे प्राथमिक शिक्षण सावर्डेतील सरकारी मराठी माध्यमाच्या शाळेत झाले. तर आंतोन वार्का गावातील कॉन्व्हेंटमध्ये शिकला. पुढे कॉलेजला मडगावमध्ये आम्ही पुन्हा एकत्र आलो."(अदेशी, १०६)

अशाप्रकारे प्रथम पुरूषी प्रमुख पात्र असणाऱ्या व्यक्तिरेखांचे निवेदन 'मी' च्या संदर्भाने येते.

### ५.१.२ तृतीय पुरुषी निवेदन

'ओझे' या कथासंग्रहातील 'देऊळ' या कथेतला नायक कथेतल्या सर्व घटना, प्रसंग आणि संवादाना साक्षी आहे. या कथेतील नाना जोशी हा त्याच्या सोसायटीच्या बाजूला घडणाऱ्या घडामोडींचा साक्षी आहे आणि त्यातून त्याच्या 'स्व' अनुभवांची मांडणी या कथेत आलेली आहे. कथेचे निवेदन त्रयस्थपणे लेखकाने केले असले तरी कथेचा नायक सर्व घटनांना साक्षी आहे.

‘गोल चेहऱ्याचा तरुण’ या कथेत लेखकाने तृतीय पुरुषी निवेदनाचा वापर केला असून रघुनाथ कुलकर्णी हा या कथेत घडणाऱ्या घडामोडींचा प्रत्यक्ष साक्षीदार आहे. या कथेत आलेल्या वेश्या वस्तीचे निरीक्षण लेखक निवेदनातून करत असले तरीही कथेत चित्रित झालेल्या प्रसंगांना रघुनाथ हा सर्वज्ञ आणि सर्वसाक्षी आहे. रघुनाथची शारदा विषयीचे आकर्षण, काळजी आणि त्याची संवेदनशीलता ही तृतीय पुरुषी निवेदनातून या कथेत आलेली आहे.

उदा. "तो तरुण त्या बंद दरवाजाकडे पाहत राहिला. आता त्याला त्या वस्तीतून बाहेर पडावसं वाटेना. तो तेथेच रेंगाळू लागला. त्याच्या कानात त्या पोरीचं लाघवी बोलणं घुमू लागलं. खळखळून हसणारा तिचा चेहरा दिसू लागला. तिची तारुण्याने बहरलेली नाजूक रेखीव देहयष्टी आकृष्ट करू लागली पदर खाली टाकून विशिष्ट पोझमध्ये बसलेली तिची आकृती कुठल्यातरी जग-प्रसिद्ध शिल्प- कलेची आठवण करून देऊ

लागली. थोडाच वेळ का होईना खेटून बसल्यामुळे तिच्या मांसल मांड्यांचा झालेला मुलायम स्पर्श सारं अंग पेटवू लागला त्याच्या अंगाची रंधनं रंधं पुलकीत झाली, रोमांचित झाली. तिला आपल्या बाहुपाशात घट्ट आवळून कायमचंच ठेवावंसं वाटू लागलं. या धाणेरडया बकाल वस्तीतून तिला बाहेर काढून दूर... दूर जावसं वाटायला लागलं."(गोल चेहऱ्याचा तरुण, १९) राघुनाथच्या मनात शारदा विषयी वाटणारी ही कळवळ कथेच्या निवेदनात तटस्थपणे किंवा त्रयस्थपणे येते.

'फिंगर बाऊल' या कथेत चित्रित झालेल्या वातावरणाची साक्ष खुद्द लेखक निवेदनाच्या माध्यमातून देताना दिसून येतो. उदा. "रविवारचा मास संपला आणि चर्चमधून माणसं गटागटानं बाहेर पडली. रविवारी त्या चर्च परिसरात एखाद्या सणासारखं वातावरण असतं. रंगीबेरंगी कपडे केलेले स्त्री-पुरूष घोळक्या घोळक्यानं एकत्र होऊन एकमेकांशी बोलत असतात. थट्टा-मस्करी करीत असतात. त्यानी लावलेल्या परफ्युमनं तिथलं सारं वातावरण सुगंधित झालेलं असतं, तर तरूण मुलं-मुली आपल्या वेगळ्याच जगात वावरत असतात. लहान मुलं जवळपासच्या दुकानात खाऊसाठी किंवा एखाद्या खेळण्यासाठी आपल्या आई-वडिलांकडे हट्ट करताना दिसत असतात, तर बऱ्याचजणांनी आजूबाजूच्या दुकानात खरेदीसाठी एकच गर्दी केलेली असते..." (फिंगर बाऊल,६३)

'चंवर' या कथेतही तृतीय पुरुषी निवेदनाचा वापर करून लेखकाने नायिकेच्या मनाचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे. शेवतूचा नवरा तिला एकटीला सोडून घर सोडून गेलेला असतो. सहा वर्षा नंतर तो घरी परततो. इतकी वर्षे त्यांच्या काहीच संभाषण झालेले नसते. पण त्याच्या विषयीची शेवतूच्या मनात तरळणारी अव्यक्त काळजी लेखकाने निवेदनाच्या माध्यमातून व्यक्त केलेली आहे.

उदा. "काही खाल्लं असेल का त्यानं...? भुकेला असेल का तो...? मघाशी आपण त्याला विचारायला हवं होतं. ती पटकन अंथरूणावरून उठली. धावतच स्वयंपाकघरात गेली. चुलीपाट्यावरच्या मडकीत डोकावलं पेजेखाली थोडे शितांचे गोटे असल्याचं तिला जाणवलं. तिनं मडकीतले सगळी पेज थाळीत ओतली बुयावातली खारी आमली काढली. पेजेचं ती थाळी आणून त्याच्या पुढ्यात ठेवली. उजेडासाठी पुढ्यात चिमणं ठेवली आणि ती पडवीच्या लाकडी खांबाला टेकून त्याच्या पुढ्यात उभी राहिली." (चंवर, २१) अशा प्रकारे एका स्त्री मनाचा वेध घेणारी निवेदन शैली लेखकाने या कथेत वापरली आहे.

सर्वज्ञ, सर्वसाक्षी, आंतरिक संवेदनासह निवेदन पध्दती बरोबरच केवळ निरिक्षक म्हणूनही काही कथांमध्ये तृतीय पुरूषी निवेदन वापरले जाते. विठ्ठल गावस यांच्या कथेतील केवळ निरिक्षकाची भूमिका निवेदनासाठी वापरलेल्या कथांची उदाहरणे द्यायची झाल्यास 'कॅथरीन' मधील 'निकाला नंतरची गोष्ट' ही कथा. या कथेत आलेल्या नायकाच्या सूक्ष्म हालचाली लेखकाने टिपल्या आहेत. फुटपाथवर राहणाऱ्या गरिबांचे चित्रण या कथेत आलेले आहे. त्याला फुटपाथवरून हाकलले जाते त्यावेळच्या त्यांच्या अवस्थेचे चित्रण लेखक येथे करतो.

उदा. "ती दोघं चालू लागली. तिच्या पोटातून कळा येत होत्या. तरीही ती चालत होती. कुठं जायचं... पुढे काय... काहीच ठरलं नव्हतं... दिशाहीन... अंधाराकडे... की प्रकाशाकडे... अनिश्चित.. तिच्या पोटातून एक जीवघेणी कळ आली. एक आतं किकाळी मारून ती तेथेच बसली तो तिला सावरण्याचा प्रयत्न करू लागला, एवढयात रस्त्यावरील विजेचे दिवे गेले... सर्वत्र काळाकुट्ट अंधार पसरला... दूरवर कुठूनतरी कुत्र्यांच्या भुंकण्याचा आवाज येत होता.."(निकाला नंतरची गोष्ट, ९१)

येथे निवेदक फक्त निरिक्षक आहे. तो सर्वसाक्षी, सर्वज्ञ निवेदकाप्रमाणे  या प्रसंगांचे निवेदन करतो. आवुच्या दुःखद अवस्थे बद्दल त्याला सहानुभूति, दुःख अथवा हळहळ होत नाही फक्त घटनांचा प्रत्यक्ष साक्षी निरिक्षक म्हणून निवेदनाची भूमिका येथे घेतली आहे.

विठ्ठल गावसांच्या कथेमध्ये तृतीय पुरूषी निवेदन त्याचप्रमाणे प्रथम पुरूषी निवेदन पद्धतीचा वापर केला आहे. काही वेळा प्रथमपुरुषी निवेदनात अधून मधून प्रथमपुरुषी निवेदनाची वापर लेखकाने केला आहे. त्यामुळे विठ्ठल गावसांची कथा मराठी साहित्यामध्ये आशय, विषय आणि अभिव्यक्तीच्या दृष्टीने वेगळी ठरते. निवेदनाच्या वेगवेगळया पद्धतींचा वापर केल्यामुळे विठ्ठल गावसांच्या कथांना जिवंतपणा व तठस्तपणा लाभतो.

## ५.२ वातावरण निर्मिती

कथेतील प्रसंग हे विशिष्ट वातावरणात घडत असतात. कथेतील व्यक्तिरेखा कोठे तरी वावरत असतात. कथेला असणारी भौगोलिक, राजकीय, सामाजिक चौकट तसेच स्थलकालाचे अवकाश यालाच 'वातावरण' असे म्हणतात. कथेतील व्यक्ती, व्यक्तीसमूह त्यांच्या भोवती घडणाऱ्या विविध घटना हे सर्व घटक

वेगवेगळे असू शकत नाहीत. या सर्वांना एकत्रित जोडणारा व कथेच्या घडण्यासाठी अवकाश मिळवून देणारा मर्यादित प्रदेश म्हणजे 'वातावरण' होय. पात्रनिर्मितीसाठी वातावरण सहाय्यभूत ठरत असते. कथेचा अपेक्षित परिणाम साधण्यासाठी वातावरण सहाय्यभूत ठरत असते.

विठ्ठल गावसांच्या कथा या गोमंतकीय परिपेक्षात घडणाऱ्या कथा आहेत. त्यांच्या कथा या गोव्यातील वेगवेगळया ठिकाणी घडणाऱ्या आहेत. त्यांच्या कथा ग्रामीण, शहरी, राजकीय स्वरूपाच्या आहेत. गावसांनी वापरलेल्या भाषेमुळे, निसर्गचित्रणामुळे, निवेदनातून या कथासंग्रहातील कथांना आकर्षक वातावरण निर्मिती लाभलेली आहे. ग्रामीण वातावरण असणाऱ्या त्यांच्या काही काही कथा सांगता येतात. 'नांगरणी', 'वादळ', 'गाभ', 'बांध', 'ओझे', 'चंवर' या सारख्या कथांतील वातावरण कथानकाच्या घडणीला पोषक असलेले दिसून येते. 'नांगरणी' या कथेत शेतात नांगरणीचे काम चालू असताना आजूबाजूच्या वातावरणाचे सूक्ष्म चित्रण लेखकाने केले आहे.

"हळूहळू सूर्य माथ्यावर येत होता. आजूबाजूच्या शेतात काम करणारे सारे कामात गुंग होते. बैलांना हाकारण्याचा आवाज चारी बाजूंनी येत होता. नांगराच्या पाठीमागे काम करणाऱ्या बाया गाणी गात गात काम करत होत्या. अंतूचे कान त्या बायांची गाणी ऐकण्यात गुंतले होते." (नांगरणी, १००) या वातावरणात अंतू ही व्यक्ती आपल्या बैलांना नांगरणीसाठी हाकलत असलेले कथेतून दिसून येते.

'वादळ' या कथेतील वातावरण हे ग्रामीण जीवनातील नैसर्गिक ओढवणाऱ्या आपत्तीमुळे एका शेतकऱ्याच्या वाट्याला येणारे दारिद्र्याचे चित्रण करणारी आहे. रवळूची हलाकीची स्थिती ही नैसर्गिक आपत्तीशी निघडीत असते.

"उद्याला तर आपनाला पेरनी करायची हाय... आगुदर ह्या वर्षाला पेरनीला उशीर झालाया... पावस सुरू झाला तोच वादळानं... आपल्या घराचं तर छप्परच उडून गेलंया. सामानाची जमवाजमव करून ते सारखं करीतोवर आठ-दहा दिवस गेलं आणि शेत नांगरायला उशीर झाला." (वादळ,७०)

या वरून एकंदरीत शेतकऱ्यांचे कष्टकरी जीवन, शेतकऱ्याचे दारिद्र्याची स्थिती दिसून येते. 'बांध' या कथेत हिरव्यागार कुळागार असलेल्या शीतल ग्रामीण परिसराचे चित्रण येते.

"विचार करतच नाना कुळागारामध्ये पोचले. त्यांचं ते ऐसपैस पसरलेलं हिरवंकंच... कुळागार... आकाशाला गवसणी घालणारी नारळी-पोफळीची झाडं... त्याच्या खाली असलेलं केळीचं बन... त्याच्या वरच्या बाजूला असलेली आंब्या फणसाची झाडं पाटात वाहणारं खळखळतं नितळ पाणी... "(बांध, ५४) अशा या थंडगार वातावरणाचा आस्वाद घेत नाना मनोमन आपण जोपासलेल्या कुळागराचा विचार करत होते.

'गाभ' या कथेत बदलत्या ग्रामीण वातावरणाचे चित्रण झाले आहे. "आता ह्या असाच जाताला. तो कारखानो दिस-रात्री इकाळो धूर सोडीत आसता न्हूं... जनावरांच्या नाकातोंडान जाता तो. कारखान्याचा सांडपाणी न्हयच्या फाट्यात मिसळता. ताच पाणी जनावरां पितत. मगेर जनावरां गाभ सांडची नाय तर काय जाताला. आणखी काय दिसानी आमच्या बायलाचाय तांच जातालां." (गाभ, १०८) या वातावरणात शोड्डूलो या व्यक्तिरेखेची होणारी मानसिक कोंडीचे चित्रण येथे झाले आहे.

गोमंतकीय नैसर्गिक वातावरणाचे चित्रण करणाऱ्या काही गावसांच्या कथा आहेत. 'हार' या कथेत सत्तरी तालुक्यातील वातावरणाचे चित्रण झाले आहे. "त्यांना पंचवीस वर्षांपूर्वीचा सत्तरी आठवला. जंगलांनी, दऱ्याखोऱ्यांनी व्यापलेल्या सत्तरीतल्या गावात त्या वेळी रस्तेसुद्धा नव्हते. पावसाळ्यात नाले-ओढे दुथडी भरून वाहायचे. एका गावाहून दुसऱ्या गावात जाता येत नव्हतं. आणि एखाद्या वेळी अडचणीमुळे जावं लागलं तर व्हाळावर माडांचे बुंधे टाकून जीव मुठीत धरून त्यावरून हळूहळू जावं लागायचं. छोट्या छोट्या मातीच्या कौलारू घरांची गावं. माडाच्या चुडतांनी शाकारलेले गुरांचे गोठे. सगळेचजण कष्टकरी."(हार, १२५) गोव्यातील निसर्गा बरोबरच तेथील दारिद्र्याचे चित्रण केले आहे.

निमशहरी वातावरणात घडणाऱ्या काही कथा विठ्ठल गावस यांच्या कथांमध्ये आढळतात. 'गोल चेहऱ्याचा तरुण', 'सोबत', 'सांगाती' या कथातुन निमशहरी वातावरण विशेषरूपाने चित्रित होते. शहराच्या संसर्गाने शहरालगतचे वातावरण धड शहरीही ठरत नाही व ग्रामीणही ठरत नाही. झोपडपट्ट्या, बाजारपेठ, धाबे, दारू दुकाने, दारिद्र्य, गुन्हेगारी यांनी व्यापलेला असा हा प्रदेश. 'गोल चेहऱ्याचा तरुण' या कथेतील वातावरण वेश्याव्यवसायाचे स्वरूप लक्षात आणून देते. वेश्या व्यवसाय चालणाऱ्या बकाल वस्त्यांचे चित्रण या कथेत येते.

"आतल्या बाजूच्या कोपऱ्यावर रंगीबेरंगी कपडे केलेल्या सहा-सात पोरींचा घोळका उभा होता. उगाच हवेत हातवारे करीत त्या पोरी येणाऱ्या जाणाऱ्यांचे लक्ष आपल्याकडे वेधण्याचा प्रयत्न करीत होत्या. एखादा तरुण

त्यांच्या दिशेने येत असल्याचे दिसताच त्यांना हातवायऱ्यांचा वेग वाढत होता." (गोल चेहऱ्याचा तरुण, ११) वेश्या व्यवसाय करणाऱ्या वस्तीचे वास्तवदर्शी वातावरण विठ्ठल गावस शब्दबद्ध करतात.

'सोबत' या कथेत बाजारात चालणाऱ्या संध्याकाळच्या वातावरण गावसांनी टिपलेले आहे. "जसाजसा अंधार पडू लागला, तसतशी त्या बाजारातील गर्दी हळूहळू कमी होऊ लागली. सकाळपासून गिऱ्हाईकांशी हुज्जत घालता घालता दमून गेलेल्या त्या बाया आपलं सामान आवरू लागल्या. आता त्या सर्वांना घराची ओढ लागली होती. केव्हा एकदा घरी पोहचेन असं झालं होतं. त्यामुळे त्यांचं एकमेकींशी बोलणंही बंद झालं होतं." (सोबत, १६)

'सांगाती' या कथेत रात्रीच्यावेळी दारूच्या दुकानांकडे वळणाऱ्या पावलांचे वर्णन झाले आहे. "फेरीबोटची शेवटची फेरी होईपर्यंत ती गल्ल्यावर बसून गि-हाईकाची वाट पहात बसत होती, फेरीबोटीत नेहमीच्या गि-हाईकांसोबत दोन-तीन तरी नवीन गि-हाईक असतात, घोटभर दारू घशाखाली उतरवून ती घरच्या वाटेला लागतात हे तिला नेहमीच्या अनुभवानं माहीत झालं होतं. ती लगबगीनं उठली." (सांगाती, १५६) असेच वातावरण कॅथरीन या कथेतही आलेले आहे.

शहरी वातावरणातही काही कथा घडल्याचे दिसून येते 'अपहृत', 'प्रोफेसर बारलिंगे', 'सवाई' या कथांमधून शहरी वातावरण चित्रित होते. शहरी जीवन चित्रण करणाऱ्या कथांमधून फ्लॅट, टॅक्सी, चाळ, बस स्टॉप, ऑफिस, क्लिनिक, रेल्वे या गोष्टींचे चित्रण झाले आहे. 'अपहृत' या कथेत शहरातील धकाधुकीच्या वातावरणाचे चित्रण झाले आहे. "फुटपाथवरून माणसांचे लोंढेच्या लोंढे जात होते. रस्त्यावरून वाहने धावत होती. त्यांचा कर्कश आवाज कानात घुमत होता. रस्त्याच्या बाजूच्या फेरीवाल्यांचा आवाज त्यात मिसळून जात होता. ."(अपहृत, २६)

अशी शहरातील दैनंदिन वातावरण या कथेत चित्रित झाले आहे. असेच वातावरण 'प्रोफेसर बारलिंगे' या कथेत सुद्धा आलेले आहे. "रस्त्यावरून कर्कश आवाज करीत वाहने धावत होती. बाजूच्या फेरीवाल्यांचा, हमालांचा आवाज त्यात मिसळून जात होता. फुटपाथवरून माणसांचे लोंढेच्या लोंढे पुढे सरकत होते. ह्यावेळी शहरातील बहुतेक माणसं घराबाहेर पडत असतात. प्रत्येकाला ऑफिसला जायची घाई असते. त्यामुळे जिकडं-तिकडं माणसंच माणसं दिसत असतात. रस्त्यावर... फुटपाथवर... बस स्टॉपवर... रेल्वे स्टेशनवर... माणसांचा महापूर." (प्रोफेसर बारलिंगे, ५०) असे शहरी वातावरण गावसांनी सूक्ष्मपणे कथेतून उभे केले आहे.

वातावरणाच्या परिणामातून प्रसंगनिर्मिती होत असते. समोर घडलेल्या घटनेचे वर्णन लेखक करत असतो. पात्रांच्या क्रिया-प्रतिक्रियेतून प्रसंगाची निर्मिती होत असते. साहित्यातील प्रसंग वास्तवतेला कल्पकतेचा आधार देऊन चित्रित केले जातात. गावसांच्या कथांमध्ये अनेक प्रसंग जिवंत उभे राहतात. 'सवाई' या कथेतही उठावदार प्रसंगचित्रण आले आहे. "डॉ. कशाळकरांचं आज सकाळी अपहरण करून खून करण्यात आला आहे आणि त्यांच्या कुटुंबियांचा रोहनवर संशय आहे." त्यांचं ते बोलणं ऐकून काही क्षण ती सुन्न झाली. पुढं काय बोलावं तिला काहीच कळेना. सारं जग आपल्याभोवती गरगर फिरत असल्यासारखं वाटू लागलं. आपण जमिनीवर कोसळणार असं वाटू लागलं. त्याही परिस्थितीत तिनं स्वतःला सावरलं आणि शक्य होईल तेवढ्या मोठ्या आवाजात ती ओरडली, "हा साहेब, तोच खुनी आहे. रोहननेच तो खून केला आहे. मी सांगते आहे. साहेब, पकडा त्याला... बेड्या ठोका त्याला... फासावर चढवा त्याला साहेब... या जगात एक क्षणसुद्धा ठेवू नका साहेब त्याला..." म्हणत ती ओक्साबोक्शी रडत राहिली." (सवाई, १५४) एका हताश आईच्या दुःखद प्रसंगाचे चित्रमय रेखाटण गावस या कथेतून रेखाटतात.

'दर्याचा पूत' या कथेत नानुच्या मृत्यूसमयी सूचक अशा वातावरणाची निर्मिती गावसांनी केली आहे. "हळूहळू धोऽऽ ऽ धोऽऽ ऽ पाऊस पडायला सुरूवात झाली. वाऱ्यानेही जोर धरला. किनाऱ्यावरची माडांची, सुरूची झाडे अवसर आलेल्या माणसासारखी मुळापासून घुमू लागली. आकाशात विजा चमकू लागल्या. आणि कानठळ्या फोडणारा गडगडाट होऊ लागला. रात्रभर निसर्गाचं ते तांडव नृत्य सुरूच होते." (दर्याचा पूत, १३)

विठ्ठल गावसांनी कथेद्वारे निर्माण केलेले वातावरण हे वास्तवदर्शी आहे. त्यांच्या कथेतून मानवी जीवनातील भाव भावनांचा आविष्कार हा वातावरण निर्मितीतून अधिक शब्दबद्ध होतो.

## ५.३ भाषाशैली

भाषा ही मानवी जीवनात अतिशय महत्त्वाचे कार्य करते. भाषेशिवाय माणूस जगू शकत नाही. कारण मानवी मनातील भावभावना व विचार प्रगट करण्याचे ते एक महत्त्वाचे साधन असते. लेखकाच्या मनात असलेले विचार साहित्यरूपाने रसिकासमोर साकारले जातात. म्हणून लेखक व वाचक यांमध्ये संदेशवहनाचे कार्य भाषाशैलीमुळे घडते. भाषेबाबत लिहिताना डॉ. भालचंद्र नेमाडे असे म्हणतात की, "खास मानवी अशी

संदेशवहनाची व्यवस्था म्हणजे भाषा होय."[१] म्हणून खरोखरच भाषा ही व्यक्तीव्यक्तीत विचारांची देवाणघेवाण करणारी एक महत्त्वाची संस्था आहे, असे दिसून येते.

साहित्यातील भाषाशैलीमुळे तेथील घटनाप्रसंग व समाजजीवन आपल्या डोळ्यांसमोर जिवंतपणे उभे राहते. विशिष्ट पात्राच्या तोंडून येणारे शब्द त्या त्या प्रादेशिक जाणिवा, बोलीतील आशय, परंपरा, श्रद्धा, संस्कृती चित्रित करत असते. म्हणून भाषा म्हणजे कलाकृतीतील आशयाचा एक अपरिहार्य असा आविष्कार असतो. सामाजिक स्तरानुसार सुशिक्षित-अशिक्षित माणसांच्या बोलण्यातून व्यक्त होणारा आशय भाषेत बांधला जातो. ग्रामीण बोलीभाषा व प्रमाणभाषा या प्रकारांनुसार त्या त्या वेळी साजेशी भाषा साहित्यात वापरली जाते.

विठ्ठल गावस हे गोमंतकीय ग्रामीण माणसांचे जीवन चित्रण करणारे कथाकार आहेत. त्यांची कथा गोमंतकीय 'ग्रामजाणिवा' घेऊन प्रगट होते. त्यांच्या कथेतील संवाद हे अस्सल कोंकणी भाषेत तर, काही कथा पेडणेच्या सारख्या बोलीतुन आलेले आहे. विठ्ठल गावसांनी कथालेखनासाठी साधी, सरळ, सोपी भाषाशैली वापरली आहे. त्यांच्या कथांतून प्रामुख्याने गोव्यातील पेडणे भागात बोलल्या जाणाऱ्या बोली सारख्या बोलीचा वापर झाला आहे. पेडणे हा तालुका गोवा- महाराष्ट्रसीमेवर असलेला भूप्रदेश असल्या कारणाने कोंकणीवर मराठीभाषेचा प्रभाव असलेला दिसून येतो. म्हणून महाराष्ट्रातील वाचकालासुद्धा ही भाषा आपलीशी वाटते.

विठ्ठल गावसांचा 'कॅथरीन' हा पहिलाच कथासंग्रह असल्याने त्यात त्यांनी ख्रिस्ती लोकांच्या गोमंतकीय बोलीचा किंवा गोमंतकीय स्थानिक भाषेचा वापर केलेला दिसून येतो. गोव्यातील ग्रामीण ख्रिस्ती समाज चित्रण करताना त्यांनी प्रामुख्याने या भाषेचा वापर केला आहे. त्यामुळे त्यांच्या कथांना गोमंतकीय वातावरण लाभलेले दिसून येते.

उदा. "कॅथरीन, हाव गोया आयलो. सोरो पीयोक शिकलो. कोकणी उलोक शिकलो, खरोखुरो गोयकार झालो. पुण एक उल्ले."

"कितें तें...?'

"गोयचे तियात्र हावेन पळेले ना. जे एक गोयचे संस्कृतायचे आंग आसा. आयज व्हडले इगर्जेकडे तियात्र आसा. आयज मझो गोयातलो निमाणो दिस या निमाण्या दिसा तू माझ्या सागात तियात्राक येता ?" (कॅथरीन, ४)

पेडणेच्या बोली सारखा वापर लेखकाने प्रामुख्याने अनेक कथेतून केलेला दिसून येतो. सात मैलावर भाषा बदलते याच प्रकारे गोव्यात प्रत्येक तालुक्याची विशिष्ट अशी बोली बनलेली आहे. त्यात पेडणेची बोली ही गोव्यातील लोकांना तशीच महाराष्ट्रातील लोकांना परिचित आहे.

उदा. "मी सांगताय ता आयक. तेका जेवक घालू नाका... घरातल्यान हाकलून लाव. म्हणाचा, गावापासून दूर खय तरी जा... कोणाच्या हॉटेलान ना झाल्या खानावळीत काम करून स्वतःचा तरी पोट भर... तू वगी रवशील तर घरतल्यात भायर पडचो ना तो आणि वर्साक एक एक पोर होत रावताला बघ." (चंवर, ३२)

लेखकाने वापरलेली भाषाशैली ही पेडणेची बोली असल्याचे लेखकाने नमूद केले असले तरीही या भाषेत फरक जाणवतो. 'गावापासून' हा शब्द वरील वाक्यात आलेला आहे जो प्रमाण मराठीतला आहे. ज्याचा संबंध पेडणेच्या बोलीशी येत नाही. यावरून पेडणे सदृश्य भाषेचा वापर त्यांनी केलेला दिसून येतो.

"आपूणच कळतां तां. आदी कितके लोक हायसर येयत. लगीन जातकीच एक एक जण कमी जावंक लागलो. ह्या सगळां बघतय मी."( माज, ६७)

या बोलीत 'ता' चा हेल प्रत्येक शब्द उच्चारत असताना लागतो हे दिसून येते. स्वतःला संबोधताना 'मी' असे संबोधले जाते. एरवी कोंकणी बोलीत 'हाव' असे म्हटले जाते.एकूण कोंकणी व मराठी या भाषेचे मिश्रण होऊन ही बोली तयार झालेले आहे. त्याचा वापर गावसांनी आपल्या कथेत केला आहे. कोंकणी व मराठी भाषेतील म्हणींचा व वाक्प्रचारांचा वापरही या कथांतून झालेला आहे.

"सोरोप नाचत म्हणान गायनोळान नाचाक जायना." ( ओझे, ०५) याचा अर्थ दुसरा करतोय म्हणून आपण केल पाहिजे अस नसते.

"पाण्यात राहून उगाच माशाशी वैर का करायचं?"( ओझे, १८९)

म्हणींचा वापर हा संवाद प्रमाणेच कथेच्या शिर्षकासाठी वापरला आहे. उदा. 'पेजेला देईल....' ही म्हण खरंतर अशी आहे की "पेजेला देईल त्याला शेजेला घेईन." (पेज हा तांदळापासून बनणारा जेवणाचा प्रकार आहे) जो आपले पोट भरेल त्याला आपण शेजारी घेईल अशी ही म्हण एका देवदासीच्या जीवनाशी निघडीत लेखकाने वापरली आहे. घरात पेज शिजवण्यासाठी जो त्यांना मदत करीत त्यालाच त्या आपल्या शेजारी घेत असे. अशा प्रकारे सूचक अर्थाने म्हणींचा वापर गावासांनी आपल्या कथेत केला आहे.

विठ्ठल गावसांच्या काही कथा या अस्सल ग्रामीण भागातील आहेत. या कथांचे निवेदन हे प्रमाण भाषेत करण्यात आले आहे तर त्यात आलेल्या व्यक्तींच्या तोंडी ग्रामीण बोलीचा वापर झालेला आढळतो. त्यामुळे त्या कथांना ग्रामीण वातावरण लाभले आहे. उदा. "सांबाळून रं बाबा, हाता-पायाकडं... नवरात्रीचं दिस... सगळीकडं गवत वाढलंय. जीव-जीवानू कुठं असंल सांगाया येत नाय." (कॅथरीन, ३१)

"दोनपारच्या वेळेला घराबाहेर पडली ती परत आली नाय. या दिसामंदी ती न्हेमीच दोनपारला घराबाहेर जातेया. आज तिला परतायला येळ झाला म्हणून कळलं बग तुला."(त्याची म्हैस परत आली...,३३)

"सरपंचांनी आपनाला असं का सांगितलं? काय बी इचारलं तर आपून हो म्हणायचं... नुसती मान हलवायची... नंदीबैलासारखी... पर असं काय इचारनार हाय मंत्रीसायेब... काय बी उमगत न्हाय... समदं अजीबच हाय." (वादळ, ७२)

वरील उद्गारावरून गावातील भाषेच्या अविकसित स्तिथीचे चित्रण घडते. त्यांच्या अपूर्ण शब्द उच्चारण्याच्या पद्धतीचाही आलेख येथे येतो. या कथांना गोमंतकीय पार्श्वभूमी लाभली आहे हे खरे पण ही भाषा गोव्यात कुठेच बोलली जात असलेली आढळत नाही.

अधूनमधून शिव्यांचा वापरही या कथांतून झालेला आहे. उदा. 'मायझवणे', 'भैयझवरे', 'रांड'. काही ठिकाणी अश्लील असे संदर्भ आलेली आहेत. उदा. गाभ कथेत शेड्डूच्या मुलाला पैसे न दिल्याने तो, "पैसे गाणीखाली घालून बस." अशा प्रकारे तो बरळतो.

खेड्यात व्यक्तीव्यक्तींमध्ये होणारे संवाद किती राकट, ग्रामीण बोलीत येतात. त्यातून त्यांचे स्वभाव, प्रसंगनिर्मिती यांचे दर्शन घडते. अशा उद्गारांमुळे कथा कुठेही बोझड किंवा किळसवाणी बनत नाही. ग्रामीण भागात अशाप्रकारची भाषा सवयीनुसार तयार झालेली असते. त्यात शिव्या गाळ येणे साहजिकच असते.

गोव्यातील ग्रामसंस्कृतीत घडणाऱ्या सांस्कृतिक सणा सुधींना देवाकडे गाऱ्हाणे घालण्याची एक विशिष्ट पद्धत आहे त्याचा हि वापर लेखकाने या कथासंग्रहातील कथेतून केला आहे.

उदा. "हे देवा समर्था-"

"हय सायबा."

"आज तुझी ही भोळीभाळी लेकरां तुझ्या पायाकडे शरण येऊन गाऱ्हाणे मागता माझ्या समर्था."

"हय सायबाऽऽ"

"तू गावधनी, गाव राखणो, घडांना ते घडोन, वठांना ते वठोन, खुटी मारून मठी जोडपी, असो सर्व समर्थ माझ्या देवा-"

"हय सायबा."

"आजपर्यंत ह्या गावार नाना अरिष्टा इल्या, संकटा इल्या, प्रकोप झाल्या, त्या वेळार तू देवा, एका दिलान एके निष्ठेन गांवा पाठल्यान उभो रावला माझ्या समर्था."

"हय सायबा."(वहिवाट, १०१)

अशा प्रकारे गोव्यातील लयबद्ध पद्धतीने देवाकडे साकडं घालण्याच्या पद्धतीचा वापर लेखकाने 'वहिवाट', 'फोण' या सारख्या कथेतून केला आहे. ज्यामुळे या कथांना एकूण गोमंतकीय संस्कृतीचा पट लाभला आहे. काही कथांना शहरी पार्श्वभूमी लाभली आहे. या कथांतून शिक्षित लोकांचे चित्रण झाले आहे. डॉक्टर, वकील, राजकारणी या सारख्या हुद्यांवर आहेत. त्यांच्या तोंडुन अधूनमधून इंग्रजी शब्दांचा उल्लेख झालेला आढळतो. 'ऑफिस', 'ऑपरेशन', 'काँग्रेच्युलेशन', 'गुड मॉर्निंग' या सारखे इंग्रजी शब्द काही कथेतून आलेले आहेत.

काही कथांतून हिंदी भाषेचा देखील वापर झाला आहे. गोव्यात अनेक धर्माचे लोक राहतात म्हणून त्यांच्या कथांतून अशी वेगवेगळी व्यक्तिचित्रण डोकावताना दिसून येतात. त्या प्रत्येक व्यक्तीनुसार त्यांची भाषा बदलत जाते. बाहेरून गोव्यात येऊन स्थिर झालेल्या वास्को शहरातील माणसाच्या तोंडून हिंदी भाषेचा उच्चार झालेला आहे.

उदा. "यहाँ के सरकारी स्कुल में, बदली होकर आया हूँ."

"तो टॅक्सीकी जरूरत नही है, स्कूल तो नजदीक है." (हार,१२०)

त्याच प्रमाणे 'कहत कबीरा' या कथेत मुसलमान व्यक्तिरेखांच्या तोंडी लेखकाने हिंदी भाषात वापरली आहे. वस्तीत वावरणाऱ्या व्यक्तीच्या तोंडी हिंदी भाषेचा उल्लेख झालेला आहे त्यामुळे कथा अधिक प्रभावी झालेली दिसून येते. वस्तीतिल वास्तव चित्रण करणारी भाषा कथेत वापरली आहे.

उदा "ये...क्या बे, आपको क्या चाहिये?", "तो इधर इतना टाइम क्यो खडे हो....?"(गोल चेहऱ्याचा तरुण, १२)

विठ्ठल गावसांच्या कथेतून काही ठिकाणी चित्रमय भाषाशैली निर्माण झालेली आढळून येते. "त्यांचं ते ऐसपैस पसरलेलं हिरवंकंच... कुळागार... आकाशाला गवसणी घालणारी नारळी-पोफळीची झाडं... त्याच्या खाली असलेलं केळीचं बन... त्याच्या वरच्या बाजूला असलेली आंब्या फणसाची झाडं पाटात वाहणारं खळखळतं नितळ पाणी...."(बांध,५४)

"तांबडंलाल सूर्यबिब हळूहळू समुद्राच्या पोटात जातं होतं. त्याच्या सभोवती परित उभं राहून चिखलातले छोटे छोटे मासे टिपणारे पांढरेशुभ्र बगळे एक एक करून उडून जात होते. आकाशात कावळे काव काव करीत जमू लागले होते." (लवण,१)

"पावसाची रीप् रीप् थोडीशी मंदावली तसा तो उठला आणि बाहेर आला. पडवीच्या पायऱ्यांवर उभे राहून त्याने वर पाहिले. काळोख असूनसुद्धा आकाश थोडंसं उजळल्यासारखं दिसत होतं." (वादळ, ६९) वरील उदाहरणांवरून गावसांची प्रसंग चित्रण करण्यासाठी वापरलेली भाषा चित्रमय स्वरूपाची असलेली दिसून येते.

लेखकाने परिस्तिथीनुसार योग्य अशा भाषेचा वापर आपल्या लेखनात केला आहे म्हणून त्यांच्या कथा या वाचनीय ठरतात.

## ५.४ जीवन दृष्टी

विठ्ठल गावस यांच्या कथांमधून गोमंतकीय जीवनाचे चित्रण झालेले आहे. ते करत असताना त्यांनी अनेक गोमंतकीय विषय मांडलेले आहेत. लेखकाने गोमंतकीत ग्रामीण जीवन त्याचप्रमाणे अनेक गोवामुक्ती

नंतर घडणाऱ्या अनेक बदलांचे चित्रण कथांमधून मांडले आहे. बदलत्या गोमंतकीय जीवनामुळे समाजात निर्माण झालेल्या अनेक समस्यांचे व त्याच्या विषयी कळवत व्यक्त करणाऱ्या कथा लेखकाने मांडल्या आहेत. तर लेखकाने काही कथांमधून जीवन जगण्या विषयीचा दृष्टिकोण लिहिला आहे.

'देऊळ' या कथेत लेखकाने खाण व्यवसाय गावात आल्यामुळे गावाचे बदलते रूप चित्रित केले आहे. खाणमातीने लोकांना काही काळासाठी जगविले खरे पण त्यातून लोकांच्या सुख समाधानाने जगणाऱ्या आयुष्याची माती केली. सुरुवातीच्या काळात शेती सोडली तर अन्य व्यवसायाबद्धल लोकांना माहिती नव्हती. त्याकाळी आपले पर्यावरण हिरव्यागार झाडा झुडुपांनी समृद्ध होते. माणसांमधली संबंध हे कौटुंबिक, समजुतीच्या पातळीवरचे होते. माणसांच्या अपेक्षा सर्व सामान्य पातळी वरच्या होत्या. जसा काळ बदलला लोकांच्या अपेक्षाही बदलल्या सुरुवातीला देवळाच्या बांधकामाच्या गोष्टीने नाचणारे, जल्लोष करणारे लोक हळूहळू देवालासोडून स्वतःचा विचार करू लागले. देऊळ बांधल्याने देवाचे दारिद्र संपले तसेच आपले ही संपेल या आशेने लोक भांबावून गेले. खाणीमुळे लोकांना रोजगार व भरपूर पैसे मिळू लागले. म्हणून लोकांनी पारंपरिक शेती व्यवसाय सोडला. सर्वजण खाणमातीतून पैसे कमावण्याच्या नादाला लागले. कंपनीच्या मालकाच्या सांगण्यावरून गावातील देवाला भव्य असे मंदिर बांधण्यात आले. पण या बदलत्या काळात पूर्वी असलेले देवळाचे वातावरण बहुतेक प्रमाणात बदलून गेलेले होते. बदलत्या काळानुसार लोकांना पैसा महत्वाचा वाटू लागला. सगळे लोक पैशांच्या मागे धावू लागले. खाण बंद करण्यात येते त्यावेळी त्या गावातील लोक ही तेथून निघून जातात. ज्या देवामुळे लोकांची परिस्तिथी सुधारली त्याच देवाला शेवटी लोक गावात एकट्याला सोडून निघून गेले. खाणव्यवसाय गोव्यात आल्या नंतर पर्यावरणाची आणि लोकांची झालेल्या उध्वस्त जीवनाचे चित्रण येथे करतात.

'गोष्ट आजोबांची' ही कथा देखील खाण व्यवसायामुळे लोकांच्या बदलत्या जीवन पटाचे चित्रण करणारी ठरते. माणसांची अपेक्षेपेक्षा जास्त मिळवण्याच्या मनोवृत्तीमुळे हातातून निसटणाऱ्या सुखी, आनंदी जीवनाचे प्रत्ययकारी चित्रण लेखक या कथेतून करतात.

'अदेशी' या कथेतून लेखकाने भारतीय नागरिकत्व गमावल्याने आंतोनची झालेली अवस्था यावर जीवनभाष्य केले आहे. या कथेत दोन मित्र आहेत. त्यातला आंतोन ह्याला पोर्तुगीज नागरियत्व मिळविण्याचे व पोर्तुगालला जाण्याचे वेड असते. तर त्याचा मित्र हा भारतीय नागरियत्वाचे महत्व जाणणारा असतो. तो

आंतोनला अनेक वेळा समजावण्याचा प्रयत्न करतो की कशा प्रकारे भारतीय देश हा अन्य देशापेक्षा सुरक्षित व संपन्न आहे. पण आंतोन मात्र त्याचे एकही ऐकून घेत नाही. आंतोन पोर्तुगालला गेल्यावर त्यांना पोर्तुगीज भाषा बोलण्याची सक्ती केली जाते. भारतीय नागरियत्व नाकारल्याने त्याला भारतात परतणे शक्य होत नाही. युरोपियन युनियन अस्तित्वात आल्या नंतर तो इंग्लंडला जातो. तेथे थोडी वर्षे काम करतो. त्यानंतर ब्रिटन देशाकडून पोर्तुगीज पासपोर्ट आलेल्या सांगळयांना युरोपियन देशातून बाहेर काढण्यात येते. कारण त्यांना काळया सावळया रंगाच्या माणसांची चीड यायची. पोर्तुगालला परत परतायचे ठरविले तर त्या देशाची आथिर्क स्तिथी खालावलेली असल्याने इतर देशातील लोकांना सांभाळून घेणे त्यांना घातक वाटत असे. अशा वेळी आंतोन सारख्या परदेशस्थ माणसांसमोर निर्माण झालेली स्तिथी ही भयावह होती. आंतोनने एका बाजूने भारतीय नागरियत्व गमावले होते तर, दुसऱ्या बाजूने पोर्तुगालचे नागरियत्व मिळवणे त्याच्यासाठी दुर्दैवी ठरले होते. तर अशा परिस्तिथीत भारतीय सरकारने दुहेरी नागरिकत्व देण्याच्या निर्णयाने आंतोन सारख्या व्यक्तीचे जीवन सावरण्यात आले असते. पण सरकारी कामकाज आणि आंतोनचा आपल्या मनावरील अनियंत्रणामुळे शेवटी आत्महत्या करतो व स्वतःला संपवतो. भारतीय नागरिकत्व मिळवण्याला भाग्य लागते अन्यथा आंतोनसारखी परिस्तिथी माणसावर ओढवली जाते. या जीवन जाणिवेवर प्रकाश टाकणारी ही कथा आहे.

'ओझे' या कथेत बदलत्या काळानुसार बहुजन समाजातील लोकांची होणारी कोंडी लेखकाने चित्रित केली आहे. ओझे पाठविण्याची प्रथा ही सवर्ण समाजातील लोकांमध्ये पूर्वी पाळली जायची. पण बदलत्या काळानुसार बहुजन समाजातील लोकांनीही या प्रथेचे अनुकरण करण्यास सुरुवात केली. गावात सरकारी नोकरी करणारा जावई मिळणे म्हणजे प्रतिष्ठेचे मानले जाते. सरकारी नोकरी करणारा हा साधा शिपाई असला तरीही त्याचे तोरे मोठे असायचे. त्याचप्रमाणे जाणूच्या मुलीच्या सासरकडून लग्ना नंतर दरवेळी ओझ्याची मागणी केली जाते. आणि ते पाठविण्याच्या नादात जानू पाडेली कर्जाच्या डोंगराखाली चिरडत जात असलेला या कथेत दिसून येतो. शेवटी तो भाटकाराच्या मुलीला पाठविण्याचे ओझे आपल्या मुलीच्या सासरी पोहोचवतो. तेथून परतल्यावर तो आपल्या गावाच्या विरुद्ध दिशेने वाटचाल करतो व नाहीसा होतो. प्रतिष्ठा, प्रथा-परंपरांच्या ओझ्याखाली असे कित्येक जानू समाजात कर्जाच्या डोंगराखाली चिरडत असावे अशा जीवना विषयक दृष्टिकोण वाचकांसमोर मांडणारी ही कथा आहे.

'निकाला नंतरची गोष्ट' या कथेत भ्रष्ट राजकरणाचे चित्रण झाले आहे. या कथेत निवडणूक लढविण्यासाठी उमेदवारांनी चालवलेल्या भ्रष्ट चाळयांचे चित्रण झालेले आहे. या कथेत लेखकाने फुटपाथवर राहाणाऱ्या माणसांचे दारिद्रपूर्ण जीवन उभे केले आहे. फुटपाथवरची माणसे ही छोटी मोठी कामे करून जगणारी असतात. रोजच्या जगण्यात त्यांच्या हाताला प्लास्टिक विकून दोन चार रुपये जमायचे. उमेद्वार मात्र निवडणूकीच्या वेळी या माणसांना आपल्याकडे जमवायचे. फुटपाथवरच्या लोकांचा सहभाग निवडणुकीच्यावेळी मतदान करण्यासाठी महत्वाचा असतो या गोष्टीचे पुरेपूर ज्ञान या राजकरणी माणसांना होते. फुटपाथवर राहणाऱ्या माणसांचे नागरिकत्व एरव्ही एका ठिकाणचे नसते. त्यांच्याकडे ओळखपत्र सुद्धा नसते. पण भ्रष्ट उमेदवार या लोकांना दुसऱ्याच्या नावावरून स्वतःला मत मारण्याचा आदेश द्यायचे आणि त्यासाठी त्यांना पैसे दिले जात होते. आणि त्या पूर्तीच या राजकर्णीयांची नजर या फुटपाथवरच्या माणसांवरून फिरकायची. पुढे ज्यावेळी विरोधी पक्षाला या गोष्टीची जाणीव होते की फुटपाथवरच्या लोकांनी पैसे घेऊन मत मारल्याने त्यांची पार्टी हरली. त्यावेळी ते या फुटपाथवरच्या लोकांना मारहाण करून तेथून हाकलावून देतात अशा वेळी निवडून आलेला उमेद्वार त्यांच्याकडे ढुंकून सुद्धा पाहत नाही. स्वतःच्या स्वार्थामुळे लोकांचा गैरफायदा घेण्याच्या मनोवृत्तीचे चित्रण या कथेत झाले आहे. माणसांमधल्या स्वार्थी स्वभावामुळे समाजात निर्माण झालेल्या भ्रष्ट जीवनावरचे भाष्य करणारी ही कथा आहे.

'वादळ' या कथेतही लेखक याच प्रकारच्या ग्रामीण जीवनातील भ्रष्ट राजकारणाचे जीवनविषयक दृष्टिकोन मांडण्याचा प्रयत्न करतात. मध्यस्ती असलेल्या सरपंच सारख्या माणसांमुळे गरजू लोकां पर्यंत त्यांच्या हक्काचे पैसे पोहोचविले जात नाहीत. आणि त्यामुळे रवळू सारख्या शेतकऱ्याला दारिद्र्यात जीवन काढावे लागते.

'सोयरिक' या कथेतुन बदलत्या गोव्याचे चित्रण लेखकाने टिपले आहे. या बदलत्या जीवन सरणीमुळे लोकांची ढासळत चाललेली मूल्यव्यवस्थेचे चित्रण या कथेत आले आहे. गोवा हे एका पर्यटन स्थळ म्हणून प्रसिद्ध असून हॉटेल, शॅक या सारख्या गोष्टी इथल्या किनारपट्टीवर निर्माण झाल्या. कॅसिनो, कारखाने या सारखे व्यवसाय गोव्यात होऊ लागले. या ठिकाणी रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या. तरुण पिढी या ठिकाणी नोकरी करू लागली. त्याचप्रमाणे गोपीची मुलगी देखील बोटीवर नोकरी करत होती. कॅसिनो सारख्या ठिकाणी अनेक अनैतिक व्यवहार चालाचे म्हणून गोपिला त्याच्या मुलीने तेथे नोकरी करणे आवडत नव्हते. पण तिच्या

नोकरीमुळे घरात चार पैसे येतात हे बघून त्याला गप्प राहावे लागत होते. मुलीचे लग्न करणे ही एका बापावर मोठी जबाबदारी असते. त्याची मुलगी लग्नाच्या वयाची झालेली असते म्हणून तो तिच्यासाठी सोयरीक शोधत असतो. त्यानुसार त्याला एक मुलगा आपल्या मुलींसाठी सापडतो. त्यांचा पाहण्याचा कार्यक्रम ठरविला जातो. नेमक्या त्याच दिवशी त्याची मुलगी घरी परतत नाही. अशा स्तिथीत तो घरा बाहेर पडतो तर त्याच्या कानावर बातमी येते की पोलिसांनी एका हॉटेलात धाड घातली होती आणि त्यात अनेक तरुणींना पकडण्यात आले होते. हे ऐकल्यावर एका बापाच्या मनाची कळवळ आणि अनपेक्षित प्रसंगी तरुणींचे होणारे उध्वस्त जीवन लेखक येथे मांडतात. शाणूच्या मुली प्रमाणेच गोपीची मुलगी त्यात असली असावी म्हणून ती घरी परतली नव्हती. या तरुणींन प्रमाणेच अन्य किती तरुणींचे जीवन या कॅसिनो सारख्या व्यवसायामुळे पणाला लागले असावे या गोष्टींबद्धल चिंता व्यक्त करणारी ही कथा आहे.

'अशीच एक संधाकाळ' या कथेत नोकरी करणाऱ्या तरुणाच्या मनातील आंदोलनांचे चित्रण केलेले आहे. शिवाय वासना-विकारांचेही चित्रण आढळते. वास्तविक पाहता बालपणी सुसंस्कार झालेला हा संवेदनशील तरुण आहे. पण वास्तविक गुंतागुंतीच्या जीवनात अनेक गोष्टींना तो बळी गेलेला आहे. सिगरेट, दारूचे व्यसन त्याला जडलेले आहे. त्याच्या डोक्यात प्रचंड वादळे आहेत. तरुणाचे तरुणींन विषयीचे आकर्षण आणि त्यातून त्याला मिळालेला नकार अशावेळी एका तरुणाच्या मनाची झालेली भावनिक कोंडी लेखक स्पष्ट करतात. प्रकट झालेल्या परिस्तिथीना सामोरे जाण्याचे बळ निर्माण न झाल्याने एखाद्या व्यक्तीची झालेली दयनीय अवस्था लेखकाने येथे स्पष्ट केली आहे.

विठ्ठल गावस यांनी जीवन विषयक दृष्टिकोन मांडणाऱ्या 'ओझे', वादळ', 'सोयरीक' इ या सारख्या अनेक कथा आपल्या कथासंग्रहात मांडल्या आहेत.

## निष्कर्ष

१. विठ्ठल गावास यांनी दारिद्र, गरिबीचे चित्रिण करण्यासाठी सूचक अशी वातावरण निर्मिती कथामधून केली आहे.

२. विठ्ठल गावसांच्या कथा ग्रामीण, शहरी, निमशहरी वातावरणात घडणाऱ्या आहेत.

३. आकर्षक नैसर्गिक वातावरणाचे चित्रण गावसांच्या कथेतून झाले आहे.

४. शहरातील धावपळीच्या वातावरणाचे चित्रण लेखक करताना दिसतात.

५. बकाल वस्तीतील वास्तवदर्शी चित्रण गावसांच्या कथेतून झाले आहे.

६. गावसांच्या कथांमधून हिंदी, इंग्रजी, भाषेचा वापर झाला आहे.

७. पात्रांच्या तोंडी निघणाऱ्या संवादासाठी गोव्यातील स्थानिक बोलींचा वापर झाला आहे.

८. निवेदनासाठी प्रमाण मराठी भाषेचा वापर झाला आहे.

९. मराठी कोंकणी भाषेतील म्हणींचा वापर कथांमधून झालेला आढळतो.

१०. प्रसंगचीत्रणासाठी चित्रमय भाषाशैलीचा वापर झाला आहे.

११. लेखकाने कथेत शहरी त्याचप्रमाणे ग्रामीण वातावरण निर्मिती सुचकपणे केलेली आहे.

१२. विठ्ठल गावासांनी प्रथम पुरुषी व तृतीय पुरुषी निवेदन पद्धतीचा वापर केला आहे.

१३. वातावरण निर्मितीसाठी फ्लॅशबॅक पद्धतीचाही वापर झालेला आहे.

१४. बदलत्या काळानुसार समाजात निर्माण होणाऱ्या परिस्तिथीकडे चिंताग्रस्थ दृष्टिकोणातून पाहण्याची जीवन विषयाक दृष्टिकोण त्यांच्या कथेतून दिसून येतो.

१५. जीवनाकडे आशावादी दृष्टिकोनातून पाहण्याचा जीवन विषयक दृष्टिकोण लेखकाने आपल्या कथे द्वारे मांडला आहे.

## संदर्भ

१. पावडे, व्यंकटी. "रा. र. बोराडे यांची कथा शोध आणि समीक्षा." इसाप प्रकाशन नांदेड, २०१३, पृ. १९२.

# प्रकरण ६

# समारोप आणि निष्कर्ष

# सामारोप आणि निष्कर्ष

## सामारोप

प्रस्तुत प्रबंधीकेत 'विठल गावास यांच्या कथासंग्रहांचा अभ्यास' या विषयावर अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे. पहिले प्रकरण 'कथा: स्वरूप व संकल्पना' असे आहे. या पहिल्या प्रकरणातून कथा या वाङ्मय प्रकारच्या सैद्धांतिक मांडणीची चर्चा करण्यात आली आहे. दुसरे प्रकरण 'गोमंतकीय मराठी कथा' असे आहे. त्यात गोमंतकीय कथेची वाटचाल, गोमंतकीय मराठी कथेतील प्रादेशिकता, गोमंतकीय मराठी कथेचे वेगळेपण, विठ्ठल गावस यांचे वाङ्मयीन योगदान या विषयावर भाष्य केले आहे. प्रकरण तिसरे हे 'विठ्ठल गावस यांच्या कथेतील जीवन चित्रण' असे आहे. त्यात त्यांच्या कथांमधून येणारा ग्रामीण परिसर व वातावरण, लोकसंस्कृती, समस्यारूपी कथानके, बदलते समाजजीवन यांचा अभ्यास केला आहे. चवथे प्रकरण 'गावसांच्या कथेतील व्यक्तिरेखांचा अभ्यास' या विषया अंतर्गत ग्रामीण पुरुष व्यक्तिरेखा आणि ग्रामीण स्त्री व्यक्तिरेखा यांचा अभ्यास केला आहे. पाचवे प्रकरण 'वाङ्मयीन मूल्यमापन' असे आहे. या प्रकरणा अंतर्गत विठ्ठल गावसांच्या कथेला लाभलेल्या वातावरण निर्मिती , निवेदन, भाषाशैली, कथांतून दिसून येणारी जीवनदृष्टी यांचा विचार केला आहे. प्रकरण सहावे 'निष्कर्ष' आहे.

## निष्कर्ष

नव्वोदोत्तरी काळातील विठ्ठल गावस हे एक महत्वाचे गोमंतकीय कथाकार आहेत. प्रत्यक्ष गोमंतकीय परीपेक्ष वाचकांसमोर आणण्याचे कार्य विठ्ठल गावसांनी कथालेखानातून केले आहे. ते करत असताना गोव्यातील ग्रामीण जीवन त्यांनी प्रकर्षाने चित्रित केले आहे. ग्रामीण समस्या, ग्रामीण व्यक्तिरेखा, त्यांचे व्यवसाय यांचे अत्यंत सूक्ष्म असे चित्रण त्यांच्या चारही कथासंग्रहातून घडते. गोव्यातील ग्रामीण जीवनाचे चित्रण करत असताना लोकांची पारंपरिक रहाणीमान, पारंपरिक व्यवसाय, गोमंतकीय संस्कृती हे त्यांच्या नजरेतून निसटत नाही. गोवा मुक्तीनंतर बदलत्या गोमंतकीय जीवनाचा जीवनपट वाचकांसमोर आणण्याचे कार्य विठ्ठल गावसांच्या 'कॅथरीन', 'लवण', 'ओझे', 'फिंगर बाऊल' या कथासंग्रहानी केले आहे.

1. कथा हा मानवी जीवन दर्शन घडवणारा एक साहित्यप्रकार आहे.
2. कथा हा कमी वेळात महत्वपूर्ण अर्थ मांडणारा एक साहित्यप्रकार आहे.

3. कथेतून एकच एक संस्कार केला जातो.
4. मुक्तीपूर्वीची कथा हि रंजनप्रधान होती पण मुक्तीनंतरची कथा ही अस्सल वास्तवाचे चित्रण करणारी आहे.
5. मुक्तीपुर्वीच्या कथेच्या तुलनेत मुक्तनंतरच्या  कथेत अनेक नवीन विषय हाताळले आहे.
6. नव्वदोत्तर काळात प्रादेशिक कथेत  ग्रामीण जीवन चित्रण जास्त प्रमाणात झालेले आहे.
7. विठ्ठल गावसांनी कथेत मांडलेले विषय हे वैविध्यपूर्ण आहेत.
8. गावसांच्या अनेक कथांना गोमंतकीय ग्रामीण वातावरण लाभले आहे
9. समाजातील अनेक समस्यांना वाचा फोडणाऱ्या गावसांच्या कथा आहेत.
10. विठ्ठल गावसांच्या कथांमधून  समाज जीवनात होणाऱ्या सुक्ष्म बदलांचे चित्रण झाले आहे.
11. गोमंतकीय ग्रामीण जीवनातील गावगाड्याचे प्रत्ययकारी चित्रण विठ्ठल गावसांच्या कथांमधून दिसून येते.
12. ग्रामीण स्त्री जीवनाचा वेध घेणाऱ्या अनेक कथा विठ्ठल गावसांनी 'ओझे' या कथासंग्रहात लिहिल्या आहेत.
13. या कथासंग्रहातील काही कथा या स्त्रीवादी स्वरूपाच्या आहेत. उदा. सवाई, चंवर.
14. 'कॅथरीन' या कथासंग्रहातून गोमंतकीय ग्रामीण ख्रिस्ती समाजाचे चित्रण लेखकाने केले आहे.
15. गोमंतकीय ग्रामीण जीवनातील प्रथा, परंपरांचे चित्रण लेखक अनेक कथांतून करतात.
16. ग्रामीण जीवनातील राजकारण आणि त्यात दडपणारा ग्रामीण माणूस याचे प्रत्ययकारी चित्रण 'वादळ' या कथेतून चित्रित झाले आहे.
17. ग्रामीण जीवनातील प्रथा, परंपरा, संकेतामुळे व्यक्तीमनाची होणारी कोंडी काही कथांमधून अचूकपणे चित्रित झाली आहे.
18. मराठी, कोंकणी भाषेतील म्हणींचा वापर कथांमधून झालेला आढळतो.
19. गोमंतकीय संस्कृती दर्शविणाऱ्या अनेक गोष्टींचा उल्लेख या कथासंग्रहातील वेगवेगळया कथांतून होतो. उदा. घुमट, काजूची फेणी, सांजाव सण, गडे उत्सव.
20. स्त्री जीवनातील एकाकीपण, दारिद्र्य, दुख: अशा अनेक स्त्री भावभावनांचे विषय लेखक सोबत, संगती इ. यासारख्या कथेतून मांडतात.

21. गोव्यात निर्माण होणाऱ्या नवीन जीवन पद्धतीमुळे पारंपारिक जीवन पद्धतीचा होणारा ऱ्हास विठ्ठल गावसांच्या कथेतून दिसून येतो.
22. 'देऊळ', 'फोण', 'वहिवाट' या सारख्या कथा आपल्याला धार्मिक रूढी, प्रथा परंपरेकडे डोळसपणे पाहण्याची दृष्टी देतात.
23. 'फिंगर बाऊल' या कथासंग्रहात ग्रामीण गोवा व शहरी गोवा यांचे चित्रण झालेले आढळते.
24. जाती, धर्म, प्रथा, परंपरा, भाषा, संस्कृती यांचे काळपरत्वे बदलतेरूप लेखकाच्या 'कहत कबीरा', 'दर्याचा पूत', 'ओझे' इ कथातून दिसून येते.
25. विठ्ठल गावसांच्या कथेत आजच्या गोमंतकीय जीवन जाणीव, व्यक्तिरेखा, निसर्ग, परंपरांचे चित्रण आलेले आहे.
26. विठ्ठल गावसांनी वातावरण निर्मितीसाठी फ्लॅशबॅक पद्धतीचाही वापर केलेला आहे.
27. कथेतील संवादांसाठी लेखकाने स्थानिक बोली व पेडणे सदृश्य बोलीचा वापर केला आहे.
28. 'फिंगर बाऊल' या कथासंग्रहातील कथांमधून प्रामुख्याने गोव्याच्या सत्यस्तीथीचे संदर्भ आलेले आहेत.
29. विठ्ठल गावसांच्या कथांमधून मध्यमवर्गीय समजाजीवन व ग्रामीण समाजजीवन तितक्याच ताकदीने चित्रित झालेला आहे.
30. परप्रांतीय व्यक्तीरेखांपासून ते ग्रामीण व्यक्तिरेखांचे चित्रण विठ्ठल गावसांच्या कथेतून घडते.
31. देवदासी स्त्रियांचे दारिद्र्यपूर्ण चित्रण 'सौभाग्य', 'पेजेला देईल...' या सारख्या कथांमधुन अचूकपणे झालेले आहे.
32. काही व्यक्तिरेखा या स्वतःला आधुनिक जीवनाशी जुळवून घेवू पाहणाऱ्या आहेत.
33. गावसांच्या कथेतील अनेक व्यक्तिरेखा या एकसारख्याच असलेल्या दिसून येतात.
34. काही कथांमधून घटना प्रसंगांची पुनरावृत्ती झालेली दिसून येते.
35. कथेतून चित्रित झालेल्या स्त्रिया पुरुषांच्या अतृप्त वासनांना बळी पडलेल्या आहेत.
36. ग्रामीण जीवनातील राजकारणा बरोबरच राष्ट्रीय स्थरावरच्या राजकारणाचे चित्रण 'अदेशी' सारख्या कथेतून लेखकाने केले आहे.
37. निवेदनासाठी प्रमाण मराठी भाषेचा वापर झाला आहे.

38. विठ्ठल गावसांच्या कथा या सकारात्मक जीवन दृष्टीकोण मांडणाऱ्या आहेत.

39. बदलत्या काळानुसार समाजात निर्माण होणाऱ्या परिस्तिथीकडे चिंताग्रस्थ दृष्टिकोणातून पाहण्याचा जीवन विषयाक दृष्टिकोण त्यांच्या कथानांतून दिसून येतो.

40. विठ्ठल गावस हे एक ग्रामीण कथाकार नसून ग्रामीण कथा हे त्यांच्या कथालेखनाचे वैशिष्ट आहे.

# परिशिष्टे

## मुलाखत

१) तुम्ही लेखनाकडे कसे वळलात?

माझे वडिल दशावतार नाट्य कलाकार होते. ते दशावतारी नाटकात काम करायचे. तशेच दशावतार नाटकेही लिहायचे. गोव्यातील बऱ्याच भागातून बरेचजण त्यांच्याकडून नाटक लिहून घ्यायचे. त्यांनी पौराणिक स्वरूपाची बरीच नाटके लिहिली होती. पण नाटके छापायची असतात हे त्यांना माहिती नव्हते. नाटके छापायला काय करायचे असते ते ही त्यांना माहित नव्हते. ती नाटके छापली गेली असती तर आज ते गोमंतकातील प्रसिद्ध नाटककार म्हणून प्रसिद्धीस आले असते. मला वाटतं त्यांच्याच रक्तातला हा गुण माझ्यात उतरला असवा आणि आणि मी लेखक झालो असावा.

२) तूम्हाला कथा लेखनाची प्रेरणा कुणाकडून मिळाली?

लहानपणापासून मला वाचनाची आवड होती. हातात मिळेल तो कागद मी वाचायचो. एकदिवस असाच वाचत असताना कोकणीतील प्रसिद्ध लेखक पुंडलिक नाईक यांचा 'मुठैय' कथासंग्रह माझ्या हाती लागला. तो घरी आणून मी भराभर वाचून काढला. तो कथासंग्रह वाचून मी भारावून गेलो. पुंडलिक नाईक यांनी त्या कथासंग्रहात वळवई, सावयवेरे कडचा प्रदेश रसरसीत पणे चित्रित केला आहे. तेथील माणसे, राखणे शेतकरी मानाय, सण-उत्सव प्रत्ययकारीपणे रेखाटले आहेत. अशाप्रकारचे लेखन आपणीही करावं असे मला वाटले आणि मी लेखनाकडे वळलो

३) तुमच्या कथांच्या शिर्षकांची वैशिष्टये सांगा ?

एखाद्या कथेला शीर्षक द्यायचे असते त्यावेळी मी फार विचार करत असतो. शिर्षकांमध्ये कथांचा सार यायला पाहिजे असे मला वाटते. तसेच शीर्षकवाचून वाचकांच्या मनात कुतूहल जागृत व्हायला हवे. वाचकाला ती कथा वाचावीशी वाटली पाहिजे. उदा. मी 'लवण' कथेचे देईन.

'लवण' हा संस्कृत शब्द आहे व त्याचा अर्थ मीठ असा आहे. ही मिठागराची कथा आहे. पण सर्वसाधारण वाचकाला लवण या शब्दाचा अर्थ माहित नसतो. त्यामुळे वाचक ती कथा वाचायला उत्सुक होतो. अशा प्रकारची शीर्षके मी माझ्या कथांना दिली आहेत.

४) तुमच्या लेखनात आलेले विषय हे कोणत्या आधारावर तुम्ही निवडले आहेत?

मी वास्तववादी लेखन करणारा लेखक आहे, लेखक जेव्हा एखादी साहित्यकृती तयार करत असतो तेव्हा ती थोडीशी वास्तव थोडीशी काल्पनीक असते. वास्तव आणि कल्पना याचे ते मिश्रण असते. माझ्या मते लेखकाच्या आयुष्यातला २०-२५ वर्षा पर्यंतचा काळ महत्वाचा असतो. ह्या काळात तो अतिसंवेदनशील असतो. या काळात त्याने पाहिलेली माणसे, प्रसंग, घटना त्याच्या मनावर पुढच्या काळात सतत आघात करत असतात. मी माझ्या त्या वयात गावाकडची जी माणसे पाहिली, प्रसंग, घटना पाहिल्या आजूबाजूचा परिसर पहिला. माणसाचे रीतिरिवाज, श्रद्धा अंधश्रद्धा पाहिल्या त्यांच्यावर आधारित कथा लेखन केले आहे. तेच माझ्या कथांचे विषय आहेत.

५) तुमच्या कथांतून जास्तप्रमाणात ग्रामीण स्त्रियांची दुःखे चित्रित होण्यामागची करणे काय?

गोव्यामध्ये बऱ्याच स्त्री लेखिका आहेत. पण, माझ्या एवढे स्त्रियांच्या प्रश्नांवर सखोल कथालेखन केलेला दुसरा कथालेखक नाही हे सत्य आहे. माझा जन्म खेडेगावातला त्यामुळे तेथील स्त्रियांचे प्रश्न, त्यांची दुःखे मी लहानपणापासून पहिली आहेत, आपल्या समाजात सगळ्यात जास्त दुःख सहन करणाऱ्या या ग्रामीण स्त्रीयाच आहेत. विधवा स्त्रियांचे प्रश्न, नवरा दारुडा असल्यामुळे आपला संसार उभा करण्यासाठी धडपडणाऱ्या स्त्रिया, स्त्रियांचे होणारे लैंगिक शोषण, मजुरी करणाऱ्या स्त्रियांचे प्रश्न हे सगळे मी माझ्या कथांमधून मांडलेले आहे.

६) कथालेखनासाठी वापरलेल्या विविध बोलीबदल, कास सांगू इच्छितात?

मी माझ्या कथामध्ये निवेदनासाठी प्रमाण मराठी भाषेचा उपयोग केला आहे. फक्त संवादासाठी बोली भाषेचा वापर केला आहे. मी माझ्या कॅथरीन या पहिल्या कथासंग्रहात मी राहत असलेल्या परिसरातील बोलीत संवाद लिहिले आहेत. माझा हा कथासंग्रह मराठीतील एका प्रसिद्ध समीक्षकाच्या वाचनात आला. त्यांनी मला एक छोटेसे पत्र लिहिले. त्यात त्यांनी लिहिले कि, "गोमंतकीय मराठी लेखकांनी आपला वाचक वर्ग कोण आहे ते पाहून संवाद लेखन करावे." त्याचे ते पत्र वाचून माझ्या पुढ्यात एक प्रश्न उभा राहिला. संवाद लेखन कोणत्या भाषेत करावे... प्रमाण भाषेत संवाद लिहिले तर त्या साहित्याला या मातीचा गंध येणार नाही. आणि ते मी पक्कं जाणून होतो. शेवटी विचार करून मी ठरवले. गोव्यातील पेडणेची बोली ही मराठीला जवळची आहे आणि मराठी भाषिक माणसाला ती सहज कळते म्हणून पुढे मी पेडणेच्या बोलीतून संवाद लेखन केले. त्यासाठी त्या बोलीचा अभ्यासही मी केला.

७) तुमची कथा अन्य कथाकरांपेक्षा वेगळी कशी ठरते?

हलकीफुलकी फँटासीच्या अंगाने जाणारी कथा लिहिण्याचे मी ठरवले असते तर मी दहा-पंधरा कथा संग्रह लिहिले असते, पण मला तसं करायचं नव्हतं. मला मळलेल्या वाटूयाने जायचे नव्हते. आपली वेगळी वाट तयार करायची होती. मी माझ्या कथांमधून मुक्तीनंतर बदललेल्या गोमंतकाचा वेध घेतला आहे. गोमंतकाच्या समस्या, प्रश्न कथांमधून मांडले आहेत. इथला निसर्ग, माणसे, त्यांचे रितीरिवाज, सण-उत्सव, श्रद्धा-अंधश्रद्धा यांचे चित्रण केले आहे. हे सगळं वास्तव आहे. स्वप्नरंजनात कल्पनाविलासात मी रमलो नाही, त्यामुळे माझी कथा इतर कथाकारांपेक्षा वेगळी आहे.


८) लेखन करणाऱ्या नव्या पिढीला काय संदेश देऊ पाहता?

संदेश देण्याएवढा मोठा लेखक मी नाही. दुसरं संदेश देणं वगैरे खोट असतं असे मी मानतो. एखाद्याचा संदेश ऐकून कोणीही मोठा लेखक होत नाही. मला इथं ऑऱ्हान पामूक हा नोबेल


पारितोषिक विजेत्या लेखकाची आठवणी होते. पामूक हा तुर्कीचा लेखक आहे. नोबल पारितोषिक स्वीकारल्यानंतर त्यांनी भाषण केले होते. त्याचा मराठी अनुवाद अंतर्नाद या मराठी मासिकात छापला होता. ते आपल्या भाषणात म्हणतात, "लेखन करणे म्हणजे सुईच्या टोकाने विहिर खणण्यासारखे आहे." सुईच्या टोकाने विहीर खणण! कल्पनाच करा किती कष्ट करावे लागेल. नवोदिताने एवढे कष्ट करण्याची तयारी ठेवली पाहिजे. लेखनाचा ध्यास घ्यायला हवा...सतत चिंतन, मनन करायला हवं. प्रचंड वाचन करायला हवं तरच हाताला काहीतरी लागण्याची शक्यता असते.


# लेखकाची मुलाखत घेत असतानाची छायाचित्रे







# कथासंग्रहांची मुखपृष्टे



## आधार ग्रंथ


१. गावस, विठ्ठल. "कॅथरीन." गमभन प्रकाशन पुणे, १९९४.
२. गावस, विठ्ठल. "लवण." गोमंतक मराठी अकादमी पणजी, २००३.
३. गावस, विठ्ठल. "ओझे." गोमंतक मराठी अकादमी पणजी, २०१०.
४. गावस, विठ्ठल. "फिंगर बाऊल" गोमंतक मराठी अकादमी पणजी, २०००.


## संदर्भ ग्रंथ सूची


१. बडवे, सतीश. "मराठी कथा स्वरूप व संकल्पना." गंधारे द. के.(संपा), 'मराठी वाङ्मय प्रकार : स्वरूप, संकल्पना व वाटचाल', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, २०१७.
२. जोशी, सुधा. "कथा : संकल्पना आणि समीक्षा." मौज प्रकाशन मुंबई, २०१२.
३. The New Encyclopaedia Britannica, volume 16, Helen Hemingway, Benton.
४. शेवडे, इंदुमती. "मराठी कथा : उगम आणि विकास." सोमय्या पुब्लीशिंग हाउस मुंबई.
५. हातकणंगलेकर, म. द. "मराठी कथा : रूप आणि परिसर." सुपर्ण प्रकाशन पुणे, १९८६.
६. फडके, ना. सी. "लघुकथा लेखन मंत्र आणि तंत्र." व्हीनस प्रकाशन पुणे, १९५२.
७. शेवडे, इंदुमती. "मराठी कथा : उगम आणि विकास." सोमय्या पुब्लीशिंग हाउस मुंबई.
८. कुलकर्णी, वा. ल. "मराठी विश्वकोश." खंड ३, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ मुंबई, १९७६.
९. जोशी, सुधा. "कथा : संकल्पना आणि समीक्षा." मौज प्रकाशन गृह मुंबई, २०१२.
१०. पावडे, व्यंकटी. "रा. र. बोराडे यांची कथा शोध आणि समीक्षा." इसाप प्रकाशन नांदेड, २०१३.
११. कानोळकर, बाळकृष्णजी. 'कथा', प्रभुदेसाई, वि. बा., घवी, रवीन्द्र, (संपा.), "गोमंतकीय मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड १." गोमंतक मराठी अकादमी प्रकाशन, २००३.
१२. कानोळकर, बाळकृष्णजी. 'कथा', प्रभुदेसाई, वि. बा., घवी, रवीन्द्र, (संपा.), "गोमंतकीय मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड १." गोमंतक मराठी अकादमी प्रकाशन, २००३, पृ.
१३. महाले,नारायण. 'कथा', नाडकर्णी, एस. एस., कोमरपंत, सोमनाथ (संपा.), "गोमंतकीय मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड २." गोमंतक मराठी अकादमी प्रकाशन, २००३.
१४. पंडित, अर्चना. "पं. महादेवशास्त्री जोशी यांचे कथाविश्व." कॉन्टीनेंटल प्रकाशन, १९९९.

१५. कानोळकर, बाळकृष्णजी. "गोमंतकीय साहित्यातील शोध्स्थळे." गोमंतक मराठी अकादमी प्रकाशन बार्देस, २००८.

१६. बापट, विनय. "नव्वदोत्तर गोमंतकीय मराठी कथा." हेरोळे गजानन (संपा.), 'नव्वदोत्तर मराठी कथा, गोदा प्रकाशन औरंगाबाद, २०१८.

१७. जोशी, सुधा. "कथा : संकल्पना आणि समीक्षा." मौज प्रकाशन गृह मुंबई, २०१२.

१८. पावडे, व्यंकटी. "रा. र. बोराडे यांची कथा शोध आणि समीक्षा." इसाप प्रकाशन नांदेड, २०१३.